**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

**अर्धा- तास चर्चा**

**अर्धा-तास चर्चा क्रमांक 1, 2 व 3 बाबत**

**तालिका सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या क्रमांक 1, 2 व 3 वरील अर्धा-तास चर्चा माननीय मुख्यमंत्री खालच्या सभागृहात व्यस्त असल्यामुळे पुढे ढकलण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यांची विनंती मान्य केली असल्यामुळे प्रथम चौथ्या क्रमांकावरील अर्ध्या तासाची चर्चा घेण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझ्या अर्धा-तास चर्चेशी संबंधित असलेले मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

**तालिका सभापती** : ठीक आहे. प्रथम क्रमांक 6 वर दर्शविलेली अर्ध्या-तासाची चर्चा घेण्यात येईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

**पृ. शी.** :शहापूर तालुक्यातील खर्डी ग्रामीण रुग्णालय सुसज्ज नसणे तसेच औषधे व तज्ज्ञ डॉक्टरांअभावी रुग्णांची होत असलेली गैरसोय

**मु. शी.**:शहापूर तालुक्यातील खर्डी ग्रामीण रुग्णालय सुसज्ज नसणे तसेच औषधे व तज्ज्ञ डॉक्टरांअभावी रुग्णांची होत असलेली गैरसोय यासंबंधी डॉ.दीपक सावंत वि. प. स. यां□ी उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ा □ि□म 92 अ□ये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रतो :-

"शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामीण भागातील गरीब जनतेला आरोग्य सुविधा मिळावी, या हेतूने शासनाने खर्डी ग्रामीण रुग्णालयाला माहे एप्रिल, 2006 मध्ये मंजुरी देऊनही अद्याप शहापुर येथील रुग्णालये संजीवनीच्या प्रतिक्षेत असणे, साडेतीन वर्षांचा कालावधी होऊनही या रुग्णालयात अपुरा कर्मचारी वर्ग दिल्यामुळे ग्रामीण जनतेचे हाल होणे, खर्डी ग्रामीण रुग्णालयाच्या उद्घाटनावेळी आरोग्य विभागाच्या जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जागा उपलब्ध झाल्यावर दोन वर्षात सुसज्ज इमारतीसह ग्रामीण रुग्णालय उभारणीचे संकेत देवून व त्यासाठी खर्डी ग्रामपंचायतीने सात एकर जागा उपलब्ध करुन देवूनही आजमितीस आरोग्य विभागाकडून त्यास पुरेसा प्रतिसाद न मिळणे, सदर रुग्णालयात औषधांचा अपुरा साठा, वैद्यकीय अधिकाऱ्यांची अपुरी संख्या, व तज्ज्ञ डॉक्टर नसणे, परिणामी खर्डी कसारा भागातील सुसरवाडी, कोथळा, माळ, उंबरमाळी, भोसपाडा आदी भागात जीवघेण्या साथीचा प्रादुर्भाव होणे, दरवर्षी गॅस्ट्रोच्या साथीचे थैमान सुरु असणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष परिणामी ग्रामीण जनतेत पसरलेला असंतोष व संताप याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

सभापती महोदय, मागील 3 सत्रामध्ये दाखविण्यात आलेली आणि प्रत्येक वेळी पुढे ढकलत तब्बल दोन वर्षाच्या कालावधीनंतर या अर्ध्या-तास चर्चेवर प्रत्यक्षात चर्चा होत आहे. मला वाटले होते की, या अर्ध्या-तासाच्या चर्चेची गरज लागणार नाही. कारण 2 वर्षाच्या कालावधीत

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

डॉ.दीपक सावंत...

खर्डी येथील ग्रामीण रुग्णालयाची परिस्थिती सुधारली असेल. त्यामुळे कदाचित मला अर्ध्या-तासाची चर्चा मागे घेण्यासाठी मंत्री महोदयांना विनंती करावी लागेल. तेथे 'ऑल इज वेल' असेल. तसे इ ााले असते तर मला बरे वाटले असते आणि सगळयांचा वेळ सुध्दा वाचला असता. परंतु शासनाकडून अशी आशा बाळगणे व्यर्थ आहे.

सभापती महोदय, शहापूर, विक्रमगड, बोईसर याठिकाणच्या ग्रामीण रुग्णालयांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. खर्डी येथील ग्रामीण रुग्णालयाला कधी संजीवनी मिळणार आहे ते समजत नाही. एप्रिल, 2006 मध्ये या रुग्णालयाच्या इमारतीला मंजुरी मिळाली आहे.. खर्डी या गावाला नेहमी भूकंपाचे वारंवार धक्के बसतात. या इमारतीच्या भूमिपूजनाच्या वेळी 2 वर्षात ही इमारत तयार होईल असे सांगितले होते. ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीसाठी खर्डी ग्रामपंचायतीने 7 एकर जागा दिलेली आहे. त्यामुळे या ग्रामीण रुग्णालयाची सद्य:स्थिती काय आहे त्याची माहिती मंत्री महोदयांनी दिली तर बरे होईल. आरोग्य विभाग या ग्रामीण रुग्णालयाला पुरेसा प्रतिसाद देत नाही. शहापूर तालुक्यामधील या रुग्णालयात आलेल्या सन 2010-11 मध्ये आंतररुग्ण व बाह्य रुग्णांची संख्या 1 लाख 5 हजार इतकी आहे. ही आकडेवारी माझी नाही तर सन 2010-11 या वर्षाच्या आरोग्य विभागाच्या अंदाजपत्रकातील आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 11:05

डॉ.दीपक सावंत....

या भागातील सुसरवाडी, कोथळा, माळ, उंबरमाळी, भोसपाडा अशी अनेक गावे आज आरोग्य सेवेपासून वंचित आहेत. खर्डी रुग्णालयामध्ये कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर ॲम्बुलन्स घेतलेली आहे. ती देखील तोडक्यामोडक्या अवस्थेमध्ये आहे. या रुग्णालयामध्ये पुरेसा स्टाफ नाही. हा भाग संपूर्ण आदिवासी असून गरीब आदिवासी कुटुंबे याठिकाणी उपचारासाठी येत असतात. या रुग्णालयामध्ये ॲण्टी स्नेक व्हेनॉमचा तुडवडा असतो. या भागामध्ये सर्प आणि विंचू मोठ्या प्रमाणावर असतात. तरी देखील सर्प आणि विंचू वरील औषधे या रुग्णालयामध्ये उपलब्ध नसतात. आदिवासी विकास विभागातर्फे पटकी नियंत्रण कार्यक्रम राबविला जातो. आदिवासी विकास विभागाच्या अंदाजपत्रकीय पुस्तकाच्या पृष्ठ क्रमांक 332वर पटकी नियंत्रण कार्यक्रमासाठी गेल्या तीन वर्षामध्ये एक रुपयाची देखील तरतूद केली गेली नाही. या भागामध्ये शुध्द पिण्याच्या पाण्याची देखील चणचण असते. जे पाणी मिळते ते दूषित असते. पावसाळा आणि उन्हाळयामध्ये या भागामध्ये गॅस्ट्रोच्या साथीची मोठ्या प्रमाणावर लागण होत असते. बोरवेल नसल्यामुळे या भागात पाण्याचा प्रचंड तुटवडा असतो. तेव्हा या जिल्हा रुग्णालयाला माननीय मंत्री महोदय कधी संजीवनी देणार हा या चर्चेचा मूळ गाभा आहे. गेल्या साडेतीन वर्षापासून या रुग्णालयामध्ये 1 डॉक्टर, 3 परिचारिका आणि 2 कर्मचारी एवढाच स्टाफ उपलब्ध आहे. तेथे एक्स-रे, सोनोग्राफी मशिन्स नाहीत, सुसज्ज अशी लॅबोरेटरी नाही.

सभापती महोदय, शहापूर उप जिल्हा रुग्णालयाची परिस्थिती देखील अशीच आहे. तेथे देखील पुरेसा स्टाफ नाही. खर्डी-कसारा या भागामध्ये विविध साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होत असतो. या भागामध्ये कुपोषण खूप मोठ्या प्रमाणावर आहे. कुपोषण दूर करण्यासाठी राबविण्यात येणा-या नव संजीवनी योजना, जननी सुरक्षा योजना यासारख्या विविध योजना आज फक्त कागदावरच आहेत. माहेर योजना राबविण्यासाठी सभागृहासारखी मोठी जागा लागते. गभर्वती मातेला त्याठिकाणी आणून 7 दिवस तिची काळजी घेऊन तिला डिस्चार्ज दिला जाते. त्याठिकाणी अशी जागाच नसल्यामुळे कोणत्याही प्रकारचे काम होत नाही.

सभापती महोदय, बाल विकास केन्द्रामध्ये एक महिन्यासाठी मुले आणून ठेवली जातात. सॅम वर्गातील मुले मॅममध्ये आणण्यापूर्वी ग्रेड 3 आणि ग्रेड-4 मधील मुले ॲडमिट केली जातात. आता माननीय मंत्री महोदय सांगतील की, बालविकास केन्द्राची योजना बंद करुन घरोघरी जाऊन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 11:05

डॉ.दीपक सावंत...

मुलांची तपासणी करुन उपचार देण्यात येतात. मुंबई पासून केवळ 100 कि.मी. अंतरावर असलेल्या भागामध्ये आरोग्य सुविधेचे तीनतेरा वाजलेले आहेत.

सभापती महोदय, या भागामध्ये तसेच या भागातील रुग्णालयांना मी तसेच विधान सभेतील सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित आम्ही दोघांना अनेक वेळा भेटी दिलेल्या आहेत. एक्सपायरी झालेल्या औषधाबाबत अनेक पंचनामे केलेले आहेत. हिदुस्थान लॅबोरेटरीचा जो स्वॅब दिला जातो तो देखील डेट एक्सपायर झालेला असतो. आमच्या भेटीमध्ये हा स्वॅब कोरडा आढळला. त्यामध्ये अल्कोहोलचा यत्किंचितही अंश नव्हता. केवळ कोरडा टिश्यु पेपर होता.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत........

या स्वॅबची खरेदी हिंदुस्थान लॅबोरेटरीकडून प्रती नग 1.44 रुपये या दराने खरेदी केली जाते. बाजारात या स्वॅबची प्रती नग किंमत 75 ते 80 पैसे असताना प्रत्येक स्वॅबपोटी 44 ते 50 पैसे अधिक देऊन खरेदी केली जाते. या स्वॅबची खरेदी कोटी नगाच्या संख्येत केली जाते. असे असताना शॉर्ट एक्स्पायरी स्वॅब का खरेदी केले जातात?

सभापती महोदय, जननी सुरक्षा योजनेखाली जी औषधे दिली जातात ती देखील शॉट एक्स्पायरी असल्याचे आढळून आले आहे. यासंबंधी सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. त्याठिकाणी असलेले प्रा.आ.केंद्र भातसा येथे स्थानांतरण करण्याचा निर्णय झाला होता. याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे हे मंत्री महोदयांनी सभागृहाला अवगत करावे अशी मी विनंती करतो. आज या भागातील आरोग्य व्यवस्था अत्यंत हलाखीची झालेली आहे. मंत्री महोदयांनी सहा महिन्यापूर्वी या भागाचा दौरा केलेला होता. परंतु पुन्हा एकदा त्यांनी या भागाचा दौरा करावा व आम्हाला देखील या दौऱ्यामध्ये सहभागी करुन घ्यावे. म्हणजे तेथील दुरवस्था आम्ही त्यांच्या निदर्शनास आणून देऊ शकतो. हा परिसर मुंबई शहरापासून फक्त 100 कि.मी.अंतरावर आहे. तेथील आरोग्य व्यवस्थेबाबत मॉनिटरिंग झाले पाहिजे. दोन-चार अधिकाऱ्यांवर फैलावर घेतले पाहिजे. त्यांच्या बदल्या कराव्यात असे आमचे म्हणणे नाही. मंत्री महोदयांना यावर तातडीने उपाययोजना करावयाची असेल तर मंत्री महोदयांनी विभागामध्ये अधिक कठोर भूमिका स्वीकारली पाहिजे. डॉक्टरांचे मनोधैर्य खचेल अशी भूमिका घ्यावी असे आमचे म्हणणे नाही. डॉक्टरांना सस्पेंड करावे असेही आमचे मत नाही. अगोदरच आरोग्य खात्यामध्ये डॉक्टरांचा तुटवडा आहे. याबाबत वारंवार लोकसेवा आयोगाकडून डॉक्टरांच्या शिफारशी वेळेवर होत नाहीत असे कारण पुढे केले जाते. मंत्री महोदयांनी या भागाचा दौरा करावा व मी ज्या बाबी याठिकाणी मांडल्या आहेत त्या सत्य आहेत की असत्य आहेत हे त्यांनीच स्पष्ट करावे. मंत्री महोदय ज्यावेळी भेट देण्यासाठी जातात त्याची पूर्वसूचना दिली जाते. म्हणून माझे म्हणणे आहे की, मंत्री महोदयांनी सरप्राईज व्हिजिट द्यावी. म्हणजे या आरोग्य केंद्राचे खरे चित्र नजरेसमोर येईल. हा संपूर्ण आदिवासी बहुल भाग आहे. तेथे कुपोषणाचे प्रमाण खूप मोठे आहे. पावसाळयापूर्वी या प्रश्नासंबंधी एखादी बैठक घ्यावी, तेथील कुपोषणाचा आढावा घ्यावा आणि त्या भागातील दूषित

..2..

SGB/ ST/ D/ 11:10

डॉ.दीपक सावंत........

पाण्याबद्दल योग्य ती उपाययोजना करावी. सरप्राईज व्हिजिट देत असताना आम्ही देखील आपल्यासमवेत यायला तयार आहोत. ही सरप्राईज व्हिजिट देण्यासाठी शासकीय वाहनाऐवजी खाजगी वाहन वापरण्यात यावे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

-----------

.3....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अर्धातास चर्चेच्या माध्यमातून शहापूर तालुका, जि.ठाणे येथील ग्रामीण रुग्णालयाच्या आरोग्य व्यवस्थेबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे.

सभापती महोदय, दिनांक 22 मार्च, 2006 रोजी या प्रा.आ.केंद्राचे ग्रामीण रुग्णालयामध्ये अपग्रेडेशन करण्याचा शासनाने निर्णय घेतला. दिनांक 16 जून, 2006 रोजी जिल्हा परिषदेने ठराव मंजूर केला की, प्रा.आ.केंद्राच्या इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात ग्रामीण रुग्णालय सुरु करावे व जागा उपलब्ध झाल्यानंतर तेथे ग्रामीण रुग्णालय शिफ्ट करण्यात यावे. दिनांक 1 मे, 2007 रोजी प्रा.आ.केंद्राच्या इमारतीमध्ये ग्रामीण रुग्णालय सुरु झाले. त्यानंतर आजपर्यंत जमीन उपलब्ध होण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक व आरोग्य विभागाचे अधिकारी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, भूसंपादन करण्यासंबंधी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण झालेली असून उपलब्ध झालेला भूखंड आरोग्य खात्याच्या नावावर हस्तांतरित करण्याची प्रक्रिया शिल्लक राहिलेली आहे.

नंतर डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .........

ही प्रक्रिया ताबडतोब फॉलो-अप करुन घेऊ. त्यानंतर प्लॅन व एस्टीमेट तयार करुन या ग्रामीण रुग्णालयाचे काम लवकरच सुरु करु, असे मी सांगू इच्छितो. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी असाही मुद्दा उपस्थित केला की, ग्रामीण रुग्णालय हे तात्पुरते प्राथमिक आरोग्य केंद्रात सुरु केले पण तेथे अनेक जागा रिक्त आहेत. मी त्यांना नम्रपणे सांगू इच्छितो की, आपण सांगत आहात तशी परिस्थिती नाही. माझ्याकडे असलेल्या माहितीनुसार या ग्रामीण रुग्णालयात एकूण 15 मंजूर पदे असून त्यातील 11 पदे भरलेली आहेत, चारच पदे रिक्त आहेत. आपण कदाचित दोन वर्षापूर्वीची माहिती दिली असावी, पण मी दिलेली माहिती ही अद्ययावत स्वरुपाची आहे. या चार रिक्त पदांमध्ये एक शिपायाचे पद आहे, वैद्यकीय अधीक्षकाचे एक पद आणि दोन परिचारिका अशी ही वर्गवारी असून लवकरच ही पदे भरण्यात येतील. तसेच संपूर्ण ठाणे जिल्ह्यात रिक्त पदे असल्याचा उल्लेख जो आपण केला तशी परिस्थिती नाही. कारण ठाणे जिल्हा परिषद क्षेत्रात अंदाजे 1590 मंजूर पदे असून मी सभागृहाला खात्रीने सांगतो की, त्यात फक्त 19 पदे रिक्त आहेत. कारण ठाणे जिल्हा हा मुंबईला जवळच असल्याने अनेक डॉक्टर्स ठाणे जिल्ह्यात काम करण्यासाठी पुढे येतात. यामध्ये आपण डीएमईआरकडून आपल्याकडे परत आलेली सर्व पदे ठाणे जिल्ह्यातच पोस्टिंग केली आहेत. रिक्त पदांबाबत मी असे सांगू इच्छितो की, एक वैद्यकीय अधिकारी, नर्सेसची 10 पदे, प्रयोगशाळा तंत्रज्ञाची दोन पदे, आरोग्य सहाय्यकाची दोन पदे, आरोग्य सेवक आणि आरोग्य सेविका अशी प्रत्येकी दोन दोन पदे, मिळून एकूण 19 पदे व सफाई कामगारांची 5 पदे आहेत आणि ही माहिती मी लेखी स्वरुपातही देऊ शकतो

सन्माननीय सदस्यांचा पुढचा मुद्दा ॲम्ब्युलन्स बाबतचा होता. त्याबाबत मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, आपण एनआरएचम मार्फत नवीन ॲम्ब्युलन्सची ऑर्डर दिलेली असून त्यांची बॉडी बिल्डिंग होऊन पुढील सहा महिन्यात आपल्याकडे डिलिव्हरी होईल. तसेच आदिवासी विभागात आपण मोबाईल ॲम्ब्युलन्स देण्याचे ठरविले आहे, हे देखील मला सांगावयाचे आहे. अशा प्रकारे जितक्या लवकर देता येतील तितक्या लवकर अशा ॲम्ब्युलन्स आपण देणार आहोत.

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .........

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी एएसव्हीसंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. त्यासंबंधीची माहिती मी ही चर्चा संपल्यानंतर घेतो आणि ज्या ज्या आरोग्य केंद्रांमध्ये एएसव्ही सारख्या महत्वाच्या लसेस उपलब्ध नसतील त्यांची व्यवस्था एक दोन दिवसात किंवा आजूबाजूच्या आरोग्य केंद्रांकडून घेऊन पाठविण्यात व्यवस्था करण्यात येईल.

सन्माननीय सदस्यांचा तिसरा व महत्वाचा मुद्दा म्हणजे शॉर्ट एक्स्पायरिची औषधे व स्वॅब्स या आरोग्य केंद्रांमध्ये उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यासंदर्भात मी सभागृहाला अशी माहिती देऊ इच्छितो की, यासाठी आपण एनआरएचएम मार्फत प्रयत्न करीत असून फार्मासिस्टना ऑनलाईन ड्रग्ज इन्व्हेंटरिंगचे काम करण्याचे प्रशिक्षण देणार आहोत. त्यासाठी लवकरच त्यांना कॉम्प्युटर्स उपलब्ध करुन देण्यात येतील. तसेच ऑनलाईन औषधे विकत घेणे व त्यांच्या एक्स्पायरी डेट्ससंबंधीची माहिती ऑनलाईन मिळेल अशी व्यवस्था करणार आहोत. तसेच जिल्हा व राज्य स्तरावर त्याचे मॉनिटरिंग आपण करणार आहोत. अशा प्रकारे एक्स्पायरी झालेले कोणतेही औषध रुग्णांना देता कामा नये हे लक्षात घेऊन हा कार्यक्रम लवकरात लवकर म्हणजे एक महिन्यात राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी फंडिंगची व्यवस्था सुध्दा एनआरएचएम च्या वतीनेच होणार आहे.

त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी एक्स्पायरी झालेल्या स्वॅबबाबत विचारलेल्या मुद्याच्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की यासंबंधीची माहिती मी विभागाकडून घेतो व ज्यांनी असे स्वॅब खरेदी केले त्यांची चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ...

सभापती महोदय, आरोग्य विभाग, ग्रामविकास विभाग, महिला व बालकल्याण विभागाच्या मंत्र्यांबरोबर यासंदर्भात जॉईंट मिटिंग आयोजित करण्यात येईल व या बैठकीसाठी ठाणे जिल्हयाच्या दोन्ही सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना सुध्दा बोलावण्यात येईल. सदर बैठक अधिवेशन काळात सुध्दा घेण्याचा प्रयत्न केला जाईल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी आता सांगितले आहे की, संबंधित कंपन्यांवर कारवाई केली जाईल. हिंदुस्थान लॅबोरेटरी, कर्नाटक अँटी-बायोटिक्स या दोन कंपन्याना 100-150 कोटी रुपयांच्या ऑर्डर्स मिळत असतात. या कंपन्यांवर कारवाई केली जाईल, या कंपन्यांना ब्लॅक लिस्टेड केले जाईल असे मंत्रीमहोदयांनी मी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात मागील अधिवेशनात आश्वासीत केले होते. परंतु यासंदर्भातील कारवाई अजूनपर्यंत झालेली नाही. त्यामुळे या दोन कंपन्यांवर कारवाई केव्हापर्यंत केली जाणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जीवनदायी योजनेच्या खरेदीच्या संदर्भात तसेच औषध खरेदीच्या संदर्भात दोन तीन इनक्वायरीज लावण्यात आल्या होत्या. जीवनदायी योजनेच्या संदर्भातील चौकशीचे काम अँटी करप्शन ब्यूरोला देण्यात आले होते. दोन्ही खरेदीच्या रिपोर्टच्या संदर्भात अँटी करप्शन ब्युरोकडून माहिती घेतली असून यासंदर्भातील अहवाल 10-15 दिवसात येणार असून हा अहवाल आल्याबरोबर यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

---

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अनुदानित शाळांमधील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती वेळेवर मिळण्याबाबत कार्यपध्दतीत करावयाचा बदल

**मु. शी.** : अनुदानित शाळांमधील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती वेळेवर मिळण्याबाबत कार्यपध्दतीत करावयाचा बदल यासंबंधी श्री.रामनाथ मोते,वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातील अनुदानित शाळांमधील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक-शिक्षकेतरांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीयोजना लागू असणे, ४० हजारापर्यंतची देयके शिक्षणाधिकारी यांचे स्तरावर मंजूर होणे, शासन स्तरावर मंजूर होणारी देयके ५-५ वर्ष न मिळणे,देयकांची योग्य पध्दतीने पडताळणी न होणे व परिणामत: त्रुटी निघाल्याने प्रस्ताव परत येणे, शिक्षकांना वेळेवर देयके न मिळणे, ४० हजारापेक्षा जादा रकमेची देयके मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना असणे, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे प्रमुख हे राज्याचे शिक्षण संचालक असूनही त्यांना अधिकार न देणे, देयक वेळेवर मिळण्यासाठी कार्यपध्दतीत करावयाचा बदल व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

सभापती महोदय, ही अर्धातास चर्चा शालेय शिक्षण विभागातील अनुदानित संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या संदर्भात आहे.

राज्य सरकारी कर्मचा-यांना महाराष्ट्र राज्य सेवा नियम 1961 लागू असून त्यानुसार त्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती दिली जाते. ज्या प्रमाणे राज्य सरकारी कर्मचा-यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती लागू आहे त्याच धर्तीवर अनुदानित संस्थामध्ये काम करणा-या प्राथमिक, माध्यमिक, उच्च

..3.

श्री. रामनाथ मोते...

माध्यमिक, तंत्रशाळा, अध्यापक महाविद्यालये यांच्यामध्ये पूर्णवेळ काम करणा-या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना राज्य सरकारी कर्मचा-यांप्रमाणे 12 मे,1989 च्या शासन निर्णयानुसार या सवलती लागू केलेल्या आहेत. वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती अंतर्गत दोन प्रकारे वैद्यकीय आर्थिक मदत मिळत असते.

पूर्वी आकस्मिक आजारांच्या यादीमध्ये 18-19 आजार समाविष्ट होते परंतु आता त्यामध्ये 26-27 आजारांचा समावेश करण्यात आलेला आहे. यामध्ये होणारा खर्च 40 हजार रुपये असेल तर तो शिक्षण अधिका-यांच्या स्तरावरच मंजूर केला जात असतो. जर आकस्मिक आजारात 40 हजारापेक्षा अधिक खर्च झाला असेल तर त्याच्या प्रतिपूर्तीसाठी शासनाची मंजुरी घ्यावी लागते.

यानंतर श्री. गायकवाड ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 11:25

श्री.रामनाथ मोते..

सभापती महोदय, जे गंभीर स्वरुपाचे आजार असतात त्या आजारावर औषधोपचार करण्याकरिता लाखो रुपयांचा खर्च येत असतो. काही वेळा हा खर्च भागविण्यासाठी शासनाकडून संबंधित व्यक्तीला अग्रिम रक्कम देखील घ्यावी लागते. बायपास सर्जरी, ओपन हार्ट सर्जरी, ॲंजिओग्राफी किंवा ॲंजिओप्लॅस्टी, किडनी ट्रान्सप्लान्टेशन, ब्लड कॅन्सर इत्यादी आजार हे गंभीर स्वरुपाच्या आजाराच्या यादीमध्ये येतात. पूर्वी फक्त ब्लड कॅन्सरचा समावेश या यादीमध्ये करण्यात आला होता परंतु आता सर्व प्रकारच्या कॅन्सरचा समावेश या यादीमध्ये करण्यात आला आहे.या गंभीर स्वरुपाच्या आजारावर ओषधोपचार करण्यासाठी मोठया प्रमाणावर खर्च करावा लागतो आणि या खर्चाची 100 टक्के प्रतिपूर्ती संबंधित शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-याला दिली जाते.

सभापती महोदय,या विषया संबंधीची अर्धा तास चर्चा उपस्थित करण्यामागचे माझे प्रयोजन असे आहे की, साधारणपणे: हा खर्च झाल्यानंतर एक वर्षाच्या आत संबंधित व्यक्तीला खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यासबंधीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा लागतो. 40 हजार रुपयांच्या आतील प्रस्ताव असेल तर तो प्रस्ताव जिल्हा पातळीवर शिक्षणाधिका-याच्या स्तरावर मंजूर केला जातो.त्या पेक्षा जास्त रकमेचा जर प्रस्ताव असेल तर तो शिक्षणाधिका-यांकडून शिक्षण उप संचालकाकडे आणि त्यांच्याकडून शिक्षण संचालक यांच्याकडे येतो आणि त्यांच्याकडून नंतर शिक्षण संचालनालयाच्या मार्फत शासन स्तरावर येतो. 4 ऑक्टोबर 2010 रोजी एक जी.आर. काढण्यात आला असून त्यामध्ये एक स्टेप कमी करण्यात आली आहे. शिक्षण उंप संचालकाकडून डायरेक्ट शिक्षण सचिवांकडे म्हणजेच शासन स्तरावर प्रस्ताव पाठविण्याची आता सोय करण्यात आली आहे. त्यामध्ये अडचण अशी आहे की , वर्षानुवर्षे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती संबंधित कर्मचा-याला मिळत नाही हीच माझी तक्रार आहे. यासाठी एक कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात आला पाहिजे. वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव सादर केल्यानंतर दोन महिन्यानंतर वा तीन महिन्यानंतर संबंधित कर्मचा-याचे देयक मंजूर झाले पाहिजे. त्याने जे देयक सादर केले आहे ते मंजूर केले किंवा नामंजूर केले आहे यासंबंधीचा निर्णय त्याला त्या कालावधीत कळविला पाहिजे परंतु त्याच्या प्रस्तावाचा निर्णय चार - पाच वर्षे लागत नाही व त्याला बिल मिळत नाही ही बाब बरोबर नाही. एखाद्या कर्मचा-याची बायपास सर्जरी झाली असेल व त्यांची पुन्हा एकदा पाच

2..

श्री.रामनाथ मोते..

वर्षानंतर बाय पास सर्जरी करण्याची वेळ येते परंतु त्याला अगोदरच्या बाय पास सर्जरीच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम मिळत नाही.त्यासाठी शासन स्तरावर विलंब होतो सबंधित शिक्षक व शिक्षकेतर व्यक्तीला वैद्यकीय प्रतिपूर्ती खर्चाचे देयक ठराविक कालावधीत मिळण्याकरिता टाईम बाऊड प्रोग्राम तयार करण्यात यावा अशी माझी मागणी आहे. आज शिक्षक आणि शिक्षकेतर व्यक्तीला पाच पाच वर्षे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळत नाही व शासन स्तरावर मोठया प्रमाणावर विलंब होत आहे हा विलंब टाळण्यासाठी शासनाने संपूर्ण योजनेमध्ये आणि कार्यपध्दतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे.असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी काही उदाहरणे देऊ इच्छितो.जव्हार येथील एका शाळेमध्ये श्रीमती जाधव नावाच्या मुख्याध्यापिका असून त्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे देयक 2006 सालातील असून हे देयक सादर केल्यानंतर उप संचालकांकडे सादर केल्यानंतर त्यांनी शिक्षण संचालकाकडे 2010 साली ते पाठविले होते.पाच वर्षे हे देयक शिक्षण उपसंचालकाच्या कार्यालयाच्या स्तरावर प्रलंबित होते. आदर्श मंडळाची एक शाळा असून त्या शाळेतील श्री अनंत जोशी नावाचे एक शिक्षक आहेत त्यांची ओपन हार्ट सर्जरी झाली असून 2004 साली वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी त्यांनी देयक सादर केले होते. दोन वेळा ही फाईल गहाळ झाली होती .7 मे 2010 रोजी मी सचिव महोदयांना भेटलो होतो. त्यावेळी त्यांनी मला असे सांगितले की, ही फाईल गहाळ झाली तरी हरकत नाही या फाईलमधील कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती पाठवून त्वरित हे देयक मंजूर करण्यात येईल. दिनांक 7 मे 2010 च्या बैठकीत माननीय सचिवांनी असे सांगितले होते की, आठ दिवसात संबंधिताचे देयक मंजूर करुन हे प्रकरण निकाली काढण्यात यावे .त्यानंतर फेर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. आता 7.5.2011 ही तारीख येईल परंतु अजूनही हे देयक मंजूर करण्यात आलेले नाही. त्याचबरोबर या देयकाच्या संदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली नाही.अशा प्रकारे वर्षानुवर्षे देयक मंजूर होत नाहीत. सचिव महोदयांनी निदेश दिल्या नंतर सुध्दा देयक मंजूर होणार नसेल तर ते बरोबर होणार नाही.

3..

श्री.रामनाथ मोते..

सभापती महोदय, श्रीमती गिता शरद भुरम नावाच्या एक शिक्षिका असून त्यांचे बिल अजूनही मंजूर करण्यात आलेले नाही. माहितीच्या अधिकाराखाली मला दिनांक 19 मार्च 2011 रोजी माहिती मिळाली असून त्यांचे देयक 19 वर्षापूर्वीचे होते.गेल्या सात आठ वर्षापासून मी या बिलाचा सातत्याने पाठपुरावा करीत आहे. पंरतु अद्याप हे बिल मंजूर झालेले नाही.

सभापती महोदय, अशा प्रकारे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्याची देयके देण्यामध्ये शासन स्तरावर मोठयाप्रमाणावर विलंब होत आहे तो अक्षम्य आहे. दोन दिवसापूर्वी मी मंत्रालयातील संबंधित विभागाकडे अशी विचारणा केली की तुमच्याकडे किती देयके प्रलंबित आहेत.? तेव्हा त्यांनी मला यांसबंधीची माहिती सांगितली नाही म्हणून मी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळवली होती. डिसेंबर 2010 अखेर वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे किती प्रस्ताव आपल्याकडे प्रलंबित आहेत.अशी मी विचारणा केली होती.

नंतर श्रीमती रणदिवे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ ST/ पूर्वी श्री.गायकवाड . . . . 11:30

श्री.रामनाथ मोते . . .

या माहितीच्या माध्यमातून मला कळले की, शासन स्तरावर डिसेंबर 2010 अखेरपर्यंत 616 बिले प्रलंबित आहेत हे मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सदरहू बिले कधी देण्यात येणार आहेत. याचा निपटारा कसा होणार आहे आणि जरी एका दिवसमध्ये केवळ हेच काम करावयाचे म्हटले तरी त्याचा किती निपटारा करु शकाल हा प्रश्न आहे. त्यामुळे आम्हाला वर्षानुवर्षे मिळणार नाहीत आणि त्यामुळे या संपूर्ण पध्दतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. तसेच दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, हे प्रस्ताव शाळेकडून ई.ओ.स्तरावर जातात आणि तेथून डी.वाय.डी.ई.यांच्या स्तरावर पाठविले जातात आणि मग मंत्रालय स्तरावर पाठविले जातात, म्हणजे चार ठिकाणी चेक लिस्टच्या आधारे पडताळणी केली जाते आणि आम्ही पाठविलेल्या प्रस्तावामध्ये सचिव स्तरावर म्हणजे मंत्रालय स्तरावर त्रुटी काढण्यात येतात.मग माझा असा प्रश्न आहे की,याबाबत ई.ओ.स्तरावर पडताळणी होत नाही काय, डी.वाय.डी.ई.स्तरावर पडताळणी होत नाही काय, पूर्वीच्या पध्दतीप्रमाणे डायरेक्टर स्तरावर देखील पडताळणी झालेली नाही काय? याचा अर्थ हे अधिकारी कोणत्याही स्तरावर पडताळणी करीत नाहीत. शासन स्तरावर जी चेक लिस्ट आहे,तीच ई.ओ., डी.वाय.डी.ई.,डी.ई.,स्तरावर आहे.मग त्या पध्दतीने जर चेक लिस्टप्रमाणे पडताळणी झाली तर यातील त्रुटी त्याच स्तरावर निदर्शनास येतील आणि त्या जर आमच्या निदर्शनास आणून दिल्या तर आम्ही तातडीने त्याबाबत पूर्तता करु शकतो. परंतु प्रत्यक्षात दोन वर्षांनी सदरहू बिले मंत्रालय स्तरावर गेल्यानंतर त्रुटी काढल्या जातात. म्हणून यामध्ये बदल होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके प्रथम आम्हाला शाळेला आणि शाळेकडून सिव्हील सर्जनला द्यावी लागतात. आमची अशी अपेक्षा आहे की, सिव्हील सर्जनकडून वैद्यकीय खर्चाच्या देयकाची योग्य त्या पध्दतीने पडताळणी व्हावयास पाहिजे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सिव्हील सर्जन आमच्याकडून अधिकृत तीन टक्के रक्कम घेतात, अनधिकृत किती घेतात ते मला माहिती नाही.

श्री.वसंतराव खोटरे (खाली बसून) : जास्त रक्कम घेतात.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आमच्याकडून तीन टक्के रक्कम घेतल्यानंतर त्याची पावती दिली जाते, म्हणजेच माझे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे बिल 2 लाख रुपयांचे असेल तर मला 6000/-रुपये भरावे लागतात आणि त्यांच्याकडून प्रमाणपत्र घ्यावे लागते. आरोग्य विभागातील

श्री.रामनाथ मोते . . .

अधिकारी, सिव्हील सर्जन काय करतात ? तर त्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या बिलातील एकही पान चाळत नाहीत. फक्त डॉक्टरांनी दिलेले जे डिसचार्ज कार्ड आहे, त्यामध्ये डायग्नोसिस काय केलेले आहे म्हणजे कोणत्या आजारासाठी उपचार करण्यात आले, त्याच्या आधारावर आम्हाला प्रमाणपत्र देतात की, अमुक-अमुक आजारासाठी खर्च झालेला आहे आणि सदरहू आजार शासनाच्या जी.आर.मध्ये 10 क्रमांकावर आहे, 15 क्रमांकावर आहे किंवा 20 क्रमांकावर आहे म्हणजेच तो आजार देयके देण्यास मान्यताप्राप्त आहे किंवा नाही एवढेच फक्त सिव्हील सर्जनकडून सर्टीफाय केले जाते आणि ते सर्टीफाय करण्यासाठी आम्हाला तीन टक्के रक्कम द्यावी लागते. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे 2 लाख रुपयांचे बिल असेल तर त्यासाठी 6 हजार रुपये द्यावे लागतात. मला असे सांगावयाचे आहे की, एकतर ते बंद करावे आणि आमच्या ई.ओ.स्तरावर पडताळणी करावयास सांगावे. परंतु जर मघाशी सांगितल्याप्रमाणे जर ते 3 टक्के रक्कम घेण्यात येणार असतील तर संपूर्ण वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रस्तावाची त्यांनी पडताळणी केली पाहिजे.

सभापती महोदय, ज्याप्रमाणे आम्ही बँकेमध्ये कर्ज घेण्यासाठी जसा प्रस्ताव देतो त्यावेळी ते आमच्याकडून 1 टक्का किंवा 2 टक्के रक्कम घेतात परंतु ते पूर्ण प्रस्तावाची छाननी करतात. अशा पध्दतीने याठिकाणी देखील होण्याची आवश्यकता आहे. वैद्यकीय बिले प्रलंबित रहाता कामा नयेत. सगळयात महत्वाची बाब म्हणजे ही बिले मिळण्यासाठी भ्रष्टाचार होत असतो आणि आम्हाला याचा अनुभव ई.ओ.स्तरावर, डी.वाय.डी.ई. यांच्या स्तरावर आलेला आहे. परंतु मंत्रालय स्तरावर सचिव पातळीवर बिले मंजूर करण्यासाठी पैसे घेतात असा काही अद्याप अनुभव आलेला नाही. पण खालच्या स्तरावर आणि सिव्हील सर्जनच्या स्तरावर प्रमाणपत्र मिळविण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो. त्याठिकाणी अधिकृत 3 टक्के आणि अनधिकृतपणे 5 टक्के, 6 टक्के, 10 टक्के इतकी रक्कम घेतात असा सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे साहेबांनी उल्लेख केला. ते या बाबतीत त्यांचा अनुभव सांगतील. आम्हाला संबंधितांना एवढी मोठी रक्कम द्यावी लागते याचे मूळ कारणच असे आहे की, वैद्यकीय देयकाचे पैसे मिळण्यासाठी संबंधितांच्या प्रमाणपत्राची गरज आहे असे नमूद केल्यामुळे या सर्व भानगडी उद्‌भवत आहेत. सगळ्यात महत्वाचे म्हणजे आपण हे बिल शासनाकडून मंजूर झाल्यानंतर ते शाळेमध्ये पाठविले जाते आणि सदरहू बिल मंजूर होताना त्याबाबत संबंधित शाळेच्या संस्थेने ठराव केला तरच मिळू शकते म्हणजे एकीकडे शासन स्तरावर





श्री.रामनाथ मोते . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बिलाला मंजुरी दिली जाते, त्यासंबंधीचे पत्र संबंधित शाळेकडे पाठविले जाते. त्यानंतर फक्त वेतन पथकाकडे बिल पाठवावयाचे आहे. पण आमचे देयक वेतन पथकाकडे जाण्यासाठी संस्था चालकांचा ठराव लागतो की, संबंधितांना बिल देण्यास हरकत नाही. पण प्रत्यक्षात बिल शासन देत आहे. संस्था कसे ठरविणार ? शासनाने हा क्लॉज कशासाठी टाकलेला आहे ? त्याची काही आवश्यकता नाही. कारण शासन बिल देणार आहे आणि दुसऱ्या बाजूला मात्र संस्थेच्या ठरावाची मागणी करता.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

काही संस्था चालक, दोन लाख रुपये मिळणार आहेत ना मग दोन टक्के द्या, चार टक्के द्या, पाच टक्के द्या, 20 हजार रुपये द्या, अशी मागणी करतात आणि ते पैसे दिल्याशिवाय ठराव शिक्षकांना दिला जात नाही. या सगळया दृष्टिकोनातून वेळेवर पैसे मिळण्यासाठी या संपूर्ण योजनेमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गंभीर स्वरुपाच्या आजारांसाठी 100 टक्के प्रतिपूर्ती देय आहे. एका बाजूला गंभीर आजारांच्या संदर्भात शासन मान्य रुग्णालयात उपचार घेतले तर दीड लाख रुपये अग्रीम मंजूर करण्यात येतो आणि तो शिक्षण संचालकांच्या स्तरावर मंजूर होतो. त्याला शासनाच्या मंजुरीची आवश्यकता नसते. पण देयक मंजुरीसाठी शासन स्तरावर यावे लागते. शासकीय रुग्णालयात उपचार घेतले असतील, शासन मान्य रुग्णालयात उपचार घेतले असतील त्याप्रमाणे 40 हजार रुपयांपर्यंतची देयके शिक्षण अधिकाऱ्यांच्या स्तरावर मंजूर करण्यात येतात त्याच पध्दतीने या गंभीर आजारांसाठी, शासन मान्य रुग्णालयात आणि शासकीय रुग्णालयात उपचार घेतल्या नंतर ती रक्कम कितीही मोठी असली तरी खालच्या स्तरावर मंजूर झाली पाहिजे. तेव्हा या संदर्भातील तरतूद करण्याची आवश्यकता आहे. अनेक प्रश्न मांडण्यासारखे आणि त्यावर बोलण्यासारखे आहेत परंतु अन्य सन्माननीय सदस्यांना देखील त्यांचे महत्वाचे मुद्दे मांडावयाचे आहेत म्हणून मी सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही. पण या एकूणच योजनेचा फेर विचार करण्याची, शिक्षकांना दिलासा देण्याची आणि त्यांना वेळेवर देयके मिळतील या दृष्टिकोनातून उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. प्रस्ताव आल्या नंतर कोणत्या स्तरावर किती दिवसात प्रकरण निकाली निघाले पाहिजे यासंदर्भात टाईम बाऊंड प्रोग्रॅम तयार करण्यात यावा. या प्रस्तावांची नियमानुसार पडताळणी करण्यात यावी, योग्य प्रस्ताव असतील तरच ते मंजूर करण्यात यावेत आणि अयोग्य असतील तर ते नामंजूर करण्यात यावेत, त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. फक्त या प्रस्तावांचे निकाल मिळण्यासाठी शिक्षकांना पाच-पाच वर्षे थांबायला लागू नये, अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे ( औरंगाबाद विभाग-शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी एका महत्वाच्या विषयावर या ठिकाणी अर्धा-तास चर्चा घडवून आणलेली आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याला माझे पूर्ण समर्थन आहे. या मुद्यांची मी पुनरावृत्ती करणार नाही.

सभापती महोदय, मंत्री महोदया, या सुध्दा प्राध्यापिका होत्या त्यामुळे त्यांना शिक्षकांच्या व्यथा आणि दु:ख माहीत आहेत. सर्वच आजारी पडत असतात म्हणून शिक्षकांना सुध्दा वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके सन 1989 च्या शासन निर्णयाप्रमाणे लागू झालेली आहेत. परंतु ही प्रतिपूर्ती मिळण्याची जी प्रक्रिया आहे त्या प्रक्रियेमुळे 6/6 वर्षे शिक्षकांना वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती मिळत नाही. वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती ज्या शिक्षकांना मिळालेली नाही त्यांची यादी माझ्या जवळ आहे. श्री. किशोर साबू, गणेशदास राठी विद्यालय, अमरावती, श्री. साळुंके, बार्शी टाकली, या दोन शिक्षकांनी वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रस्ताव दिल्यानंतर ते मयत झाले. याशिवाय माझ्या अमरावती विभागातील 10 ते 15 प्रकरणे माझ्या जवळ आहेत. त्यांना अद्यापही वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती मिळालेली नाही. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांची सुध्दा वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्तीची देयके मिळालेली नाहीत. याबाबत शिक्षक आमदारांची एक बैठक घेण्यात यवी, अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो. वैद्यकीय प्रतिपूर्तीचा प्रस्ताव पाठविल्या नंतर कमीत कमी एका महिन्याच्या आत वैद्यकीय प्रतिपूर्तीचे देयक मिळाले पाहिजे, अशा प्रकारची माझी सूचना आहे, याबाबत शासनाने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी ज्या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे आणि त्यांनी जे दु:ख सांगितलेले आहे त्याची व्याप्ती खूप मोठी आहे. प्रतिपूर्तीची देयके मिळण्यासाठी सहा वर्षा पेक्षाही जास्त कालावधी लागतो. त्या कालावधीत ते शिक्षक मृत्यूमुखी देखील पडतात. याबाबतीत शासकीय आणि शासन मान्य रुग्णालयात घेतलेल्या उपचाराची प्रतिपूर्ती देण्यात येते. म्हणून शिक्षकांनी दिलेली देयके जशीच्या तशी मंजूर केली पाहिजेत आणि ती जबाबदारी सिव्हिल सर्जनवर टाकली पाहिजे. तसेच ही देयके अंतिम मंजूर करण्याचे अधिकार उप संचालकांकडे देण्यात यावेत. कारण महाराष्ट्र इतका मोठा आहे की, प्रत्येक गोष्ट मंत्रालयात आणली तर या शिवाय दुसरे काही काम मंत्रालयात होणार नाही म्हणून प्रत्येक लहान-लहान गोष्टीसाठी मंत्रालयात यावे लागू नये.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

या प्रकारची जी बिले आहेत त्यामध्ये चोरी होण्याची शक्यता नाही. जी चोरी होते ती आपण निर्माण केलेल्या अडचणींमुळे आणि अडथळ्यांमुळे होते. ते अडथळे दूर केले तर चोरी होणार नाही, भ्रष्टाचार होणार नाही आणि त्यांना पैसे वेळेवर मिळतील. म्हणून उप संचालकांकडे 2 लाख रुपयांपर्यंतचे आणि संचालकांकडे 3 लाख रुपयांपर्यंतचे अधिकार द्यावेत. त्या इस्पितळाच्या प्रमुखाने किंवा डीनने एकदा बिल मंजूर केल्यानंतर ती रक्कम पुन्हा तपासण्याची गरज नाही. जर त्यामध्ये जर काही भ्रष्टाचार किंवा गडबड आढळून आली तर वेगळ्या पध्दतीने पुन्हा त्याची चौकशी जरुर करता येईल. परंतु चौकशीसाठी ते बिल मंत्रालयापर्यंत, सचिवांपर्यंत न्यावयाचे याला काही अर्थ नाही. कारण मंत्रालयातील कोणत्याही अधिकाऱ्याला ते बिल कळत नाही. फक्त पैसे कसे काढावयाचे एवढे कळू शकते. म्हणून हे सगळे अडथळे दूर करावेत आणि खालच्या पातळीवरच हा अधिकार विकेंद्रित करावा अशी माझी सूचना करुन माझे भाषण संपवितो.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथदादा मोते यांनी ज्या विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे त्या चर्चेमध्ये सहभागी होत असताना त्यांच्या मताशी मी पूर्ण सहमती व्यक्त करतो. या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळण्यात जी दिरंगाई होते आणि जो भ्रष्टाचार होतो तो संपुष्टात आणण्यासाठी शासनातर्फे पावले उचलण्यात यावीत, ही माझी पहिली मागणी आहे. ही योजना विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळेतील कर्मचाऱ्यांना लागू नाही. त्यांना सुध्दा ही योजना लागू करण्यात यावी, अशी माझी दुसरी मागणी आहे. या योजनेत सर्व आजार अंतर्भूत नाहीत. 23 प्रकारच्या आजारांसाठी ही योजना लागू आहे. सर्व आजारांसाठी ही योजना लागू करावी. गर्भाशयाशी संबंधित, हृदयरोगाशी संबंधित असे अनेक आजार आहेत की, ज्याकरिता ही योजना लागू पडत नाही. त्या आजारांना ही योजना लागू करावी, अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, वैद्यकीय प्रतिपूर्तीचा जो प्रस्ताव सादर केला जातो त्यामध्ये नकारात्मक पाऊल टाकण्यासाठी खूप वाव ठेवलेला आहे. त्यामुळे ते अधिकारी इतक्या त्रुटी काढतात की, प्रस्ताव सादर करणाऱ्या माणसाला मी कशाला प्रस्ताव सादर केला असे वाटते. नको ती प्रतिपूर्ती अशा पध्दतीचा वैताग येण्यासारखी परिस्थिती आहे. इतकी दयनीय अवस्था करुन ठेवली जाते. यावर सिव्हिल सर्जनची काऊंटर सही घेतली जाते. ही फार मोठी भयंकर घटना आहे. पूर्वी 5 टक्के घेत होते. गेल्या वर्षापर्यंत ते 10 टक्के घेत होते. आता चालू वर्षी त्यांचा दर वाढलेला असून 15 टक्केच्या पुढे दिल्याशिवाय ते सही करीत नाहीत. हे सर्व अनधिकृत आहे. गेल्याच आठवड्यात माझ्या जिल्ह्याच्या सिव्हिल सर्जनकडे मी शिक्षकाचे एक शिष्टमंडळ घेऊन गेलो. त्या ठिकाणी बंडगर नावाचा एक लिपिक पैसे घेतो. त्याला त्या ठिकाणी बोलवले, त्याला पढवले, ऐकवले आणि विचारले की, आपण पैसे घेता की नाही ? त्यांनी नेहमीच्या पध्दतीने 'नाही' असे सांगितले आणि दुसऱ्याच दिवशी त्यांनी पैसे घेण्याचा दरबार तसाच चालू ठेवला. आजही हे पैसे घेतले जातात. हे नुसते सांगली जिल्ह्यामध्येच आहे अशातील भाग नाही. राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये हा प्रकार आहे. काऊंटर सही हा एक भयानक प्रकार आहे. काही नियमित आजारी पडणारे आणि नियमित बिले घेणारे आणि त्यांचा व्यवसाय अत्यंत छान चाललेले शिक्षक आहेत. त्यांचे प्रकरण उकरुन काढले तर ते आजारी पडले असे सांगून प्रशासन त्यांना पाठीशी घालतात. खरे म्हणजे त्याला आजार नसतात तसेच सगळी असत्य बिले दाखविलेली असतात. असे रॅकेट यामध्ये काम करीत आहे. ते रॅकेट प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या मर्जीने चालले आहे. हे रॅकेट बंद, उद्ध्वस्त झाले पाहिजे. जो खरा गरजू आजारी पडला आहे त्याचा प्रस्ताव मात्र दाखल करुन घेतला जात नाही. त्यांची प्रकरणे चार-पाच वर्षे प्रलंबित आहेत. एवढा उल्लेख करुन मी माझे भाषण संपवितो.

---

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/ पूर्वी श्री.शिगम 11:45

प्रा.फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अतिशय महत्वाच्या विषयावर अर्ध्या-तासाची चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यांनी केलेली मागणी योग्य अशीच आहे. आजारी शिक्षकांना वैद्यकीय देयके वेळेवर मिळाली पाहिजेत अशी आपल्या सर्वांचीच भूमिका आहे. सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न यापूर्वी देखील उपस्थित केला होता. त्याला अनुसरुन शासनाने देयके मंजूर करण्याच्या प्रक्रियेतील संचालक स्तरावरील एक टप्पा कमी कला आहे. आजारी शिक्षकांची वैद्यकीय देयके वेळेवर देणे गरजेचे आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने त्यांनी काही प्रश्न सुध्दा मांडले आहेत. वैद्यकीय देयकांची छाननी शिक्षणाधिकारी, उपसंचालक यांच्या स्तरावरुन योग्य पध्दतीने होत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे तिसऱ्या टप्पावर वैद्यकीय देयकांची छाननी होते त्यामध्ये बदल झाला पाहिजे असे त्यांचे मत आहे. या मताशी मी देखील सहमत आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी वैद्यकीय देयके मंजूर करण्याच्या प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार होत असल्याचे सांगितले आहे. सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी तर पुढे जाऊन असे म्हटले की, शिक्षक व अधिकाऱ्यांचे संगनमत होऊन एक रॅकेट तयार झालेले आहे. काही शिक्षक नेहमी आजारी पडतात आणि वैद्यकीय देयके सादर करतात. हा त्यांचा व्यवसायच झाला आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, एखाद्या ठिकाणी असा प्रकार होत असेल, परंतु शिक्षकांवर सरसकट असा आरोप करणे बरोबर नाही. काही शिक्षक रोज आजारी पडतात आणि वैद्यकीय बिले सादर करतात, असे सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांना म्हणावयाचे नसेल. पण त्यांचे असे म्हणणे असेल तर त्यांनी ते कृपया मागे घ्यावे.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सरसकट शिक्षकांवर वैद्यकीय देयकांबाबत सरसकट आरोप करणे बरोबर नाही अशी भावना व्यक्त केली असल्यामुळे मी माझे त्याबाबतचे वाक्य मागे घेतो.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या मुद्याकडे आपण एक प्रश्न म्हणून पाहू. हे निश्चित आहे की, काही प्रमाणात असे प्रकार होत असतील. सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी वैद्यकीय देयकांना मंजुरी देण्याच्या प्रक्रियेत सुधारणा होणे आवश्यक आहे असे म्हटले आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

प्रा.फौजिया खान...

यासाठी ठराविक कालमर्यादा ठरवून या प्रक्रियेत बदल करता येईल. सध्याच्या पध्दतीवर योग्य पध्दतीने नियंत्रण आणले पाहिजे. जेन्यूईन केसेसच्या बाबतीत वेळेवर देयके अदा करण्याबाबत मी देखील सहमत आहे. या प्रक्रियेत बदल करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आवश्यक तो अभ्यास करणे गरजेचे आहे. ग्रामविकास विभाग, शालेय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग या तिन्ही विभागांशी समन्वय ठेवून मंत्री महोदयांच्या स्तरावर एक बैठक आयोजित करता येईल. त्यासाठी शिक्षक आमदारांना बोलविता येईल. या प्रश्नाबाबत अभ्यास करुन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. त्यानंतरच सध्याच्या पध्दतीत बदल करता येईल असे मी सांगू इच्छिते.

त्याचप्रमाणे गंभीर आजाराच्या वैद्यकीय देयकातील 100 टक्के रक्कमेचे रिएंबर्समेंट मिळाले पाहिजे अशीही मागणी करण्यात आली आहे. ज्यांना गंभीर आजार झालेला आहे त्याबाबतची वैद्यकीय देयके शासकीय रुग्णालय व शासन मान्य रुग्णालयात सादर केली जातात. ही देयके शासन स्तरापर्यंत येतात. मी आरोग्य राज्यमंत्री म्हणूनही सांगू इच्छिते की, राज्यात जीवनदायी योजना सुरु आहे. या योजनेत काही बाबी समाविष्ट करण्याचे ठरविलेले आहे. या योजनेत बीपीएलच्या लोकांना व बाकीच्या लोकांना हेल्थ कार्ड देणे, इन्शुरन्स स्किमद्वारे त्यांच्या आजाराची जबाबदारी घेण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. त्यामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा समावेश करण्याबाबत शासन स्तरावर विचार करता येईल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

आज जीवनदायी योजना पायलट बेसिसवर सुरु करुन तिची अंमलबजावणी कशी होते, कोणत्या प्रकारचे प्रश्न निर्माण होतात याचा विचार शासन स्तरावर नक्की करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी पेंडिंग बिलाचा उल्लेख केला. शासन स्तरावर वर्षानुवर्षे वैद्यकीय बिले पेंडिग राहातात ही बाब गंभीर आहे. यासाठी स्पेशल ड्राईव्ह घेण्याचा मानस आहे. हा स्पेशल ड्राईव्ह घेऊन ही पेंडिग बिले कशी लवकरात लवकर काढता येतील यासंदर्भात शासन विचार करील. अनेक सन्माननीय सदस्यांनी महत्वपूर्ण सूचना केलेल्या आहेत. त्या सर्व सूचनांचा समावेश जेव्हा यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल त्यावेळी त्यामध्ये करण्यात येईल.

श्री. वसंतराव खोटरे : 1 लाख रुपयापर्यन्तची बिले शिक्षण उप संचालक स्तरापर्यंत काढण्याचे अधिकार देण्यात येतील काय ?

प्रा. फौजिया खान : सर्व सूचनांचा विचार बैठकीमध्ये होईल.

श्री. रामनाथ मोते : आदरणीय मंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या संदर्भात निश्चितपणे सकारात्मक भूमिका घेऊन बदल करण्याचे संकेत दिलेले आहेत त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांनी "अशा प्रकारे या क्षेत्रामध्ये वैद्यकीय बिलाच्या संदर्भात गैरकारभार करणारे एक रॅकेट आहे, त्यांना शिक्षा करण्याचा उल्लेख केला नाही" असे मत मांडले. चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरातून ही बाब स्पष्ट केलेली आहे की, पडताळणी योग्य पध्दतीने होत नाही. कोणताही खर्च न करता एक गोष्ट करता येण्यासारखी आहे. ती म्हणजे वैद्यकीय देयके हाताळणारे ई.ओ. स्तरावरील क्लार्क आणि डीवाय.डी. स्तरावरील क्लार्क यांना एकत्रितपणे दोन दिवसांचे प्रशिक्षण दिले गेले तर हा प्रश्न सुटण्यास मदत होईल. मुख्याध्यापक स्तरावरुन ई.ओ.कडे प्रस्ताव येतात. तेथून ते प्रस्ताव डीवाय.डी.स्तरावर जातात. त्याठिकाणी कागदपत्रांची योग्य प्रकारे छाननी करण्याचे बंधनकारक केले तर प्रस्तावामध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहाणार नाहीत. प्रस्तावाची व्यवस्थित छाननी करण्यात आली अशा प्रकारचे प्रमाणपत्र ई.ओ.नी दिले तर देयके मंजूर होण्यास विलंब होणार नाही. आता ई.ओ.कडून डीवाय.डी.कडे फक्त टपाल पोहोचविण्यासारखे काम होते. तेथून तो प्रस्ताव मंत्रालयीन स्तरावर आल्यानंतर तेथे त्रुटी निघतात आणि त्रुटींची पूर्तता





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

करण्यामध्ये वर्षानुवर्षे जातात. वैद्यकीय बिलास वर्षानुवर्षे विलंब होण्याचे हे एक कारण आहे. तेव्हा या पध्दतीमध्ये बदल करुन त्याची योग्य पध्दतीने अंमलबजावणी केली तर खूप चांगले रिझल्टस् मिळू शकतात. बिले मंजूर होण्यास मदत होऊ शकते.

--

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 11:50

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने अत्यंत महत्वाच्या विषयाला हात घातलेला आहे. या विषयाच्या संदर्भात सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. याबाबतीत शालेय राज्यमंत्री महोदयांनी अत्यंत चांगल्या प्रकारे आणि सकारात्मक उत्तर दिलेले आहे. शासनाची हीच भूमिका आहे की, ज्याला आवश्यक आहे त्याला वैद्यकीय देयके वेळेवर मिळायला पाहिजेत.हा विषय सन्माननीय सदस्यांनी फार लावून धरण्याची आवश्यकता नाही. सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे हे जे काही बोलले ते सिस्टिम विषयी बोलले ही गोष्ट आपण लक्षात घेणे आवश्यक आहे. शेवटी कोणतीही व्यक्ती असू द्या, मग ती राजकारणी व्यक्ती असू द्या, पत्रकार मंडळी असू द्या, कोणीही असू द्या,

...नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ D/ ST/ KTG/ 11:55

श्री.राजेंद्र दर्डा.........

शेवटी या सगळ्या पध्दतीमध्ये काही ना काही गैर गोष्टी होत असतात. त्यांनी प्रामाणिकपणे तो मुद्दा मांडला आहे. हे सांगत असताना त्यांनी रॅकेटचा उल्लेख केला आहे. कोणत्याही पध्दतीने बोगस काम होता कामा नये. त्याबद्दल जे आर्थिक नियंत्रण असणे आवश्यक आहे ते असलेच पाहिजे. त्याचबरोबर कारण नसताना देयके मंजूर करण्यास विलंब लागणे हे देखील योग्य नाही. त्याबाबत माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे येत्या महिनाभरात ग्रामविकास, शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभागाची संयुक्त बैठक घेऊन त्या बैठकीला सर्व शिक्षक आमदारांना देखील बोलावले जाईल. कारण शासनाला नवीन प्रश्न निर्माण करावयाचे नाहीत. आपणा सगळ्यांना एकत्रित घेऊन आपल्या सूचना विचारात घेऊन नक्की मार्ग काढला जाईल. त्याचबरोबर माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सांगितल्याप्रमाणे शिक्षणाधिकारी पातळीवर निर्णय होतो. शिक्षणाधिकारी यांच्या माध्यमातून मंत्रालयात सचिवांपर्यंत प्रकरण येत असेल तर यापुढे ही जबाबदारी शिक्षणाधिकारी यांच्यावरच टाकण्यात येईल. त्यांनी बिले मंत्रालयात पाठविण्यापूर्वी आपण स्वत: मंजूर करीत आहोत अशा प्रकारे 100 टक्के छाननी केली पाहिजे. म्हणजे मंत्रालय पातळीवर होणारा विलंब थांबेल. आपण केलेल्या सूचनांचा आदर करुन लवकरच बैठक बोलावण्यात येईल.

---------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शिरुर कासार (जि.बीड) तालुक्यातील तीव्र पाणी टंचाई.

**मु.शी.**: शिरुर कासार (जि.बीड) तालुक्यातील तीव्र पाणी टंचाई यासंबंधी ॲड.उषा दराडे यांनी उपस्थित केलेली अर्धातास चर्चा.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धातास चर्चा उपस्थित करते.

"शिरुर कासार (जि.बीड) तालुक्यात पुर्वीपासून असलेली जुनी पाणी पुरवठा योजना पूर्ण क्षमतेने न चालविणे, काही गावांत योजना कार्यान्वित नसणे, तसेच तालुक्यात १८ ठिकाणी योजना प्रस्तावित झाल्या असून त्यांची कामे अद्याप पूर्ण न झाल्याने तालुक्यात निर्माण झालेली तीव्र पाणी टंचाई व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

सभापती महोदय, ही अर्धातास चर्चा मागील अधिवेशनात चर्चेला येणार होती. परंतु काही अडचणीमुळे चर्चा पुढे ढकलण्यात आली होती. दरम्यानच्या काळात माननीय पाणीपुरवठा राज्यमंत्री यांनी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत आम्हाला देखील बोलावून बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये शिरुर तालुक्यातील 18 प्रस्तावित पाणीपुरवठा योजना, त्याचबरोबर संघ अठराखेडी पाणीपुरवठा योजना, ता.परळी; असरडोह पाणीपुरवठा योजना, ता.धारुर; दहीफळ मडमाऊली पाणीपुरवठा योजना, ता.केज; ऊस पाणीपुरवठा योजना, ता.आंबेजोगाई व केज पाणीपुरवठा योजनांबाबत चर्चा झाली होती. त्यानंतर बीड येथे जिल्हयाचे सीईओ आणि लघुपाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्यासमवेत आमची बैठक झाली. बंद पडलेल्या योजनांऐवजी नवीन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करणे, प्रस्तावित असलेल्या योजना पूर्ण करणे आणि ज्याठिकाणी पूर्वीच्या योजना असूनही पुन्हा नवीन योजना प्रस्तावित करणे आवश्यक आहे याबाबत बैठक झाली होती. माननीय पाणीपुरवठा राज्यमंत्री यांच्याकडे काही नवीन प्रस्ताव पाठविले आहेत. या संदर्भात सचिव पातळीवर बैठक घेतली तर हे प्रश्न मार्गी लागतील. याबाबत शासनाने सहकार्य करावे अशी माझी विनंती आहे.

-----

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (पाणीपुरवठा राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांच्या समवेत पाणीपुरवठा विभागाचे सचिव यांची बैठक अधिवेशन संपण्यापूर्वी घेऊन जे काही प्रश्न प्रलंबित आहेत ते मार्गी लावण्यात येतील.

---------

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ D/ ST/ KTG/ 11:55

**पृ.शी.**: पद्मासागर सहकारी गृहनिर्माण संस्था, भट्टीपाडा रोड, भांडूप (प.), मुंबई या संस्थेवरील प्रशासकांनी केलेला आर्थिक गैरव्यवहार.

**मु.शी.**: पद्मासागर सहकारी गृहनिर्माण संस्था, भट्टीपाडा रोड, भांडूप (प.), मुंबई या संस्थेवरील प्रशासकांनी केलेला आर्थिक गैरव्यवहार यासंबंधी डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केलेली अर्धातास चर्चा.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धातास चर्चा उपस्थित करतो.

"मुंबई शहर व उपनगरातील शेकडो सहकारी गृहनिर्माण संस्थांनी एम-२० बंधपत्रे शासनाकडे सादर केलेली नसल्याने व काही गृहनिर्माण संस्थांच्या गैरकारभारामुळे शासनाने नेमलेले खाजगी व शासकीय प्रशासक, सदर प्रशासक हे संस्थेच्या बँक खात्यातील लाखो रुपये स्वत:साठी काढीत असून आधीच गृहनिर्माण संस्थातील सदस्यांना त्यांच्या सदनिकांच्या देखभाल खर्चापोटी द्यावे लागणारे हजारो रुपये प्रती महिना इमारतींच्या देखभाल व रंगरंगोटी व मोठ्या दुरुस्तीसाठी आवश्यक असतानाही सदर प्रशासक बिनधास्तपणे लाखो रुपये काढीत असून त्यांचेवर किती रक्कम घ्यावी याबद्दल नियंत्रण नसणे,उदा. पदमासागर सहकारी गृहनिर्माण संस्था, भट्टीपाडा रोड, भांडूप (प) मुंबई ७८ या संस्थेवरील प्रशासकाने काहीही कारण नसताना माहे फेब्रुवारी २०१० मध्ये संस्थेच्या बँक खात्यातून ४०,०००/- रुपये स्वत:च्या खर्चासाठी नियमबाह्य काढून केलेला आर्थिक गैरव्यवहार, सदर संस्थेच्या सदस्यांनी दुरुस्ती व रंगकामासाठी वर्गणी काढून बँकेत ठेवलेली दोन लाख रुपये रक्कम काढल्याने संस्था आर्थिक दिवाळखोरीत असणे, संस्थेवरील प्रशासकानी विद्यमान माजी सचिवांशी केलेली हातमिळवणी, माजी सचिवाच्या गैरकारभाराला शासन व प्रशासक देत असलेले संरक्षण, अशाच प्रकारे हजारो सहकारी गृहनिर्माण संस्थांवरील प्रशासक बिनदिक्कत मोठ्या रक्कमा स्वत:साठी काढीत असून अशा प्रशासकांची चौकशी करुन त्यांनी अनावश्यक व बेकायदेशीररित्या काढलेले लाखो रुपये त्यांच्याकडून वसूल करुन त्यांची चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

...5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, ही अर्धातास चर्चा यापूर्वीच्या तीन चार अधिवेशनात कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली होती. परंतु काही अडचणींमुळे यासंबंधी चर्चा होऊ शकली नाही.

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात पद्मासागर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कारभारासंबंधी जी काही कारवाई अपेक्षित होती ती पूर्ण झालेली आहे. तेथील प्रशासकांनी स्वत:च्या खर्चासाठी संस्थेच्या बँक खात्यातून 40 हजार रुपये नियमबाह्य पध्दतीने काढून घेऊन गैरव्यवहार केला होता. सदर संस्थेच्या सभासदांनी बँकेत ठेवलेली रक्कम बेकायदेशीररित्या काढून आर्थिक अनियमितता केली होती. आता या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये निवडणूक होऊन नवीन कार्यकारिणीची नियुक्ती झालेली आहे. संस्थेवरील प्रशासक निघून गेले आहेत. प्रश्न असा आहे की, आज मुंबईमध्ये अनेक सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. शासनाने या सर्वच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना एम 20 हे बंधपत्र सक्तीचे केलेले आहे. याबाबत शासनाने फेरविचार केला पाहिजे.

नंतर एम.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ..........

कारण सर्वच सोसायट्यांना अशा प्रकारचे बंध पत्र देणे बंधनकारक केले आहे. मग त्यात कमी वार्षिक उलाढाल असो अथवा जास्त असो सर्वांचाच समावेश आहे. या चर्चेच्या निमित्ताने माझी अशी सूचना आहे की, एखाद्या गृह निर्माण संस्थेत कमी सभासद संख्या असेल तर त्यांना या बंध पत्राच्या अटीतून सूट द्यावी. मला माहीत नाही की, कायद्यात यासाठी किती लवचिकता आणता येईल पण या बाबीचा शासनाने जरुर विचार करावा. तसेच या बंध पत्रासाठीची मुदत जरी वाढविलेली असली तरी किती सभासद असले म्हणजे हे बंध पत्र बंधनकारक असावे याचा विचार करणे आवश्यक आहे. कारण कमिटीने अशा प्रकारचे बंध पत्र देणे एक प्रकारचे बाईंडिंगच असते. त्यामुळे संस्थेचे चेअरमन आणि सेक्रेटरी म्हणून काम करण्यासाठी कोणीही पुढे येण्यास तयार होत नाही, पुढेही तयार होणार नाही, ही एक प्रॅक्टिकल स्वरुपाची अडचण आहे. त्याचप्रमाणे जे प्रशासक नेमले जातात ते शासनाच्या पॅनलमधील असतात. त्यांची नेमकी अर्हता काय असावी यासंबंधी कोणतेही बंधन ठेवलेले नाही. या पदासाठी कोणीही कॉमर्स ग्रॅज्युएट असला तरी तो प्रशासक पदावर नेमला जातो. ज्यावेळेस हा प्रशासक संस्थेवर येतो तेव्हा संस्थेच्या खात्यातून सरळ पैसे काढण्यास सुरुवात करतो आणि सोसायटीची अनावश्यक कामे केल्याचे दाखवून सदस्यांच्या डोक्यावर तो खर्च लादला जातो. यासंबंधीच्या तक्रारी करुन सुध्दा त्यातून काहीच निष्पन्न होत नाही, असा अनुभव आहे.

अशा अनेक सोसायट्या आहेत की ज्यांच्यावर प्रशासक नेमलेले आहेत, त्याची आकडेवारी मंत्री महोदयांनी सभागृहात द्यावी, अशी मी विनंती करतो. तसेच हा प्रशासक वास्तविक सहा महिन्यापुरताच असतो पण सोसायट्यामधील वाद जितके तीव्र असतात तितका त्या प्रशासकाचा कालावधी वाढत जातो. मग हा प्रशासक ज्या समितीवर आरोप झालेले असतात त्या समितीच्या लोकांनाच हाताशी धरुन त्यांना सोडविण्याच्या निमित्ताने पुन्हा भ्रष्टाचाराला सुरुवात करतो. यातून प्रशासक नेमण्याचा उद्देश मात्र सफल होताना दिसत नाही. उलट त्यामुळे सोसायट्यांच्या कारभारात सुधारणा होण्याऐवजी त्या सोसायटीत पुन्हा भ्रष्टाचार सुरु हातो. मी जी उदाहरणे या चर्चेच्या माध्यमातून दिली आहेत त्यांनी सुध्दा संस्थेच्या खात्यातून 40 हजार रुपये काढले व ते स्वत:साठीच खर्च केले आहेत. तसेच प्रशासक नेमल्यानंतर त्याचा भार संपूर्णपणे सोसायटीवरच

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .........

पडत असतो त्यामुळे अशा प्रशासकासाठी एक आचारसंहिता किंवा नियमावली तयार करणे आवश्यक आहे. तसेच सह निबंधक आणि प्रशासक याच्यामध्ये जे लागेबांधे असतात त्यांचाही विचार करणे आवश्यक आहे. मी उदाहरणात दिलेल्या सोसायटीचा प्रश्न आज जरी सुटलेला दिसत आहे. तरी धोरणात्मक दृष्टीने या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मी मंत्री महोदयांना विनंतो करतो की, प्रशासकाने संस्थेच्या खात्यातून किती पैसे काढावेत यावर बंधन घालता येईल काय याचा सर्वंकष विचार शासनाने करावा. जेणेकरुन प्रशासकामार्फत सहकारी गृह निर्माण संस्थेला ज्या आर्थिक दिवाळखोरीत जावे लागते त्याला आळा बसू शकतो व खरोखरच प्रशासक किती सहकारी गृह निर्माण संस्थांवर परिणामकारक ठरु शकतो, याचाही विचार व्हावा अशी विनंती करुन मंत्री महोदयांकडून उत्तराची अपेक्षा करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

----------

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून अत्यंत महत्वाचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला आहे, त्यावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

महोदय, या निमित्ताने मला एक-दोन सूचना करावयाच्या आहेत. त्यात प्रथम त्यांच्याकडे असलेल्या अधिकाराचा गैरवापर करुन प्रशासकच भ्रष्टाचार करतात, असे वेळोवेळी स्पष्ट झालेले आहे. सहकारी गृह निर्माण संस्थेच्या चेअरमन आणि सेक्रेटरी यांनी एम-20 हे बंध पत्र भरुन दिले पाहिजे, तसे बंध पत्र भरुन दिले नसतील तर तातडीने अशी समिती बरखास्त केली जाते, अशी कायद्यात तरतूद आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे ..

सभापती महोदय, सोसायटीचे चेअरमन, सेक्रेटरी आपला कामधंदा सांभाळून सोसायटीचे काम करीत असतात. परंतु कार्यबाहुल्यामुळे एम-20 बंधपत्र देण्याचे काही वेळा राहून जाते. परंतु कायद्यान्वये ज्या सोसायटीने एम-20 बंधपत्र दिले नाही, कमिटी डिझॉल्व्ह झाली असेल, सोसायटीमध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार किंवा आर्थिक गैरव्यवहार झाला नसेल तर त्याच सोसायटीतील दुसरे तीन सदस्यांची प्रशासकीय समिती तयार करुन व या समितीने सहा महिन्यात निवडणूक होईपर्यंत` सोसायटीचा आर्थिक व्यवहार आणि इतर रुटींनच्या गोष्टी केल्या तर अधिक चांगले होईल असे मला वाटते. बाहेरचा प्रशासक नेमण्यापेक्षा सोसायटीतीलच सदस्यांनी हे काम केले तर ते काम अधिक चांगल्या प्रकारे करु शकतील. त्यामुळे याबाबत शासन विचार करणार आहे काय ?

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मुंबई आणि उपनगरातील सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रश्नासंदर्भात अर्धातास चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. सहकारी संस्थेची निवडणूक झाल्यानंतर एम-20 हे बंधपत्र निवडून येणा-या संचालकांनी दाखल केले पाहिजे. यासंदर्भातील कायद्यात सुधारणा करुन गृहनिर्माण संस्थेला एम-20 बंधपत्र देण्याची मुदत 45 दिवसांनी द्यावयाची मुभा देण्यात आलेली आहे. यासंदर्भातील प्रश्न सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी उपस्थित केलेला आहे.

यासंदर्भात माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार मुंबई शहराचा विचार केला तर एकंदरीत 2163 गृहनिर्माण संस्था आहेत. मुंबई शहर-2 व पूर्व उपनगरे मिळून 4156, मुंबई शहर -3 व पश्चिम उपनगरे मिळून 13215 गृहनिर्माण संस्था आहेत. एकंदर 20834 गृहनिर्माण संस्थांची नोंदणी सहकार खात्यामध्ये झालेली आहे. एम 20 बंधपत्र दाखल न केल्यामुळे काही गृहनिर्माण संस्थांमध्ये प्रशासकाची नेमणूक करण्यात आलेली आहे. 20834 गृहनिर्माण संस्थांपैकी फक्त 168 गृहनिर्माण संस्थांवर प्रशासक नेमण्यात आलेले आहेत. कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे 31 गृहनिर्माण संस्थांवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. एकंदरीत मुंबई शहर व उपनगराचा विचार केला तर अंदाजित 21000 गृहनिर्माण संस्थांपैकी फक्त 200 गृहनिर्माण संस्थांवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे म्हणजे 1 टक्क्यापेक्षा कमी गृहनिर्माण संस्थांवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मला आपल्याला सांगावयाचे आहे की, सहकार खात्यातील अधिका-यांना प्रशासकाची जबाबदारी सोपवली जात असते. सहकार खात्यातील निवृत्त अधिकारी तसेच दुस-या खात्यातील अधिका-यांचीही नियुक्ती केली जात असते. तसेच वकील, सी.ए. यांची सुध्दा प्रशासक म्हणून नियुक्ती केली जात असते. परंतु 95 टक्के प्रशासकीय अधिकारी म्हणून सहकार खात्यातील अधिकारी व सेवानिवृत्त अधिका-यांचीच प्रशासकीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली जात असते.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी पद्मसागर गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके..

त्या संस्थेवर दिनांक 3.1.2010 ते दिनांक 29.5.2010 या कालावधीसाठी प्रशासक नेमण्यात आले होते. आता त्या संस्थेच्या निवडणुका झाल्या असून नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आले आहे. सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले होते की ,संस्थेच्या बॅक खात्यातून 40 हजार रुपयाची रक्कम प्रशासकांनी काढली होती. अर्थात हे पैसे काढण्यात आले होते हे मला मान्य आहे परंतु ती रक्कम त्यांनी खर्च न करता परत खात्यामध्ये भरली होती. 26 जानेवारीच्या कार्यक्रमाचा खर्च भागविण्यासाठी संस्थेच्या बॅक खात्यातून हा खर्च करण्यात यावा अशी सदस्यांनी प्रशासकांना विनंती केली होती त्यासा**ठी** 40 हजार रुपये काढले होते परंतु नंतर 26 जानेवारीच्या कार्यक्रमाचा खर्च त्यांनी चेकव्दारे केला होता आणि रोख रक्कमेचा भरणा बॅक खात्यामध्ये करण्यात आला होता. या पैशाचा कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही.

डॉ.दीपक सावंत : त्या संस्थेच्या सदस्यांनी हरकत घेतली होती. त्यामुळे प्रशासकांनी बॅक खात्यामध्ये हे पैसे भरले होते.

श्री.प्रकाश सोळंके: या बाबतीत चौकशी करण्यात आली असून त्या चौकशीमध्ये जे काही निष्पन्न झाले होते ते मी आपल्याला सांगितले आहे. शासनाकडील माहितीनुसार प्रशासकाने ही रक्कम बॅकेच्या खात्यामध्ये भरली आहे. प्रशासकाच्या कालावधीमध्ये त्यांना काही प्रमाणात खर्च करावा लागतो. संस्थेच्या नोकरवर्गाचा पगार, साफ सफाई, दिवा बत्ती, प्रॉपर्टी टॅक्स इत्यादी जो काही वैधानिक बाबीवर त्यांना खर्च करावा लागतो . ज्या ज्या सहकारी गृह निर्माण संस्थांमध्ये प्रशासक नेमण्यात आले आहेत त्या संस्थांचे लेखा परीक्षण अप टू डेट करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

सभापती महोदय, त्याच संस्थेमधील सदस्यांचे एखादे प्रशासक मंडळ तेथे नेमण्यात यावे अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री प्रकाश बिनसाळे यांनी केलेली आहे तेव्हा या सूचनेचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. सभासदांनी निवडणुकीच्या माध्यमातून संचालक मंडळ नेमून त्या संस्थेचा कारभार करावा असे अपेक्षित आहेत त्यामुळे ज्या सदस्यांवर कारवाई झालेली आहे वा कलम 78 अन्वये ज्यांना अपात्र ठरविले आहे आणि संस्थेवर प्रशासक नेमण्यात आला आहे तेव्हा असे सदस्य वगळून ज्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही अशा सदस्यामघून तीन किंवा पाच सदस्यांचे प्रशासक मंडळ नेमण्याबाबत शासन निश्चितपणे विचार करील.

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके ...

सभापती महोदय,बंधपत्राबाबत मी सांगू इच्छितो की, प्रत्येक निवडून आलेल्या संचालकांनी स्टॅम्प पेपरवर बंधपत्र द्यावे आणि त्याच्या माध्यामातून ते अधिक जबाबदारीने त्या संस्थेमध्ये काम करतील अशी भूमिका शासनाची आहे हे आपणा सर्वांना माहीत आहेच.त्यामुळे बंधपत्र देण्यापासून कोणालाही सूट देऊ नये असे मला वाटते, गृह निर्माण सोसायटीच्या बाबतीत 15 दिवसां ऐवजी 45 दिवसात बंधपत्र द्यावे अशी मुदत वाढ देऊन बंधपत्र सादर करणे कायद्याने बंधनकारक केलेले असल्यामुळे काही प्रमाणात हा प्रश्न मिटणार आहे परंतु त्यांना बंधपत्रातून मुक्तता देता येणार नाही. तशी जर देण्यात आली तर काही संस्थांच्या सदस्यांना बंधपत्रातून मुक्तता दिली आणि काही सदस्यांना मात्र ते बंधनकारक केले असे होईल. त्यामुळे बंधपत्र देण्यापासून कोणालाही सूट देता येणार नाही सन्माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केल्या आहेत त्याबाबत मी त्यांचे मनापासून आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

**पृ.शी.** :गणपतीपुळे व श्री क्षेत्र हरिहरेश्वर (जि.रायगड)
या मंदिर परिसरात असलेल्या सोयी सुविधांचा अभाव

**मु.शी.** :गणपतीपुळे व श्री क्षेत्र हरिहरेश्वर (जि.रायगड)
या मंदिर परिसरात असलेल्या सोयी सुविधांचा अभाव या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 3481 ला दिनांक 22 मार्च 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.संजय केळकर,वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा- तास चर्चा.

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय,"गणपतीपुळे व श्री क्षेत्र हरिहरेश्वर (जि.रायगड) या मंदिर परिसरात असलेल्या सोयी सुविधांचा अभाव " या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 3481 ला दिनांक 22 मार्च 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय या विषयावरील माझी अर्धा तास चर्चा एक वर्षापासून प्रलंबित होती.ती आज या ठिकाणी उपस्थित करण्याची संधी मला मिळाली आहे.रत्नागिरी जिल्यातील गणपतीपुळे आणि रायगड जिल्हयातील हरिहरेश्वर या दोन्ही ठिकाणी मोठया प्रमाणावर भक्त मंडळी जातात. पावसाळा सोडून इतर दिवशी रोज आठ ते दहा हजार भक्त मंडळी गणपतीपुळे येथे भेट देत असतात त्याचबरोबर हरिहरेश्वर येथे मोठया प्रमाणावर राज्यातून आणि देशातून भक्त मंडळी भेट देत असतात. हरिहरेश्वरचा विकास आराखडा 1993 साली मंजूर करण्यात आला होता त्य ठिकाणी 10.24 लाख रुपयांचा निधी त्याकरता मंजूर करण्यात आला होता.

नंतर श्रीमती रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . . .

परंतु प्रत्यक्षात त्याठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून अनेक कामे प्रलंबित आहेत. त्याठिकाणच्या देवस्थानच्या कमिटीने शासनाकडे पत्र व्यवहार केलेला आहे. त्याठिकाणी कामांचा आराखडा देण्यात आला होता त्यातील काही कामे प्रलंबित आहेत. उदाहरण द्यावयाचे तर या कामांच्या बाबतीत जी यादी आहे, त्यानुसार निवळे-चाफे रस्त्याचे रुंदीकरण, वळण रस्ता आणि त्याचं डांबरीकरण या बाबतीत जी माहिती देण्यात आली आहे, त्याप्रमाणे अद्याप काम हाती घेण्यात आलेले नाही. चाफे-गणपतीपुळे रस्ता या प्रमुख जिल्हा मार्गाचे काम हाती घेण्यात आलेले नाही. वडोरे रस्त्यावरील पुलाचे काम अद्याप हाती घेण्यात आलेले नाही. मुलांसाठी बगिचा तयार करण्याचे काम, पोहोण्याचा तलाव, हेलीपॅड तयार करणे , लोकांना बसण्यासाठी बाकडी, करमणूक तथा आरोग्य केंद्र व व्यायाम शाळा ही कामे अद्यापही हाती घेतलेली नाहीत. नळ योजनेच्या उद्‌भवनाजवळ एक पक्का बंधारा बांधण्याच्या बाबतीत काम प्रस्तावित केले होते, ते देखील हाती घेतलेले नाही. तसेच व्यापारी संकुलाच्या संबंधात 2001 मध्ये भूमीपूजन झाले होते, पण त्याला पर्यावरण विभागाची परवानगी नसल्याने ही बाब केंद्र शासनाकडे असून ही बाब अजूनही प्रलंबित आहे. त्यामुळे तेथे व्यापारी संकुल व सदरहू काम सुरु झालेले नाही. तसेच तेथे धर्मशाळा बांधण्याचे कामही हाती घेण्यात आलेले नाही. त्याठिकाणी सार्वजनिक ग्रंथालय बांधण्याबाबतचा मुद्दा बजेटमध्ये घेण्यात आला होता, पण त्याचेही काम हाती घेतलेले नाही. त्याठिकाणी सुलभ शौचालयाच्या दोन युनिटचे कामही झालेले नाही. त्यामुळे गणपतीपुळे हे कोकणातील अत्यंत महत्वाचे पर्यटन स्थळ असून देखील तेथील अनेक प्रकारची कामे प्रलंबित आहेत. तसेच मंदिरालगतची 6 एकर जमीन शासनाच्या ताब्यात असून, त्यातील 44 गुंठे जमीन मिळावी यासाठी मागणी करण्यात आलेली आहे आणि देवस्थान त्याचे पैसेही देण्यास तयार आहे. जर ही जमीन मिळाली तर त्याचा उपयोग पार्कींगसाठी सोय करणे, बैठकीची व्यवस्था करणे, सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प तयार करणे, समुद्रातील निर्माल्याच्या माध्यमातून खत प्रकल्प तयार करण्यासाठी या जमिनीचा उपयोग करण्यात येईल, या कामासाठी 44 गुंठे जमिनीची मागणी केली आहे. पण ती देखील प्रलंबित आहे.

सभापती महोदय, मी डिसेंबर 2009 मध्ये माहिती घेतली तेव्हा असे दिसून आले की, त्या कालावधीमध्ये त्याठिकाणी एकंदर 19,282 लोक दर्शनासाठी आले होते म्हणजे त्याठिकाणी एवढया मोठया प्रमाणात गर्दी झाली होती.त्याठिकाणी जो सभामंडप आहे तो तात्पुरत्या स्वरुपामध्ये बांधला

श्री.संजय केळकर . . . .

आहे असे म्हणावे लागेल. परंतु अजून तेथे देवस्थानाला सभामंडप बांधण्यासाठी सुध्दा परवानगी मिळालेली नाही.तेथे झापांचा मंडप बांधण्यात आलेला आहे. त्यामुळे मंदिरामध्ये बांबूच्या लाईन लावून तेथील गर्दीचे नियोजन करावे लागते. त्याठिकाणी 24 तास सुरक्षा रक्षकांची गरज आहे. त्याठिकाणी बरीच मुले पोहण्यासाठी जातात, त्यांच्यावर नियंत्रण रहात नाही त्यामुळे बरेच अपघात होतात. अशा स्थितीत तेथे सुरक्षा रक्षक असणे गरजेचे आहे, पण ती बाब पूर्ण झालेली नाही. 1993 मध्ये जो विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे, त्यातील अशी अनेक कामे पूर्ण झालेली नाहीत. असे हे गणपतीपुळे देवस्थान मोठे आहे आणि तेथे देशातील पर्यटक जात असतात. आपण नेहमी असे म्हणतो की, देशातीलच नाही तर परदेशातील पर्यटक कोकणामध्ये आले पाहिजेत. परंतु आपण त्यांना जर सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या नाहीत तर हे पर्यटक तेथे येणार नाहीत. म्हणून या सोयी-सुविधा तातडीने उपलब्ध करुन द्याव्यात अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, दुसरे म्हणजे त्याठिकाणी हरिहरेश्वर आहे.पण तेथील विकास आराखडा देखील तयार करण्यात आलेला नाही. तेथील कामांसाठी 2010 मध्ये 9 लाख 75 हजार रुपयांचा निधी मंजूर केला होता. परंतु तो निधी कुठे-कुठे खर्च करण्यात आला याची काही कल्पना नाही. तेथील देवस्थानाला तीन हजार रुपये वार्षिक अनुदान मिळत आहे. त्यामध्ये देखील वाढ करण्याची गरज आहे. हरिहरेश्वर असेल, दिवेआगर असेल, श्रीवर्धन असेल येथे देखील मोठया प्रमाणात पर्यटक, भाविक येत असतात आणि येथील जे रस्ते आहेत ते राज्य मार्ग निकषानुसार होणे गरजेचे आहे. तसेच गणपतीपुळे व हरिहरेश्वर याठिकाणी नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण होणे देखील आवश्यक आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. संजय केळकर.....

अस्थी विसर्जन करण्याकरिता मोठया संख्येने भाविक त्या ठिकाणी जातात परंतु तो अस्थी वसर्जनाचा परिसर विकसित झालेला नाही. त्यामुळे त्या ठिकाणी निधी देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, हरिहरेश्वर भागात मोठया प्रमाणात अपघात होतात, म्हणून त्या ठिकाणी 24 तास सुरक्षा रक्षकांची गरज आहे. वाहनतळ उपलब्ध नाही. पावसाळयामध्ये त्या ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांचे आणि पर्यटकांचे मोठया प्रमाणात हाल होतात म्हणून या ठिकाणी वाहनतळ करण्याची गरज आहे. या दोन्ही धार्मिक स्थळांच्या ठिकाणी आणि पर्यटन स्थळांच्या ठिकाणी मोठया प्रमाणात उणिवा आहेत. पर्यटकांना मोठया प्रमाणात सोयी-सुविधा उपलब्ध व्हावयास पाहिजेत, त्या झालेल्या नाहीत. तरी देखील मोठया प्रमाणात पर्यटक त्या ठिकाणी जातात ही गोष्ट लक्षात घेऊन त्या ठिकाणी आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात आल्या तर त्या ठिकाणी आणखी मोठया संख्येने पर्यटक आणि भाविक जातील म्हणून या चर्चेच्या माध्यमातून पुढील कार्यवाही करण्यात यावी, अशी मी विनंती करतो. ही अर्धा-तास चर्चा वर्षभरापूर्वी उपस्थित करण्यात आली होती. माझी तेथील लोकांबरोबर चर्चा झालेली आहे. परंतु त्या ठिकाणी काही सुधारणा झालेल्या आहेत असे दिसत नाही. तेव्हा मंत्री महोदयांनी यासंदर्भात ठोस अशा प्रकारचे नियोजन करावे, अशा प्रकारची विनंती करतो. धन्यवाद.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधन ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी जी चर्चा उपस्थित केली आहे त्यामध्ये दोन महत्वाचे मुद्दे मला या ठिकाणी मांडावयाचे आहेत.

सभापती महोदय, गणपतीपुळे येथील समितीने तेथे एक कमान उभारण्याच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाकडे एक प्रस्ताव दिला होता. तो प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, त्या प्रस्तावाची नेमकी सद्य:स्थिती काय आहे? या प्रस्तावाची प्रत माझ्याकडे आहे. ती प्रत मी उद्या मंत्री महोदयांच्या कार्यालयात सादर करीन. दुसरा मुद्दा असा की, हे पर्यटनक्षेत्र असल्यामुळे हजारो पर्यटक तेथे पोहण्यासाठी जात असतात परंतु तेथे रेस्क्यू गार्डच्या संकल्पनेचा अभाव आहे. या दोन गोष्टीकडे शासन लक्ष देईल काय? एवढेच दोन मुद्दे मला या ठिकाणी मांडावयाचे आहेत. धन्यवाद.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी अर्धा-तास चर्चेमध्ये उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. कोकणामध्ये सर्वात निसर्गरम्य क्षेत्र कोणते असेल तर मला असे वाटते की, ही दोन्ही तीर्थक्षेत्रे आहेत. ती विकसित केलेली आहेत. गणपतीपुळेला जाताना आरेवारे येथून एक रस्ता जातो. आरेवारे या ठिकाणी असलेला समुद्र किनारा अतिशय निसर्गरम्य आहे. त्याठिकाणी गेल्या नंतर आपण कोकणात नसून इतर कुठे तरी परदेशात आहोत असे वाटते इतका सुंदर समुद्र त्या ठिकाणी आहे. आरेवारे या ठिकाणी राहण्याची व्यवस्था नाही. तसेच गणपतीपुळे या ठिकाणी सुध्दा म्हणावी तेवढी डेव्हलपमेंट झालेली नाही. या ठिकाणी 1993 ते 95 या दरम्यान मोठया प्रमाणात मंदिराची सुधारणा झालेली आहे. पण पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने त्या ठिकाणी आराखडयाप्रमाणे ज्या सोयी-सुविधा निर्माण व्हावयास पाहिजे होत्या त्या उपलब्ध झालेल्या नाहीत. गणपतीपुळे येथील समुद्र किनारा अतिशय थोकादायक आहे. त्याठिकाणी अनेक लोकांनी आपला जीव गमावलेला आहे. त्यामुळे गणपतीपुळे येथे सुध्दा सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना केली पाहिजे. त्याठिकाणी येणाऱ्या बाहेरच्या पर्यटकांना हा समुद्र किनारा किती धोकादायक आहे याची कल्पना येत नाही. त्या ठिकाणी केवळ एक बोर्ड लावून उपयोग होणार नाही. या दोन्ही ठिकाणी लोकांना चांगल्या प्रकारच्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या तर मला असे वाटते की, या ठिकाणी मोठया प्रमाणात पर्यटक येतील तेव्हा या सूचनेचा शासनाने तातडीने विचार करावा, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते. धन्यवाद.

-----

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी हरिहरेश्वर आणि गणपतीपुळे येथील विकासाच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. सर्वप्रथम विलंब झाला हे मी नाकारत नाही. याचे कारण असे आहे की, या बाबतचा आराखडा जिल्हाधिकारी तयार करतात. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, शासनाने फार अगोदर पैसे मंजूर करुन देखील त्यांचा आराखडा आमच्यापर्यंत आलेला नाही, ही सत्य परिस्थिती आहे. पण हे करताना काही जे प्रश्न आहेत ते स्थानिक स्तरावर सोडविणे अत्यंत गरजेचे आहे. आपण ॲप्रोच रोडच्या बाबतीत उल्लेख केला. आपण जर हरिहरेश्वरला गेलो तर त्या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण आहे. त्या ठिकाणी रस्ता बांधावयाचा असेल तर अतिक्रमण काढावे लागेल. जोपर्यंत ग्रामपंचायत अतिक्रमण काढणार नाही तोपर्यंत रस्ता बांधणे शक्य नाही. ही सत्य परिस्थिती आहे. आपण गणपतीपुळे तसेच हरिहरेश्वर या दोन्ही ठिकाणी पाहिले तर अजिबात जागा उपलब्ध नाही. कोणतेही विकासाचे काम करावयाचे असेल किंवा मूलभूत सुविधा उपलब्ध करुन द्यावयाची असेल तर त्यासाठी जागा पाहिजे. परंतु त्या ठिकाणी जागाच उपलब्ध नाही. पार्कीन्गचा प्रश्न आहे. या कामासाठी मागे आपण जवळपास 11 कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर केला होता. हरिहरेश्वरसाठी 4 कोटी रुपये रिलीज सुध्दा केले होते. त्यामध्ये टॉयलेट, रस्ता, पार्कीन्ग, स्युवेज तसेच सौंदर्यीकरण तसेच जेट्टी आणि नवाबलेकची सुधारणा असा प्रस्ताव होता. आताच या संदर्भात जिल्हाधिकारी यांनी त्यामध्ये काही दुरुस्त्या करुन प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविलेला आहे. नवाबलेक सुधारणा आणि सौंदर्यीकरणाऐवजी महिरप कमान, गार्डन आणि सौंदर्यीकरणाचा प्रस्ताव दिलेला आहे. हरिहरेश्वर मंदिराच्या सौंदर्यीकरणाचे जे काम दिले आहे त्यामध्ये संरक्षक भिंतीचे काम त्यांनी प्रस्तावित केले आहे. म्हणजे पुष्कळ दुरुस्त्या करुन त्यांनी प्रस्ताव पाठविलेला आहे. तो प्रस्ताव 2010 मध्ये आलेला आहे. पैशाच्या बाबतीत आम्ही अगोदर एक टप्पा रिलीज केलेला आहे. याची अंमलबजावणी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातूनच होणार आहे. त्यामुळे त्यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे त्याला शासनाने मान्यता दिलेली आहे. अंमलबजावणी जिल्हाधिकाऱ्यांनीच करावयाची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2...

RDB/ KTG/ KGS

श्री. रणजित कांबळे ....

सन्माननीय सदस्यांनी गणपतीपुळेच्या बाबतीत जागेच्या मागणीच्या संदर्भात एक प्रश्न उपस्थित केला होता. हे खरे आहे की, सरपंच आणि देवस्थान यांनी सरकारची जवळपास 4400 चौ.मीटर जागा आहे ती मागण्यासाठी एक प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता ती बाब शासनाच्या विचाराधीन आहे. वेगवेगळ्या कामासाठी त्यांनी तो प्रस्ताव दिलेला आहे. निश्चितपणे गणपतीपुळेच्या बाबतीत आतापर्यंत टुरिझमला कोणतीही जागा टुरिझमसाठी घेण्याचा अधिकार नव्हता. आता नुकताच मागच्या महिन्यामध्ये तो जी.आर.आलेला आहे. निश्चितपणे आता आम्ही जागा संपादित करुन मंदिराला देणार आहोत. ज्या अनेक अडचणी आहेत त्यामध्ये एक अडचण अशी आहे की, दोन्ही ठिकाणी स्युवेज वॉटरचे जे काम आहे ते सीआरझेडमध्ये येते. या बाबतीत आपले नॉर्म्स आहेत. ते सीआरझेडमध्ये येतेच. ओला कचरा आणि सुका कचरा वेगळा करणे, सॅनिटेशनचे काम करणे ही कामे शेवटी स्थानिक स्वराज्य संस्थेलाच करावी लागता. आपण पैसे मंजूर करुन देऊ शकतो परंतु त्यांची अंमलबजावणी ग्रामपंचायतीला किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेला करावी लागते. गणपतीपुळेचा जो प्रस्ताव आहे त्यामध्ये काही कामे उदा. स्युवेजचे काम हे सीआरझेडच्या अडचणीमुळे अडलेले आहे. तो प्रश्न जिल्हाधिकाऱ्यांना आपल्या स्तरावर सोडवावा लागणार आहे. पण निश्चितपणे सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले की, यामध्ये विलंब झालेला आहे ते मी नाकारत नाही. यामध्ये दोन कारणांमुळे विलंब झालेला आहे. एक म्हणजे नवीन प्रस्ताव आताच आलेला आहे आणि दुसरे म्हणजे सीआरझेडचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मागे सन्माननीय मंत्री महोदय आणि मी एक बैठक घेतली होती. त्यामध्ये कोकण पॅकेजमधील जी कामे प्रलंबित आहेत ती तातडीने कशी मार्गी लावू शकू या उद्देशाने बैठक घेतली होती. पुन्हा एक रिव्ह्यू बैठक घेणार आहोत. त्या बैठकीमध्ये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना बोलविणार आहोत तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे संबंधित अधिकारी आहेत त्यांना सुध्दा बोलविणार आहोत. ते प्रश्न तातडीने कसे मार्गी लावू शकू यासाठी ही बैठक बोलविणार आहोत. हा प्रश्न कसा मार्गी लावता येईल यासाठी पाहिजे तर कोकण विभागातील जे सन्माननीय सदस्य इच्छुक आहेत त्यांना सुध्दा या बैठकीमध्ये बोलवू शकतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे....

दुसरा प्रश्न लाईफ गार्डसंबंधी उपस्थित करण्यात आला आहे. हरिहरेश्वरसाठी लाईफ गार्डस्, स्पीड बोटस् आणि लाईफ गार्डस्साठी लागणारा निधी याबाबतचा प्रस्ताव एमटीडीसीच्या मागील एका बैठकीत मंजूर झालेला आहे. कारण एकदा प्रस्ताव मंजूर झाला की, ही ऑन गोईंग प्रोसेस सुरु असते. गणपुतीपुळे व हरिहरेश्वर एमटीडीसीचे गेस्ट हाऊस आहेत. लाईफ गार्डस्चा ऑन गोईंग खर्च आहे. त्याबाबत एक कंपोनटच केला जाणार आहे. या दोन ठिकाणी ही व्यवस्था प्रथम केली जाणार आहे. कोकणामध्ये 30 बीच आहेत. प्रत्येक बीचवर कोठे ना कोठे अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. परंतु या दोन ठिकाणच्या बीचवर हे काम प्राधान्याने केले जाईल. त्यासाठी मान्यता दिलेली आहे. त्यानंतर उर्वरित बीचेसवर अशी व्यवस्था केली जाणार आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय,..

**उप सभापती** : सभागृहाची वेळ दुपारी 12.30 पर्यंत होती. तथापि, दुपारी 12.35 पर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, या दोन ठिकाणी तातडीने ही व्यवस्था केली जाईल का, कारण शाळांना उन्हाळ्याची सुट्टी सुरु झाल्यावर लोक त्याठिकाणी जातील.

श्री.रणजित कांबळे : लाईफ गार्डस्बाबत मागील 3 आठवड्यापूर्वी झालेल्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता मिळाली आहे. एकदा लाईफ गार्डस् ठेवल्यानंतर त्यांना कायम स्वरुपी पगार द्यावा लागणार आहे. सरकार म्हणून निर्णय घेत असताना जॉब क्रिएट करावा लागतो. त्यासाठी एक प्रक्रिया आहे. हा प्रस्ताव वित्त विभागापर्यंत जावा लागतो. या प्रक्रियेला बायपास करता यावे म्हणून ज्या ज्या ठिकाणी एमटीडीसीचे गेस्ट हाऊसेस आहेत त्याठिकाणी त्यांच्या कंत्राटाचा हा एक भाग असणार आहे. त्यांनी लाईफ गार्डस् उपलब्ध करुन दिले पाहिजेत. ही व्यवस्था बायपास करुन तातडीने निर्माण करण्यासाठी मागील बैठकीत याबाबतच्या प्रस्तावाला मान्यता दिलेली आहे. त्यामुळे ही इक्विपमेंटस् लवकर घेता येतील. आता पुढील प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण केली जाणार आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहकार्याबाबत उल्लेख केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी आराखडा प्रसिध्द करावयाचा असतो असे मंत्री महोदय म्हणाले आहेत. पुणे जिल्ह्यासंबंधी याठिकाणी चर्चा झाली त्यावेळी सुध्दा वस्तुस्थिती समोर आलेली आहे. विभागीय आयुक्त अनेक कमिट्यांचे अध्यक्ष असतात. जिल्हाधिकारी पातळीवरील कमिटीचे जिल्हाधिकारी अध्यक्ष असतात. ही उच्चपदस्थ अधिकारी मंडळी स्थानिक पातळीवर बैठका घेत नाहीत, स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता आराखडा तयार करतात. हे अधिकारी स्थानिक लोकांची सोय होण्यापेक्षा गैरसाय कशी होईल अशा पध्दतीचा आराखडा तयार करतात. म्हणून माझी सूचना आहे की, गणपतीपुळे येथे मालगुंड ग्रामपंचायत आणि हरिहरेश्वर ग्रामपंचायत यांच्या बाबतीत जे सहकार्य रायगड व रत्नागिरी जिल्हाधिकाऱ्यांना पाहिजे असेल ते मी देण्यास तयार आहे. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी माझ्याशी संपर्क साधावा. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थेची अडचण सांगितली जात आहे ती चुकीची आहे. या दोन्ही ग्रामपंचायतींच्या ठिकाणी मी अनेकदा गेलो आहे. या संस्था माझ्या मतदार संघातील आहेत. दोन्ही ठिकाणी चांगले लोकप्रतिनिधी असल्यामुळे शासनाला जे सहकार्य पाहिजे ते देण्यास तयार आहोत. विशेषत: शासकीय आराखडा तयार करण्यापूर्वी जनतेकडून हरकती व सूचना मागविल्या जातात. त्या एकदा प्रसिध्द केल्या नंतर आमच्यासारखे सदस्य असतील, जिल्हा परिषद सदस्य, ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य, पंचायत समितीचे सभापती, सदस्य या सर्वांना बरोबर घेऊन यासंदर्भात शासनाला चांगले काम करता येईल. परवाच्या दिवशी पुणे जिल्ह्याबाबत चर्चा होत असताना सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी ही बाब निदर्शनास आणली होती. शासकीय समित्यांवर विभागीय पातळीवर व जिल्हा पातळीवर विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी अध्यक्ष असतात. त्याठिकाणी त्यांनी निर्णय घेताना या गोष्टींचा साकल्याने विचार केला तर यातून योग्य तो मार्ग निघेल.

श्री.रणजित कांबळे : सजेशन फॉर ॲक्शन.

**उप सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक पुन: दुपारी 1.00 वाजता भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.34 ते 1.00 पर्यंत स्थगित झाली. )

-----

यानंतर श्री.शिगम....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ D/ KTG/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 13:00

**<u>स्थगितीनंतर</u>**

**<u>सभापतीस्थानी माननीय सभापती</u>**

**<u>श्री. सचिन अहिर, गृहनिर्माण राज्यमंत्री यांचे वाढदिवसानिमित्त अभिनंदन</u>**

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आपल्या राज्याचे गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. सचिन अहिर यांचा आज वाढदिवस आहे. त्यांचे आपण अभिनंदन करावे अशी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो.

**सभापती** : गृहनिर्माण विभागाचे राज्यमंत्री श्री. सचिन अहिर यांचा आज वाढदिवस आहे. सभागृहाच्या वतीने मी त्यांना शुभेच्छा देत आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) T-2

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**मिरज शहर (जि.सांगली) येथील राष्ट्रीय दलित महासंघाचे कार्यकर्ते व अन्य पाच जणांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विष प्राशन केल्याबाबतची घटना**

**(१) * १३३२६ श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , श्री.प्रकाश बिनसाळे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.अरुण गुजराथी , श्री.जयंत पाटील , श्री.कपिल पाटील , श्री.सुभाष चव्हाण , श्री.हुसेन दलवाई, श्री.विजय सावंत , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.राजन तेली , डॉ.सुधीर तांबे , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.सतीश चव्हाण , श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.नागो गाणार , श्री.रामनाथ मोते : ** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज शहर (जि.सांगली) पोलीसांनी विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल केल्याने सांगलीतील राष्ट्रीय दलित महासंघाचे कार्यकर्ते व त्यांच्या कुटुंबातील अन्य पाच जणांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विषप्राशन केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार खोटा गुन्हा दाखल करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१), (२) व (३) सांगलीतील राष्ट्रीय दलित महासंघाचे कार्यकर्ते व त्याचे कुटूबांतील अन्य पाच जणाविरूद्ध विनयभंग व इतर बार्बीसाठी दि.२५/१२/२०१० रोजी गु.र.नं. १८९/२०१० भादंवि सहकलम ३६६ (क), ३५४, ३४२, ३८४, १४३, १४७, १४९, ४२७, ३२३, ५०४, ५०६ अन्वये मिरज शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. हे प्रकरण मिटवावे व गुन्हा दाखल होऊ नये यासाठी त्यांनी दि.२५/१२/२०१० रोजी जाळून घेवून आत्महत्या करण्याची धमकी दिली होती व त्यानुसार दि.२७/१२/२०१० रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. याबाबत त्यांचेविरूद्ध सांगली शहर पोलीस ठाणे भाग-५ गुन्हा नोंद क्र.२६४/२०१० भा.दं.वि. कलम ३०९, ३५३, १८६, १४३, १४७, १४९, ५०६ बीपी ॲक्ट ११०, ११२ प्रमाणे दि.२७/१२/२०१० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी कोणत्याही प्रकारचा खोटा गुन्हा दाखल केला नसल्याने त्यांचेविरूद्ध कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) विलंब झालेला नाही.

श्री. रमेश शेंडगे : सांगलीमध्ये दलित कुटुंबीय त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात दाद मागण्यासाठी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये गेले. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये गेल्यानंतर ते तेथे त्यांच्यावर होणा-या अन्यायाबाबत, अत्याचाराबाबत संबंधित

..3..



MSS/ KGS/ D/ KTG/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 13:00

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अधिका-यांना विनंती करीत होते की त्यांच्यावरील अन्याय दूर करावा. परंतु प्रशासनातील कोणत्याही अधिका-याचा त्यांनी केलेल्या विनंतीला प्रतिसाद मिळत नव्हता. त्यांच्यावर खोटया केसेस दाखल करुन त्यांच्यावर अत्याचार करण्यात येत आहे असे ते वारंवार सांगत होते. परंतु त्यांच्या सांगण्याची कोणीही दखल घेत नव्हते. त्यांना पोलीस कस्टडीमध्ये टाकण्यात येणार होते. त्या अगोदर त्यांचे म्हणणे अधिका-यांनी ऐकून घ्यावे अशी त्यांची भावना होती. परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे आणि कोणताही पर्याय न राहिल्यामुळे त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये विष प्राशन केले आणि ते कुटुंब जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेशुद्ध पडले. या प्रकाराची कोणीही दखल घेतली नाही. एका दलित कुटुंबामध्ये त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होतोय अशी भावना निर्माण झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील कोणत्याही अधिका-याने त्याची दखल घेतली नाही. तेव्हा अशा प्रकारे अन्याय, अत्याचारा विरुध्द दाद मागणा-या कुटुंबाकडे प्रशासनातील ज्या जबाबदार अधिका-याने दुर्लक्ष केले त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय, तसेच या घटनेची शासन चौकशी करणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : संबंधित आरोपीवर श्रीमती मंजू भाटीया या महिलेने विनयभंग केल्याची तक्रार केली होती. तक्रार केल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली तरी पोलिसांवर खापर फोडले जाते आणि कारवाई नाही केली तरी खापर फोडले जाते. इचलकरंजी या ठिकाणी अशा प्रकारच्या अनेक गुन्ह्याची नोंद आहे. गुन्हे नोंद झाल्यानंतर तपासाला सामोरे जाणे, न्याय प्रक्रियेचा वापर करणे हे मार्ग उपलब्ध असताना जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जाऊन गोंधळ निर्माण करुन विष पिण्याची धमकी देणे हे योग्य नाही. ट्रॅक रेकॉर्ड बघितल्यानंतर यांच्यावर अनेक प्रकारच्या गुन्ह्यांची नोंद झालेली आहे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केली की आरोपी दलित समाजाचे आहेत. त्यामुळे वरिष्ठ अधिका-याकडून ही घटना मी पुन्हा एकदा तपासून घेईन.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-03-2011          ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही )          T-4

MSS/ KGS/ D/ KTG/ ST/     पूर्वी श्री. खंदारे          13:00

**भूविकास बँकांसाठी केंद्र शासनाकडून आलेला रू.५०० कोटीचा**
**निधी वापराविना पडून असल्याबाबत**

**(२) * १३८५२ श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री.मोहन जोशी , श्रीमती अलका देसाई , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.धनंजय मुंडे , डॉ.सुधीर तांबे , श्री.चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून सन २०१० मध्ये भूविकास बँकांसाठी देण्यात आलेला ५०० कोटी रुपयांचा निधी वापराविना पडून आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज देणाऱ्या बँकांनी निम्मेच कर्ज वाटप कले असून आणखी कर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०११ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज देणाऱ्या भूविकास बँकांचे बळकटीकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपायायेजना केली आहे तसेच संबंधित बँकांकडून शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत तपशिल घेऊन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) भूविकास बँकेच्या पुनरुज्जीवनासाठी उपाययोजना सुचविण्याबाबत शासनाने लघुगटाची स्थापना केली असून लघूगटाने सादर केलेल्या शिफारशी शासनाने तत्वत: स्वीकारल्या आहेत त्यानुसार पुढील कार्यवाही चालू आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : या भूविकास बँकेची स्थापना होऊन जवळपास ७५ वर्षे पूर्ण झ ालेली आहेत. हे राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. शेतक-यांना सुलभ हप्त्याने कर्ज देणा-या या बँकेने शेतक-यांना कर्ज देणे बंद केलेले आहे. शासनाने या प्रश्नाबाबत असे उत्तर दिले आहे की,

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/ 13:05

ता.प्र.क्र.13852.......... श्री.जयप्रकाश छाजेड....

लघुगटाची स्थापना केली आहे आणि त्यांनी शिफारशी केल्यानंतर पूर्ववत केले जाईल. या लघुगटाच्या शिफारशी बँका पुनरुज्जीवन करण्यासाठी सकारात्मक आहेत का? यासंबंधी कालबध्द कार्यक्रम निश्चित केला आहे का? हा कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत बँकांचा संचित तोटा निर्लेखित करुन ताबडतोब कर्ज वाटपाची प्रक्रिया सुरु करण्यात येईल काय? राज्यातील भूविकास बँकांमधील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत शासनाचे धोरण काय आहे?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, टास्क फोर्सच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या आहेत. या शिफारशींप्रमाणे राज्यातील 29 जिल्हा भूविकास बँका आणि एक फेडरल भूविकास बँक जी राज्य स्तरावर सुरु आहे यांच्याबाबत सकारात्मक शिफारशी टास्क फोर्सच्या माध्यमातून शासनास प्राप्त झाल्या आहेत. साधारणत: दोन महिन्यात शासन या संदर्भात निर्णय घेईल. या विभागाचा प्रमुख या नात्याने माझी मनापासून भूमिका आहे की, या जिल्हा भूविकास बँका 1988 सालापासून बंद आहेत. स्पर्धेमध्ये या बँका सुरु होणे आवश्यक आहे म्हणून सरकारचा विचार सकारात्मक राहणार आहे. जिल्हा स्तरावर भूविकास बँका सुरु करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. या बँकांचा संचित तोटा निर्लेखित करावा अशी माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. सभापती महोदय, मध्यंतरी आपल्या दालनात भूविकास बँकांबाबत बैठक झाली होती. आपण काही सूचना केल्या होत्या. शेतकऱ्यांचे जे व्याज आहे ते काही प्रमाणात कमी करण्याबाबत आपण सूचना केली होती. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये असा निर्णय घेण्यात आला की, यापूर्वीच्या काळात 765 कोटी रुपये व्याज माफ केले आहे. नवीन एक प्रस्ताव आला होता. 31 मार्च, 2007 नंतर ज्या शेतकऱ्यांचे व्याज थकले आहे त्याबाबत वेगळा विचार निश्चितपणे करीत आहोत. काही दिवसापूर्वी माननीय राज्यमंत्र्यांकडे या संदर्भात बैठक झाली होती. सरकारची सकारात्मक भूमिका राहणार आहे. शेतकरी वर्षानुवर्षे कर्जामध्ये अडकले आहेत. त्यांच्या बाबतीत मार्ग काढणे गरजेचे आहे. कर्मचाऱ्यांबाबतचा प्रश्न आहे. भूविकास बँकांमध्ये 1646 कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांच्या पगाराचा प्रश्न आहे. वेळेवर त्यांना पगार मिळत नाही, म्हणून अडचण निर्माण झाली आहे. पगाराची रक्कम देण्यासंदर्भात वसुलीचे प्रयत्न करीत आहोत. व्हीआरएसची योजना तयार केली आहे. यापुढील दोन महिन्यात किमान 14 जिल्हा भूविकास बँका सुरु करण्याच्या संदर्भात शासनाचा प्रयत्न सुरु आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/ 13:05

ता.प्र.क्र.13852..........

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय मुद्देसूद उत्तर दिले आहे. काही गोष्टी त्यांनी मान्य केल्या आहेत. जोपर्यंत भूविकास बॅकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दीर्घकाळाचे कर्ज दिले जाणार नाही तोपर्यंत या बँकांचे पुनरुज्जीवन कसे होणार हा प्रश्न आहे. भूविकास बँकांच्या सगळ्या शाखांमध्ये कर्मचाऱ्यांच्या युनियनचे काम मी पाहतो. 1646 कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. रायगड जिल्हयातील बँकेमध्ये कर्मचाऱ्यांना पगार दिलेला नाही. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये देखील कर्मचाऱ्यांचे पगार झालेले नाहीत. त्यांना सांगितले जाते की, वसुली करा आणि पगार घ्या. फक्त विचार करुन चालणार नाही. जोपर्यंत आम्ही त्यांना फीड देणार नाही, जोपर्यंत त्या शेतकऱ्यांपर्यंत आपण पोहोचणार नाही तोपर्यंत वसुली होणार नाही. शेतकऱ्यांना दीर्घकाळाचे कर्ज केव्हापासून देणार आहात? विशेषत: सिंधुदुर्ग आणि रायगड जिल्हयातील भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांचे दोन वर्षापासून पगार थकले आहेत ते केव्हा देणार आहात?

नंतर व्ही.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13852......

श्री हर्षवर्धन पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांनी या बँका पुन्हा सुरु करण्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला. त्यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, भूविकास बँका सुरु करण्याच्या संदर्भात दीर्घ व अल्प मुदतीची कर्जे सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतल्याचे मी मघाशीच सांगितले आहे. तसेच मध्यंतरी असाही एक प्रस्ताव आला होता की, या बँकांना पब्लिकमधून ठेवी घेण्याची परवानगी द्यावी. कारण काही जिल्ह्यांमध्ये त्याला चांगला प्रतिसाद मिळतो व अशा ठेवी देण्यास लोक तयार आहेत. याचे कारण या बँकेचे एक वेगळे अस्तित्व आहे म्हणून तोही विचार शासनाच्या स्तरावर सुरु आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या वसुलीच्या बाबतीत वन टाईम सेटलमेंटची जी मुदत 31 मार्च, 2011 होती ती वाढवून मिळावी अशी अनेक शेतकऱ्यांची मागणी आहे. त्या निमित्ताने मी आजच घोषित करतो की, वन टाईम सेटलमेंटच्या संदर्भातील मुदत 31 मार्च, 2012 पर्यंत वाढविण्यात येत आहे व त्याचा शेतकऱ्यांना फायदा होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, भूविकास बँकाकडून शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जावरील व्याज माफ करण्याचे आदेश अगोदरच दिले होते. पण प्रत्यक्षात त्याचा अंमल झालाच नाही. कारण मुद्दल अधिक व्याज घेऊन काही केसेसचे वन टाईम सेटलमेंट करावे लागते असे शासनाचे मत आहे. पण वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून सहकार मंत्र्यांसह वेगवेगळ्या विभागांकडे अनेक तक्रारी आलेल्या आहेत. त्यात 1 लाखाच्या कर्जावर 8 लाख एवढे व्याज शेतकरी कसे भरणार आहेत अशी त्यांची तक्रार आहे. त्यासंदर्भात काही शेतकरी कोर्टात सुध्दा गेले आहेत, हे शासन थांबविणार काय ? तसेच वन टाईम सेटलमेंटची मुदत वाढवित असताना त्यासंबंधी काही मार्गदर्शक तत्वे व निकष असले पाहिजेत. कारण 1 लाख कर्ज आणि 8 लाख व्याज अशी वसुली करुन शेतकऱ्याची संपत्ती शासन जप्त करायला निघाले तर शेतकऱ्याला आत्महत्येशिवाय पर्याय नाही. म्हणून वर्धा जिल्ह्यातून ज्या अनेक तक्रारी झाल्या आहेत व काही शेतकरी कोर्टात सुध्दा गेले आहेत त्यांचा विचार शासन करणार काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, एका बाजूला सावकारी प्रतिबंधक कायदा मध्यंतरी आपण या राज्यात लागू केला. त्यानुसार दामदुपटीपेक्षा जास्त व्याज घेता येणार नाही. तरी देखील अनेक तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत. या तक्रारीमध्ये स्वत: लक्ष घालून शासनाने वन टाईम

....2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील.....-

सेटलमेंट पॉलिसी तयार केली आहे त्यानुसार पुढील व्याज 6 टक्क्याने आकारावे लागणार आहे. तसेच 31 मार्च, 2004 पर्यंतचे जे मुद्दल व व्याज हाते त्यातील संपूर्ण व्याज जवळपास 776 कोटी एवढी रक्कम शासनाने माफ केली आहे. 1 एप्रिल, 2004 पासून पुढे जे मुद्दल राहील त्यावर 10 टक्क्याने व्याजाची आकारणी करण्यासंबंधीचा निर्णय झालेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : 1.4.2004 पर्यंतची जी मुद्दल रक्कम आहे ती यामध्ये पकडणार आहे की व्याज पकडणार आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, 1.4.2004 पर्यंत असलेले मुद्दल व थकित व्याज मिळून जी रक्कम होती त्यातून संपूर्ण व्याजाची रक्कम शासनाने माफ केलेली आहे. आता 1.4.2004 नंतरची जी मुद्दल असेल त्यांच्यासाठी दोन वर्षाचा वन टाईम सेटलमेंटचा हप्ता देखील शेतकऱ्यांना करुन दिला आहे. पण पुन्हा दुष्काळ पडला म्हणून त्याला मुदतवाढ दिली आणि नंतर पुन्हा 2007 मध्ये देखील मुदतवाढ दिली. पुन्हा काही शेतकऱ्यांनी मुदतवाढीची विनंती केली म्हणून 31 मार्च, 2012 पर्यंत शासनाने ही मुदतवाढ दिलेली आहे. वर्धा जिल्ह्याच्या ज्या केसेस आहेत त्यात मी स्वत: लक्ष घालून अशा काही घटना घडल्या असतील तर त्या दुरुस्त केल्या जातील.

श्री. दिवाकर रावते : महोदय, भूविकास बँकांच्या पुनर्वसनासंबंधीचा प्रश्न सुवर्ण महोत्सवी वर्षात सोडविण्याचे शासनाने ठरविले आहे असे दिसते, त्याबद्दल मंत्री महोदयांच्या भावनांचा मी आदर करतो. पण तशी कृती होत नाही याचा खेद वाटतो. आपण भूविकास बँकांमधील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सांगितले की, कर्मचाऱ्यांसमोर व्हीआरएसचा प्रस्ताव देखील ठेवलेला आहे. पण पणन महासंघातील कर्मचाऱ्यांसमोर सुध्दा असाच प्रस्ताव ठेवला होता. तरी देखील ज्यावेळेस भरती केली जाते तेव्हा कंत्राटी पध्दतीने लोक भरले जातात अशी स्थिती आहे. मग या बँका पुढे चालू ठेवावयाच्या असतील तर शासनाला नव्याने कर्मचाऱ्यांची भरती करावीच लागेल. तसेच केंद्रशासनाकडून आरबीआयच्या माध्यमातून 500 कोटी रुपये सुध्दा आपल्या राज्यातील भूविकास बँकांच्या पुनर्वसनासाठी दिलेले आहेत.......

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ ST/ 13:15

**ता.प्र.क्र.: 13852 .....**

श्री. दिवाकर रावते....

त्यामुळे हे 500 कोटी रुपये मिळणार आहेत काय, या पैशाचे काय झाले आहे ?

या ठिकाणी सन्माननीय मंत्र्यांनी सावकारी कायद्याच्या संदर्भातील उल्लेख केलेला आहे. सावकारी कायदा गृह मंत्रालयाकडून राष्ट्रपतींकडे गेलेले नाही अशी आमची माहिती आहे त्यामुळे सावकारी कायद्याची आता काय स्थिती आहे यासंदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करणे गरजेचे आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, 500 कोटी रुपये वैद्यनाथन समितीच्या माध्यमातून मंजूर झाले होते ते पैसे अद्याप शासनाला मिळाले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मध्यंतरीच्या काळात माननीय मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून केंद्रीय अर्थमंत्र्यांना भेटण्याचा प्रयत्न केला होता. मागील 15 दिवसा पूर्वी आपल्या सर्व खासदारांना घेऊन केंद्रीय वित्त मंत्र्यांना भेटलो होतो. या विषयाच्या संदर्भात मी दिल्लीला चार वेळेस अर्थमंत्र्यांची भेट घेतलेली आहे. माननीय केंद्रीय मंत्र्यांचे म्हणणे असे आहे की, संबंधित बँकेची वसुली ही किमान 50 टक्क्याच्या पुढे असली पाहिजे तसेच सदर बँक ऑपरेटींग असणे आवश्यक आहे. खरे म्हणजे आपली बँक 1988 पासून बंद असल्यामुळे 500 कोटी रुपये मिळण्यामध्ये अडचण येत आहे. या ज्या दोन अटी आहेत त्या शिथील कराव्यात अशी आम्ही केंद्राला विनंती केलेली आहे. 500 कोटी रुपये आपल्याला मिळाले तर हा विषय मार्गी लागू शकतो. या 500 कोटी रुपयाच्या संदर्भात अजूनपर्यंत तरी निर्णय झालेला नाही. केंद्रीय बजेट अधिवेशन संपल्यानंतर माननीय केंद्रीय अर्थमंत्री या विषयाच्या संदर्भात एक बैठक घेणार आहेत. या बैठकीच्या वेळेस संबंधित प्रमुख लोकांना सुध्दा घेऊन जाण्याची माझी तयारी आहे.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सावकारी कायद्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी सावकारी कायद्याच्या संदर्भात सांगू इच्छितो की, आपल्या सभागृहाने सावकारी विधेयक मंजूर करुन ते केंद्र सरकारकडे पाठविण्यात आले आहे. या सावकारी कायद्याला केंद्राच्या सात खात्याची मान्यता लागणार होती परंतु या विधेयकाला केंद्राच्या सहा खात्यांची मान्यता मिळाली असून एक खात्याची मान्यता मिळावयाची राहिलेली आहे. या सावकारी कायद्याच्या संदर्भात मागील आठ दिवसापूर्वीच प्रधान सचिव दिल्लीला गेले होते. सातही विभागाची मान्यता मिळाल्यानंतर या विधेयकाला माननीय राष्ट्रपती महोदयांची मान्यता मिळू शकेल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 13852 .....**

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी वैद्यनाथन समितीच्या मार्फत 500 कोटी रुपये मिळतील असे सांगितलेले आहे. वैद्यनाथन समितीच्या चिकित्सा समितीवर मी वर्षभर काम केलेले आहे. खरे म्हणजे सोसायटी सक्षम बनवण्यासाठी वैद्यनाथन समितीची स्थापना झाली होती व त्यासाठीच केंद्र शासनाने 500 कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. यामध्ये भूविकास बँकेचा समावेश नाही एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. सदर 500 कोटी रुपये मिळाले तर आम्हाला आनंदच होईल. परंतु हे पैसे मिळू शकणार नाहीत अशी परिस्थिती आहे. हा प्रश्न या सभागृहात 8-10 वेळेस उपस्थित झालेला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल असे सांगण्यात आलेले आहे. माननीय सभापती महोदय, आपण जेव्हा खालच्या सभागृहात होता त्यावेळेस आपण सुध्दा हा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. राज्यातील काही भूविकास बँकाचे काम चांगले सुरु आहे. सांगलीच्या भूविकास बँकेचे काम चांगल्या प्रकारे चालले आहे. आपल्याला वन टाईम सेटलमेंटच्या अनुषंगाने हा प्रश्न सोडविता येणार नाही. शेतकरी पैसे देत नसल्यामुळे आपल्याला मुद्दलामध्येच भूविकास बँकेचे सेटलमेंट करावे लागणार आहे. त्यामुळे अशा प्रकारचे सेटलमेंट शासन करणार आहे काय, व्हीआरएस योजनेला राज्य शासन पैसे देणार आहे काय ? 29 भूविकास बँका पैकी काही भूविकास बँकाची वसुली झालेली नाही. रायगड जिल्हयातील शेतक-यांकडून 1.5 कोटी रुपये येणे बाकी आहे. तसेच जे 1.5 कोटी रुपये येणार आहेत त्यामध्ये लोकांच्या प्रॉपर्टीज सुध्दा अस्तित्वात नाहीत. व्हीआरएस योजना शासनाने लागू केली तर त्यासाठी राज्य शासन आपल्या बजेटमध्ये तरतूद करणार आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

VTG/ ST/ D/ प्रथम श्री.जुन्नरे 13.20

ता.प्र.क्र. 13852..

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या समितीवर सन्माननीय सदस्यांनी एक वर्ष काम केले आहे परंतु मी गेल्या 8 वर्षापासून या विषयाशी संबंधित आहे.एक वर्षापूर्वी काय घडले होते हे सन्माननीय सदस्यांना कदाचित माहीत नसावे. 80 सीसी या योजनेखाली भूविकास बॅकांचा समावेश वैद्यनाथन समितीने केला होता. या सर्व भू विकास बॅका दीर्घ मुदतीचे कर्ज वाटप करीत होत्या त्यामुळे वैधनाथन समितीच्या शिफारशीमध्ये 80 सीसीचे कलम आहे. त्यामुळे या योजनेमध्ये भू विकास बॅका बसतात.म्हणूनच त्यासाठी शासन 500 कोटी रुपयांची मागणी करीत आहे..सन्माननीय सदस्यांनी स्वेच्छा निवृत्तीच्या संदर्भात एक मुद्दा उपस्थित केला आहे. आज भू विकास बॅकांकडे काहीही पैसे नाहीत. त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे फंडस नाहीत. सध्याचे पगार सुध्दा त्यांना देता येत नाहीत अशी त्या बॅकांची परिस्थिती आहे म्हणून मागच्या महिन्यात मी या सदर्भात एक बैठक घेतली असून या संबंधीचा एक स्वतंत्र प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या समोर मांडण्याचे ठरविले आहे. 1400 कोटी रुपयांच्या थकीत रक्कमेसंबंधी त्याचप्रमाणे या बॅकेच्या कर्मचा-यांना स्वेच्छा निवृत्ती घेण्याच्या बाबतीत तसेच विभागीय स्तरावर भू विकास बॅकेची पुर्नरचना करण्याच्या आणि काही जिल्हा बॅकांना या संदर्भातील परवानगी देण्याच्या बाबतीत मंत्रिमंडळाने निर्णय घ्यावा अशा प्रकारची शिफारस त्या प्रस्तावामध्ये मांडण्याची मी भूमिका घेतली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : ज्या 14 जिल्हयातील भूविकास बॅकांचे पुनरुज्जीवन करण्यात येणार आहे त्यामध्ये चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयातील भूविकास बॅका आहेत काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : 14 जिल्हयाच्या भूविकास बॅंकांचा प्रस्ताव शासनाकडे आलेला असून त्यामध्ये विदर्भातील दोन जिल्हयाच्या भू विकास बॅकांचा समावेश करण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्हयाचा समावेश त्या यादीमध्ये असावा असे मला वाटते परंतु ती यादी आता माझ्याकडे नाही. आयुक्ताकडे ही यादी आहे . कोणत्याही रिजनचा हा प्रश्न नसून एखादी बॅक सुरु करावयाची असेल तर तेवढे वर्कींग तेथे व्हावयास पाहिजे, तेवढे ट्रॅन्झॅक्शन व्हावयास पाहिजे अशी अट असल्यामुळे हा प्रश्न विचाराधीन आहे.

श्री.जयप्रकाश छाजेड : वन टाईम सेटलमेन्टची घोषणा करण्यात आली आहे त्याप्रमाणे जिल्हा बॅकांनी पैसे वसूल केले असून ते मुंबईतील फेडरल बॅकेकडे पाठविले आहेत. ते सगळे पैसे व्याजामध्ये जमा करतात परंतु मुद्दलामध्ये जमा करीत नाहीत.शेतक-याकडून लाखो रुपये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13852..श्री.जयप्रकाश छाजेड ....

वसूल करण्यात आलेले आहे. वन टाईम सेटलमेन्टच्या योजनेमध्ये 100 रुपयाला 100 रुपये व्याजाचे वसूल केले जात असतील तर व्याजाने जे जास्त पैसे जमा झालेले आहेत त्या पैशाचे काय करण्यात येणार आहे, त्याचप्रमाणे 14 बॅंकेच्या यादीमध्ये नाशिक जिल्हयाचा समावेश आहे किंवा नाही ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असल्यामुळे त्या यादीमध्ये नाशिकचा उल्लेख असेलच. वन टाईम सेटलमेन्टच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, जिल्हा बॅंका आणि शिखर बॅंक यांच्यामध्ये काही तफावती असून त्यासंदर्भातील तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत त्यामुळे या तक्रारीमध्ये मी स्वत: लक्ष घालीन आणि कोणत्याही ठिकाणी मी अन्याय होऊ देणार नाही.

**सभापती** : सन्माननीय मंत्र्यांना मला दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. भू विकास बॅंकाच्या वन टाईम सेटलमेंट करता एक वर्षाची मुदत वाढ दिली असून तशा प्रकारे जाहीर करण्यात आले आहे. त्याचबरोबर अन्य काही सहकारी संस्थांनी सुध्दा शेतक-यांना कर्ज दिले असून त्याची मुदत 31 मार्च 2011 रोजी संपणार आहे तेव्हा या सहकारी संस्थांच्या बाबतीत वन टाईम सेटलमेन्टच्या दृष्टीने आणखी एक वर्षाची मुदत वाढ देण्यात येणार आहे काय , यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की,वन टाईम सेटलमेंन्ट करिता शासनाने ज्या मार्गदर्शक सूचना केल्या आहेत त्यामध्ये बॅंकांनी व्याजाचा दर किती असावा ही बाब त्या बॅंकानीच ठरवावयाची असते असे मला वाटते.

श्री.जयंत प्र.पाटील : 18 टक्के व्याजाचा दर आहे.

**सभापती** :शेतकऱ्यांचे हित कसे साधेल या दृष्टीकोनातून आपण या बाबतीत पुन्हा विचार करावा.

श्री.हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, आपण सूचना केल्या प्रमाणे यामध्ये सहकारी संस्थांचा सुध्दा समावेश केला जाईल व त्याला मुदतवाढ दिली जाईल. त्याचबरोबर त्यांनी जादा दराने व्याजाची आकारणी केली असेल तर 31 मार्च 2012 पर्यत रिॲडजेस्ट करण्याच्या सूचना देण्यात येतील .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नागरी सहकारी संस्थांनी शेतक-यांना कर्ज दिलेले आहे तेव्हा त्या नागरी सहकारी संस्थांचा समावेश वन टाईम सेटलमेन्टची मुदतवाढ देण्यामध्ये करण्यात येणार आहे काय



VTG/ ST/ D/ प्रथम श्री.जुन्नरे 13.20

ता.प्र.क्र. 13852..

श्री.हर्षवर्धन पाटील : मूळ प्रश्न हा भू विकास बॅकांशी संबंधित आहे. नागरी सहकारी बँकांचा येथे संबंध येत नाही. नागरी सहकारी बँकेच्या संदर्भातील अशी कोणतीही योजना शासनाकडे नाही.

-----

नंतर श्रीमती रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ ST/ D/ पूर्वी श्री.गायकवाड . . .. 13:25

**राज्यात विविध ठिकाणी मोटारसायकली जाळण्याच्या घडलेल्या घटना**

**(3) *12899 डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष चव्हाण, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.हुसेन दलवाई, श्री.विजय सावंत,श्री.राजन तेली,श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.किसनचंद तनवाणी, श्री.दिवाकर रावते, डॉ.दिपक सावंत, श्री.राम पंडागळे** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात नाशिक, औरंगाबाद व मुंबईतील सायन कोळीवाडा येथील म्हाडा वसाहतींमध्ये, विक्रोळीच्या टागोरनगरमध्ये (इ.क्र.616) येथे रस्त्यावर अथवा पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या मोटारसायकली जाळण्याचे अनेक प्रकार गेल्या 2 महिन्यात घडल्याच्या घटना व चेंबूर येथे घरासमोर उभ्या असलेल्या दोन गाड्या जाळण्याची घटना दिनांक 23 जानेवारी, 2011 रोजी वा त्या सुमारास घडल्या तसेच वडाळा येथील म्हाडा कॉलनीत एका अज्ञात व्यक्तीने सात-आठ गाडया जाळण्याची घटना दिनांक 29 डिसेंबर, 2010 रोजी वा त्यासुमारास घडली हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास चौकशीचा तपशील काय व त्या अनुषंगाने सदर घटनेतील गुन्हेगारांना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) होय,
तथापि, नाशिक येथील घटनेबाबत आगीचे कारण निष्पन्न झालेले नाही.

(2) होय.

(3) नाशिक व औरंगाबाद येथील घटना वगळता अन्य गुन्ह्यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असून औरंगाबाद येथील घटनेच्या अनुषंगाने "अ" फायनल समरी करण्यात आली आहे. तसेच वडाळा येथील गुन्ह्यातील आरोपीतांना मा.न्यायालयाने जामिनावर मुक्त केले आहे. गुन्ह्यांचा अधिक तपास सुरु आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, वडाळा येथील म्हाडा कॉलनीमध्ये काही अज्ञात इसमांनी सात-आठ गाड्या जाळल्याची घटना दिनांक 29 डिसेंबर 2010 रोजी वा त्या सुमारास घडली हे खरे आहे काय ? याबाबत उत्तरामध्ये "होय" असे म्हटलेले आहे. तसेच या गुन्ह्यातील आरोपीना माननीय न्यायालयाने मुक्त केले आहे." पुढे शासनाने म्हटले आहे की,"गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे." माझा प्रश्न असा आहे की, गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे त्याचा सविस्तर तपशील मिळेल काय, तसेच अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने काही धोरण आखलेले आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, वडाळा येथील गुन्ह्यातील गुन्हेगारांना अटक करुन त्यांना न्यायालयामध्ये सादर करण्यात आले.परंतु त्याठिकाणी त्यांची मुक्तता झाली असली तरी त्या सर्वांचा इतिहास पाहिला तर पूर्व वैमनस्यातून किंवा किरकोळ वादातून अशा स्वरुपाच्या घटना घडलेल्या आहेत. याठिकाणी काही घटनांचा उल्लेख केला तर घाटकोपर मधील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घटना पाहिली तर दारुसाठी 50 रुपये दिले नाहीत म्हणून तेथे मोटर सायकल जाळण्याचा प्रकार घडला किंवा एखाद्या गॅरेजमध्ये नोकरीसाठी अर्ज केला आणि तेथील मालकाने नोकरी दिली नाही म्हणून तेथील एक मोटर सायकल जाळल्यामुळे शेजारच्या मोटर सायकल जाळल्या गेल्या अशी वस्तुस्थिती दिसून येते.कारण या घटना रात्री घडत आहेत. त्यामुळे शासनाचा असाच प्रयत्न राहील की, भविष्यकाळामध्ये रात्रीची गस्त वाढविण्याच्या दृष्टीने प्रामुख्याने प्रयत्न केला जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर देताना माननीय राज्यमंत्री महोदयांनी जी कारणे सांगितलेली आहेत, ती न पटण्यासारखी आहेत. एकाच वेळी अशा प्रकारे 10-15 मोटर सायकल जाळणे किंवा एक मोटर सायकल जाळण्यात आली म्हणून बाजूच्या दहा-पंधरा मोटर सायकल्स् जळाल्या असे म्हणणे कितपत संयुक्तिक आहे हे मला समजत नाही. माझा स्पेसिफीक प्रश्न आहे. आपण आता फायनल समरी तयार केलेली आहे. त्यामध्ये नेमके कोणते निष्कर्ष निघालेले आहेत ? तसेच जो तपास चाललेला आहे, तो पुन्हा एकदा वेगळया पध्दतीने करावयास पाहिजे. जेणेकरुन मुंबईमध्ये हे लोण येऊ नये म्हणून काही विशेष उपाययोजना करणार आहात काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, याठिकाणी एक मोटर सायकल जाळण्याचा प्रकार पाहिला तर सीट फाडून आतमध्ये जो स्पंज असतो आणि एक मोटर जळल्यावर शेजारी ज्या गाड्या उभ्या असतात त्यांना आपोआप आग लागते. सगळया गाड्या जाळल्या जात नाहीत अशी परिस्थिती आहे. नाशिक येथील एक जी घटना आहे, त्याठिकाणी महिंद्राची गाडी जाळली गेली आहे, त्यामध्ये सीड उघडून आणि पेट्रोल टँकचे झाकण उघडे ठेवण्यात आले आणि त्यामध्ये झालेल्या स्फोटामुळे बाजूच्या गाड्या जळाल्या. मुंबईमध्ये हे लोण पसरु नये यासाठी निश्चितपणे योग्य त्या खबरदारीच्या उपाययोजना हाती घेतल्या जातील.

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : मुंबईमध्ये कोणत्या खबरदारीच्या उपाययोजना घेणार आहात ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी रात्रीची गस्त वाढविण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, याठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदयांनी रात्रीची गस्त वाढविण्याबाबत उल्लेख केला. अशा प्रकारच्या घटना रात्रीच्या वेळी घडत असतात. पण मला त्यांना प्रश्न विचारावयाचा आहे की, रात्री घालण्यात येणारी गस्त ही खरच गस्त असते काय ? जर तशी गस्त घालण्यात येत असेल तर आपण त्याचा ट्रॅक कशा पध्दतीने ठेवता ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, रात्रीची गस्त ही खरच गस्त असते. त्याचा ट्रॅक बाबत सांगावयाचे तर आपण जी.पी.एस.सिस्टीम बसविलेली आहे.त्यानुसार कोणत्या गाड्या कोणत्या एरियामध्ये किती वेळ होत्या हे कळेल यादृष्टीने आपण मुंबई आणि ठाणे येथे व्यवस्था केलेली आहे. एवढेच नाही तर ठाणे येथे प्रत्येक कॉन्स्टेबल कुठे आहे आणि त्याने दिलेल्या रुटवर गस्त घातली आहे की नाही हे सुध्दा कळण्याची अधुनिक व्यवस्था पोलीस दलाला प्राप्त करुन दिलेली आहे. मोटर सायकली जळण्याच्या बाबतीतील प्रकरणे पाहिली तर अतिशय छोट्या-छोट्या कारणातून घटना होत आहेत. अनेक ठिकाणी एका मोटर सायकलला आग लागल्यावर त्यातून फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे एकतर आम्ही गस्त वाढवू. पण आज इमारतीं मध्ये मोटर सायकल्स् पार्कींगमध्ये किंवा इमारतीच्या बाहेर रस्त्यावर सुध्दा लावल्या जातात. अशा वेळी नागरीकांनी सुध्दा आपल्या मोटर सायकलच्या बाबतीत दक्षता घेतली पाहिजे. काही ठिकाणी किरकोळ कारणावरुन मोटर सायकलला आगी लावण्यात आल्या, त्याप्रमाणे शॉर्ट सर्कीटमुळे सुध्दा मालमत्तेची मोठ्या प्रमाणात हानी झालेली आहे. अशा वेळी नागरिकांनी आणि पोलिसांनी दोघांनीही काळजी घेण्याची आवश्यकता आहे. आम्ही याबाबतीत लोकांमध्ये अवेअरनेस वाढविण्यात येईल आणि पोलिसांच्या गस्तीचे प्रमाणही वाढविण्यात येईल आणि त्यासाठी पोलीस दलाला आवश्यक असणाऱ्या मोटर सायकली सुध्दा थोड्याशा अधिक प्रमाणात उपलब्ध करुन देऊ.

-----

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्याच्या पर्यटनासाठी ६ कोटी रुपयांच्या मंजूर केलेल्या निधीतून कामे करणेबाबत**

**(४) * १३२४० श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे , श्री.सतीश चव्हाण , श्रीमती उषाताई दराडे , श्री.रमेश शेंडगे, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्याच्या पर्यटनासाठी ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन माहे डिसेंबरच्या शेवटच्या सप्ताहात महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाकडे वर्ग करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधीतून कोणकोणती कामे किती कालावधीत करण्याचे निश्चित करण्यांत आले आहे,

(३) आतापर्यंत कोणकोणत्या कामावर किती निधी खर्च करण्यात आला आहे ?

**श्री. रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (१) होय, शासन निर्णय क्र.बाविआ २०१०/९/प्र.क्र.५११/पर्यटन दि.९.१२.२०१० रोजी १२ व्या आयोगाच्या शिफारशीनुसार सागरी किनारा पर्यटन विकासासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास वितरीत करण्यात आलेल्या निधीतून सुधारित कामांना मंजूरी देण्यात आली आहे. सदर कामात रु.६००.०० लाख इतक्या निधीतून गुहागर येथे पर्यटक सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

(२) सदर निधीतून गुहागर येथे पर्यटक सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

(३) सध्या प्रस्ताव प्राथमिक अवस्थेत आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, हे वर्ष या राज्याचे पर्यटन वर्ष म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे. हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणून जाहीर केल्यानंतर कोकणात पर्यटन स्थळांचा अधिक चांगल्या रीतीने वाढ व्हावी म्हणून शासन प्रयत्न करीत असेल तर गुहागरचा परिसर अतिशय निसर्गरम्य असाच आहे. सागरी किनारा पर्यटन विकासासाठी मोठया प्रमाणात निधी देण्यात येत असेल तर येथे सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. पण यासंबंधीच्या आखणीमध्ये आणखी किती कालावधी जाणार आहे, कदाचित हे पर्यटन वर्ष संपून जाईल, पण सुविधा तेथे दिसणारच नाहीत, अशा प्रकारची परिस्थिती राहिली तर पर्यटन स्थळांचा विकास होण्यासाठी अडचणी निर्माण होतील, कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग,रायगड जिल्ह्यातील पर्यटनासाठी विशेष अधिकारी किंवा विशेष दल निर्माण करुन या ठिकाणी लवकरात लवकर संपूर्ण सोयी-सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न शासन करणार आहे काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, लेखी विचारण्यात आलेला प्रश्न गुहागरसंबंधी आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी विचारलेल्या तोंडी प्रश्नाची व्याप्ती फार मोठी आहे.

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13240.....

**सभापती** : मंत्री महोदयांकडे यासंबंधीची माहिती असेल तर ती द्यावी अन्यथा गुहागर संबंधीची माहिती देण्यात यावी.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, गुहागर तालुक्यात पर्यटनाच्या सुविधा निर्माण करण्याच्या प्रक्रियेसंबंधी तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविला पाहिजे. आतापर्यंत जिल्हाधिकाऱ्याकडून शासनाकडे प्रस्ताव आलेला नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, 12 व्या वित्त आयोगाची मुदत संपली आहे हे खरे आहे काय? 12 व्या वित्त आयोगातील पैसे खर्च करण्याची मुदत संपली असेल तर मार्च, 2011 पर्यंत प्रस्ताव तयार झालेले नाहीत. प्रस्ताव तयार होऊन, खर्च होईल याची खात्री मंत्री महोदय देतील काय?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, हे खरे आहे की, 12 व्या वित्त आयोगाच्या वतीने जो निधी प्राप्त झाला त्यापैकी काही पैसा खर्च झाला आणि काही पैसा खर्च झाला नाही. काही पैसा खर्च झाला नाही त्याचे कारण असे की, केंद्र शासनाला अगोदर जी कामे कळविण्यात आली होती त्यामध्ये कुठे वन विभागाच्या तर कुठे सी.आर.झेड.च्या अडचणी निर्माण झाल्या होत्या.ज्या गोष्टी प्रायव्हेट पार्टनरशीपने करावयास पाहिजे त्या सुध्दा त्यामध्ये होत्या. त्यामुळे राज्य शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्या समितीने परत याचा आढावा घेतला. फेर आढावा घेतल्यानंतर कुठली कामे करावयाची आहेत यासंदर्भातील नियोजन करण्यात आले. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, 6 कोटी रुपये गुहागरसाठी ठेवण्यात आले आहेत. या संदर्भात दिनांक 9/12/2010 ला सचिव समितीच्या माध्यमातून कळविण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव पाठविल्यानंतर त्याठिकाणी ज्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत त्या उपलब्ध करुन दिल्या जातील. या संदर्भात मी स्वत: मिटिंग घेतलेली आहे. तसेच अनेक वेळा चर्चा केलेली आहे. महाराष्ट्रासाठी किंवा कोकणासाठी केंद्र शासनाकडून आलेले सर्व पैसे योग्य रीतीने खर्च करण्यात येतील.

श्री. दिवाकर रावते (बसून) : 31 मार्च नंतर हे पैसे लॅप्स होणार नाहीत काय?

..3..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Z-3

SMT/ ST/ D/ 13:30

ता.प्र.क्र. 13240...

श्री. छगन भुजबळ : हे पैसे लॅप्स होणार नाहीत, याची काळजी घेतली जाईल. ते पैसे खर्च करण्याची परवानगी मिळालेली आहे. सिंधुदुर्गच्या संदर्भातील प्रश्न आहे त्यासाठी सुध्दा मोठया प्रमाणात निधी उपलब्ध आहे. यासंदर्भात सन्माननीय स्थानिक आमदारांना विचारात घेऊन ही कामे पूर्ण करण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

श्री. सुभाष भोईर : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 2 मध्ये "असल्यास, उक्त निधीतून कोणकोणती कामे, किती कालावधीत करण्याचे निश्चित करण्यात आले आहे." असे म्हटले आहे तर या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "सदरहू निधीतून गुहागर येथे पर्यटक सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत." सभापती महोदय, मूळ प्रश्नामध्ये गुहागरमध्ये कुठली कामे हाती घेण्यात येणार आहेत आणि ती किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहेत असे म्हटले आहे त्यामुळे या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये विसंगती आहे. याबाबतीत शासनाचे नेमके काय धोरण आहे?

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13240....

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, त्या ठिकाणी पर्यटनाच्या संदर्भात जी कामे घेण्यात येणार आहेत त्यामध्ये त्या ठिकाणी कोणत्या सुविधा पाहिजेत याबाबत तेथील लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन आणि तेथील जिल्हाधिकाऱ्यांकडे असलेली माहिती लक्षात घेऊन, त्यांनी ती कामे द्यावयाची आहेत. त्यानंतर कामे होणार आहेत. त्या ठिकाणी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे आणि कोणत्या गोष्टी करणे शक्य आहेत हे तेथील लोकप्रतिनिधी आणि जिल्हाधिकारी यांनी ठरवून सांगावयाचे आहे. निधी उपलब्ध करुन देण्याचे काम शासनाकडे आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे या सगळ्या बाबतीत पाठपुरावा करुन ताबडतोब ही कामे होतील यादृष्टीने मी काळजी घेईन.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या ठिकाणी असे उत्तर देण्यात आले आहे की, सध्या प्रस्ताव प्राथमिक अवस्थेत आहे. या प्राथमिक अवस्थेमध्ये असलेल्या प्रस्तावाला किती कालावधीमध्ये मूर्त स्वरुप मिळेल ? हा निधी लॅप्स होणार नाही असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. किती महिन्यांमध्ये हा निधी खर्च करुन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्यात येईल ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, या अधिवेशनाच्या कालावधीमध्ये तेथील जिल्हाधिकारी आणि सर्व संबंधित अधिकारी यांची बैठक घेऊन ताबडतोब त्यांनी केलेल्या आराखड्याबरहुकूम ही कामे चालू केली जातील.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटन विकासाबाबत**

**(५) * १४०२० श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.परशुराम उपरकर , श्री.रामदास कदम, डॉ.दिपक सावंत, श्री.सुरेशदादा देशमुख , श्री.सुभाष चव्हाण , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.हुसेन दलवाई :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासाकरिता सन २०१० पर्यंत केंद्र व राज्य शासनाकडून किती निधी प्राप्त झाला आहे,

(२) तसेच प्राप्त झालेल्या निधीपैकी किती खर्च करण्यात आला व किती निधी अखर्चित राहिला आहे,

(३) तसेच केंद्र शासनाकडून रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासासाठी देण्यात आलेल्या निधीमुळे स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध होणार असल्याचे माहे जानेवारी, २०११ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पर्यटन विकासाकरिता मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोकण पर्यटन विकासाकरिता कंपनी स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती ती कंपनी केव्हा कार्यान्वित होणार आहे,

(५) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सीवर्ल्डचे काम सुरु करण्याबाबत व पर्यटन विकासाची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (१) केंद्र शासनाकडून सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी कोकण रिव्हीएरा सर्किट अंतर्गत सर्किट-१, सर्किट-२ व सर्किट-३ साठी अनुक्रमे रु. ३०२.०० लाख, रु.३८८.५४ लाख व रु.१३४.४२ लाख इतका निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास प्राप्त झालेला आहे.

राज्य शासनाकडून कोकण विकास पॅकेज अंतर्गत सन २००४ मध्ये रु.३६०.०० लाख वितरीत केले आहेत. १२ व्या वित्त आयोगांतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी रु.८२९९.०० लाख निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास प्राप्त झाला आहे.

(२) केंद्र शासनाकडून प्राप्त कोकण रिव्हीएरा सर्किट अंतर्गत प्राप्त झालेला रु.८२४.९६ लाख इतका निधी पूर्ण खर्च झाला असून कामे पूर्ण झाली आहेत.

सन २००४ अंतर्गत कोकण विकास पॅकेज अंतर्गत मिळालेला निधी रु.३६०.०० लाख खर्च झाला असून कामे पूर्ण झाली आहेत.

१२ व्या वित्त आयोगांतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास वितरीत करण्यात आलेल्या निधीपैकी पुढीलप्रमाणे खर्च करण्यात आला आहे. तारकर्ली येथे धूप प्रतिबंधक बंधारा व स्कुबा डायव्हिंग केंद्र आणि कुणकेश्वर साठी रु.५७०.०० लाख इतका निधी खर्च झाला आहे व कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील इतर पर्यटन विकासाच्या कामांसाठी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना रु.९२५.४५ लाख वितरीत करण्यात आले आहेत.

(३) होय.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 14020 ..... श्री. रणजित कांबळे, श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता....

(४) शासन निर्णय क्र.टीडीएम २००९/६/प्र.क्र.२०१/पर्यटन दि.२९.८.२००९ अन्वये सागरी क्षेत्र पर्यटन विकास महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अधिनस्त उपकंपनी स्थापन केली आहे. सदर कंपनी कार्यान्वित होण्याची कार्यवाही महामंडळामार्फत होत आहे.
(५) याबाबतचा सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार अंतर्गत सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी, पुणे या अग्रगण्य संस्थेस दिले असून अंतिम अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, 1998 साली सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला. आज कोकणाबद्दल आणि पर्यटनाबद्दल शासनाचे फार उदासीन धोरण आहे, असे मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते. 2005 पासून 2010 पर्यंत केंद्र सरकारच्या बाराव्या वित्त आयोगाचे पैसे खर्च झालेले नाहीत. आज महामंडळाकडे एकही स्टाफ नाही. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झाला पण त्या ठिकाणी फक्त एक माणूस बसतो. त्याच्याकडे कोणत्याही प्रकारची माहिती नसते. आज केरळ तसेच आमच्या बाजूचे गोवा राज्य पाहिले तर ही पर्यटनदृष्ट्या विकसित झालेली राज्ये आहेत. त्या ठिकाणची अर्थव्यवस्था चांगली झालेली आहे. यामधून रोजगार निर्माण होण्यासारखी परिस्थिती आहे. यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीमध्ये भर पडण्यासारखी परिस्थिती आहे. आम्ही या ठिकाणी सातत्याने भांडतो परंतु पर्यटनाच्या दृष्टीने शासनाने ज्या पध्दतीने लक्ष द्यावयास पाहिजे होते तेवढे लक्ष दुर्दैवाने दिलेले नाही. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा हा 1998 मध्ये देशातील एकमेव पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झाला परंतु पर्यटनासाठी शासन पैसे ठेवताना दिसले नाही. सी-वर्ल्डच्या संदर्भात मी लक्षवेधी सूचना दिली होती. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, या बाबत 6 महिन्यात अभ्यास करु आणि 2 वर्षात प्रत्यक्षात या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करु. 2005 सालापासून पैसे आलेले आहेत. 9 डिसेंबर, 2010 ला शासनाचा एक निर्णय झालेला आहे. क्रमांक 2011/9/511/पर्यटन, या निर्णयामध्ये आता यादी मंजूर झ ाालेली आहे, असे म्हटले आहे. आता हे पैसे त्या त्या जिल्ह्यांकडे वळते झालेले आहेत. ही सगळी कामे प्रत्यक्षात कधी सुरु होतील, यामध्ये मुळातच 6 वर्षे विलंब झालेला आहे. हे पैसे केव्हा खर्च होणार, ही कामे महामंडळामार्फत करणार की

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

ता. प्र. क्र 14020... श्री. राजन तेली ....

सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत करणार, याबाबत माननीय मंत्री महोदय माहिती देतील का ? कोकणाच्या संदर्भात पर्यटनाची एक सबकमिटी जाहीर केली होती. त्यांचे काम लवकरात लवकर सुरु करु असे सांगितले होते. ते केव्हा सुरु करणार आणि कोकणातील पर्यटनाला चालना कधी मिळणार ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/ पूर्वी श्री.बरवड 13:40

ता.प्र.क्र.14020.....

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये मी असे म्हटले आहे की, "सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी कोकण रिव्हीएरा सर्किट अंतर्गत सर्किट-1, सर्किट-2 व सर्किट-3 साठी जवळपास 8 कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी खर्च झाला आहे. कोकण रिव्हीएरा सर्किटमध्ये विजयदुर्ग व सिंधुदुर्गचा समावेश होता. विजयदुर्गच्या विकासासाठी 2 कोटी रुपये व सिंधुदुर्गसाठी 1 कोटी 2 लाख रुपये असा 3 कोटी 2 लाख रुपयांचा निधी या विभागाला प्राप्त झाला. या निधीतून सर्व कामे पूर्ण केली आहेत. त्यापैकी विजयदुर्ग येथे निवासव्यवस्था, वाहनतळ, उपहारगृह, जलक्रीडा इत्यादीचा समावेश आहे. या सुविधा खाजगीकरणाच्या माध्यमातून पुढे सुरु ठेवण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सिंधुदुर्गसाठी मालवण येथे पर्यटकांसाठी जेट्टी बांधली आहे. डेक्कन ओडिसीचे पर्यटक सुध्दा तेथे येतात. त्या जेट्टीची अवस्था खराब झालेली आहे. तिच्या मजबुतीकरणाचे काम सुरु आहे. कोकण रिव्हीएरा सर्किट या अंतर्गत दिवेआगारला रॉयल टेण्टचे 37.50 लाख रुपयांचे काम पूर्ण झालेले आहे. धामापूरला 87 लाख 75 हजार रुपयांचे पर्यटक निवास बांधण्याचे काम पूर्ण झ ाालेले आहे. आंबोली येथे 1 कोटी 75 लाख 50 हजार पर्यटक निवास बांधण्याचे काम पूर्ण झालेले आहे. उभादांडा येथे 87 लाख 75 हजार रुपयांचे रॉयल टेण्ट बांधण्याचे काम पूर्ण झालेले आहे. अशा रितीने ही कामे पूर्ण झालेली आहेत. सर्किट-3 चे सुध्दा काम पूर्ण झालेले आहे. कोकण विकास कार्यक्रमासाठी 3 कोटी 60 लाख रुपये महाराष्ट्र शासनाने पॅकेज अंतर्गत दिले होते आणि ते सुध्दा खर्च झालेले आहेत. या कामांचा परत एकदा मुख्य सचिवांनी आढावा घेऊन पैसे ठरवून दिले होते. रायगड जिल्ह्यासाठी 24 कोटी 80 लाख रुपये, रत्नागिरी जिल्ह्यासाठी 52 कोटी 57 लाख रुपये, सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी 82 कोटी 99 लाख रुपये, ठाणे जिल्ह्यासाठी 11 कोटी 89 लाख रुपये, मुंबई, एमटीडीसीसाठी 75 कोटी 73 लाख रुपये दिले आहेत. यापैकी काही कामे झाली आहेत व काही कामे निश्चितपणे सुरु होणार आहेत. काही कामे सा.बां.विभागामार्फत सुरु होतील. काही कामे केंद्रीय आर्कियालॉजी विभाग करणार आहे. काही कामे एमटीडीसीच्या माध्यमातून होणार आहेत. काही कामे सुरु झाली आहेत व बाकीची कामे लवकरात लवकर सुरु व्हावीत यासाठी शासन प्रयत्नशील आहे. कारणे कोणतीही असली तरी ही कामे सुरु होण्यासाठी उशीर झ ाालेला आहे, हे मी मान्य करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

NTK/ ST/ D/

ता.प्र.क्र.14020.....

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, माझा हा जनरल प्रश्न आहे. मागील प्रश्नाच्या वेळीच मला बोलावयाचे होते. मी सभागृहाला थोडीशी माहिती देऊ इच्छितो. कोकणाचा केवळ पर्यटनाच्या दृष्टीने विचार न करता पर्यावरणाच्या दृष्टीने क्रमांक 1 वर असलेला विभाग आहे. आंतरराष्ट्रीय रिपोर्ट असा आहे की, रत्नागिरी जिल्हा म्हणजे फ्रेंच रिव्हीएरासारखा जिल्हा आहे. या जिल्ह्यामध्ये पर्यटनाचे मोठया प्रमाणावर प्रोटेंशिअल आहे. आघाडीचे सरकार अस्तित्वात आले त्यावेळी एक निर्णय घेण्यात आला होता की, सिंधुदुर्ग हा एकच जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून विकसित करण्यापेक्षा संपूर्ण कोकणाचा विकास व्हावा यादृष्टीने कोकण पर्यटन महामंडळ स्थापन करण्यात यावे. प्रत्यक्षात यासंबंधी काही झालेले नाही, ते होणार आहे का, गुहागरचा येथे उल्लेख झाला आहे. गुहागरला जाण्यासाठी चांगले रस्तेच नाहीत. तेथे साधी पिण्याच्या पाण्याची सोय नाही, एमटीडीसीचे केंद्र नाही. दापोली येथेही केंद्र नाही. दापोली येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. परंतु तेथे जाण्यासाठी चांगला रस्ता नाही. चिपळूणच्या खाडीमध्ये कोयनानगरचे पाणी जाते. तेथे बोटींची व्यवस्था केली पाहिजे. लोकांना बोटिंगची खूप हौस आहे. या सर्व सुविधा करण्यासाठी वेगळा आराखडा तयार करुन येत्या 3 वर्षात बजेटमध्ये त्याची व्यवस्था होणार आहे काय ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14020....

श्री. छगन भुजबळ : या सर्व बाबीसंबंधी एक कंपनी निर्माण करण्याचा प्रस्ताव कॅबिनेटमध्ये मंजूर करण्यात आला होता. परंतु पुढे काही काम झाले नाही. या कंपनीसाठी वेगळा कर्मचारी वर्ग देता येणार नाही, शासनाकडे असलेलाच कर्मचारी वर्ग परत वापरायचा आहे. या अटीमुळे पुढे काम झाले नाही. काहीही काम झालेले नसल्यामुळे यामधून बाहेर पडावे अशा प्रकारची नोटीस दुस-या खात्याकडून आली. त्यामुळे पुढची कारवाई झाली नाही. जवळ जवळ 28 कामांची यादी केलेली आहे. 74 कोटी रुपयाची कामे पूर्ण झालेली आहेत. कुडाळ नेरुर येथे बोटींगची सुविधा केलेली आहे. आरोंदा येथे स्वच्छता गृहे, बोटींगची व्यवस्था केलेली आहे, मालखेड येथे वॉटरस्पोर्ट सुविधा केलेली आहे...

श्री. विनोद तावडे : मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांच्याकडे पर्यटन खाते आल्यानंतर कामे जोरात होतील अशी अपेक्षा होती. कोकणामध्ये कामेच सुचविली जात नसल्यामुळे त्या कामांना मंजुरी मिळत नाही हे कोकणातील लोकांचे दुर्दैव आहे. कोकणामध्येच पर्यटन जास्त होऊ शकते. परवा नाशिक जिल्ह्याकडे निधी वळविण्यात आला असे कोणी तरी म्हणत होते. 12व्या वित्त आयोगाचे जे काही पैसे आलेले आहेत ते कोकणासाठी खर्च होतील असे आश्वासन मंत्री महोदय देतील काय ?

श्री. छगन भुजबळ : या कामाला उशीर झालेला आहे हे मी मान्य करतो. मी हेही सांगितले की, या कामामध्ये मी लक्ष घातलेले आहे. पुन्हा बैठका सुरु झालेल्या आहेत. ही कामे पूर्ण व्हावीत म्हणून सर्व जिल्हाधिका-यांना बोलावून ती कामे पूर्ण झालीच पाहिजे असे सांगितलेले आहे.

श्री. विनोद तावडे : मंत्री महोदयांनी जुन्या स्टाईलने उत्तर दिलेले आहे.

श्री. छगन भुजबळ : 2003-04मध्ये पर्यटन विषयक कामे करण्यात आलेली आहे. गणपती पुळे, तारकर्ली येथे रिसॉर्ट सुरु झाले. काही केले नाही अशातला भाग नाही. आता हे खाते माझ्याकडे आलेले आहे. मी पूर्णपणे याकडे लक्ष देत आहे असेही मी सांगितले आहे. सर्व निधी खर्च होईल. 28 कामे आहेत. या कामाबाबत मी एवढेच सांगेन की, जास्तीत जास्त कामे सुरु झ ालेली आहेत असा अहवाल मी पुढच्या अधिवेशनापर्यन्त निश्चितपणे देईन.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : कोकणाच्या संबंधातील 5-6 प्रश्न तसेच आताचे गुन्हागर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गच्या संबंधातील दोन प्रश्न याच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी कोकणातील सन्माननीय सदस्यांसमवेत त्यांच्या दालनामध्ये बैठक घ्यावी. पुढच्या अधिवेशनामध्ये मंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली तेथील कामांची झालेली प्रगती पुढच्या अधिवेशनामध्ये सदनामध्ये समजेल यादृष्टीने या प्रश्नाकडे मंत्रीमहोदय नक्की लक्ष देतील असे सांगून मी पुढच्या प्रश्नाकडे जातो.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मी मिटींग घेतोय असे आधीच सांगितलेले आहे.

----

....3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**मुंबईसह राज्यात अन्न निरीक्षकांनी टाकलेल्या धाडीत भेसळयुक्त गुटखा जप्त केल्याबाबत**

**(६) * १२८०३ श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.जगदीश गुप्ता , श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे एप्रिल, २००९ ते माहे नोव्हेंबर, २०१० या कालावधीत अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न निरीक्षकांनी गुटख्याचे जे ११५ नमुने तपासणीसाठी घेतले होते त्यापैकी ११३ नमुने अप्रमाणित दर्जाचे घोषित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरात परप्रांतातून दररोज २५ कोटी रुपयांचा व संपूर्ण राज्यात १०० कोटी रुपयांचा गुटखा विकला जात असतानाही अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न निरीक्षकांनी घातलेल्या धाडीत यापैकी फक्त ०.०१ टक्के गुटखाच जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह राज्यात येणारा भेसळयुक्त गुटखा जप्त करण्यासाठी किती धाडी टाकण्यात आल्या व त्यामध्ये किती कोटी रुपयांचा गुटखा जप्त केला ?

**श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, श्री.मनोहर नाईक** :(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यात गेल्या एप्रिल २००६ ते नोव्हेंबर २०१० या कालावधीत गुटख्यांचे ५८० नमुने विश्लेषण करण्यात आले आहे व रु.१६,०९,७७,९७६/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. तसेच राज्याच्या वेगवेगळ्या न्यायालयात प्रकरणातील ४२३ खटले दाखल करण्यात आले असून ते सर्व न्यायप्रविष्ट आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्न भाग (1)ला "होय" असे छापील उत्तर दिलेले आहे. याचा अर्थ 115 पैकी 113 नमुने अप्रमाणित आढळलेले आहेत. म्हणजे 99 टक्के भेसळयुक्त गुटखा बाजारात विकला जातोय हे या निमित्ताने सिध्द झालेले आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/ 13:50

ता.प्र.क्र.12803.... श्री.पांडुरंग फुंडकर....

महाराष्ट्रात दररोज किमान 10 कोटी रुपयांचा गुटखा विकला जातो. याचा अर्थ एप्रिल, 2009 ते नोव्हेंबर, 2010 या 18 महिन्यांच्या काळात 5 हजार कोटी रुपयांचा गुटखा महाराष्ट्रात विकला गेला. 5 हजार कोटीपैकी केवळ 2.65 कोटी रुपयांच्या गुटख्याची जप्ती केली असे उत्तरात म्हटले आहे. हे कारवाईचे प्रमाण 0.01 टक्के इतके अल्प आहे. हा प्रश्न या सभागृहात गेली सहा वर्षे सातत्याने उपस्थित होत आहे. महाराष्ट्र राज्यात गुटखा विक्रीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. लहान मुलांमध्ये गुटखा खाण्याचे प्रमाण वाढत आहे. परप्रांतातून आपल्या राज्यात विक्रीसाठी येत असलेल्या गुटख्यावर बंदी घालण्यास शासन तयार नाही. गुटखा बंदी करण्याबाबत सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचे कारण पुढे केले जाते. मॅग्नेशियम कार्बोनेट हा विषारी पदार्थ मिसळून गुटखा विक्री करता येणार नाही असे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. असे असताना सर्रास मॅग्नेशियम कार्बोनेट हा विषारी पदार्थ मिसळून महाराष्ट्रामध्ये गुटख्याची विक्री केली जात आहे. या संदर्भात शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे गेली सहा वर्षे हा प्रश्न सातत्याने सभागृहात चर्चेला येत आहे. 2002 साली या राज्याने गुटखा बंदी करण्याचा क्रांतीकारक निर्णय घेतला. दुर्दैवाने सुप्रीम कोर्टाकडून या निर्णयाला स्थगिती देण्यात आली. त्यानंतरच्या काळात देखील ज्या ज्या ठिकाणी गुटखा उत्पादकांवर धाडी टाकून कारवाई करता येईल ती करण्याचा प्रामाणिक प्रयत्न गेली सहा वर्षे केलेला आहे. जवळजवळ 16 कोटी रुपयांचा माल आतपर्यंत जप्त करण्यात आला आहे. मला सभागृहाला हे सांगणे गरजेचे आहे की, राज्यामध्ये गुटख्याचे उत्पादन फार अल्प प्रमाणात होते. संकेत नावाचा गुटखा वगळला तर इतर जे गुटखा उत्पादक आहेत ते परराज्यातील आहेत. गुजराथ, गोवा आदी राज्यातून आपल्या राज्यात विक्रीसाठी गुटखा पाठविण्यात येतो. टोबॅको कायद्यांतर्गत जी कारवाई करता येईल ती करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला गेला आहे. किंबहुना यावर्षी विशेष मोहीम राबवून शाळा आणि कॉलेजच्या परिसरात 100 मीटरपर्यंत गुटखा विक्री केली जाऊ नये यादृष्टीने गृह, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने कारवाई केली आणि लाखो रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. कायद्यामध्ये ज्या तरतुदी आहेत त्या माध्यमातून गुटखा विक्रीला जेवढा प्रतिबंध करता येईल तेवढा करण्याचा शासनाचा प्रामाणिक प्रयत्न सुरु आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12803....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, परप्रांतामध्ये गुटख्याचे उत्पादन केले जाते. परंतु विक्री मात्र महाराष्ट्रात होते हे मंत्री महोदयांना ज्ञात आहे की नाही? शाळा आणि कॉलेजच्या 100 मीटर परिसरात गुटखा विक्री करण्यात येत नसली तरी त्या पलीकडे सर्रास गुटखा विक्री केली जाते. केवळ 100 मीटर परिसरात बंदी करुन चालणार नाही. गुटखा खाणारे 100 मीटर बाहेर जाऊन गुटखा खरेदी करणार नाही असे नाही. सुप्रीम कोर्टाने स्थगिती देत असताना कारवाई करु नये असे म्हटलेले नाही. सुप्रीम कोर्टाने स्पष्टपणे सांगितले आहे की, मॅग्नेशियम कार्बोनेट मिसळून गुटखा विक्री करता येणार नाही. असे केल्यास तो गुटखा अप्रमाणित ठरेल. सध्या राज्यात जो गुटखा विकला जात आहे त्यातील 115 पैकी 113 नमुन्यांमध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट असल्याचे आढळून आले आहे.

नंतर 2ई.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ ST/ पूर्वी श्री. भोगले.......... 13:55

ता. प्र. क्र. 12803............ श्री. पांडुरंग फुंडकर.......

यासंबधी शासन काय उपाययोजना करणार आहे ? केवळ परप्रांतात गुटखा तयार होतो म्हणून कारवाई करता येत नाही असे कारण न देता विक्रेत्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : महोदय, जेथे जेथे अप्रामाणिक नमुने आढळून आले आहेत त्यांच्याविरुध्द शासनाने कायदेशीर कारवाई केली आहे. तसेच उत्पादकांवर आपण 129 केसेस दाखल केल्या आहेत. अशा प्रकारे कायद्यानुसार जेवढी कारवाई करणे शक्य होते तेवढी कारवाई शासनाने केली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, राज्यात गेल्या 18 महिन्यात 5000 कोटीचा गुटखा विकला गेला आणि फक्त 2 कोटीचा गुटख जप्त केला ही कारवाई म्हणता येईल काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : महोदय, मुळात गुटखा विक्रीला राज्यात बंदी नाही तर आपण त्याचे सॅम्पल्स गोळा करुन त्यात जर मॅग्नेशियम कार्बोनेटचे प्रमाण आढळून आले तर कारवाई करतो.

श्री. कपिल पाटील : महोदय, यासंदर्भात मी क्र. 47 वर प्रश्न विचारलेला आहे. त्या अनुषंगाने मला असे विचारावयाचे आहे की, राज्यात "माय टिचर" या नावाने गुटखा विकला जातो. त्याचा परिणाम म्हणून राज्यात हजारो शाळकरी मुलांना गुटख्याची सवय लागली आहे. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाधिनता वाढीस लागते हे खरे आहे काय, या प्रश्नाला उत्तर देताना मात्र "हे खरे नाही" असे उत्तर दिले. तसेच गुटखा खाल्ल्यामुळे कोणताही अपाय होत नाही असे शासनाला म्हणावयाचे आहे असे दिसते. खरे तर या उत्तरात शासनाला दुरुस्ती केली पाहिजे. तसे नसेल तर शासनाचे असेच मत आहे काय ? त्याचबरोबर ही बाब केंद्राच्या अखत्यारित येते असे सांगून टोलवाटोलवी होत आहे. या अनुषंगाने मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, ट्रेड मार्क रजिस्ट्रेशन ऑथॉरिटीकडे यासंबंधीची तक्रार केली आहे काय, तसेच शासन या गुटख्यावर संपूर्ण राज्यात बंदी घालणार आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सन्माननीय सदस्यांनी क्र. 47 वर हा प्रश्न विचारलेला असून "माय टिचर" या गुटख्याची माहिती मिळाल्यानंतर आम्ही ताबडतोब गुजरात शासनाला पत्र लिहिले आहे. तसेच शिक्षकांच्या भावना लक्षात आणून दिल्या व वस्तुस्थिती कळविली. त्यानंतर

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12803............ श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील........

ज्या ठिकाणी अशी विक्री होते तेथे देखील धाडी टाकल्या व माल जप्त केला. आपल्या राज्यात ऑफिशियली या गुटख्याचे अधिकृत डिस्ट्रीब्युटर्स कोणालाही नेमलेले नाहीत, आणि तसे डिस्ट्रीब्युटर्स आढळून आले तर त्यांच्यावर सुध्दा कारवाई करण्यात येईल. त्याचबरोबर गुजरातच्या अन्न व औषध प्रशासन विभागालाही आपण शासनाच्या वतीने विनंती केली की, "माय टिचर" या नावाला आक्षेप घेऊन आपण बंदी घालावी. मला वाटते या गुटख्याचे उत्पादक हे गुजरातमध्ये असल्यामुळे कारवाईत अडथळे येत आहेत.....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, समाजाची तरुण पिढी या गुटखा सेवनाने उद्‌ध्वस्त होत असताना गुजरात सरकारवर ढकलून चालणार नाही. अशा प्रकारे बंदी घालण्याचा दम शासनाकडे नाही काय ? राज्यातील गुटख्याची विक्री आम्ही थांबवू शकत नाही असे शासनाने सभागृहाला सांगावे, अन्यथा गुजरातमधील गुटखा या राज्यात येऊ देणार नाही असे तरी सांगावे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : महोदय, जेवढे शक्य तेवढे सर्व आपण केले आहे.

श्री. संजय केळकर : महोदय, गुजरात सरकारकडे बोट दाखवून चालणार नाही. गुजरात सरकारने अनेक चांगल्या गोष्टी सुध्दा केल्या आहेत, त्या आपल्या राज्यात हे शासन करणार आहे काय ? तरच गुजरातकडे बोट दाखविता येईल. या निमित्ताने माझी एकच विनंती आहे की, "माय टिचर" नावाने जो गुटखा विक्री होत आहे त्याचे अधिकृत वितरक राज्यात नेमलेले नाही असे असले तरी राज्यात मोठ्या प्रमाणात व ते देखील शाळेच्याच बाहेर असा गुटखा विकला जातो हे शासनाच्या निदर्शनास आलेलेच आहे. पण आपल्या निरीक्षकांनी कोणतीच कारवाई केली नाही. असा गुटखा ठाणे, कल्याण व डोंबिवली परिसरात भरपूर विकला जातो. शासन जरी निर्मात्यांवर बंदी घालू शकत नसले तरी किमान शाळेच्या बाहेर मोठमोठ्या जाहिराती लावलेल्या असतात त्यावर तरी बंदी आणणार आहे की नाही ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : महोदय, "माय टिचर" या गुटख्याची विक्री जेथे जेथे होत असेल तेथे तेथे 8 दिवसात कायदेशीर कारवाई केली जाईल.

--------

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिंदेवाही व मूल (जि.चंद्रपूर) येथे भाड्याच्या इमारतीत राहत असलेल्या संशयास्पद व्यक्तीकडून नक्षलसमर्थक साहित्य पकडल्याबाबत**

**(७) * १२७४२ श्रीमती शोभाताई फडणवीस** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही व मूल (जि.चंद्रपूर) येथे भाड्याच्या इमारतीत राहत असलेल्या संशयास्पद व्यक्तीकडून नक्षलसमर्थक साहित्य, प्रचार साहित्य, लॅपटॉप, काडतुसे, साडेतीन लाख रुपये रोख पोलीसांनी धाड टाकून दिनांक ३० डिसेंबर, २०१० रोजी वा त्या सुमारास जप्त केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन डुग्गीपार जि.गोंदिया येथे अप क्रमांक १०४/१० कलम १२०, १२० अ भादंवि सहकलम १७, २०, ३९ यू.ए.पी.ए.अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला असून त्यातील ९ आरोपींना अटक करण्यात आली असून ते सद्या नागपूर येथे मध्यवर्ती कारागृहात बंदी आहेत सदरचा गुन्हा अद्यापि तपासाधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : आदरणीय सभापती महोदय,चंद्रपूर जिल्हयातील मूल आणि सावली परिसरात नक्षलवादी राहतात व तेथूनच ते आपल्या कारवाया सगळीकडे करीत असतात. ही वस्तुस्थिती शासनाने मान्य सुध्दा केलेली आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, स्लीपींग झोनमध्ये म्हणजे ज्या ठिकाणी नक्षलवाद्यांचे अड्डे आहेत त्याचा बंदोबस्त करण्यासाठी चंद्रपूर जिल्हयात स्पेशल व्यवस्था केली जाणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, नक्षलवाद चळवळी रोखण्यासाठी शासनाकडून नेहमीच प्रयत्न केले जात असतात व सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात शासनाने योग्य त्या उपाययोजना केल्या असून या ठिकाणावरुन काही नक्षलवाद्यांना अटक सुध्दा करण्यात आलेली आहे.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो:-

"महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन(सुधारणा) नियम, 2011 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक तेविआ.1010/प्र.क्र.74/2010 वित्त आयोग कक्ष, दिनांकित 11 मार्च 2011 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

आपल्या अनुमतीने अतिशय महत्वाचा मुद्दा औचित्याच्या माध्यमातून मांडत आहे. मोबाईल फोनच्या टॉवरमधून उत्सर्जित होणा-या विद्युत चुंबकीय लहरीमुळे त्वचारोग, डोकेदुखी, ब्रेन टयूमर, कर्करोग अशा गंभीर रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते व असा प्रादुर्भाव ज्येष्ठ नागरिक, लहान मुले व आजारी व्यक्तींच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम करणारा आहे. ठाणे जिल्हयामध्ये मोबाईल फोनचे मोठया प्रमाणात टॉवर्स उभारण्यात आलेले आहेत. ठाणे जिल्हयातील 98 टक्के मोबाईल टॉवर्स परवानगी न घेताच उभारण्यात आलेले आहेत. विशेष करुन ठाणे शहरामध्ये कशाही पध्दतीने मोबाईल टॉवर्स उभारण्यात आलेले आहेत. मोबाईल टॉवर्सच्या भाडयापोटी मोठया प्रमाणात पैसा मिळत असल्यामुळे शाळा व इमारतीवर टॉवर्स उभारण्यात आलेले आहेत. ही बाब अतिशय गंभीर असून मुलांच्या आरोग्यावर परिणाम करणारी व उच्च न्यायालयाचा अवमान करणारी असल्याने मी ही बाब औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहाच्या माध्यमातून उपस्थित करुन शासनाचे लक्ष वेधीत आहे. याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे, या बाबत शासनाने माहिती देण्याची आवश्यकता आहे. रायगड जिल्हयात एका ठिकाणी बेकायदेशीररित्या मोबाईल टॉवर उभारल्यामुळे मोबाईल टॉवर धारकाला परवा दोन दिवसाची पोलीस कोठडीची शिक्षा देखील सुनावण्यात आलेली आहे. त्यामुळे या गंभीर मुद्याच्या संदर्भात शासनाने ठोस पाऊल उचलावे अशी विनंती आहे.

---

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"ओल्ड आवर मध्ये रुग्णाला उपचार देण्यासाठी "108" क्रमांकाची अद्ययावत रुग्णवाहिका सुरु करण्याच्या प्रस्तावास तीन वर्षापूर्वी राज्य सरकारने मंजुरी दिलेली असताना ही सुविधा सध्या देशातील अकरा राज्यांमध्ये कार्यरत असून या रुग्णवाहिकेच्या माध्यमातून रोज हजारो रुग्णांना तातडीने उपचार मिळणे, हैद्राबाद येथे तातडीच्या उपचारासाठी 108 क्रमांकावर फोन केल्यास सॅटेलाईटच्या माध्यमातून रुग्ण कोठे आहे, याचा शोध घेऊन तात्काळ संपर्क यंत्रणेव्दारे रुग्णवाहिका तेथे पोहोचते, रुग्णाला नेमका कोणता आजार आहे याची माहिती घेऊन त्यानुसार रुग्णाला कोणत्या रुग्णालयात दाखल करावयाचे आहे याच्या सूचना दिल्या जाणे, अवघ्या तीन मिनिटांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण होऊन 15 मिनिटात शहरी तर 25 मिनिटात ग्रामीण भागातील रुग्णांवर रुग्णवाहिकेसोबतचे डॉक्टर, नर्स, टेक्निशियन उपचार करतात हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णाला किंवा प्रसुतीच्या वेळी गंभीर परिस्थितीत असलेल्या महिलांसाठी ही रुग्णवाहिका म्हणजे जीवनदान ठरते, राज्य शासनाने 2008 मध्ये 108 क्रमांकाची सेवा सुरु करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देणे मात्र तीन वर्षे होऊनही अद्याप ही सेवा सुरु न झाल्याने अनेकांना उपचारा अभावी प्राण गमवावे लागणे, महाराष्ट्रातील बहुतांश भागात तातडीने योग्य उपचाराची सोय नसल्याने अनेकांना उपचारा अभावी प्राण गमवावी लागण्याची वेळ येणे, त्यामुळे सामान्य माणसाच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त ठरणारी ही 108 क्रमांकाची रुग्णवाहिका सेवा योजना तातडीने कार्यान्वित करण्याची गरज आहे असा मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करत आहे.

------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय,कोकणामध्ये सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयामध्ये जानेवारी -फेब्रुवारी 2011 च्या दरम्यान ढगाळलेले आकाश व बदलेल्या वातावरणामुळे आंबा, काजू, इत्यादी पिकांवर "करपा सदृश्य रोग पडलेला आहे. सदरहू "करपा " सदृश्य रोगामुळे पिकांचा मोहोर जळून फळ उत्पादनात घट झाली आहे तसेच पिकांवर केलेल्या औषध फवारणीचा खर्च अवाढव्य वाढल्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट आलेले आहे. कोकणातील शेतकऱ्यांना नुकसानीची भरपाई मिळणेकरिता माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री,माननीय कृषी मंत्री यांच्याकडे बागायतदारांनी मागणी केलेली असून त्यांच्या मागणीचा सहानुभूतिपूर्वक विचार करुन शेतकऱ्यांना व बागायतदारांना नुकसान भरपाई देण्याकरिता शासनाने उपाययोजना करावी. किंवा या पिकाना हमी भाव द्यावा अशी विनंती करण्यासाठी मी औचित्याचा मुद्दा उपस्थित उपस्थित करीत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ प्रथम श्री.जुन्नरे 14.05

**सभापती** :सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, 16 मार्च 2011 रोजी आषाढी एकादशी झाली असून आषाढी व कार्तिकी एकादशीला पंढरपुरला लक्षवधी भक्तगण दर्शनासाठी सातत्याने जात असतात. मी देखील नुकतीच पंढरपुरला भेट दिली होती. त्यावेळी मला ज्या काही गोष्टी निदर्शनास आल्या होत्या त्या मी येथे मांडणार आहे. नामजप,प्रवचन, कीर्तन इत्यादीसाठी एकादशी नसताना गर्दी कमी असते त्यावेळी सुरक्षेच्या दृष्टीने सर्व मंदिरामध्ये परवानगी दिली जाते.पंढरपूरच्या मंदिरासाठी नवीन कार्यकारी अधिकारी नेमण्यात आलेले आहेत. महापूजा, पाद्यपूजा, अभिषेक,राजभोग,धुपारती,तुळशीपूजा,कीर्तन,नामपूजा इत्यादी पूजा वर्षानुवर्षे भाविक लोक करीत असतात .इतकेच नव्हे तर नैवेद्य दाखविण्याचा प्रघात पंढरपूर वासियांसाठी नेहमीचाच आहे.या सगळया बाबीवर कार्यकारी अधिका-यांनी बंदी आणली आहे. मी औचित्याच्या मुद्याव्दारे अशी मागणी करीत आहे की, पंढरपूर मंदिराचा संपूर्ण पदभार व जबाबदारी ज्याप्रमाणे प्रांताधिका-याकडे पूर्वी दिली होती त्याप्रमाणे पुन्हा हा पदभार प्रांत अधिका-याकडे सोपविण्यात यावा तसेच अन्नछत्र कायम स्वरुपी सुरु करण्यात यावे. त्याचप्रमाणे बडवे आणि उत्पात यांनी दक्षिणा न मागण्याचा निर्णय घेतला आहे तो निर्णय स्वागतार्ह आहे. भाविकांच्या पूजेची व्यवस्थितपणे नोंद करुन चांगल्या प्रकारची कार्यपध्दती मंदिर व्यवस्थापनाने स्वीकारावी आणि संपूर्ण पदभार पूर्वीप्रमाणे प्रांत अधिका-याकडे सोपविण्यात यावा अशी मी औचित्याच्या मुद्याव्दारे मागणी करीत आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** :सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, औचित्याचा मुद्दा मांडण्याची आपण मला संधी दिल्याबद्दल सर्व प्रथम मी आपले आभार मानतो.मुंबई विद्यापीठाशी संबंधित हा औचित्याचा मुद्दा असून दिनांक 1.1.2006 ते 2010 पर्यत निवृत्त झालेल्या विद्यापीठातील 200 कर्मचा-यांना निवृत्ती नंतर जे निवृत्ती वेतन मिळणे आवश्यक असते ते निवृत्ती वेतन अजूनही सुरु करण्यात आलेले नाही. हे कर्मचारी सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने मिळणा-या लाभाच्या देखील प्रतीक्षेत आहेत.

सभापती महोदय , मुंबई विद्यापीठामध्ये शासन मान्य आणि विनाअनुदानित अशा दोन प्रकारची पदे धारण करणारे कर्मचारी आहेत. शासन मान्य पदासाठी सह सचालकांची मान्यता आवश्यक असून विना अनुदानित पदासाठी विद्यापीठ प्रशासनाची मान्यता आवश्यक असते. जे कर्मचारी निवृत्त होतात त्या कर्मचा-यांना दुस-या महिन्यापासून निवृत्तीवेतन मिळणे अपेक्षित असते परंतु 2006 ते 2010 पर्यतचे सर्व निवृत्तीधारक कर्मचा-यांना निवृत्ती वेतन मिळालेले नाही या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधण्याकरिता मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

-----

नंतर श्रीमती रणदिवे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:10

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

आता कविवर्य कुसुमाग्रज यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरु आहे आणि कै.यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये कुसुमाग्रज यांच्या नावाने अध्यासन सुरु करण्यात आले आहे आणि त्यासाठी दोन कोटी रुपये दिलेले आहेत. पण दुर्दैव असे आहे की, हे अध्यासन प्रत्यक्षात सुरु झालेले नाही. म्हणून मी हा औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे. कै.कुसुमाग्रज यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. अशा वेळी कै.यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये अध्यासन सुरु करण्यासाठी पैसे दिले आहेत. अनेक वेळा पैशा अभावी कामे अडकतात. पण येथे तसे नाही. याठिकाणी सर्वकाही असतानाही अध्यासन सुरु होत नाही. तरी सरकारने यामध्ये लक्ष घालून या वर्षापासून कै.यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये अध्यासन सुरु होईल यादृष्टीने पहावे.

----

. . . .2 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, आपल्या देशामध्ये लोकशाही आहे आणि काहींना ती लोकशाही मान्य नाही. माझ्या हातामध्ये "सामना" हे वर्तमानपत्र आहे. "निवडणुका व लोकशाहीने देशाचे वाटोळे केले" या मथळ्याखाली श्री.बाळासाहेब ठाकरे यांची श्री.संजय राऊत यांनी मुलाखत घेतलेली आहे. त्या मुलाखतीमध्ये इतके अश्लाघ्य शब्द वापरले गेलेले आहेत . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांकडून शुक्रवारी जे औचित्याचे मुद्दे देण्यात आलेले होते, ते आज या ठिकाणी मांडण्यासाठी आपण परवानगी देत आहात काय ?

**सभापती** : होय. सन्माननीय सदस्यांनी शुक्रवारी जे औचित्याचे मुद्दे दिले होते, ते मांडण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मग सन्माननीय सदस्यांना आज देण्यात आलेला औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी कशी देता येईल ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांना दोघांना मी आज देण्यात आलेले औचित्याचे मुद्दे मांडण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी देखील आज औचित्याचा मुद्दा दिलेला आहे. परंतु माननीय सभापती महोदयांनी सांगितले की, शुक्रवारी जे औचित्याचे मुद्दे देण्यात आले होते, ते मांडण्यास मी परवानगी दिलेली आहे.

श्री.हुसेन दलवाई : तुमचा औचित्याचा मुद्दा तातडीचा नव्हता, माझा औचित्याचा मुद्दा तातडीचा आहे.

सभापती महोदय, मी मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे त्या मुलाखतीमध्ये अश्लाघ्य म्हणजे कंबरेखालचे शब्द वापरलेले आहे.याठिकाणी अशा पध्दतीचे हेडींग दिलेले आहे की,"हिजडों को वो लगती है मर्द"पण आमच्या श्रीमती सोनिया गांधी यांना फोर्ब्सने या जगामध्ये असलेल्या प्रभावी व्यक्तींच्या यादीमध्ये 10 व्या क्रमांकावर ठेवलेले आहे आणि अतिशय प्रभावी राजकारणी म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो.या लोकशाही देशातील एका मोठ्या पक्षाच्या त्या अध्यक्षा आहेत.तसेच यु.पी.ए.कमिटीच्या चेअरमन आहेत त्यांच्याबद्दल अतिशय वाईट शब्दामध्ये लिहिण्यात आलेले आहे, त्याचा खरे म्हणजे सर्वांनी निषेध केला पाहिजे.मुख्य म्हणजे हे सर्व लोकशाहीच्या विरोधामध्ये आहे



APR/ 14:10

आणि ते सातत्याने यापध्दतीने केले जाते. मी माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल काही बोलणार नाही, त्यांचे वय झाले आहे त्यामुळे मी त्यांना सोडून देतो. पण श्री.संजय राऊत यांनी अशा पध्दतीने प्रश्न विचारले आहेत.या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब उपस्थित झाले आहेत. त्यांचीही जीभ कधीतरी उलटी-पालटी होते, पण ते जाऊ दे. परंतु माझे असे म्हणणे आहे की, या देशामध्ये आपण सर्वांनी लोकशाहीच्या काही परंपरा स्वीकारलेल्या आहेत. याठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे उपस्थित आहेत आणि मला त्यांच्याबद्दल फार आदर आहे. परंतु माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी असले शब्द वापरणे आणि ते लेखी स्वरुपामध्ये वर्तमानपत्रामध्ये येणे याचा अर्थ तुम्ही केवळ माननीय श्रीमती सोनिया गांधी यांचा अपमान करीत आहात असे नाही तर समस्त या देशातील महिलांचा हा अपमान आहे. त्यामुळे मला सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांना विचारावयाचे आहे की, या बाबतीत तुमचे काय म्हणणे आहे, या देशामध्ये आपण काय करीत आहोत ? या देशाच्या काही परंपरा आहेत. परंतु त्या सर्व परंपरा गुंडाळण्याचे काम सुरु आहे. खरे म्हणजे सरकारने यासंबंधात . . . ..

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा औचित्याचा मुद्दा काय आहे ?

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, माझा हाच औचित्याचा मुद्दा आहे. याबाबतीत सरकारने ताबडतोब दखल घेतली पाहिजे. तसेच आपण या देशामध्ये लोकशाहीची जी परंपरा मानतो, त्याच्या विरोधामध्ये घडलेले आहे. आपण नेहमी सुसंस्कृत शब्द वापरतो पण प्रत्यक्षात असंस्कृत शब्द वापरले जात आहेत आणि विकृत गोष्टी घडत आहेत त्याचा मी निषेध करतो आणि आपण सरकारला याबाबतीत निदेश द्यावा की, यासंबंधात कोर्टामध्ये केस दाखल करुन त्यांना जाब विचारण्यात यावा एवढीच माझी मागणी आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाईजी यांनी औचित्याचा मुद्याच्या आधारे सदनामध्ये जो मुद्दा उपस्थित केला . . ..

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याबाबत चर्चा सुरु आहे काय ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, त्यावर माझा हरकतीच मुद्दा आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ KGS/ प्रथम सौ. रणदिवे.... 14:15

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी मी परवानगी दिल्यानंतर संबंधित सन्माननीय सदस्यांनी त्या अनुषंगाने आपले विचार मांडल्यानंतर तो औचित्याचा मुद्दा काय हे मी शासनाला सांगेन.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा सन्माननीय श्रीमती सोनियाजी गांधी यांच्या संदर्भामध्ये सामना या वर्तमानपत्रातून जी मुलाखत छापून आलेली आहे ती लोकशाहीला......

( गोंधळ )

सभापती महोदय, काँग्रेस पक्षाने श्रीमती सोनियाजी गांधी यांच्या अध्यक्षतेखाली लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुका जिंकल्या नंतर आता मुंबई महानगरपालिकेची निवडणूक सुध्दा मुंबई काँग्रेस जिंकणार अशी परिस्थिती निर्माण झालेली पाहून सन्माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी सामना या वर्तमानपत्रात असभ्य अशा प्रकारची भाषा वापरलेली आहे. लोकशाही मान्य नाही अशा प्रकारचे वक्तव्य त्यांनी केलेले आहे म्हणून या सदनामध्ये बसलेल्या शिवसेनेच्या सन्माननीय सदस्यांनी राजीनामा द्यावयास पाहिजे सभापती महोदय, या सगळया प्रकारणाचा सभागृहात निषेध केला पाहिजे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे कोणत्या नियमखाली बोलत आहेत. त्यांनी खाली बसले पाहिजे.

श्री. माणिकराव ठाकरे : शिवसेनेच्या सन्माननीय सदस्यांना या सदनामध्ये बसण्याचा कुठलाही अधिकार नाही. ज्या पक्षाला लोकशाही मान्य नाही, त्या पक्षाला या सदनाचे सदस्यत्वसुध्दा करता येणार नाही.

( गोंधळ )

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी या ठिकाणी जे वक्तव्य केले आहे त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना बोलण्याची मी परवानगी दिलेली आहे.

( गोंधळ )

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या बाबतीत सभागृहात निषेध केला पाहिजे. कॉंग्रेस पक्षाने सन्माननीय श्रीमती सोनिया गांधी यांच्या नेवृत्वाखाली लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुका जिंकलेल्या आहेत. आता मुंबई महानगरपालिकच्या निवडणुकीत तेच पडसाद उमटतील म्हणून अशा प्रकारची भाषा वापरण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**सभापती** : सन्माननीय गृह मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांच्या कडून या ठिकाणी जो औचित्याचा मुद्दा मांडण्यात आलेला आहे, त्या औचित्याच्या मुद्यामध्ये जो विषय आहे, त्या विषयाच्या अनुषंगाने आपण गृह विभागामार्फत योग्य ती दखल घ्यावी आणि या अनुषंगाने शासनाला जे करणे शक्य आहे ते जरुर करावे.

----

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी " मागाठाणे, बोरीवली (पूर्व) येथील श्रीमती सबाई मुरा रबारी यांच्या मालकीची जमीन त्यांचे पती सुरा मुरा रबारी हे कसत होते, त्यांचे पती मृत पावल्यानंतर त्यांच्या पतीचे मित्र देवराज गुंडे यांनी आपले नाव कुळाचे कुळ नसतानाही धाकदपटशा व्दारे गैरप्रकाराने खोटी कागदपत्रे बनवून श्रीमती रबारी यांची जागा ताब्यात घेण्याचा व त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या देणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, नागो गाणार, भगवान साळुंखे यांनी "मुंबई शहरातील अपंगांच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गेल्या 6 वर्षापासून शासनातर्फे नियमित वेतन अदा करण्यात येणे, या पदासाठी लागणारे ना-हरकत प्रमाणपत्र नसल्याचे दाखवून त्यांचे वेतन थांबविण्यात आल्यामुळे या कर्मचाऱ्यांनी दि. 14 मार्च, 2011 पासून विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयासमोर सुरु केलेले उपोषण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो गाणार, रामनाथ मोते, भगवान साळुंखे, चंद्रकांत पाटील यांनी "नागपूर जिल्ह्यातील पारशीवणी व कळमेश्वर तालुक्यातील काही हायस्कूलमध्ये झ ाालेले गैरप्रकार व भ्रष्टाचार, सदरहू शाळांतील महिलांचा छळ तसेच शाळा बंद करण्याच्या शाळा प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या धमक्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**सभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "सन 2010 मधील पावसाळ्याचा कालावधी लांबल्यामुळे कोकणातील भातशेतीचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्रीमती शोभा फडणवीस, श्री. संजय केळकर यांनी "मुंबईमधील पायधुनी येथील बाबू खोटे मार्गावरील रहीम इमारतीचा भाग दिनांक 17.3.2011 रोजी मध्यरात्री कोसळून त्यात 4 जण ठार होणे, 15 जण जखमी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील किल्लारी प्रकल्पावरील जलविद्युत महालक्ष्मी विद्युत प्रा.लि. कोनाळकट्टा यांचेबरोबर करार होऊनही आवश्यक प्रमाणात विद्युत पुरवठा केला न जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर, दिवाकर रावते यांनी "अकोला महानगरपालिका व वाशिम, बुलढाणा या जिल्ह्याच्या नगरपालिका व नगरपरिषदांचे हद्दवाढ करण्यासंबंधीचे प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "पुणे जिल्ह्यातील कुमशेत, ता. जुन्नर येथील तुकाराम विठ्ठल वाणी या शेतकऱ्याने सावकाराने फसवणूक केल्यामुळे दिनांक 18.3.2011 रोजी विष प्राशन करुन केलेली आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**सभापती** ....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, धनंजय मुंडे, भगवान साळुंखे यांनी "पुण्याच्या सेनापती बापट मार्गावरील सर्व्हे क्र. 98 व 99 ही रामोशी वतन जमीन शासनाने ताब्यात घेणे व तेथे गोखले नगर ही वसाहत व शासकीय वसाहत उभी असणे, उर्वरित जागा शासनाने शेळी विकास महामंडळाला देणे, तथापि सदर जागेवर विकासकाने मागणी करुन महामंडळाची जागा रस्ता म्हणून घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री भगवान साळुंखे, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते यांनी "पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत दिलेला संगणक शास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स या वैयक्तिक विषयाला अनुदान देताना शासनाकडून केला जाणारा भेदभाव" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नियम 93 अन्वये आलेल्या इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल

( दुपारी 2.23 ते 3.00 वाजेपर्यंत मध्यंतर )

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी उप सभापती )**

**<u>औचित्याच्या मुद्याबाबत</u>**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मला अतिशय महत्वाचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. बीड जिल्ह्यामध्ये तलाठी पदासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने जाहिरात दिली होती. त्या जाहिरातीनुसार जवळजवळ 11,500 उमेदवारांनी अर्ज केलेले आहेत. या उमेदवारांनी डोमिसाईल सर्टिफिकेट सादर न केल्यामुळे या सर्व उमेदवारांचे अर्ज रद्द करण्यात आलेले आहेत. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, शासनाने याबाबत त्वरित पावले उचलावीत. जवळजवळ 11,500 उमेदवारांच्या पोटापाण्याचा प्रश्न आहे. त्या बाबतच्या बातम्या अनेक वर्तमानपत्रातून आलेल्या आहेत. काल या उमेदवारांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बोंबाबोंब केली होती. बीड जिल्ह्याला लागून असलेली 856 गावे सीमावर्ती भागातील आहेत, त्यांनीच डोमिसाईल सर्टिफिकेट द्यावे असे जाहिरातीमध्ये नमूद केले होते. परंतु या शब्दाचा आधार घेऊन 11,500 उमेदवारांचे अर्ज रद्द करण्यात आले आहेत. याबाबत आपण शासनाला निर्देश द्यावेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याकडे शासनाने लक्ष द्यावे.

श्री.अनिल देशमुख : होय.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेला विषय गंभीर आहे. त्यामुळे संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांना आपण निवेदन करण्यास सांगितले पाहिजे. त्यासाठी वेळ लागला तरी आमची हरकत नाही.

श्री.अनिल देशमुख : संबंधित मंत्री महोदयांना याबाबत कळविण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे :सभापती महोदय, आजच याबाबत निवेदन करण्यास आपण सांगावे.

**उप सभापती** : आजचे कामकाज संपण्यापूर्वी संबंधित मंत्री महोदयांनी या बाबतचे निवेदन करावे असे मी शासनाला सांगतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, धन्यवाद.

----

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदनाबाबत</u>

**उप सभापती** : आजच्या नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने मंत्री महोदयांनी विनंतीनुसार केल्यामुळे उद्या चर्चेला घेण्यात येतील.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मालेगावचे अप्पर जिल्हाधिकारी यशवंत सोनावणे यांची नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथे रॉकेल ओतून जाळून केलेली निघृण हत्या

**मु. शी.** : मालेगावचे अप्पर जिल्हाधिकारी यशवंत सोनावणे यांची नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथे रॉकेल ओतून जाळून केलेली निघृण हत्या यासंबंधी सर्वश्री धनंजय मुंडे, सय्यद पाशा पटेल, संजय केळकर, रामनाथ मोते, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री राजन तेली, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष चव्हाण, उल्हास पवार, मोहन जोशी, एस क्यू ज़मा, जयप्रकाश छाजेड, हेमंत टकले, चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, एम.एम. शेख, श्रीमती अलका देसाई, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री हुसेन दलवाई, विजय सावंत, चरणसिंग सप्रा, नागो गाणार, नितीन गडकरी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.धनंजय मुंडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मालेगावचे अप्पर जिल्हाधिकारी यशवंत सोनावणे यांची नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथे रॉकेल भेसळ माफियांनी पेट्रोल व रॉकेल ओतून जाळून केलेली निर्घृण हत्या, सदर हत्या प्रकरणी संशयित असलेला प्रमुख आरोपी या प्रकरणात 90 टक्के भाजल्याने घटनेनंतर चार-पाच दिवसांनी मृत्यू पावणे, धुळे, नाशिक, मनमाड या संपूर्ण भागात तसेच पुणे परिसरात रॉकेल, डिझेल, पेट्रोल भेसळ माफियांची कार्यवाही व भेसळीचे प्रकार गेल्या अनेक वर्षापासून सुरु असून हे भेसळ करणारे

4...



श्री.धनंजय मुंडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रॅकेट उच्च पदस्थांच्या आशीर्वादाने सुरु असल्याचे आतापर्यंत विविध घटनांमधून सिद्ध होणे, 8 वर्षांपूर्वी साडेतीन हजार कोटी रुपयांचा भेसळ युक्त पेट्रोल-डिझेलचा घडलेला घोटाळा, या घटनेनंतर नेमलेल्या चौकशी समितीने दिलेल्या अहवालाकडे राज्य शासनाने केलेले संपूर्ण दुर्लक्ष यामुळे एका अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्याला जाळून मारण्यापर्यंत रॉकेल भेसळ माफियांची गेलेली मजल, या घटनेनंतर राज्यात शेकडो शासकीय कर्मचाऱ्यांनी काम बंद करुन ठिकठिकाणी मोर्चे काढून नोंदवलेला निषेध, राज्यभर चालवण्यात आलेल्या छापा सत्रात अपेक्षित यश न येणे, आगामी काळात असे रॉकेल, पेट्रोल, डिझेल, दूध, वाळू भेसळ माफिया निर्माण होऊ नयेत अशी दक्षता घेण्याची कोट्यावधी जनतेची होत असलेली मागणी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना आणि त्यावर शासनाची प्रतिक्रिया."

श्री.अनिल देशमुख ( अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण सर्वजण हे मानतो की, या महाराष्ट्र राज्याचा मंगल कलश आदरणीय कै.यशवंतराव चव्हाण यांनी आणला. परंतु या महाराष्ट्रामध्ये दोन महिन्यापूर्वी घडलेली घटना सबंध देशाने पाहिली आहे. मालेगावचे अप्पर जिल्हाधिकारी यशवंत सोनावणे यांच्या हत्येने महाराष्ट्राच्या बदनामीचा कळसच झाला. भेसळीचे राज्य, माफियांचे राज्य अशाप्रकारचे विशेषण या घटनेमुळे महाराष्ट्राला लागल्यामुळे सबंध देशामध्ये महाराष्ट्र राज्य बदनाम झाले आहे.

यानंतर श्री.शिगम...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:05

श्री.धनंजय मुंडे...

या लक्षवेधीच्या माध्यमातून मला महत्वाच्या तीन प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. लक्षवेधीच्या निवेदनामध्ये असे नमूद केलेले आहे की, या प्रकरणामध्ये एकूण 15 आरोपी आहेत. त्यापैकी 1 आरोपी अल्पवयीन आहे, एक आरोपी मयत झालेला आहे आणि 4 आरोपींना अटक व्हायची आहे. ही घटना घडून दोन महिने झालेले आहेत. या घटनेमुळे देशात राज्याची मान शरमेने खाली गेलेली आहे. तेव्हा या 4 आरोपींना केव्हा अटक करण्यात येणार आहे ? या राज्यातील माफिया राज या विषयावरील माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने या प्रकरणी सविस्तर चर्चा सभागृहामध्ये झालेली आहे. मला शासनाचे या गोष्टीकडे लक्ष वेधावयाचे आहे की, या घटनेतील पोपट शिंदे असो की, यशवंत सोनावणे असो त्यांचे मागील दोन महिन्याचे मोबाईल फोनवरचे रेकॉर्ड पोलिसांनी तपासले आहे काय, महसूल अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांचे वैयक्तिक मोबाईल फोनचे आणि शासनाने दिलेल्या मोबाईल फोनचे मागील दोन वर्षापासूनचे रेकॉर्ड तपासले आहे काय ? यांचे मोबाईल फोनचे रेकॉर्ड तपासले तर वस्तुस्थिती समजू शकेल. संबंधितांचे मोबाईल फोनचे रेकॉर्ड पोलिसांनी घेतले नसेल तर ते घेण्यासाठी विलंब का लागला ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेचा संबंध गृह विभागाशी आहे.

श्री. अनिल देशमुख : सामूहिक जबाबदारी म्हणून उत्तर देण्याची माझी तयारी आहे.

श्री. दिवाकर रावते : या लक्षवेधी सूचनेमध्ये जो विषय आलेला आहे त्यासंबंधी कारवाई करण्याचे अधिकार अन्न व नागरी पुरवठा विभागाला नाहीत. या प्रकरणी कारवाई करण्याचे अधिकार महसूल खात्याला आणि गृह खात्याला आहेत. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अधिका-याला पंचनाम्यासाठी बोलावले जाते. ही फार गंभीर घटना आहे. राष्ट्रवादीच्या एका उपाध्यक्षाला वाळू माफियाने मारल्याची गंभीर घटना अधिवेशन चालू असताना धडलेली आहे. या लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यासाठी संबंधित मंत्री महोदय सभागृहामध्ये हजर नसतील तर ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी माझी विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख : या लक्षवेधी सूचनेचा संबंध गृह खात्याशी असला तरी सामूहिक जबाबदारी म्हणून माझी उत्तर देण्याची तयारी आहे. आता सभागृहामध्ये माननीय गृह मंत्र्यांचे आगमन झालेले आहे. सन्माननीय सदस्यांचा आग्रह असल्यामुळे या लक्षवेधी सूचनेला माननीय गृह मंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री. धनंजय मुंडे : माननीय गृह मंत्र्यांना माझे तीन महत्वाचे प्रश्न आहेत. 15 गुन्हेगार असून एक गुन्हेगार अल्पवयीन आहे, एक गुन्हेगार मयत आहे, आतापर्यन्त अटक झालेले गुन्हेगार 9 असून 4 गुन्हेगाराना अटक व्हायची आहे. असे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. या घटनेला 2 महिने झालेले आहेत. तेव्हा उर्वरित 4 आरोपींना अटक करण्यासाठी आणखी किती वेळ लागणार आहे ? माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी माफिया राज संबंधी मांडलेल्या प्रस्तावाच्या वेळी या घटनेबाबत सविस्तर चर्चा झालेली आहे. या घटनेतील आरोपी पोपट शिंदे असेल, यशवंत सोनावणे असेल, महसूल अधिकारी असतील, पोलीस खात्यातील पोलीस अधिकारी असतील......

...नंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक.1..... श्री.धनंजय मुंडे....

या सगळ्यांचे मोबाईल रेकॉर्ड तपासले तर मागील तीन वर्षात मनमाडपासून मुंबईपर्यंत भेसळीच्या प्रकरणामध्ये कोण कोण सामील आहेत, ते लहान आहेत की मोठे आहेत हे समोर येईल. पोपट शिंदे याच्या हद्दपारीच्या संदर्भात शासनावर अनेक आरोप झाले. ही हद्दपारी स्थगित झाली नसती तर ही घटना घडली नसती अशा प्रकारची बातमी अनेक वृत्तपत्रामध्ये छापून आली आहे. या राज्यामध्ये हद्दपारीचे चार प्रस्ताव आले तर त्यापैकी एकालाच हद्दपार केले जाते, असा आजपर्यंतचा इतिहास आहे. शासन या हद्दपारीच्या संदर्भात श्वेतपत्रिका काढणार आहे का? राज्यात यापूर्वी 3500 कोटी रुपयांचे इंधन भेसळीचे प्रकरण उघडकीस आले होते. त्यासंदर्भात समिती नेमली गेली होती. त्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. त्या अहवालातील शिफारशींनुसार कोणती कारवाई करण्यात आली हे मंत्री महोदय सभागृहाला सांगतील काय?

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सभापती महोदय, या घटनेमध्ये एकूण 15 जणांवर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. चार आरोपी अद्याप न पकडण्याचे कारण म्हणजे ते फरार असल्यामुळे आपण पकडू शकलो नाही. ते मुंबईतील आरोपी आहेत. यामधील गुन्ह्याचे आरोपी आणि यांनी पूर्वी गुन्हे केले त्यातील एकत्रित आरोपी होते. मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करताना या घटनेमध्ये ते सामील नसले तरी मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करताना हे आरोपी लवकरच पकडले जातील. त्यांचा ठावठिकाणा पोलिसांना मिळाला आहे. ते फरार झाले असले तरी त्यांना अद्याप न्यायालयाकडून जामीन मिळालेला नाही. निश्चितपणे मोक्का कायद्याखाली अटक करण्यात येईल. सभापती महोदय, तडीपारीच्या आदेशाला स्थगिती दिली नसती तर कदाचित हा गुन्हा घडला नसता असे सांगितले जाते. मी यापूर्वी याबाबत सविस्तर उत्तर दिले आहे. गृह सचिवांना कायद्याने अर्धन्यायिक अधिकार दिले गेले आहेत. प्रत्येक केस मेरिट टू मेरिट पाहिली जाते. दोन्ही बाजूचे वकील येऊन ऑर्ग्यूमेंट करीत असतात. त्या संदर्भात हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टाच्या गाईडलाईन्स आहेत. वेगवेगळ्या खटल्यातील निकालांचा अवलंब करुन निर्णय द्यावा लागतो. या तडीपारीला स्थगिती मिळण्याचे मुख्य कारण म्हणजे कोणताही गुन्हा नसला आणि 2003 च्या गुन्ह्यावर आज तडीपारी करावयास निघालो तर असे आदेश टिकत नाहीत. एमपीडीए कायद्याखाली मुंबईमध्ये पोलीस आयुक्तांकडून एक महिन्यानंतर प्रकरण डीजींकडे गेले होते. कोणाच्याही व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येऊ नये यासाठी सुप्रीम कोर्ट आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.......

हायकोर्ट बारकाईने बघत असते. नजिकच्या काळातील गुन्हा नसल्यामुळे त्याच्या तडीपारीला त्या काळामध्ये स्थगिती दिली गेली. कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप झालेला नाही. त्याचबरोबर हे सगळे आरोपी पकडण्यात येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पोपट शिंदे, यशवंत सोनावणे आणि या प्रकरणातील आरोपी यांचे गेल्या तीन वर्षातील मोबाईल फोनचे रेकॉर्ड तपासणार आहात का? हा रेकॉर्ड तपासला आहे का? असल्यास तसे सांगावे. तपास केलेला नसल्यास मोबाईल रेकॉर्ड तपासणार का? याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे. हा मोबाईल रेकॉर्ड तपासला गेला तर निश्चितपणे या प्रकरणाच्या शेवटच्या टोकापर्यंत आपण जाऊ शकतो असे सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे. या मोबाईल रेकॉर्डसंबंधी मंत्री महोदयांनी उत्तर दिले नाही. पोपट शिंदे, यशवंत सोनावणे, प्रकरणातील इतर आरोपी आणि पोलीस अधिकारी यांचे मोबाईल रेकॉर्ड तपासणार आहात काय?

श्री.आर.आर.पाटील : मोबाईल रेकॉर्ड उपलब्ध असेल तर त्याचाही तपास करण्यात येईल. याही पुढे जाऊन या सगळ्या घटनेची नि:पक्षपातीपणे चौकशी व्हावी म्हणून राज्य सरकारने हे प्रकरण दोन्ही कुटुंबीयांनी मागणी केल्याप्रमाणे सीबीआयकडे देण्याची तयारी दाखविली आहे.

नंतर 2एन.1..

अस्पुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील............

.......अडथळा........आपल्याला काय वाटते आणि मलाही काय वाटते यापेक्षा या दोन्ही कुटुंबियांना काय वाटते याचा विचार करणे शासनाचे काम आहे. सोनावणे व शिंदे कुटुंबियांनी शासनाला या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे देण्याची विनंती केली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, या प्रकरणातील श्री. सोनावणे हा नाशिक जिल्ह्यात किती वर्षांपासून होता हे पाहणेही महत्वाचे आहे. तसेच एवढी वर्षे एकाच ठिकाणी असल्याने त्याने या परिसरात दहशत निर्माण करुन कोणा कोणाकडून हप्ते घेतले होते, आणि त्याच्या मालमत्तेची चौकशी करण्यासाठी मी नियम 260 अन्वये सभागृहात प्रस्ताव चर्चेसाठी आणला होता. त्यानुसार मयत श्री. सोनावणे याच्या मालमत्तेची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, मयत श्री. सोनावणे हे सुरुवातीला सन 1988 ते 1991 या काळात मंत्रालयात सहाय्यक पदावर होते. मार्च, 1994 पूर्वी उप जिल्हाधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती झाली, मे, 1996 ते डिसेंबर, 1996 या काळात ते प्रोबेशनरी उप जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यानंतर सन 1996 ते 1997 या सहा महिन्याच्या काळात नाशिक येथेच होते. त्यानंतर मे 1997 मध्ये कळवणला त्यांची बदली झाली. जून, 2001 ते जून 2004 या काळात बी.सी. सेल, विभागीय आयुक्त, नाशिक येथे त्यांची बदली झाली. त्यानंतर मालेगांव (जि. नाशिक) येथे उप विभागीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यानंतर पाचोरा येथे त्यांची उप विभागीय अधिकारी म्हणून बदली झाली. त्यानंतर मात्र ते नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातच होते.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, मयत श्री. सोनावणे यांच्या मालमत्तेची चौकशी करण्यासाठी शासन टोलवाटोलवी करीत आहेत ?

श्री. आर.आर.पाटील : एखाद्या शासकीय अधिकाऱ्याच्या मालमत्तेची चौकशी करण्यासाठी अगोदर गुप्तपणे माहिती घेणे आवश्यक असते. तशी माहिती उपलब्ध झाली तर आपण अशी चौकशी सुध्दा करु शकतो. पण केवळ अवैध संपत्ती आहे असे समजून चौकशी करणे योग्य नाही. तसेच सन्माननीय सदस्यांशी याबाबत मी चर्चा करण्यास तयार आहे. त्यांनी जर मला मयत श्री. सोनावणे यांच्याकडील अवैध मालमत्तेसंबंधीची माहिती दिली तर तशी चौकशी करण्यास काहीच हरकत नाही.

......2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, मयत श्री. सोनावणे यांना जाळून मारल्याची घटना घडली. पण तहसीलदार, पटवारी तसेच अन्य अधिकाऱ्यांनी मार खाल्ल्याच्या घटना राज्यात बऱ्याच वेळा घडतात. या प्रकरणानंतर मुख्य सचिवांनी आदेश काढले व त्यानंतर राज्यात सर्व ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या. खरे तर माझ्या चंद्रपूर जिल्ह्यात जितक्या धाडी पडतात तितक्या इतर कोणत्याच जिल्ह्यात टाकल्या जात नाहीत. माझ्या जिल्ह्यात या आदेशानंतर मात्र एका आंधळ्या बाईच्या घरावर धाड टाकण्यात आली, त्यानंतर एका अपंग स्त्रीच्या घरावर धाड टाकली. त्यावेळी मी असेही विचारले की, आपण मोठमोठे माफिया सोडले आणि अशा अपंग व आंधळ्या स्त्रीयांवर धाडी टाकायला लागले. तेव्हा मला असे उत्तर देण्यात आले की, हे मोठे माफिया आता स्थिर झालेले आहेत, ते काहीच हालचाल करीत नाहीत म्हणून आम्हाला त्यांच्यावर धाडी टाकता येत नाही. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात धाडी टाकल्याचे रेकॉर्ड बनवून शासनाला कळविलेले आहे. वास्तविक आपला यामागील खरा उद्देश असा आहे की, राज्यातील माफियांना अटक करुन त्यांच्यावर कारवाई करणे. त्याचबरोबर शासनाने निवेदनात जवळपास 14 उपाययोजना दिलेल्या आहेत, त्याप्रमाणे कारवाई करण्याचे ठरविले तर मूळ कायद्यातच कडक तरतूद करण्याची गरज आहे. कारण गुन्हेगारांना आज कायद्याचा धाकच राहिलेला नाही. मग राष्ट्रवादी पक्षाचे लोक कधी मार खात असले तरी हे गुन्हेगार कायद्याला घाबरत नाहीत. म्हणून कायदा कठोर करण्याचा प्रयत्न करण्याचे शासनाने म्हटले असले तरी त्यासाठी केंद्र शासनाकडे मागणी करावी लागणार आहे, कारण हा कायदा केंद्र शासनाचा आहे. त्यासाठी आपल्याला वेळ लागणारच आहे. मग तोपर्यंत किती लोकांनी मरायचे, किती लोकांनी मार खायचा आणि किती गुन्हेगारांना पाठिशी घालून महाराष्ट्राला बिहारसारखे करावयाचे आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात काळाबाजार करणा-यांवर धाडी घालण्यात आलेल्या आहेत. सन 2011 मध्ये जवळपास 8428 धाडी टाकण्यात असून त्यामध्ये 5 कोटी रुपयांचा माल जप्त करण्यात आला असून यामध्ये एकंदरीत 369 लोकांना अटकही करण्यात आलेली आहे. काळाबाजार कणा-यांविरुध्द अजून कडक कायदा करावा यासाठी मध्यंतरीच्या काळात एक समिती गठीत करण्यात आली होती व त्यामध्ये आयपीसीच्या अंतर्गत आपल्याला अजून कोणती सुधारणा करता येईल, अजून कडक शिक्षा कशी करता येईल यासाठी आयपीसी 372 ते 376 या कलमान्वये केंद्र शासनास शिफारस करण्यात आली असून यामध्ये कडक कायदा करण्यासाठी या कायद्यात केंद्र शासनाने सुधारणा करावी अशी शिफारस करण्यात आलेली आहे. दूध माफिया, वाळू माफिया, तेल माफियांना फाशीची शिक्षा देखील कमी पडेल अशा प्रकारची शिफारस राज्य शासनाने केंद्रशासनाला केलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माफियांच्या संदर्भात त्यांनी जे निवेदन केलेले आहे त्या निवेदनावरुन महाराष्ट्रातील माफियांना संदेश गेला आहे की, आम्ही कोणताही काळाबाजार केला तर त्या विरुध्द राज्य शासनाकडे कोणत्याही प्रकारची कायदेशीर तरतूद नाही. केंद्र सरकार जोपर्यंत यासंदर्भात कायदा करीत नाही तोपर्यंत आम्ही काहीही केले तरी राज्य शासन काही करु शकत नाही असा संदेश माफियांपर्यंत गेलेला आहे.

काल रेल्वेच्या पोलीस प्रमुखांनी असे जाहीर केले की, रेल्वेच्या प्रवाशांवर जो कोणी फुगा मारेल त्याला जन्मठेपेच्या कलमाखाली अटक केली जाईल. यामुळे काल कोठेही एक फुगा देखील मारला गेला नाही. त्यामुळे हे राज्य शासन माफियांविरुध्द कणखर भूमिका घेऊ शकत नाही,या विषयाच्या संदर्भात जे काही चालले आहे ते बरोबर नाही.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माफियांना आळा बसावा यासाठी हे शासन कोणत्याही प्रकारची कारवाई करीत नसल्यामुळे त्याचा निषेध म्हणून आम्ही सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

श्री. आर.आर.पाटील :सभापती महोदय, अलीकडच्या काळात अन्न भेसळ करणे, जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणे या संदर्भात शासनाने तीव्र मोहिमा हाती घेतलेल्या आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

जोपर्यंत माफियांचे पूर्णपणे उच्चाटन होत नाही तोपर्यंत यासंदर्भातील कारवाया शासनामार्फत सुरु राहणार आहेत. चंद्रपूर येथील काही ऑईल कंपन्यांच्या वरिष्ठ अधिका-यांना काळा बाजार व चो-या करीत असतांना पकडले असून त्यांच्यावर कारवाया करण्यात आलेल्या आहेत. शासनाचे धाडसत्र सुरु झाल्यापासून जे मोठे काळाबाजार करणारे लोक होते त्यांनी आपले उद्योग बंद केले असून पुन्हा त्यांनी आपले उद्योग सुरु करणार नाहीत यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील. या गुन्हेगारांविरुध्द कोर्टात केस दाखल केली जाते परंतु लवकर निकाल न लागल्यामुळे हे गुन्हेगार बेलवर सुटतात व पुन्हा आपला उद्योग सुरु करतात. म्हणून या आरोपींना लवकरात लवकर शिक्षा व्हावी यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट वाढवण्याचा निर्णय घेण्यात येईल. फास्ट ट्रॅक कोर्टामुळे आरोपींना लवकर शिक्षा होईल व त्यांना कायद्याचा धाक वाटेल. या कायद्यांमध्ये बदल करण्याच्या संदर्भात राज्य सरकारने पुढाकार घेतला असून केंद्र सरकारला या कायद्यातील बदल आणि आवश्यकता कशी आहे हे पटवून देण्यात येईल. भेसळीच्या संदर्भातील कायदे, जीवनावश्यक वस्तूंमध्ये काळाबाजार करणा-यांविरुध्दचे कायदे महाराष्ट्रात अतिशय कडक स्वरुपात होतील. गुन्हेगार लोक कायदा हातात घेण्याची हिंमत दाखवणार नाहीत अशा प्रकारच्या दुरुस्त्या करण्याचे शासनाने ठरवले आहे.

---

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दोडामार्ग तालुक्यातील बांदा-दापोली येथील शेतक-याच्या काजू बागेला लागलेल्या आगीमुळे शेकडो कलमे जळून खाक होणे

**मु. शी.** : दोडामार्ग तालुक्यातील बांदा-दापोली येथील शेतक-याच्या काजू बागेला लागलेल्या आगीमुळे शेकडो कलमे जळून खाक होणे यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, रमेश शेंडगे, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री विक्रम काळे, सतीश चव्हाण, प्रकाश बिनसाळे, विजय सावंत, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दोडामार्ग तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) येथील बांदा-दापोली रस्त्यानजीक असलेल्या शेतकऱ्यांच्या काजू बागांना दि. २२ फेब्रुवारी, २०११ रोजी वा त्या सुमारास शॉर्टसर्किट होवून लागलेल्या आगीत शेकडो कलमे होरपळून झालेली लाखो रुपयांची हानी, याबाबत सखोल चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. गुलाबराव देवकर ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, बाधित शेतक-यांना नुकसानभरपाई मिळण्यासाठीची ही लक्षवेधी सूचना आहे. काजू कलमांना आग लागून काजू कलमे जळून खाक झालेली आहेत. यामध्ये 82,400 रुपयांच्या काजू कलमांचे नुकसान झालेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले..

अशा प्रकारे नुकसान भरपाईची रक्कम मिळण्याची कार्यपध्दती जर वेळ घेणारी असेल तर ते बरोबर नाही.त्या जिल्हयातील जिल्हाधिका-यांना विकेन्द्रीकरणाच्या माध्यमातून काही अधिकार दिलेले असल्यामुळे या बाबतीत जे काही करणे आवश्यक आहे ते त्यांनी तेथल्या तेथे केले पाहिजे. परंतु तसे न करता सबंधित शेतक-यांना जर नुकसान भरपाईची रक्कम लवकर मिळाली नाही तर ते बरोबर होणार नाही. ही नुकसान भरपाईची रक्कम अतिशय लहान असून ती रक्कम मिळावी ही मागणी करण्यासाठी तेथील शेतकरी सतत शासनाच्या दरबारी कशासाठी येतील ? सर्व सामान्य माणसांचे प्रश्न सोडविण्यामध्ये शासन आपल्या यंत्रणेचा योग्य आणि कार्यतत्परतेने वापर करीत नसेल तर हे सर्वच कुचकामी आहे किंवा काय अशा प्रकारची शंका त्याच्या मनामध्ये निर्माण होत असते याबाबतीत शासनाने खालच्या पातळीवरील अधिका-यांना अधिकार दिले पाहिजेत आणि सर्व सामान्य शेतक-यांना वेळच्या वेळी नुकसान भरपाई कशी मिळेल याची व्यवस्था करावयास पाहिजे असे मला वाटते तेव्हा या बाबतीत शासन काही नवीन प्रयोग करुन ,उपक्रमशीलता दाखवून लवकरात लवकर नुकसानभरपाई देण्याची व्यवस्था करणार आहे काय ?

श्री.गुलाबराव देवकर : अशा प्रकारचे प्रश्न जिल्हा पातळीवर त्वरित निकाली काढण्याच्या दृष्टीकोनातून कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यात येईल.

श्री.परशुराम उपरकर : कोकणामध्ये अनेक ठिकाणी फलोत्पादन योजनेच्या माध्यमातून फळांची लागवड करण्यात आली आहे. शेतक-यांनी फळाची लागवड केल्यानंतर अनेक ठिकाणी आगी लागतात आठ दिवसापूर्वी आपल्या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री सुभाष चव्हाण यांच्या 100 झाडांना आग लागली होती. अशा प्रकारची आग लागल्यानंतर सबंधित शेतकरी उद्ध्वस्त होतो तेव्हा त्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी व त्याला तातडीने मदत करण्याच्या दृष्टीने शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, आग लागल्यानंतर शेतक-यांच्या पिकाचे नुकसान होते त्यावेळी नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात कायद्यात कोणतीही तरतूद नाही.

या विशिष्ट घटनेमध्ये 11 शेतक-याच्या फळबागाचे नुकसान झाले असून 103 काजूची झाडे त्याचबरोबर सागाची रोपे आणि बांबूची 2 बेटे जळाली असून त्यामुळे जवळजवळ 90 हजार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर..

रुपयांचे नुकसान झाले होते. जे काही नुकसान झालेले असेल त्याबाबतीत फळबाग योजनतून पुन्हा नवीन झाडे लावून देण्याची व्यवस्था करण्याची तरतूद सरकारने केली आहे. आगीच्या संदर्भात जे काही पिकाचे नुकसान होत असते अशा वेळी नुकसान भरपाई देण्याची कोणतीही तरतूद कायद्यामध्ये नाही.

ॲड.उषा दराडे : सिंधुदूर्ग जिल्हयातील दोडा मार्ग तालुक्यात बांदा दापोली रस्त्याजवळ एक फॅक्टरी असून त्याच्या जवळ हर्षदा सावंत, हरी बाबाजी सावंत, मनोहर सावंत आणि इतर शेतक-याच्या शेतामधून विद्युत वाहिनी जाते त्या ठिकाणी नेहमी शॉर्ट सर्किट होत असते अशा प्रकारची तक्रार या कंपनीने तसेच या शेतक-यांनीसुध्दा केली आहे. तेव्हा शॉर्ट सर्किट होणार नाही या दृष्टीने कोणतीही कार्यवाही ज्या अधिका-याने केली नाही अशा अधिका-याविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्याच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय , त्याचबरोबर काजूच्या बागा जळाल्यामुळे फलोत्पादन योजनेनुसार या संबंधी असेसमेन्ट करुन जे काही नुकसान झालेले असेल त्याची भरपाई करण्यात येईल असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे . आग लागल्यामुळे बी असलेले काजू जळाले असून फक्त झाडाचे नुकसान होत नाही तर आग लागल्यामुळे जमिनीतील जीवाणू सुध्दा मरतात. जमिनीची पिकविण्याची क्षमतासुध्दा कमी होत असते अशा परिस्थितीमध्ये अनुदान वाढवून देण्यात येणार आहे काय ?

श्री.गुलाबराव देवकर: या प्रकरणामध्ये 5 शेतक-यांचे नुकसान झालेले आहे. परंतु शॉर्ट सर्किटमुळे आग लागून हे नुकसान झालेले नसून वेगळया कारणामुळे तेथे आग लागली असून त्यामुळे नुकसान झालेले आहे विद्युत वाहिनीमुळे वा शॉर्ट सर्किटमुळे आग लागून नुकसान झालेले नाही .जमिनीमधील जीवाणू देखील आगी मुळे मरतात तेव्हा अशा वेळी नुकसान भरपाई देण्याची वेगळी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही फक्त रोपांची पुन्हा नवीन लागवड करुन देण्याची तरतूद आहे.त्याचबरोबर शासनाच्या धोरणाप्रमाणे त्या फळबागायतीसाठी तीन वर्षे अनुदान देण्यात येते ते सातत्याने देण्याची तरतूद या योजनेमध्ये राहणार आहे.

नंतर श्रीमती रणदिवे.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न अनेक वेळा वेगवेगळया माध्यमातून या सदनामध्ये उपस्थित करण्यात आलेला आहे. मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, अनेक वेळा आंबा, काजू या पिकाच्या बागांना आगी लागलेल्या आहेत आणि त्यासाठी एम.एस.ई.बी.ने देखील ही बाब नक्की केली आहे की, यामध्ये आमची चूक आहे आणि आमच्यामुळे फळबागांना आगी लागतात. तरी देखील संबंधितांना नुकसान भरपाई मिळत नाही. त्यामुळे आपण याबाबत धोरणात्मक विचार करुन कायद्यात तरतूद करणार आहात काय ? जर एखाद्या वीज कंपनीच्या कारभारामुळे किंवा अन्य कारणामुळे किंवा वणव्यामुळे जर फळबागांच्या कलमांचे नुकसान झाले तर कायद्यात तरतूद करण्याच्या बाबतीत विचार करणार आहात काय आणि तो किती दिवसामध्ये करणार आहात ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, हा विद्युत वितरण विभागाचा विषय राहील आणि त्याठिकाणी शेतकऱ्यांना मदत करण्याचे धोरण असावे. कृषी विभाग किंवा आमच्या विभागाच्या बाबत सांगावयाचे तर जेथे फळबागांच्या संबंधातील विषय असेल म्हणजे त्यांचे ज्या कारणामुळे नुकसान झाले असेल त्याबाबतीत शासनाच्या धोरणाप्रमाणे आज जी तदतूद करण्यात आलेली आहे, त्याप्रमाणे केले जाईल. पुन्हा यापेक्षा . . .

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

इलेक्ट्रीसिटीमुळे किंवा शॉर्ट सर्कीटमुळे जर . . . .

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याठिकाणी शॉर्टसर्कीट वगैरे कारणे सांगितलेली आहेत . . ..

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, जर फळबागांना आग लागण्याचे शॉर्ट सर्कीट हे कारण असेल तर त्यासाठी आमचा विभाग काही वेगळी तरतूद करु शकत नाही. तो संबंधित विभागाचा विषय आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याबाबत धोरण जाहीर केले पाहिजे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, ते आम्ही जाहीर करण्याचे कारण काय आहे ? जर विद्युत वितरण विभागामुळे नुकसान झाले असेल तर त्यासाठी आम्ही धोरण जाहीर करण्याचे काही कारण नाही.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय,याबाबतीत शासनाने धोरणात्मक निर्णय करावयास



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर . . . .

पाहिजे. शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान हे नैसर्गिक आपत्तीमुळे असो किंवा शॉर्ट सर्कीटमुळे असो किंवा इतर काही कारणामुळे असो. परंतु आपण ज्याप्रमाणे इतर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देतो त्यापेक्षा काजू, आंबा, नारळ या पिकाचे एक झाड लावण्यासाठी आणि ते मोठे होण्यासाठी 5 ते 7 वर्ष लागतात. जर आपण त्या सात वर्षाच्या काळातील नुकसान काढले तर ते शासन देणार आहे काय ? याठिकाणी निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "नुकसानीचे अंदाजित मूल्य रुपये 82,400/- इतके आहे."परंतु ज्याठिकाणी 5 लाखाच्या वर नुकसान झाले असेल, त्याअनुषंगाने म्हटलेले आहे. त्यामुळे आपण अशा पिकांसाठी काही धोरणात्मक निर्णय घेणार आहात काय ? कारण रोपटे लावल्यानंतर हे झाड मोठे होण्यासाठी सात वर्षे लागतात. त्यामुळे केवळ एक वर्षासाठी नुकसान देऊन भागणार नाही. त्या शेतकऱ्याला सात वर्षाचे नुकसान द्यावे लागेल. अशा प्रकारचा सरकार धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, याबाबतीत सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन हा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे ठेवला जाईल.

----

. . . .2 क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमधील कारखान्यांचे परवाना शुल्क व नूतनीकरण शुल्काव्दारे शासकीय तिजोरी मध्ये जमा होणाऱ्या महसुलाची पडताळणी न होणे.

**मु. शी.** : ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमधील कारखान्यांचे परवाना शुल्क व नूतनीकरण शुल्काव्दारे शासकीय तिजोरी मध्ये जमा होणाऱ्या महसुलाची पडताळणी न होणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्ह्यातील विविध औद्योगिक वसाहतींमधील कारखान्यांचे परवाना शुल्क व नूतनीकरण शुल्काव्दारे शासकीय तिजोरीत जमा होणाऱ्या महसुलाची पडताळणीच झाली नसल्याचे नुकतेच माहे जानेवारी 2011 रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, गेल्या वर्षी एप्रिल ते नोव्हेंबर या आठ महिन्यांच्या कालावधीत परवाना शुल्क आणि नूतनीकरणापोटी 83 लाख 8 हजार 760 रुपये इतका महसूल जमा होणे, ह्या औद्यौगिक वसाहतीमधील कारखान्यांची नियमित तपासणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करुन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.हसन मुश्रीफ (कामगार आणि विशेष सहाय्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. निवेदनामध्ये छोट्या-छोट्या दुरुस्त्या करावयाच्या आहेत

निवदेनाच्या पहिल्या परिच्छेदातील तिसऱ्या ओळीमध्ये "2 कोटी 47 हजार 701"या ऐवजी "2 कोटी 55 लाख 92 हजार 15" असे वाचावे.

तसेच दुसऱ्या परिच्छेदातील दुसऱ्या ओळीमध्ये "ऑगस्ट" च्या ऐवजी "नोव्हेंबर 2010 आणि त्याच्या खालील ओळीमध्ये "सप्टेंबर" च्या ऐवजी "डिसेंबर" आणि "नोव्हेंबर" च्या ऐवजी "फेब्रुवारी" असे वाचावे.

त्याचप्रमाणे दुसऱ्या पानावर दुसऱ्या ओळीमध्ये "जानेवारी" च्या ऐवजी "फेब्रुवारी" असे वाचावे.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 क्यु-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील विविध औद्योगिक वसाहतींमधील कारखान्यांचे परवाना शुल्क व नूतनीकरण शुल्क किती जमा झाले याच्या संदर्भातील दुरुस्ती

आकडेवारीची माहिती मिळाली आणि त्यानुसार या शुल्कामध्ये वाढ झालेली आहे. काही महिन्यांच्या संदर्भात उल्लेखाबाबत ज्या चुका झाल्या होत्या, त्या देखील दुरुस्त केल्या आहेत. पण मूळ प्रश्न असा आहे की, आपल्याकडे उपलब्ध असलेल्या मनुष्यबळानुसार झालेली वसुली आहे. पण मुळात याबाबतीत वसुली करण्यासाठी किती मनुष्यबळ असावयास हवे आणि ती संख्या पूर्ण झाल्यावर आपण दिलेल्या आकडेवारीमध्ये नक्की किती टक्क्यानी वाढ होण्याची शक्यता आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, औद्योगिक परवाना शुल्क व नूतनीकरण करण्यासाठी जे मालक येतात आणि त्यांना आपण चलन देतो. त्यानंतर ते चलन ट्रेझरीमध्ये भरल्यानंतर त्याची एक प्रत आपल्याकडे देतात. मात्र त्याची पडताळणी करण्याची आवश्यकता आहे. पण त्याच वेळेला म्हणजे एप्रिल ते डिसेंबर महिन्याच्या अखेरीस जनगणनेचे काम सुरु झाले.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ .....

त्यामुळे या कार्यालयात जेवढे अधिकारी होते ते सर्व जनगणनेसाठी गेले, आणि दोनच अधिकारी राहिले. त्यामुळे त्या दोन अधिकाऱ्यांनी जेवढी पडताळणी केली तेवढीच झाली. म्हणून मी मघाशी म्हटले की, मार्च, 2011 पर्यत सगळी पडताळणी पूर्ण करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा मुद्दा असा होता की, कारखाने शासनाकडे व्यवस्थित शुल्क भरीत नाहीत. त्यामुळे शासनाकडे जो निधी प्राप्त व्हवयास पाहिजे तो वेळेवर येत नाही. सर्व अधिकारी जनगणनेच्या कामासाठी गेले होते आणि दोनच अधिकारी या कामासाठी होते असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. पण आता संगणकीकरण झालेले आहे. प्रत्येक कारखान्याकडून प्रत्येक वर्षी किती शुल्क यावयास पाहिजे हे संगणकावर टॅली केल्यानंतर किती शुल्क येणे बाकी आहे, कोणी किती शुल्क बुडविले आहे, कोणी चुकीचे शुल्क भरले आहे, हे कळते. त्यानंतर शासनाकडून त्यांना नोटीस देण्यात येते. तुम्ही अमुक एवढे शुल्क भरावयास पाहिजे होते ते तुम्ही भरलेले नाही त्यामुळे अमुक एवढा दंड भरावा लागेल. पण दंड वसूल करण्याकरिता जी तडजोड होते त्यातून भ्रष्टाचार होतो आणि शासनाकडे येणारे शुल्क वेळेवर येत नाही, हा या संपूर्ण प्रकरणातील मुद्दा आहे. परंतु अधिकारी जनगणनेच्या कामासाठी गेले होते असे म्हटल्यामुळे मी या अधिकाऱ्यांवरील कारवाईच्या बाबतीत प्रश्न विचारु शकत नाही. त्यामुळे माझा मुद्दाच संपला. धन्यवाद.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मार्च, 2011 पर्यंत पडताळणी पूर्ण करण्यात येईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील विविध शाळांमधील 1067 अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याच्या बाबतीत होत असलेली दिरंगाई.

**मु. शी.** : राज्यातील विविध शाळांमधील 1067 अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याच्या बाबतीत होत असलेली दिरंगाई यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, धनंजय मुंडे, प्रा. सुरेश नवले वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात गेली पंधरा वर्षे विविध शाळांमधून १०६७ अर्धवेळ ग्रंथपाल म्हणून कार्यरत असणे, आज पूर्णवेळ होऊ, उद्या पूर्णवेळ होऊ म्हणत अनेक अर्धवेळ ग्रंथपाल सेवानिवृत्तीकडे झुकले असणे,महागाईच्या काळात तुटपुंज्या पगारावर उदरनिर्वाह करताना कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत असणे, अर्धवेळ ग्रंथपालांची शासनाने माहिती मागवून देखील याबाबत शासनाने अद्याप ठोस निर्णय न घेणे, परिणामी ग्रंथपालांच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

श्री. राजेंद्र दर्डा ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील :सभापती महोदय, 1994 साली चिपळूणकर समितीच्या अहवालाप्रमाणे शाळांमध्ये पगारावर होणारा खर्च कमी करण्यासाठी काही धोरण आखण्यात आले आणि जवळ जवळ 2000 पेक्षा जास्त ग्रंथपालांना 1000 पेक्षा विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे अर्धवेळ घोषित करण्यात आले. पण नंतरच्या काळामध्ये माननीय मत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी पटसंख्येची अट थोडी शिथिल केल्यामुळे 1000 अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्यात आले पण जवळ जवळ 1067 ग्रंथपाल अजूनही 16 वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून अर्धवेळ काम करीत आहेत. मला शासनाला असे विचारावयाचे आहे की, या अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे काय, यातील बरेच अर्धवेळ ग्रंथपाल सेवानिवृत्तीला आलेले आहेत. शासनाला जर ही विद्यार्थी संख्या कमी करता येत नसेल तर त्यासाठी अन्य काही मार्ग शासनासमोर आहे काय? उदाहरणार्थ तेच ग्रंथालय त्या गावाचे ग्रंथालय म्हणून वापरणे, दोन किंवा तीन शाळांचा मिळून एक ग्रंथपाल नेमणे,अशा प्रकारे या ग्रंथपालांना न्याय मिळण्याची आवश्यकता आहे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, 1994 साली चिपळूणकर समितीच्या शिफारशीनुसार राज्यातील मान्यताप्राप्त अशासकीय माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी नवीन आकृती बंध निर्माण करण्यात आला आणि त्यावेळी 501 च्यावर आणि 1000 च्या खाली पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये अर्धवेळ ग्रंथपाल आणि 1000 पटसंख्या असलेल्या शाळेमध्ये पूर्णवेळ ग्रंथपाल अशा पध्दतीची नियुक्ती करण्यात आली. अर्धवेळ ग्रंथपाल पाच वर्षापेक्षा अधिक काळ नियमित सेवा करीत असतील तर त्यांना मानवतेच्या दृष्टिकोनातून पटसंख्या शिथिल करुन पूर्णवेळ करण्याची संघटनेची अनेक दिवसांपासून मागणी होती. त्यानुसार 2006 साली ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी वापरलेला शब्द चुकीचा आहे. मानवता म्हणजे दया दाखविणे. ते कर्मचारी आहेत, ते काम करीत आहेत, त्यांना पगार दिला पाहिजे. म्हणून हा शब्द अयोग्य आहे असे आपल्याला वाटत नाही काय? त्यांना मानवता कसली दाखवता?

..4..

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, संघटनेच्या पत्रामध्ये तसा उल्लेख होता. सभापती महोदय, सन 2006 साली 924 अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याचा निर्णय करण्यात आला. त्या निर्णयानुसार मंत्रिमंडळाने 924 पदांना उन्नत करुन पूर्णवेळ पदामधील रुपांतरास मान्यता दिली त्यापैकी जे 640 अर्धवेळ ग्रंथपाल होते त्यांना पूर्णवेळ करण्यात आले. ही गोष्ट खरी आहे की, ज्या शाळांची पटसंख्या 1000 पेक्षा कमी आहे त्या शाळांमध्ये 1067 अर्धवेळ ग्रंथपाल आहेत, त्यांना पूर्णवेळ ग्रंथपाल करण्यात यावे, अशी मागणी आहे. यासंबंधी दिनांक 22 जून, 2010 रोजी कॅबिनेटमध्ये हा विषय आला असता माननीय मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखील उच्चस्तर समितीकडें हे प्रकरण द्यावे अशा प्रकारे आदेशित केले आहे. त्या पध्दतीने प्रस्ताव तयार करुन तो वित्त विभागाला पाठविण्यात आला आहे. वित्त विभागाने त्या संबंधात काही त्रुटी काढल्या आहेत. त्या त्रुटींची पूर्तता करुन लवकरच सविस्तर प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात येईल.

यानंरत श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, हा विषय आताच नव्याने आलेला नाही. गेल्या 4-6 वर्षापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये हा विषय आम्ही सर्व लोकप्रतिनिधी सभागृहात उपस्थित करीत आहोत. या संदर्भामध्ये पूर्वी ज्या चर्चा झाल्या त्यामध्ये केवळ शिक्षक आमदारांनीच नव्हे तर सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांच्यासह अन्य सर्वपक्षीय सदस्यांनी वाचन संस्कृतीचा विकास होण्यासाठी यासंदर्भात बाजू लावून धरली होती. ही सगळी 1067 पदे मराठी माध्यमाच्या शाळेतील आहेत. आताची परिस्थिती विचारात घेता या शाळांमध्ये विद्यार्थी संख्येचा निकष भविष्यामध्ये केव्हाही पूर्ण होण्याची शक्यता नाही, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. जर आपण हाच विद्यार्थी संख्येचा निकष ठेवला तर त्यांना कधीही न्याय मिळणार नाही. म्हणून पूर्वी जी चर्चा झाली होती त्या चर्चेच्या अनुषंगाने विद्यार्थी संख्येचा निकष शिथिल करुन ज्यांची 5 वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा झालेली आहे त्या सर्व अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याच्या संदर्भात शासन निर्णय घेणार का ? माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, उच्चस्तरीय समितीसमोर हा विषय आहे. परंतु हा विषय आताचा नसून 6-7 वर्षापासूनचा असल्यामुळे शासन किती कालावधीत या बाबतीत सकारात्मक निर्णय घेणार ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्याप्रमाणे फक्त 1067 अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ केल्याने महाराष्ट्रातील प्रश्न सुटतो, अशातील भाग नाही. फक्त 1067 अर्धवेळ ग्रंथपालांना जरी पूर्णवेळ ग्रंथपाल करुन जर ग्रंथालयाचा आणि विद्यार्थ्यांच्या ग्रंथालयामध्ये बसण्याचा प्रश्न सुटत असेल तर हा भाग वेगळा आहे. सध्याची जी अट आहे ती शिथिल करुन 2005 मध्ये जो आकृतीबंध तयार करण्यात आला त्याप्रमाणे पूर्वी 500 विद्यार्थी संख्येची अट होती ती 101 पर्यंत खाली आणण्यात आली. याचा अर्थ असा की, यापूर्वी 500 पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या शाळांमध्ये अर्धवेळ ग्रंथपाल नव्हते. या नवीन आकृतीबंधामध्ये 101 विद्यार्थी असले तरी अर्धवेळ ग्रंथपाल पदाला परवानगी देण्यात आलेली आहे. पूर्वी अर्धवेळ ग्रंथपालांची संख्या 2260 होती आणि नवीन नियमाप्रमाणे अर्धवेळ ग्रंथपालांची संख्या 9526 होणार आहे. 8 हजार पेक्षा जास्त अर्धवेळ ग्रंथपालांना नोकरी मिळणार आहे आणि जवळपास सगळ्या माध्यमिक शाळा त्यामध्ये कव्हर होणार आहेत. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न 1067 अर्धवेळ ग्रंथपालांना

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राजेंद्र दर्डा ....

पूर्णवेळ करण्याच्या बाबतीत आहे. मी एवढेच सांगेन की, विद्यार्थी संख्या 101 असली तरी अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करा अशीही मागणी उद्या येऊ शकेल. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी मांडलेला मुद्दा महत्वाचा आहे की, त्यांना पूर्ण वेळ काम मिळावयास पाहिजे या दृष्टीने त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा चांगला आहे. 2-3 शाळा मिळून जर आपण एक ग्रंथपाल नेमू शकलो किंवा त्यांच्याकडे त्या गावातील ग्रंथालयाचे दुसरे काम देता येते काय, हा मुद्दा आजपर्यंत तपासला गेलेला नाही. परंतु ही सूचना अत्यंत चांगली आहे. त्या अनुषंगाने विचार करण्यात येईल्. 1067 ग्रंथपालांसंबंधीचा जो विषय आहे तो कॅबिनेटकडे आहे तो लवकरात लवकर मार्गी लागेल या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सासवणे (ता.अलिबाग,जि.रायगड) येथील श्री. कापरी देव मच्छीमार विशेष कार्यकारी सहकारी संस्थेत मृत व्यक्ती सभासद म्हणून दाखविण्यात येणे

**मु. शी.** : सासवणे (ता.अलिबाग,जि.रायगड) येथील श्री. कापरी देव मच्छीमार विशेष कार्यकारी सहकारी संस्थेत मृत व्यक्ती सभासद म्हणून दाखविण्यात येणे यासंबंधी सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सासवणे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील श्री कापरी देव मच्छीमार विशेंष कार्यकारी सहकारी संस्था, सासवणे या संस्थेची नोंदणी करताना किमान 25 सभासद व आवश्यक किमान यांत्रिकी बोटी यांची कमतरता असताना मृत व्यक्ती संस्थेचे सभासद दाखवून त्यांच्या खोट्या सह्या करुन संस्थेची नोंदणी करुन घेणे, अशा नियमबाह्य संस्थेद्वारे लाकडी बोट बांधण्यासाठी 9 प्रकरणे मंजूर करणे, प्रत्येक लाकडी बोटीसाठी रुपये 42 लाख 19 हजार 700 प्रमाणे 9 प्रकरणी एकूण 1 कोटी 32 लाख 92 हजार 55 रुपये इतके अनुदान एन.सी.डी.सी.कडून मंजूर करुन घेणे, मात्र 42 लाख 19 हजार 700 रुपयांची लाकडी बोट बांधण्याऐवजी केवळ रुपये 7 लाख किंमतीची फायबर बोट बांधून प्रत्येक प्रकरणात कराराचा भंग करुन एकूण 3 कोटी 17 लाख रुपये हडप करुन शासनाची फसवणूक करणे, शिवाय 9 प्रकरणातील एका प्रकरणी श्री.रमेश नाखवा या सभासदांची खोटी सही करुन खोटे प्रकरण तयार करुन रुपये 14 लाख लुबाडण्याचा प्रयत्न करणे, या सर्व प्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

श्री. भास्कर जाधव ( मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अलिबाग तालुक्यामध्ये सासवणे मच्छीमार सोसायटीमध्ये एनसीडीसीमार्फत जे कर्ज वितरण करण्यात आले त्यामध्ये काही गटात मयत सभासद होते. हे मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये मान्य केलेले आहे. अशा परिस्थितीत मयत सभासदांना त्यांच्या सह्या घेण्यासाठी स्वर्गातून आणले आहे काय, ही किमया कोणत्या अधिकाऱ्यांनी केली आहे, या अधिकाऱ्यांविरुध्द शासन काय कारवाई करणार आहे ? राष्ट्रीय सहकार विकास निगमची 42 लाख रुपयांची ही योजना असताना कोणत्या तरी कक्ष अधिकाऱ्यांनी त्यांना कोणताही अधिकार नसताना एक परिपत्रक काढून फायबरच्या बोटी बांधण्याचा आलेला एक प्रस्ताव मान्य केला आहे. फायबरची एक बोट बांधण्यासाठी 8 लाख रुपये खर्च येतो. लाकडी बोट बांधण्यासाठी 45 लाख रुपये खर्च येतो. या 45 लाख रुपयांमध्ये 50 टक्के सबसिडी आहे. त्याऐवजी 8 लाखाची बोट बांधण्यासाठी परवानगी देणे म्हणजे सबसिडीपेक्षाही कमी किंमतीची बोट बांधण्याचा विक्रम सुध्दा केलेला आहे. या सभासदांनी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खोट्या सह्या घेऊन खाते घडलेले आहे. या बँकेने तसे कळविलेले आहे. या सगळ्या प्रकरणाची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर व संबंधित गट प्रमुखांकडून व्याजासह रक्कम शासन वसूल करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हे खरे आहे की, 9 गटांनी एनसीडीसीकडे प्रकरण सादर करुन मंजुरी मिळविली होती. त्यापैकी 8 गटांनी मत्स्यव्यवसाय विभागाकडे अशाप्रकारची मागणी केली होती की, लाकडी बोटीऐवजी फायबरच्या बोटी बांधण्यास परवानगी द्यावी. तसे अधिकार मत्स्यव्यवसाय आयुक्तांना आहेत. मत्स्यव्यवसाय आयुक्तांनी या प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर लाकडी बोटीऐवजी फायबरच्या बोटी बांधण्याचा प्रस्ताव मंजूर केलेला आहे. फायबरची बोट व लाकडी बोट या दोन्ही बोटींच्या किंमतीमध्ये फरक आहे. त्याबाबतची माहिती सन्माननीय सदस्यांनी सांगितली आहे ती खरी आहे. या दोन्ही बोटींच्या बांधणीच्या खर्चात फरक आहे. हा फरक 30 लाख 48 हजार 800 रुपये इतका आहे. लाकडी बोटी बांधणीसाठी 30 लाख 48 हजार 800 रुपये अधिक खर्च आला असता. परंतु फायबरच्या बोटींसाठी 30 लाख 48 हजार 800 रुपये इतका खर्च कमी लागला आहे. फायबरच्या बोटी बांधण्यासाठी परवानगी दिली, परंतु प्रकरणे

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.भास्कर जाधव.....

लाकडी बोटी बांधण्याची मंजूर झाली होती. त्यामुळे 30 लाख 48 हजार 800 रुपये वसूल करण्याची कारवाई मत्स्यव्यवसाय विभागामार्फत सुरु झालेली आहे. आजतागायत 11 लाख 65 हजार 934 रुपये वसूल झालेले आहेत. उर्वरित 16 लाख 9 हजार 166 रुपये येत्या एक महिन्यात वसूल केले जातील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 45 लाख रुपये एक रकमी दिले जात नाहीत. ही रक्क्क टप्प्याटप्प्याने दिली जाते. प्रथम 5 लाख, नंतर 3 लाख अशाप्रकारे टप्प्याटप्प्याने दिली जाते. दुसऱ्या टप्प्याचा पैसा देण्यापूर्वी शासकीय अधिकारी जाऊन तपास करतात. त्यानंतरच दुसऱ्या टप्प्याचे पैसे दिले जातात. अधिकाऱ्यांना बोगस लाकडी बोट दाखविल्यानंतर दुसऱ्या टप्प्याचे पैसे देण्यात आले आहेत. त्याबाबत संबंधितांविरुध्द कारवाई झाली पाहिजे. मंत्री महोदय संबंधित अधिकाऱ्यांची बाजू घेत आहेत. ज्या अधिकाऱ्यांनी हे पैसे मंजूर केले त्यांच्याविरुध्द शासन कारवाई करणार आहे की नाही ? मी तत्कालीन राज्यमंत्री श्री.रविशेठ पाटील यांनाही एक पत्र लिहिले होते. त्यांनी सुध्दा हे कबूल केले होते. मी स्वत: त्याठिकाणी 10 वेळा गेलो आहे. या संस्थेमध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार सुरु आहे. ठराविक 10 मच्छिमार सोसायट्यांना कर्जाचे वाटप होत आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

200-300 कोटी रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे. त्यांचे कोणीही वाकडे करु शकत नाही या भ्रमामध्ये ते आहेत. एका गावातील एक व्यक्ती दोन्ही सोसायटयामध्ये सभासद आहेत. या प्रकरणी आमदार, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि सरपंच या सर्वांनी तक्रारी देऊनही कोणतीही कारवाई होत नाही. बोटी बांधणारे आपल्या बायकांना दागिने करतात, गाड्या घेतात. एकेकाच्या घरापुढे 10-10 गाड्या उभ्या आहेत. या प्रकरणी उच्च पातळीवर शासन चौकशी करणार आहे काय ? तसेच या प्रकरणी जे जे संबंधित अधिकारी दोषी आहेत त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ? वाटेल तसे काम करण्याचे प्रकार चालू आहेत. मी तेथील बँकेचा चेअरमन आहे. या बोगस लोकांनी मोर्चाकाढून उचल का देत नाही म्हणून आमच्या बँकेच्या जनरल मॅनेजरला घेराव घातला. त्याबाबतीत पोलीस केस देखील केलेली आहे. तेथील सहाय्यक निबंधक श्री. सूर्यवंशी यांनी देखील रिपोर्ट दिलेला आहे. त्या रिपोर्टची प्रत मंत्री महोदयांकडे आहे. तेथील शर्मा की वर्मा नावाचे डेप्युटी रजिस्ट्रार म्हणतात की, माझे कोणी वाकडे करु शकत नाही. मंत्र्यांना मी खिशात घालतो. असे बोलणे ही फार आक्षेपार्ह बाब आहे. आम्ही सर्व लोकप्रतिनिधी हे सांगत आहोत की हे सर्व चुकीचे प्रकार होत आहेत. या प्रकरणी चौकशी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. सभापती महोदय, मयत माणसाला कर्ज दिलेले आहे. अशा प्रकरणी कारवाई होणार नसेल, आम्हाला न्याय मिळणार नसेल तर मग याठिकाणी लक्षवेधी सूचना उपस्थित करुन काय उपयोग ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी 2 प्रश्न उपस्थित केले. काही ठराविक लोकांना कर्ज मिळते, बाकीच्या लोकांना कर्ज मिळत नाही असे त्यांनी सांगितले. सन्माननीय सदस्य त्या भागातील असल्यामुळे आणि त्या विषयामध्ये ते काम करीत असल्यामुळे माझ्यापेक्षा त्यांना अधिक माहिती असेल हे कबूल करण्यामध्ये मला अडचण वाटत नाही. पूर्वी आपल्याकडे ठराविक रक्कम येत होती आणि त्या रकमेतून प्रकरणे मंजूर होत होती. मी सांगू इच्छितो की, या देशाचे कृषी मंत्री आदरणीय श्री. शरद पवार साहेब यांनी, एनसीडीसीची जेवढी प्रकरणे जातील त्या सर्वांना केन्द्र शासनाचा निधी देण्याची व्यवस्था केलेली आहे. आपली जेवढी प्रकरणे केन्द्रात जातात तेवढी ती मंजूर होतात. यापूर्वीचा अनुभव वेगळा असू शकतो. या नंतर जेवढी प्रकरणे येतील तेवढी ती मंजूर होतील अशी मी ग्वाही देतो.

..2..

श्री. जयंत प्र. पाटील : बोगस माणसांना कर्ज दिलेले आहे. या प्रकरणी सभापती महोदय आपण मला न्याय द्यावा.

श्री. भास्कर जाधव : मृत व्यक्तीच्या नावे कर्ज घेतलेले आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. एका सोसायटीमध्ये 25 सदस्य असावेत असा नियम आहे. परंतु एका सोसायटीमध्ये 25 ऐवजी 28 सदस्य आहेत. त्या सोसायटीतील दोन सदस्य मृत झाले. त्यानंतर तेथील सर्व लोकांना विश्वासात घेऊन मृतांच्या नातेवाईकांना सभासद करुन घेण्यात आले आणि त्याना कर्ज देण्याची व्यवस्था झालेली आहे. कोणीही आमचे भले-वाईट करु शकत नाही अशी तेथील लोकांची भावना असल्याचे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. आम्ही आमच्या मनाप्रमाणे धोरण राबवू, कायदा डावलून, नियम डावलून काम करु आणि त्याबाबत शासन आम्हाला मोकळीक देईल अशा वल्गना कोणी करीत असतील तर ते आक्षेपार्ह आहे. सन्माननीय सदस्यांनी नैराश्यामध्ये राहाण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकारच्या वल्गना जो कोणी अधिकारी करीत असेल त्याबाबत स्पेसिफिक प्रकरण दिले तर अशा प्रकारच्या वल्गना करणा-या व्यक्तीला शासन झालेले असेल अशा प्रकारचा अनुभव सन्माननीय सदस्यांना येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : या प्रकरणी कोणावरही कारवाई झालेली नाही. त्यांनी बँकेत खाते उघडून मयत माणसाच्या नावे कर्ज दिलेले आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, बोटी बांधण्याकरिता जो निधी दिला त्याबाबत चुकीची नावे दिली गेली हे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे, वसुली मान्य केली आहे. वस्तुत: लाकडी बोटी बांधल्या जात आहेत की नाही हे प्रत्यक्ष पाहणी न करता पैसे दिले गेले याबद्दल कारवाई करण्याचे मंत्री महोदयांनी सुतोवाच केलेले नाही. मयत माणसाच्या नावे पैसे उचलले गेले. नंतर त्यांच्याऐवजी त्यांच्या नातेवाईकांची नावे समाविष्ट केली गेली. परंतु मूळ मयत माणसाच्या नावे पैसे दिले गेले, खोट्या सह्या करुन बँकेतून पैसे उचलले गेले हे चुकीचे झालेले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, वास्तविक पहिला हप्ता दिल्यानंतर दुसरा हप्ता देण्यापूर्वी प्रत्यक्ष काय चालले आहे हे पाहिले पाहिजे. लाकडी बोट बांधण्याकरिता निधी मंजूर केला आहे आणि नंतर फायबर बोटीकरिता परवानगी दिली असली तरी मुळात संपूर्ण रक्कम का रिलिज केली गेली हा बेसिक प्रश्न आहे. अशा पध्दतीने अधिकाऱ्यांनी चुकीचे काम केले आणि नंतर मात्र वसुली करुन घ्यायची ही बाब उघडकीस आली आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. अशा पध्दतीने चुकीचे काम केले आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. त्याची जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**.: चिंबावे (ता.महाड, जि.रायगड) येथे रासायनिक मिश्रित पाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीची पाईपलाईन फुटून महाड औद्योगिक परिसरात झालेले प्रदुषण.

**मु.शी**.: चिंबावे (ता.महाड, जि.रायगड) येथे रासायनिक मिश्रित पाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीची पाईपलाईन फुटून महाड औद्योगिक परिसरात प्रदुषण होणे यासंबंधी सर्वश्री राजन तेली, भाई जगताप, चरणसिंग सप्रा यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"चिंबावे (ता.महाड, जि.रायगड) येथील वडवली नजिकच्या गावाजवळ दिनांक ७ फेब्रुवारी, २०११वा त्यासुमारास रासायनिक मिश्रित पाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीचे पाईपलाईन फूटून सांडपाणी सावित्री नदीच्या पाण्यात मिसळण्याचा दृष्टोत्पत्तीस आलेला धक्कादायक प्रकार, सदर रसायन मिश्रित पाणी आसपासच्या शेतजमिनीत व बागायततून वाहात गेल्याने महाड औद्योगिक परिसरात सांडपाण्याचे व हवेचे झालेले प्रदूषण, शेतजमीन नापिक होण्याचा ओढवलेला दुर्देवी प्रसंग, वास्तविक रसायन मिश्रित सांडपाण्यावर जल शुध्दीकरण केंद्रात प्रक्रिया करण्याबाबत तेथील औद्योगिक परिसरात आस्थापनांनी दाखवलेली बेपर्वाई, परिणामी सदर जल प्रदूषणामुळे तेथील जनजीवन विस्कळीत होण्याचा घडलेला धोकादायक प्रकार, याबाबतीत शासनाने युद्धपातळीवर नुकसानाची पाहणी करुन नुकसान भरपाई देण्याबाबत केलेली वा करावयाची उपाययोजना, कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री.संजय देवतळे (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, लक्षेवधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन कृपया छापावे)

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक.8....

श्री.राजन तेली : सभापती महोदय, रासायिक मिश्रित पाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीची पाईपलाईन फुटून सांडपाणी सावित्री नदीच्या पाण्यात मिसळल्यामुळे जे प्रदुषण झाले त्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली, या परिसरात असलेल्या रासायनिक कारखान्यांवर कोणामार्फत देखरेख ठेवण्यात येते, किती कालावधीनंतर या कारखान्यांची तपासणी केली जाते, नदीमध्ये दूषित पाणी सोडले जाते त्याबाबत देखरेख करण्याची जबाबदारी कोणाची आहे, किती महिन्यातून त्यांनी भेटी दिल्या पाहिजेत? सांडपाण्यावर पूर्ण प्रक्रिया केल्यानंतर त्या प्रक्रियायुक्त सांडपाण्याची विल्हेवाट बंद वाहिनीद्वारे एमआयडीसीतर्फे 21 कि.मी.अंतरावर ओवळे येथे सावित्री नदीच्या खारेपाणी क्षेत्रात करण्यात येते. सीईटीपीच्या अपग्रेडेशनचा प्रस्ताव विचाराधीन आहे असे म्हटले आहे. या प्रस्तावावर किती दिवसात कार्यवाही पूर्ण होईल?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, निवेदनात म्हटल्याप्रमाणे पाईपलाईन लिकेज झाली होती. श्री.विनायक परशुराम घाडगे व श्री.श्रीधर गणपत जागडे यांच्या शेत जमिनीचा तलाठीमार्फत सर्व्हे करण्यात आला आणि त्यांना आर्थिक मदत देण्याचा एमआयडीसीकडे पाठविला आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते बंद वाहिनीद्वारे 21 कि.मी. अंतरावर ओवळे येथे सावित्री नदीच्या खारेपाणी क्षेत्रात पाठविले जाते. त्या संदर्भातील सीईटीपीच्या विस्तारीकरणाचा प्रस्ताव पाठविला आहे. 7 एमएलडी क्षमतेच्या सामूहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचा 10 एमएलडी क्षमता वाढविण्याबाबत निरी या संस्थेने अहवाल दिला आहे. 13.63 कोटी रुपयांची विस्तारीकरणाची प्रक्रिया करुन त्याप्रमाणे सुधारणा करावयाची आहे.

नंतर 2डब्ल्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, ही घटना महाड एमआयडीसीमधील असली तरी लोटे-परशुराम तसेच कणकवली भागात देखील मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झालेले आहे. या भागात मुख्यत: केमिकलचेच उद्योग आहेत. एका बाजूला केमिकलचे उद्योग आणि दुसऱ्या बाजूला पुन्हा औष्णिक विद्युत प्रकल्प येत आहेत, त्यामुळे या परिसरात प्रदूषणाची भीती जास्त आहे. मग जी घटना महाडला घडली तशा घटना लोटे परिसरात नेहमीच घडतात त्यामुळे या ठिकाणी सांडपाण्याचा जो प्रश्न निर्माण झालेला आहे तो आमच्या भागात सुध्दा निर्माण होतो. यासंदर्भात मात्र कारखानदार अतिशय बेदरकारपणे वागतात. त्यामुळे संपूर्ण जनजीवनच धोक्यात येते, मासे मरतात म्हणून शासन पूर्णत: व जबाबदारीने कायमस्वरुपी उपाययोजना करणार काय ?

श्री. संजय देवतळे : महोदय, ही घटना महाड येथील वडवली नजिकच्या गावाजवळची असून सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे आपण येथे ज्या सुधारणा करणार तशाच सुधारणा लोटे परिसराच्या बाबतीत देखील चर्चा करुन केल्या जातील.

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, महाड एमआयडीसीतील दूषित पाणी हे बानगडच्या काठापर्यंत सोडण्याचा प्रस्ताव होता. पण ही पाईपलाईन चिंबावे पर्यंतच असून त्या सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा केवळ दाखविण्यापुरतीच आहे. म्हणून शासन ही प्रक्रिया बानगडपर्यंत नेण्याचे आश्वासन देणार काय ?

श्री. संजय देवतळे : महोदय, 21 कि.मी. ची ही पाईपलाईन असून सावित्री नदीच्या खार पट्ट्यात सोडली जाणार आहे. तसेच राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेने ठरवून दिलेले ठिकाण आंबेतपर्यंत आहे. हे एमआयडीसीचे काम आहे तरी देखील सन्माननीय सदस्यांनी सुचविल्यानुसार यादृष्टीने बैठक घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ. शी.** : कोल्हापुरी चपलांचे "जी आय आर" नोंदणी केंद्र कोल्हापूर येथेच ठेवणे

**मु. शी.** : कोल्हापुरी चपलांचे "जी आय आर" नोंदणी केंद्र कोल्हापूर येथेच ठेवणे याबाबत श्री.सुभाषण चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

महोदय, कोल्हापुरी चप्पलला युरोप, सिंगापूर, जपान, बांगला देश या पश्चिम आशियाई देशात मागणी आहे. परंतु "जी आय आर" च्या शिक्क्याअभावी कोल्हापुरातील कारागिरांना ही चप्पल अस्सल असूनही तिची निर्यात करता येणे शक्य होणार नाही, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. संबंधितांनी महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, मिरज यासारख्या जिल्ह्यात चर्मकार समाजाच्या पूर्वजांकडून ही कला आत्मसात केली असून या जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक कारागीर आहेत. नाशिकची वाईन, कोकणचा हापूस, येवल्याची पैठणी, महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी या महाराष्ट्राच्या वैभवावर आलेल्या वस्तूंवर "जी आय आर मार्क" उमटला आहे. त्याप्रमाणेच कोल्हापुरी चपलांचे "जी आय आर" नोंदणीचे केंद्र कोल्हापूर येथेच ठेवावे, अशी शिफारस महाराष्ट्र शासनाने केंद्रीय वाणिज्य विभागाला करावी व कोल्हापुरी चपलांची निर्यात वाढवून देशाच्या महसूल उत्पादनात वाढ करावी, अशी विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाला करीत आहे.

--------

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रेवदंडा (जि. रायगड) परिसरात पुरातत्व खात्याने घरबांधणी व दुरुस्तीसाठी केलेली बंदी

**मु. शी.** : रेवदंडा (जि. रायगड) परिसरात पुरातत्व खात्याने घरबांधणी व दुरुस्तीसाठी केलेली बंदी याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

केंद्र सरकारच्या पुरातत्व विभागाने शहरातील मध्यवर्ती भागातील भुईकोट किल्ल्यापासून 300 मीटर क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे नवीन बांधकाम, दुरुस्ती अथवा उत्खनन करता येणार नाही, असे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार अलिबाग तालुक्यातील रेवदंडा (जि. रायगड) या गावाला पूर्वी अगरकोट हे नाव होते. सध्या या गावात मोठ्या प्रमाणात बागायती जमिनी मालकी हक्काच्या आहेत. या ठिकाणी असणारे रहिवाशी अनेक वर्षे वास्तव्य करुन आहेत. पूर्वीच्या कुटुंबात वाढ झाली आहे, त्यामुळे त्या ठिकाणी त्या कुटुंबाला राहण्यासाठी नवीन बांधकाम करणे आवश्यक आहे. तसेच प्राचीन काळापासून असलेल्या घरांची प्राप्त परिस्थितीत दुरुस्ती करणेही आवश्यक आहे. मात्र अशा प्रकारचे बांधकाम अगर दुरुस्तीचे काम ग्रामस्थांनी सुरु केले असता भारतीय पुरातत्व विभाग या केंद्र सरकारच्या खात्यातील कर्मचारी ते काम बंद पाडतात. यामुळे रहिवाशांची फारच अडचण होते व त्यांना जीवन जगणे कठीण होऊन बसले आहे. तरी या पिडीतग्रस्त रहिवाशांना दिलासा द्यावा, व रहिवाशांना बांधकाम करता येईल असे आदेश द्यावेत, अशी या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनाला विनंती करतो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मौ.नेकनूर (जि.बीड) येथील पोलीस स्टेशनची इमारत मोडकळीस येणे

**मु.शी.**: मौ.नेकनूर (जि.बीड) येथील पोलीस स्टेशनची इमारत मोडकळीस येणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, मौजे नेकनूर(ता.जि.बीड) येथील पोलीस ठाण्याची निजामकालीन असलेली इमारत मोडकळीस आली असून कोणत्यावेळी कोसळेल याची शाश्वती देता न येणे, अशा परिस्थिती जनतेच्या दक्षतेसाठी असलेल्या पोलिसांना जीव मुठीत घेवून कार्यरत रहावे लागणे, याबाबत सखोल चौकशी करुन सदर पोलीस ठाण्याच्या इमारतीची दुरुस्ती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेले पोलिसी अत्याचार

**मु. शी.** :राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेले पोलिसी अत्याचार याबाबत श्री.दिवाकर रावते,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विशेष उल्ले□संबंधीची सूचना दिली आहे. त्यानी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूचना मांडतो.

महाराष्ट्र राज्यात पोलिसी अत्याचार वाढत चालले आहेत. पोलीस सर्वसामान्य जनतेला गुंडाच्या मदतीने कसा त्रास देतात, गुंडाना कसे पाठीशी घालण्यात येते यांची अनेक उदाहरणे दररोज महाराष्ट्र राज्यात आपणास ऐकावयास मिळतात, पहावयास मिळतात. गेल्या महिन्यात सोलापूर जिल्हयातील एका गरीब कुटुंबातील तरुणास व त्याच्या वडिलांना कसा त्रास दिला जातो हे मी आपणामार्फत सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मु.पो.लिंबीचिंचोळी ता. दिक्षण सोलापूर येथे श्री.मळसिध्द नलप्पा किवडशेट्टी हा शेतमजूर कुटुंबासह झोपडीत राहतो. गावातील संगप्पा व दिशेन हणमशेट्टी यांच्याकडून त्यांनी 1 वर्षापूर्वी बैल खरेदीसाठी रु. 10,000/- कर्ज घेतले होते. त्यांचे व्याज तो दरमहा देत असे. परंतु घरात लग्न कार्य निघाल्यामुळे त्याने मागच्या दोन महिन्याचे व्याज दिले नव्हते. दि.4.2.2011 रोजी रात्री हणमशेट्टी या सावकाराने गरीब शेतमजूर श्री. किवडशेट्टी यांस व त्यांच्या तरुण मुलास गुंडाच्या मदतीने मारहाण केली. सदर भाग महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील आहे. त्यामुळे मारहाण करण्यासाठी हणमशेट्टी यांनी कर्नाटकच्या विजापूर जिल्हयाती इंडी तालुक्यातील तझेवाडी येथील गुंडाना मोबाईल वरुन बालाविले. त्यांनी येतांना तलवारी, बंदुका आणल्या होत्या. हे गुंड गावात आल्यानंतर त्यांनी हवेत गोळीबार देखील केला होता. हल्ल्यात श्री. किवडशेट्टी यांच्या हाताचा अंगठा तोडून टाकला. तलवारीचे वार केले गेले. श्री. किवडशेट्टी अद्यापही रुग्णालयात आहेत. त्यांच्या मुलाने पोलिसात

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

तक्रार दिली तर ती घेण्यात येत नाही. इतकी हणमशेट्टी यांची तेथे दहशत आहे. याबाबत पोलिसांकडे आपल्याकडे, मा. मुख्यमंत्री, गृहमंत्री यांचेकडे तक्रार अर्ज देऊन जिल्हा पोलीस प्रमुखांच्या कार्यालयासमोर आत्मदहन करण्याची नोटीस 8 फेब्रुवारी, 2011 रोजी दिली होती. अद्यापपर्यंत या संदर्भात आरोपीस अटक करण्यात आलेली नाही, तरी श्री संगप्पा हणमशेट्टी व त्यांचे साथीदार गावगुंड यांना तातडीने अटक करावी व श्री. किवडशेट्टी व त्यांच्या कुटुंबियांना भयमुक्त करावे. किवडशेट्टी हे अत्यंत गरीब शेतजूर आहेत. सदर हल्ल्यामुळे त्यांना व त्यांचा मुलगा श्री. शैल यांचा यांना औषधोपचारासाठी बराच खर्च झाला आहे. सदर गुन्हयाची नोंद होण्यासाठी शासनाने कर्नाटक राज्याशी बोलून गुन्हा नोंदविण्याच्या सूचना द्याव्यात तसेच संबंधित शेतक-यास शासनाने त्याना आर्थिक मदत द्यावी अशी मी आपल्या मार्फत मा. मुख्यमंत्र्यांना विनंती करतो.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :निरंतर शिक्षण केंद्र कायमस्वरुपी सुरु राहण्याबाबत

**मु. शी.**:निरंतर शिक्षण केंद्र कायमस्वरुपी सुरु राहण्याबाबत श्री.भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

राज्यातील जवळ जवळ सर्वच जिल्हयात गावोगावी हजारो निरंतर शिक्षण केंद्र प्रौढ शिक्षण विभागामार्फत चालविली जात आहेत. या निरंतर शिक्षण केंद्रासाठी लागणारा निधी केंद्र शासनाकडून येतो. काही वेळा केंद्र शासनाकडून हा निधी येण्यामध्ये विलंब होत असतो. त्यामुळे ही निरंतर शिक्षण केंद्रे सहा महिने बंद पडतात. त्यामुळे केंद्राचा निधी येईपर्यंत राज्य शासनाने आपला निधी या योजनेसाठी खर्च करावा व केंद्राचा निधी आल्यानंतर तो त्यातून वळता करावा. असे जर केले तर निरंतर शिक्षण केंद्रे नियमित सुरु राहू शकतील. त्यामुळे ग्रामीण भागातील नवसाक्षरांना या केंद्राच्या लाभापासून वंचित रहावे लागू नये यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास विनंती करतो की, ही निरंतर शिक्षण केंद्रे नियमितपणे चालू राहण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना तातडीने करण्यात यावी.

---------

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** :ब्रेन डेड रुग्णांच्या बाबतीत अवयव दान करण्याकरिता जनजागरण मोहिम शासनाने हाती घेणे

**मु.शी.** :ब्रेन डेड रुग्णांच्या बाबतीत अवयव दान करण्याकरिता जनजागरण मोहिम शासनाने हाती घेण्याबाबत श्री.हेमंत टकले,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखासबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.हेमत टकले ( विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा 1994 मध्ये केन्द्र सरकारने पुष्कळ सुधारणा केलेल्या आहेत या कायद्यातील तरतुदीमुळे गरजू रुग्णांना अवयव मिळण्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. आपल्या देशात आणि विशेषत: महाराष्ट्र राज्यात नेत्रदान आणि नेत्र प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करतांना आज जी स्थिती आहे त्यामध्ये खूप सुधारणा होण्याची अवश्यकता आहे. नुकतेच के.ई.एम या सरकारी इस्पितळात लिव्हरचे ट्रान्सप्लान्टेशन यशस्वीपणे झालेले आहे . कीडनीचे ट्रान्सप्लान्टेशनच्या बाबतीत ब-याच वेळेला अवैध मार्गाने केल्या जाणा-या उपचारामुळे किंवा पध्दतीमुळे कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या होत्या परंतु ब्रेन डेड रुग्णांच्या बाबतीत अवयव दान हे सर्वात महत्वाचे असतांना त्याबद्दल अजूनही आपल्या राज्यात उदासीनता दिसते याबाबतीत एक व्यापक जनजागरण मोहिम राबविण्याच्या संदर्भात राज्याच्या सावर्जनिक आरोग्य विभागाने पुढाकार घ्यावा यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील अनुशेषासाठी 2010-2011 या वर्षासाठी केलेली तरतूद आणि झालेला खर्च या बाबतची आकडेवारी अद्याप शासनाकडून प्रसिध्द न होणे

मु.शी. : विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील अनुशेषासाठी 2010-2011 या वर्षासाठी केलेली तरतूद आणि झालेला खर्च या बाबतची आकडेवारी अद्याप शासनाकडून प्रसिध्द न होणे या संबंधी श्री पांडुरंग फुंडकर ,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, घटनेच्या 371 (2) कलमानुसार सिंचनासह विविध क्षेत्रासाठी निधी वाटपाचे आदेश माननीय राज्यपालांकडून राज्य सरकारला दिले जातात या आदेशाचे पालन कशा प्रकारे झाले आहे याची सविस्तर आकडेवारी देखील सरकारकडून सभागृहाला सादर करणे आवश्यक आहे, सन 2010 - 2011 या वर्षासाठी विदर्भ ,मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील अनुशेषासाठी किती रक्कमेची तरतूद करण्यात आली व त्यातील किती रक्कम खर्च झाली याची सविस्तर माहिती दोन्ही सभागृहाला सादर करणे आवश्यक असताना महालेखापालांकडून सविस्तर आकडेवारी अद्याप प्राप्त झालेली नाही हे कारण पुढे करुन राज्य सरकारने आपली जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापि माननीय राज्यपालांना शासनाचा हा युक्तीवाद पटलेला नाही.

महालेखापालाकडून आकडेवारी प्राप्त होण्यास विलंब लागत असल्यास राज्य शासनाने ही आकडेवारी प्रसिध्द करावी अशी सूचना राजभवनावरुन करण्यात आलेली आहे. एका अर्थी अनुशेषग्रस्त भागासाठी वाटप करण्यात येणारा निधी आणि प्रत्यक्ष झालेला खर्च याची माहिती सर्व सामान्य जनतेला उपलब्ध करुन देण्याच्या माननीय राज्यपालांच्या आदेशाचे उल्लंघन ही एक चिंतनीय बाब आहे म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणत आहे. "

----

**पृ.शी.** राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

( प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला )

**उप सभापती** : यानंतर माननीय राज्यपालांच्या अभिभाषाच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेला माननीय उप मुख्यमंत्री उत्तर देतील.

श्री.अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांच्या आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडला असून सन्माननीय सदस्य श्री विनायक मेटे यांनी त्या प्रस्तावाला अनुमोदन दिले आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल या उभयतांनी काही विचार व्यक्त केले आहेत त्याचबरोबर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते,जयंत प्र.पाटील तसेच दोन्ही बाजूच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात जे विचार मांडले आहेत ते सभागृहातील इतर सन्माननीय सदस्यांनी ऐकले आहेत. या ठिकाणी करण्यात आलेल्या भाषणामध्ये या सर्व सन्माननीय सदस्यांनी काही विधायक सूचना केल्या आहेत त्याबद्दल मी सर्व प्रथम या सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो. तसेच राज्याच्या पुढच्या वाटचालीच्या दृष्टीने तसेच राज्याला पुढे नेण्याच्या दृष्टीने त्यांनी काही महत्वाच्या सूचना केल्या आहेत त्याचे मी स्वागत करतो त्याचबरोबर सभागृहाला असा विश्वास देऊ इच्छितो की,पुढच्या विकासाच्या वाटचालीमध्ये राजकारण न आणता पुरोगामी विचाराच्या महाराष्ट्राच्या दृष्टीने ज्या काही महत्वाच्या बाबी असतील त्याच बाबी करण्याचा प्रयत्न राज्य सरकार म्हणून आमच्याकडून होईल.

सभापती महोदय, ख-या अर्थाने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या सुरुवातीला विधानमंडळाच्या अमृत महोत्सवाच्या वर्षा निमित्त माननीय राज्यपालांनी सर्व सन्माननीय सदस्यांना व राज्यातील जनतेला मनापासून शुभेच्छा दिलेल्या आहेत.

नंतर श्रीमती रणदिवे ...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार . . ..

माननीय विरोधी पक्षनेत्यांना माहिती आहे की,आपल्याला कोणीही शुभेच्छा दिल्या तर त्या शुभेच्छांबद्दल आभार मानण्याची वेगळया प्रकारची परंपरा आहे आणि ही तुमची-आमची भारतीय संस्कृती आहे आणि ती महाराष्ट्राची देखील संस्कृती आहे. त्यामुळे या परंपरेचे पाईक होण्यासाठी आपण सर्वांनीच माननीय राज्यपाल महोदयांचे आभार मानले पाहिजेत असे मला स्वत:ला वाटते.

सभापती महादेय, खरेतर या विधानमंडळात राज्याला विविध क्षेत्रामध्ये दिशा देण्याचे आणि लोकाभिमुख कल्याणकारी निर्णय घेण्याचे तसेच विशेषत: सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्याचे सामर्थ्य या सभागृहाला आहे. आपल्या विधिमंडळाला देखील थोर परंपरा लाभलेली आहे. आपल्या मध्ये राजकीय मतभेद असले तरी सर्वजण विकासाच्या मुद्यावर एकत्र येऊन राज्याच्या विकासाच्या दृष्टीकोनातून सकारात्मक अशा प्रकारची चर्चा विधिमंडळामध्ये नेहमीच घडवून आणली जाते. मधल्या काळामध्ये काही राजकीय घटना घडल्या.अचानक राज्याच्या त्यावेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांना आणि उप मुख्यमंत्र्यांना जावे लागले. त्यानंतर राज्यामध्ये नवीन मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांची नियुक्ती झाली आणि एकंदरीतच लोकांच्याही अपेक्षा वाढलेल्या आहेत. आपण जर पाहिले तर माननीय राज्यपाल महोदयांनी देखील आपल्या अभिभाषणामध्ये याच गोष्टी सांगितल्या आहेत की, हे शासन पुढील वर्षी विविध क्षेत्रामध्ये कोणत्या दिशेने आणि कशा प्रकारे पावले टाकणार आहे आणि याचे थोडक्यात पण स्पष्ट असे चित्र अभिभाषणाच्या निमित्ताने राज्यातील जनतेसमोर मांडण्याचा प्रामुख्याने प्रयत्न असतो. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितल्याप्रमाणे बऱ्याच अंशी तो एक विकासाचा रोड मॅप असतो ही वस्तुस्थिती देखील मी मान्य करीन. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संबंधात सत्ताधारी पक्षाकडून त्यांच्याच पक्षाचे सरकार आहे, त्यामुळे सहाजिकच त्यांनी काही मुद्यांच्या बाबतीत कौतुक करणे अपेक्षित आहे. परंतु सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य यांच्याकडून विधायक सूचना अणि बदल अपेक्षित असतात आणि त्यापध्दतीने नेहमीच परिपूर्ण असे त्यांनी काही मुद्दे मांडावेत असे आम्हाला वाटत. यामध्ये काही त्रुटी किंवा कमतरता असू शकतात. परंतु एकंदरीत जनतेच्या हितासाठी आणि वेगवान विकासासाठी आवश्यक ते बदल घडून यावेत या पध्दतीचे विचार देखील आम्ही करीत असतो.

सभापती महोदय, एकंदरीतच माननीय राज्यपालांनी अभिभाषणाच्या सुरुवातीलाच अभिमान बाळगावी अशी एक बाब आपणा सर्वांसमोर सांगितली आहे की, केंद्र शासनाच्या विशिष्ट ओळखपत्र

श्री.अजित पवार . . ..

देण्याच्या आधार प्रकल्पाचा उल्लेख त्यामध्ये आहे. देशभर राबविल्या जाणाऱ्या या प्रकल्पाची सुरुवात आपल्या राज्यामधून आणि ती देखील नंदूरबार सारख्या आदिवासी भागातील टेंभली या गावातून झाली आहे. याबाबत त्यांनी महाराष्ट्राविषयी दाखविलेल्या विश्वासाबद्दल आपण सर्वांनी केंद्र शासनाचे देखील आभार मानले पाहिजेत.

सभापती महोदय, एकंदरीत गेली अनेक वर्षे आम्ही आघाडी सरकार म्हणून काम करीत आहोत. ते काम करीत असताना मध्यंतरीच्या काळामध्ये म्हणजे 1995 ते 1999 या कालावधीमध्ये भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांचे सरकार या राज्यात पहिल्यांदा सत्तेवर आले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून कधीही विरोधी पक्षाचे सरकार नव्हते. मधल्या काळामध्ये पुलोदचे सरकार झाले होते. पण त्यामध्ये कॉंग्रेसमधील लोकांनीच महत्वाची भूमिका वठविण्याचे काम केले होते किंवा कॉंग्रेसच्या विचारांचे मुख्यमंत्री त्यामध्ये होते. पण मघाशी सांगितल्याप्रमाणे 1995 ते 1999 मध्ये भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना यांनी सत्तेवर येऊन साडेचार वर्षे सरकार चालविले. मी त्या काळामध्ये विधिमंडळाचा सदस्य म्हणून काम करीत होतो. परंतु राज्यातील जनतेने त्या सरकारचा कारभार पाहिल्यानंतर एक गोष्ट सर्वांना प्रकर्षाने जाणवली की, त्या कालावधीमध्ये अनेक वेगवेगळया गोष्टींच्या संदर्भात उल्लेख झाला, घोषणा झाल्या. परंतु जनतेला त्या सरकारचा कारभार योग्य वाटला नाही. म्हणून 1999 सालातील निवडणुकीमध्ये पुन्हा लोकशाही आघाडीचे सरकार या राज्यामध्ये सत्तेवर यावे यासाठी आणि भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना यांना सत्ते पासून बाजूला ठेवण्याकरता राज्यातील जनतेने कौल दिला. तेव्हा आपल्यावर ही वेळ का आली? त्याचे कारण देखील संबंधितांनी लक्षात घेतले पाहिजे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

सभापती महोदय, एकंदरीतच कामकाज करीत असताना 1999, 2004 आणि 2009 ला तिसऱ्यांदा लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आलेले आहे. ठीक आहे, आम्ही राज्य सरकार चालवत असताना, लोकांचे प्रश्न 100 टक्के सुटलेले आहेत असा दावा करणार नाही. परंतु निश्चितपणे सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न राज्यकर्ते या नात्याने शासनाने केलेला आहे. राज्यपाल महोदयांनी त्यांच्या अभिभाषणात उल्लेख करत असताना वेगवेगळ्या विकासाच्या संदर्भातील बाबी प्रदर्शित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अलीकडच्या काळामध्ये श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब या राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यांना केंद्र सरकारमधील अनुभव होता. ते अजूनही विधान परिषद किंवा विधानसभेचे सन्माननीय सदस्य नाहीत. आता लवकरच निवडणूक घेण्यात येईल आणि ते या ठिकाणी निवडून येतील. त्यांना माननीय पंतप्रधान कार्यालयाचा अनुभव असल्यामुळे ते निश्चितपणे या राज्याला चांगल्या प्रकारचे नेतृत्व देऊ शकतील, अशा प्रकारची चर्चा सुरु झाली होती. वर्तमानपत्रात देखील तशा प्रकारच्या बातम्या येत होत्या. सगळीकडे तशी चर्चा सुरु होती. या राज्याचा कारभार पारदर्शक असला पाहिजे. एकेकाळी या राज्याचा प्रशासनाच्या बाबतीत देशपातळीवर जो नावलौकित होता तो नावलौकिक पुन्हा वाढला पाहिजे.

सभापती महोदय, यंदाचे वर्ष महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. संयुक्त महाराष्ट्र राज्याचा मंगल कलश स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांनी आणला, त्यातून या महाराष्ट्र राज्याला पुढे नेण्याचे काम त्यांनी केले. राज्याची परंपरा अधिक ताकदीने पुढे कशी नेता येईल या पध्दतीचे काम या शासनाचे चाललेले आहे. मला या ठिकाणी सभागृहाला सांगावयाचे आहे की, नव्या मुंबईचा विमानतळाचा प्रश्न बरेच वर्षे मार्गी लागत नव्हता. याबाबतीत खूप प्रयत्न करण्यात आले, पाठपुरावा करण्यात आला. मुंबईच्या विमानतळावर मोठया प्रमाणात लोड आहे. आपण कधीही विमानातून मुंबईला आल्यानंतर अनुभवले असेल की, रात्रीच्या वेळी अर्धा ते पाऊण तास विमान आकाशातच फिरत असते कारण त्या विमानाचा उतरण्यासाठी नंबर लागत नाही. म्हणून खऱ्या अर्थाने या देशाची आर्थिक राजधानी असलेल्या या मुंबईच्या जवळच आंतरराष्ट्रीय दर्जाचे एक विमानतळ असले पाहिजे, असे आपल्या सर्वांचे मत होते, श्री. पृथ्वीराज चव्हाण या राज्याचे माननीय मुख्यमंत्री झाल्यानंतर त्या प्रश्नाला बऱ्याच अंशी निकाली काढण्यात आले आहे. केंद्रीय

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार.....

मंत्री माननीय श्री. जयराम रमेश यांनी या विमानतळासाठी एन.ओ.सी. दिलेली आहे. नव्या मुंबईचे विमानतळ प्रत्यक्षात लवकरात लवकर कसे कार्यान्वित करण्यात येईल आणि प्रत्यक्षात त्याचा वापर कसा होईल या दृष्टिकोनातून शासनाचा प्रयत्न चाललेला आहे. केंद्र सरकारकडून या विमानतळासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याची भूमिका आहे. या विमानतळासाठी 10 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्तीचा खर्च होणार आहे या विमानतळामुळे कित्येक लाख युवकांना रोजगाराची संधी मिळणार आहे. कुठलेही डेव्हलपमेंटचे काम करत असताना त्यामध्ये तरुण आणि तरुणींना रोजगार मिळाला पाहिजे अशा प्रकारची भूमिका सातत्याने सांगण्याचा प्रयत्न राज्य सरकारचा आहे.

सभापती महोदय, जैतापूरच्या संदर्भात मी जास्त वेळ घेणार नाही. कारण जैतारपूरच्या बाबतीत कालच शुक्रवारी प्रश्नोत्तराच्या तासाच्या निमित्ताने उत्तर दिलेले आहे. सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांनी श्री. केंद्रीय मंत्री श्री. जयराम रमेश साहेब हे जैतापूरच्या प्रकल्पाच्या संदर्भात काही फेर तपासणी करणार आहेत काय असा प्रश्न विचारला होता. आजच्या वर्तमानपत्रात या संदर्भात बातमी आलेली आहे. याबाबत केंद्रीय मंत्री सन्माननीय श्री. जयराम रमेश यांनी सांगितलेले आहे की, मी हा प्रकल्प थांबविलेला नाही. या प्रकल्पाच्या बाबतीत काही त्रुटी असतील किंवा जपानमध्ये जशी त्सुनामी लाट आली किंवा भूकंप झाला आहे. अशा प्रकारची दुर्घटना घडल्यानंतर या अणुऊर्जा प्रकल्पाला कुठलीही अडचण येऊ नये म्हणून जी खबरदारी घ्यावयास पाहिजे तशा प्रकारची सर्व खबरदारी राज्य सरकार घेत आहे. आणि केंद्र सरकार देखील त्याच दिशेने निघालले आहे. या राज्याला खऱ्या अर्थाने भारनियमन मुक्त केले पाहिजे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात देखील तशा प्रकारचा उल्लेख करण्यात आलेला आहे. अनेक वर्षे सत्तेत असताना देखील महाराष्ट्र राज्याला भारनियमनातून मुक्त करता आले नाही. या गोष्टीची राज्य शासनाला खंत आहे. सुरुवातीची पाच वर्षे राज्य शासनाने दाभोळ येथे एन्रॉन प्रकल्प पुन्हा व्यवस्थित सुरु करण्याचा प्रयत्न केला. स्व. यशवंतराव चव्हाण, स्व. वसंतदादा पाटील, स्व. वसंतराव नाईक किंवा आदरणीय पवार साहेबांच्या काळात या राज्याला विजेच्या बाबतीत स्वंयपूर्ण केलेले होते.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड...

श्री. अजित पवार ....

त्या काळातील सन्माननीय सदस्यांना आठवत असेल की, पूर्वी आपण कर्नाटक, गोवा, गुजरात या राज्यांना रात्रीच्या वेळी सरप्लस वीज विकत होतो. तशा परिस्थितीत राज्याला नेण्याकरिता डिसेंबर, 2012 चे उद्दिष्ट आम्ही ठेवलेले आहे. त्यातून आपल्या राज्यात मागेल त्या शेतकऱ्याला वीज देता येईल, त्याला विजेकरिता थांबावे लागू नये, त्याला नाईलाजास्तव कोठे तरी आकडे टाकावयास लागू नये, जेवढे लोक घरगुती कनेक्शन मागतील त्यांना ते देता यावेत त्याचबरोबर महत्वाचे म्हणजे या राज्यामध्ये उद्योगामध्ये मोठी गुंतवणूक करण्याकरिता ज्यावेळी बाहेरचे उद्योगपती येतात त्यावेळी त्यांना उद्योगधंदा उभारण्याकरिता जेवढी वीज लागेल तेवढी वीज त्यांना मिळाली पाहिजे, ही राज्य सरकारची भूमिका आहे. त्यामुळे अणुऊर्जा असेल, थर्मल प्लँट असतील, हायड्रो प्लँट असतील, सोलर प्लँट असतील, विंड मिलचे प्लँट असतील किंवा गॅसवर आधारित प्लँट असतील, ते उभे करण्याकरिता राज्य सरकार भरीव अशा प्रकारची तरतूद करीत आहे आणि काहीही झाले तरी विरोधकांना पुढच्या काळामध्ये येणाऱ्या निवडणुकांमध्ये या राज्यामध्ये वीज मिळत नाही, असे सांगण्याची वेळ श्री. फुंडकर साहेब, आपल्यावर येऊ देणार नाही, या मार्गाने आम्ही सर्व चाललो आहोत. या बाबतीत आम्ही निश्चितपणे डिसेंबर, 2012 चे उद्दिष्ट पूर्ण करणार आहोत आणि तसा शब्द माननीय राज्यपालांनी त्यांच्या अभिभाषणात दिलेला आहे. त्यासाठी जो काही निधी लागेल तो देण्यात येईल आणि ज्या ठिकाणी खाजगीकरणातून प्रकल्प केला पाहिजे असे आम्हाला वाटेल त्या ठिकाणी खाजगीकरणातून ते काम करण्यात येईल.

सभापती महोदय, या बाबतीत बोलत असताना काही कारणांनी विदर्भातील किंवा कोकणातील लोकप्रतिनिधी असे सांगतात की, आमच्या भागातच प्रकल्प का आणता, आमच्या शेतीच्या पाण्याचा टक्का कमी का करता ? मला या चर्चेच्या निमित्ताने एक गोष्ट सभागृहाला सांगावयाची आहे की, आपल्या राज्यामध्ये आजमितीस आपल्याकडे एकंदर 1200 टीएमसी पाणी उपलब्ध आहे. त्यापैकी 72 टक्के पाणी आपण शेतीला देतो आणि 28 टक्के पाणी बिगरशेती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. अजित पवार .....

प्रयोजनासाठी देतो. त्यामध्ये आपण मोठ्या प्रमाणावर पाणी पिण्याच्या पाण्याकरिता देतो. वीज निर्मिती प्रकल्पांकरिता आपण फक्त 6 टक्के पाणी उपलब्ध करुन देतो.

सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, अमरावती सारखा जिल्हा असेल किंवा विदर्भातील काही जिल्हे असतील, ज्या ठिकाणी आत्महत्या करण्यासाठी शेतकरी पुढे येत असतात त्या ठिकाणी त्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्याकरिता, तेथील सिंचनाचे क्षेत्र वाढविले पाहिजे याकरिता हजारो कोटी रुपये राज्य सरकार आणि जलसंपदा विभागामार्फत या राज्यामध्ये खर्च करीत आहे. आतापर्यंत खूप मोठी भरीव रक्कम राज्य सरकारने या सगळ्या कामाकरिता खर्च केली आहे, हे सर्वांना मान्य करावे लागेल. पुढच्या काळामध्ये कधी ना कधी कोळसा संपणार आहे. परवा डॉ. अनिल काकोडकर साहेबांचे व्याख्यान आपण सगळ्यांनी ऐकले. त्यांनी सांगितले की, या जगाला स्वच्छ आणि चांगल्या ऊर्जेकरिता अणुऊर्जेशिवाय पर्याय नाही. मला या चर्चेला उत्तर देताना असे सांगावयाचे की, कृपा करुन विरोधासाठी विरोध करु नका. जर एखाद्या राजकीय पक्षाची वेगळ्या प्रकारची भूमिका असेल तर ती भूमिका चर्चेतून समजावून घेऊ शकतो. चर्चेतून त्यांचे काही महत्वाचे प्रश्न असतील तर ते दूर करु शकतो. परंतु कोठे तरी आम्ही हा प्रकल्प होऊ देणार नाही, अशी टोकाची भूमिका घ्यावयाची अशा पध्दतीने राज्याला पाठीमागे नेण्याचा प्रयत्न करावयाचा आणि ऊर्जेच्या संदर्भात नवीन समस्या निर्माण करावयाच्या या रस्त्याने शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये कदापिही जाऊन चालणार नाही. अशा प्रकारची भूमिका राजकीय पक्षांनी घेतली तर राज्यातील जनता फार समंजस आहे. ती काय योग्य आणि काय अयोग्य हे समजून घेत असते. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना चांगला मोबदला देणे, त्यांच्या अडीअडचणी सोडविणे, त्यांच्या आरोग्याला घातक असतील अशा गोष्टी होऊ न देणे या सगळ्या बाबी राज्य सरकार निश्चितपणे बारकाईने बघेल, ही गोष्ट मी सभागृहाला या चर्चेच्या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, एकेकाळी पुरोगामी विचाराच्या सरकारने महिलांना 33 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/ श्री.बरवडनंतर 16:30

श्री.अजित पवार....

त्यावेळी काही जणांनी टीका केली. यामुळे काही साध्य होणार नाही, खरोखर राज्य पुढे नेणार आहे काय. परंतु अलिकडच्या काळामध्ये महिला किती सक्षमपणे काम करु शकतात, किती चांगल्या प्रकारे काम करु शकतात हे संपूर्ण राज्याने व देशाने पाहिले आहे. नुकताच 8 मार्च, 2011 रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. त्या दिवसाचे औचित्य साधून जाणीवपूर्वक राज्य सरकारने निर्णय घेतला की, आता 33 टक्के महिलांना आरक्षण देऊन थांबावयाचे नाही, आता महिलांना 50 टक्के आरक्षण दिले गेले पाहिजे. याबाबत काही जणांची वेगळी मते असू शकतात. पण जर महिलांना संधी मिळाली तर त्या उत्तम प्रकारे काम करु शकतात. सक्षमपणे एखादे पद भूषवू शकतात आणि या राज्याला प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न करु शकतात. हेच लोकशाही आघाडी सरकारने 50 टक्के महिलांना आरक्षण देण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतलेला आहे. या अनुषंगाने या अधिवेशनामध्येच नगरविकास व ग्रामविकास विभागामार्फत दोन्ही विधेयके मांडण्यात येतील आणि दोन्ही सभागृहे त्या विधेयकांना मंजुरी देतील असा मला विश्वास वाटतो. हा चांगला निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे.

एका मुद्याबाबत अनेक मान्यवरांनी त्याबाबत चर्चा सुध्दा केली आहे. ही कामे करीत असताना मधल्या काळामध्ये अवकाळी पाऊस पडला आहे. बहुतांशी सन्माननीय सदस्य शेतीशी संबंधित असल्यामुळे अवकाळी पावसासाठी शासन किती मदत करणार, कशी मदत करणार असा त्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. नागपूर येथे या सरकारचे पहिलेच अधिवेशन होते. माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी नुकताच मुख्यमंत्रीपदाचा चार्ज घेतला होता. तेथे संपूर्ण मंत्रिमंडळ एकत्र बसल्यानंतर राज्यातील एवढे शेतकरी अडचणीत असल्यामुळे त्यातून बाहेर काढण्याची सगळयांनी भूमिका घेतली होती. आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर राज्याच्या निर्मितीपासून राज्यातील शेतकऱ्यांना जेव्हा जेव्हा मदत करण्याची वेळ आली त्यापेक्षा सर्वाधिक मदत करण्याचा निर्णय केव्हा घेण्यात आला असेल तर तो यावेळी घेतलेला आहे. नागपूर येथे 1 हजार कोटींची नगद मदत करण्याचे जाहीर केले होते. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेब आपल्या पक्षाची सत्ता सुध्दा साडेचार वर्षे होती. आपणही शेतकरी आहात. कोणतेही सरकार 100

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.अजित पवार....

टक्के नुकसान भरपाई देऊ शकत नाही. परंतु अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला पुन्हा उभे राहता यावे, त्याला पुन्हा शेती करता आली पाहिजे. त्यासाठी त्यावेळी 1000 कोटींची मदत जाहीर केली होती. त्यावेळी असेही सांगितले होते की, पाठीमागे जाहीर केलेले शेतकऱ्यांचे देणे असेल ते 31 मार्च, 2011 पर्यंत राज्य सरकार निश्चितपणे देण्यासाठी प्रयत्नशील राहील. एकंदरीत अर्थसंकल्प जाहीर केल्यानंतर अचानक डिसेंबर महिन्यामध्ये 1 हजार कोटी रुपये मदत करण्याचे जाहीर केले. हा निर्णय घेतला त्यावेळी साहजिकच काही जणांना वाटले असेल की, सरकार आर्थिक अडचणीत येणार, एवढी मोठी रक्कम कशी उभी करणार ? परंतु माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेबांचा या कामासाठी चांगला उपयोग झाला. माननीय पंतप्रधान यांच्याकडे सर्वपक्षीय शिष्टमंडळ दिल्ली येथे गेले होते त्यावेळी केंद्र सरकारने आम्हाला सुरुवातीला सांगितले की, अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत मदत करण्याची कोणतीही तरतूद नाही. अतिवृष्टी असेल तर केंद्र सरकारकडून मदत मिळू शकते, दुष्काळ पडला असेल तर मदत होऊ शकते. ग्लोबल वार्मिंगच्या संकटाबाबत एवढे बोलत असतो. तशाप्रकारचा अवकाळी पाऊस येऊ लागला आहे, त्यामुळे राज्यातील वेगवेगळया पिकांचे नुकसान होत आहे ही बाब माननीय मुख्यमंत्र्यांनी व बाकीच्या सहकाऱ्यांनी माननीय पंतप्रधान यांना पटवून दिली. त्यामुळे माननीय पंतप्रधान यांनी सांगितले की, मी यामध्ये लक्ष घालतो. त्यानुसार त्यांनी यासाठी 400 कोटी रुपयांची मदत दिली. अवकाळी पावसाबाबत मदत देण्याचे निकष नसताना केंद्र सरकारकडून 400 कोटी रुपये मिळाले. एवढ्यावरच आम्ही थांबलो नाही तर देशाचे कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार यांनाही भेटलो. ते या राज्याचे चार वेळा मुख्यमंत्री होते, त्यामुळे त्यांना राज्याची परिस्थिती माहिती होती. ते म्हणाले की, फळबागाच्या व कांद्याच्या पिकाच्या नुकसानीसाठी 200 कोटी रुपये मदत करण्यात येईल. अशाप्रकारे केंद्र सरकारकडून 600 कोटी रुपयांची मदत राज्याला मिळाली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 16:35

श्री. अजित पवार...

माझी माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना विनंती आहे की त्यांनी हे 600 कोटी रुपये आणि ते 1000 कोटी रुपये असे 1600 कोटी रुपये देण्याचे मनामध्ये आणू नये. एकंदरीत राज्यात चाललेली विकासाची कामे थांबू नयेत, ती चालू रहावीत, त्यासाठी एक हजार कोटी रुपये मदत करता यावी म्हणून 600 कोटी रुपये मिळविण्याचे प्रयत्न केलेले आहेत. पुनर्वसन विभाग जसजसे पैसे मागत आहे तसतसे ते देण्याचे काम झालेले आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी, 2 टक्के दराने कर्ज देण्याची बाब सोडली तर तुम्ही शेतक-यांसाठी काय केले, अशी विचारणा केली. त्यांनी असेही सांगितले की, या शिवाय दुसरे काहीही कौतुकास्पद काम या सरकारने केलेले नाही. माननीय विरोधी पक्षनेते हे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक आहेत. या आधी शेतक-यांना 25 हजार रुपयापर्यन्त शून्य टक्के दराने व्याज दिले जात होते. ही मर्यादा वाढवून 50 हजार रुपये केलेली आहे. तसेच शेतक-यांसाठी 3 लाखापर्यन्त 2 टक्के व्याज आकारण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. एनडीअे सरकार होते त्यावेळी शेतक-यांना कमी व्याजाने कर्ज देण्याचा निर्णय झाला नाही. युपीअेच्या सरकारने देशपातळीवर शेतक-यांना 4 टक्के व्याजाने पीक कर्ज करण्याचा निर्णय घेतला. राज्य सरकारने देखील या शेतक-यांना भरीव मदत करण्याचा निर्णय घेतलेला. शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. तरीही तुमच्या आणि आमच्या महाराष्ट्राचे नागरीकरण ज्या गतीने होतेय ते पाहिल्यानंतर 50 टक्के शहरी आणि 50 टक्के ग्रामीण असे राज्याचे चित्र नजिकच्या काळात राहाणार आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये शासनाने कृषिपंप धारकांकडून इंधन व इतर समायोजन आकाराची आणि त्यावरील व्याजाची एकूण 2410.44 कोटी रुपये इतकी रक्कम कृषिपंप धारकांकडून वसूल न करता ती अनुदान स्वरुपात समायोजित करुन देण्याचा निर्णय घेण्यासंबंधीचा उल्लेख आहे. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचे या गोष्टीकडे लक्षवेधू इच्छितो की, राज्य वीज नियामक आयोग सर्व प्रकारच्या वीज ग्राहकांचे विजेचे दर ठरवून देते. कृषिपंप धारकांकडून इंधन व इतर समायोजन आकाराची वसुली केली जाते. आपण शेतक-याकडून युनिटला 20 पैसे या प्रमाणे वसुली करतो. मागच्या काळातील जवळपास 1518 कोटी रुपये एवढी थकबाकीची रक्कम वसूल करण्याच्या संदर्भातील निर्णय झाला त्यावेळी सरकारने हे 1500 कोटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

रुपये माफ करुन ते राज्य सरकारच्या तिजोरीतून भरायचे अशा प्रकारचा महत्वाचा निर्णय घेतला. पहिल्या वर्षी 500 कोटी, नंतरच्या वर्षी 900 कोटी आणि राहिलेले 118 कोटी अशा पध्दतीने शेतकरी बांधवांच्या तीन वर्षात वीज बिलातील इंधन आणि समायोजन आकाराच्या पूर्ण रकमा काढून टाकण्याची कार्यवाही झाली. अशा त-हेने शेतक-यांसाठी जेवढे जास्त देता येईल तेवढे ते देण्याचा प्रयत्न या सरकारने केलेला आहे.

सभापती महोदय, मधल्या काळामध्ये विविध प्रकारच्या सबसिडी देत असताना मला एक गोष्ट सांगावयाची आहे की 2000 ते 2010 या कालावधीत सुमारे 11 हजार कोटी रुपयाची सबसिडी शासनाने शेतक-यांना दिलेली आहे. सन 2010-2011 मध्ये 1800 कोटी रुपये सबसिडी आम्ही देत आहोत. येत्या आर्थिक वर्षामध्ये हा भार अडीच हजार कोटीच्या पुढे जाईल. जवळपास 3 हजार कोटी रुपये लागतील आणि ते लागले तरी शेतक-यांच्या बाबतीत मदत करण्यासाठी हे सरकार मागेपुढे पहाणार नाही. हा भार शासन सहन करील. आमच्या शेतकरी बांधवांच्या हितासाठी आवश्यक असे निर्णय घेण्याची या सरकारची तयारी असते हे मला सभागृहाला आवर्जून सांगितले पाहिजे.

सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी वीज प्रकल्पासंबंधीचा मुद्दा मांडला. वीज आणताना कोणते इन्फ्रास्ट्रक्चर देणार असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. एक्सप्रेस फिडरच्या माध्यमातून आज देखील 24 तास वीज पुरवठा करण्यात येतो. परंतु प्रश्न असा आहे की, कोणत्याही परिस्थितीमध्ये उद्योगाना वीज दिली नाही तर बेकारी वाढेल. म्हणून उद्योगांना 24 तास वीज दिली पाहिजे. औद्योगिक वसाहती करिता सुरुवातीच्या काळात आठवड्यातून 24 तास भारनियमन होते. नंतरच्या काळामध्ये ते भारनियमन आम्ही आठवड्यातून 16 तास केले.

अप्रुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

...नंतर श्री. भोगले....

SGB/ KGS/ KTG/ 16:40

श्री.अजित पवार.......

त्यानंतर ते प्रमाण आम्ही 8 तासावर आणले. आता मात्र हे भारनियमन अजून कमी कसे करता येईल हाही प्रयत्न करीत आहोत. 24 तासावरुन 8 तासावर आलो आहोत, म्हणजे निश्चितपणे विजेची परिस्थिती मागच्या तुलनेत सुधारली आहे. 31 मार्च, 2011 पर्यंत 2.5 लाख शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना वीज कनेक्शन देण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. 2.5 लाखापेक्षा जास्त कृषी पंपांना वीज द्यायची म्हणजे तेवढी मागणी वाढणार आहे. मागील काळात कनेक्शन दिलेली आहेत, त्यांच्याकडून वीज वापरली जाणार आहे. अशा पध्दतीने विजेबाबत आपण प्रगती करीत आहोत. त्यामध्ये हाही प्रयत्न आहे की, रात्रीच्या वेळी राज्यामध्ये जादा वीज उपलब्ध होऊ लागली आहे. त्यामुळे या काळात उद्योगधंद्यांना काही सवलतीच्या दरामध्ये वीज देता येईल का याबद्दल देखील राज्य सरकार गांभीर्याने विचार करीत आहे. यापुढच्या काळात नवीन उद्योगधंदे येणार असतील तर उद्योजकांना वाटले पाहिजे की, पूर्वीपेक्षा कमी दराने रात्रीच्या वेळेत वीज देत आहेत याचा अर्थ भारनियमनात बऱ्याच अंशी शासनाला यश आले आहे. या पध्दतीने सरकार काम करु पहात आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.पाशा पटेल सभागृहात उपस्थित असते तर बरे झाले असते. त्यांनी तत्परतेने प्रतिक्रिया व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. औसा तालुक्यातील चारोळा येथे तीन अभियंत्यांना बांधून ठेवण्यात आल्याचा त्यांनी सभागृहात उल्लेख केला होता. खरे तर त्यांच्याशी बोलताना मला नेहमी हा अनुभव आला आहे की, ते ज्या गोष्टीचा उल्लेख करतात ती गोष्ट कधी खोटी असल्याचे आढळलेले नाही. विरोधी पक्षातील काही नेते रेटून बोलतात, असत्य बोलतात हा अनुभव महाराष्ट्राने घेतला आहे. तुमच्या पक्षातील काही मान्यवर नेते आता राष्ट्रीय नेते झाले आहेत. परंतु माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांच्या बाबतीत मला कधी असा अनुभव आला नाही. मात्र त्यांनी या घटनेची माहिती न घेता या ठिकाणी उल्लेख केला. मी या प्रकरणाची माहिती घेतली. चारोळा, ता.औसा येथे तीन ट्रान्सफॉर्मर असून त्यापैकी दोन सुरु होते. त्या परिसरात कोणत्याही नागरिकांची गैरसोय झाली नाही. जो ट्रान्सफॉर्मर बंद होता त्यावर दोन पिठाच्या गिरण्या आणि काही नळ पाणीपुरवठ्याचे कनेक्शन होते. तेथील वीज बिल थकित होते ते भरण्याचे त्यांनी आश्वासन दिल्यानंतर लगेच ट्रान्सफॉर्मर सुरु केला. कोणाला बांधून ठेवलेले नव्हते एवढेच मला सांगावयाचे आहे.

डॉ.दीपक सावंत : आम्ही सगळ्यांनी फोनच्या स्पीकरवरुन ते संभाषण ऐकले होते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : त्या ठिकाणाहून चुकीचा फोन केला त्याला मी काय करु. ती त्यांची चूक नाही. खरे तर मी त्यांचे कौतुक केले. ते कधी चुकीचे सांगत नाहीत.

सभापती महोदय, एकंदरीत हे सगळे काम करीत असताना मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, अलीकडच्या काळात तेल माफिया, वाळू माफिया, दूध भेसळ माफिया यांच्या संदर्भात चर्चा मोठया प्रमाणात होऊ लागली आहे. राज्य कारभार हातामध्ये घेतल्यानंतर माननीय मुख्यमंत्री आणि आम्ही सगळ्यांनी ठरविले आहे की, या राज्यातून या सगळ्या माफियांना बाहेर काढावयाचे असेल तर राजकीय हस्तक्षेप अजिबात असता कामा नये. एकंदरीत या राज्याला पुढे नेत असताना माफियांना अजिबात थारा मिळता कामा नये. माफिया हे कोणत्याही पक्षाचे नसतात. ज्या पक्षाची ताकद असेल त्या पक्षाची ते जवळीक साधतात. रायगड जिल्हयात शेकापचे कार्यकर्ते म्हणून रहायचे. ज्याठिकाणी भाजप स्ट्राँग असेल, ज्याठिकाणी शिवसेना किंवा राष्ट्रवादी पक्ष स्ट्राँग असेल तिथे त्यांच्याशी जवळीक ठेवायची. अशा पध्दतीने यांची वागणूक असते. हे निव्वळ स्वार्थी लोक असतात. मधल्या काळात माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, महसूल मंत्री, महसूल राज्यमंत्री यांनी मिळून राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची कॉन्फरन्स बोलावली होती. त्या कॉन्फरन्समध्ये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या की, जिल्हयाचा कारभार करीत असताना त्या जिल्हयातील जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख यांनी व्यवस्थितपणे भूमिका घेऊन कारभार करावयाचा म्हटले तर लोकाभिमुख कारभार करता येतो.

नंतर 3एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ..........

हा अनुभव प्रशासनात आपण घेतला आहे. परंतु राज्य कारभार करीत असताना शासनाने केलेल्या नियमांच्या बाहेर जाऊन चालत नाही. कधी कधी राजकीय पक्ष, मग ते विरोधी पक्षाचे असोत अथवा सत्ताधारी पक्षाचे असोत त्यांचा स्वत:चा दबाव आणून काही गोष्टी करण्याचा प्रयत्न करतात. मग अशाच वेळेला माफियांचे फावते. म्हणूनच मी शासनाच्या वतीने जनतेला आवर्जून सांगू इच्छितो तसेच परवाच आम्ही शासनाच्या अधिकाऱ्यांनाही सांगितले की, आपण काम करीत असताना अत्यंत पारदर्शक, स्वच्छ आणि नियमावर बोट ठेवून काम करीत असताना, चुकीचे असले तरी देखील माझ्यासाठी कर अशा प्रकारे राजकीय पक्षाच्या लोकांनी त्यात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला तरी त्यांचे ऐकण्याची गरज नाही. माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री तसेच महसूल मंत्री व राज्यमंत्री यांनी सांगितल्यानंतर अधिकाऱ्यांना नक्कीच मॉरल सपोर्ट मिळाल्याशिवाय राहणार नाही, अशी मला खात्री आहे. अशा प्रकारे काहीही झाले तरी या राज्याला पुढे न्यायचे असेल, संपूर्ण देशात आपल्या राज्याचा पहिला क्रमांक टिकवून ठेवायचा असेल तर वेगवेगळे माफिया हा शब्द गेल्या काही दिवसात परवलीचा झालेला आहे त्यांच्यावर कारवाई करावी लागेल. थोडे काही झाले तरी या ठिकाणी माफिया राज चालू आहे, जुन्या काळात बोफोर्सचा एवढा गवगवा केला होता की, एखाद्या ग्राम पंचायतीत थोडे काही झाले तरी आमच्या ग्राम पंचायतीत मोठे बोफोर्स प्रकरण घडले असा उल्लेख केला जातो. हीच गोष्ट माफियाच्या बाबतीत झालेली आहे. शेवटी आपण समाजात काम करीत असताना वर्तमानपत्रात, टी.व्ही. वर किंवा रेडियोवर एखादी बातमी ऐकली किंवा वाचली तरी त्यामुळे समाधान वाटत नाही. आज आम्ही सत्तेत असलो आणि विरोधी पक्षात आपण असला तरी कायमचे आम्हीच सत्तेत राहू किंवा आपणही कायमच विरोधात बसणार अशातला भाग नाही. शेवटी आपल्याला राज्य पुढे न्यावयाचे आहे. या पध्दतीने काम करीत असताना कुठल्याही चुकीच्या पध्दतीने काम होत असेल तर कडक शासन झाले पाहिजे व त्यासाठी गृह विभाग किंवा तत्सम विभागाने तशी भूमिका घेतली पाहिजे. काहीही करुन एक गोष्ट मात्र मान्य करावी लागणार आहे की, माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर ते चुकीच्या फाईलवर कधीच सही करणार नाही.

....2...

श्री. अजित पवार .......

माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आपले भाषण अत्यंत व्यवस्थितपणे मुद्दे मांडून केले परंतु सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी मात्र आपल्या भाषणातून वेगवेगळ्या प्रकारे चिमटे काढून भाषण केले, तशी त्यांची परंपराच आहे. अशा प्रकारचे मुद्दे ते नेहमीच काढत असतात. त्यांनी आपल्या भाषणातून असेही म्हटले की, भारतीय प्रशासन सेवेत यशस्वी होण्यासाठी मराठी मुलांचा टक्का कसा वाढेल. पण हा टक्का जसजसे महाराष्ट्रात मराठी लोक प्रशासन सेवेत प्रतिनियुक्तीवर येतील तसतसा वरिष्ठ पातळीवर हळूहळू वाढविता येईल. एकदम मराठी-मराठी करुन प्रश्न सुटणार नाही. वास्तविक मराठीचे महत्व जेवढे आपल्याला वाटते त्यापेक्षा जास्त आम्हाला वाटते. म्हणून सरकारने या भाषेसाठी एक स्वतंत्र विभाग सुरु केला. या विभागाला गती कशी देता येईल यासंबंधी मी राज्याचा उप मुख्यमंत्री म्हणून सांगू इच्छितो की, या विभागासाठी जेवढा निधी लागेल तितका दिला जाईल, कमी पडू दिला जाणार नाही. मराठी ही मातृभाषा असली तरी जगाच्या पाठीवर आपल्याला इंग्रजी भाषा आवश्यकच आहे, तसेच देश पातळीवर राष्ट्रभाषा हिंदीचाही वापर तितकाच आवश्यक आहे. या दोन्ही भाषा महत्वाच्या असल्या तरी मातृभाषा विसरुन चालणार नाही. यासाठी राज्यात मराठी शाळांना मान्यता देण्याच्या दृष्टीने शासनाचा बृहत आराखडा तयार करण्यात येत आहे. असा आराखडा तयार झाल्यावर राज्यात स्वतंत्र असे शैक्षणिक धोरण आखण्यात येईल व त्या माध्यमातून राज्यातील ज्या ज्या भागात मराठी शाळा नाहीत अशा ठिकाणी मराठी मुलांना मराठीतून शिकावयाचे असेल तर त्या भागात विना अनुदानित नव्हे तर अनुदान तत्वावर शाळा काढण्याचाही शासनाचा विचार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ...

मराठीच्या बाबतीत तुम्ही आम्हाला काही सांगचू नका. रावते साहेब मी आपल्याला सांगू इच्छितो की, मराठीचा आग्रह असावा परंतु दुराग्रह कोणाच्याही बाबतीत, कदापिही नसावा. मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी परवा 40-45 मिनिटे भाषण केले परंतु त्यांनी या भाषणात मराठी भाषेतून अक्षरी लिहिली जावीत असे सांगितले. हे सर्व सांगत असतांना आपण कितीदा तरी जीआर, जीआर, जीआर या शब्दाचा उल्लेख केला होता. आपण पाच वेळा जीआर या इंग्रजी शब्दाचा उल्लेख केलेला आहे. या शब्दाच्या ऐवजी आपण शासन निर्णय हा शब्द वापरु शकला असता. तसेच आपण दोन कंपन्यांच्या संदर्भात मराठी शब्द न वापरता "रजिस्टर्ड" असा इंग्रजी शब्द वापरला होता. "रजिस्टर्ड" या शब्दाऐवजी नोंदणी शब्द वापरला असता तरी आम्हाला तो समजला असता. तसेच आपण "टेंडर" शब्द वापरला या शब्दाच्या एवेजी "निविदा" शब्द आपण वापरु शकला असता. यामध्ये मी आपल्याला दोष देत नाही कारण काही इंग्रजी शब्दाची आपल्याला जिभेला सवय झालेली आहे. आपण इंग्रजी शब्द मुद्दाम वापरता असे मी म्हणूनच शकत नाही. परंतु कधी कधी कळत न कळत असे शब्द वापरले जात असतात. जो माणूस बोलतो तो बोलतांना एखादी चूक करु शकतो. जो माणूस बोलतच नाही त्याच्याकडून चूक होण्याचा प्रश्नच येत नाही. परंतु मला सभागृहाला सांगावयाचे आहे की, ज्यावेळेस मराठीचा मुद्दा सन्माननीय सदस्य पोटतिडीकीने मांडतात त्यावेळेस राज्य सरकारची देखील तशाच प्रकारची भूमिका असते हे आपण विसरु नये. हिंदी आणि इंग्रजी बोलायचे टाळावे अशा मी अधिका-यांना सूचना करीत असतो. परवाच्या कॉन्फरन्समध्ये सुध्दा मी यासंदर्भात भूमिका मांडली होती. परंतु चांगल्या भावनेने एखादी भूमिका मांडली तर त्याला वेगळया प्रकारचे स्वरुप दिले जात असते.

काही महिन्यांपासून उपमुख्यमंत्री म्हणून काम करीत असतांना सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे की, "काँग्रेस आणि राष्ट्रवादीमध्ये काय चालले आहे, अमक्यात काय चालले आहे, तमक्यात काय चालले आहे, पेपरला अशा अशा बातम्या येतात". खरेतर या बातम्यांमध्ये कसल्याही प्रकारचे तथ्य नाही. "राष्ट्रवादीमुळे विकास रखडला, मुख्यमंत्री बरसले" असा मथळा देऊन छापून आली होती. परंतु असे काहीही झालेले नाही. उलट यासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या ऑफिसने क्लिअर केले की, अशा प्रकारचे वातावरण निर्माण करणा-या बातम्या दिल्या जाऊ नयेत. काही काही जण मनानेच बातम्या देत असतात. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ...

मध्यंतरी एका वृत्तपत्रात अशी बातमी छापून आली होती की, सन्माननीय सदस्य श्री. उल्हास दादा पवार हे मा. मुख्यमंत्र्यांसाठी विधान परिषदेचा राजीनामा देत असून राज्य सभेच्या जागेसाठी उल्हास दादा पवार दिल्लीत डेरेदाखल झाले आहेत". खरे म्हणजे मा. उल्हास दादा येथेच, डेरा येथेच, सगळे काही येथेच. अशा ज्या काही बातम्या दिल्या जातात त्या योग्य नाहीत एवढेच या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

खरे तर काचेच्या घरामध्ये राहणा-यांनी दुस-याच्या घरावर दगड मारण्याचे काही काम नाही. आम्ही कधी म्हणतो का, जळगावमध्ये खडसे साहेबांचे आणि सुरेश दादांचे काय चालले आहे, त्यांचे त्यांचे चालले आहे, आपल्याला काय करायचे ? शिवसेनेचे नेते आणि भाजपचे नेते असे वागावयास सागंतात का ? नाही तसे ते सांगत नाहीत. एवढे मोठे राज्य चालवितांना एखादा दुसरा मुद्दा घडला तर त्यामध्ये आपण एवढा गहजब करुन घेऊ नये.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ..

सभापती महोदय, माझ्या बाबतीत असे वर्तमानपत्रात आले की, माझे आणि कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे - पाटील यांचे पटत नाही. आमच्या दोघांचे न पटण्याला कोणती अडचण आली ? मुळा प्रवरा संस्थेच्या बाबतीत जे काही असेल ते नियमाप्रमाणे करावे असे मी माझ्या विभागाला सांगितले होते. नियमाप्रमाणे काही गोष्टी करण्यात आल्या आहेत त्यामध्ये एमईआरसीने काही निर्णय घेतले होते.परंतु लगेच त्याला वेगळया प्रकारचे स्वरुप द्यावयाचे आणि या सरकारमध्ये काही वेडेवाकडे चाललेले आहे आणि या सरकारमधील एकमेकांना अजिबात तारतम्य नाही. हे विचार तुम्ही डोक्यातूनच काढून टाकावेत. लोकशाही आघाडी सरकारच्या सत्तेमध्ये असणा-या राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेस पक्षला कोठे मतभेद करावयाचे आणि कोठे मिटवावयाचे हे खूप चांगले माहीत आहे.त्यामुळेच राज्यातील जनता सतत आम्हाला निवडून देत आहे. तेव्हा हे विचार तुम्ही डोक्यातून काढून टाकावेत.

सभापती महोदय, एक गोष्ट मी या ठिकाणी सांगू इच्छितो .त्यांच्या वरिष्ठ नेत्यांचा तो प्रश्न असल्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी वाईट वाटून घेता कामा नये . मधल्या काळात तुम्ही असे ठरवले की, 19 वर्षे होऊन गेली परंतु आपल्या एकटया पक्षाने मोर्चाच काढला नाही.1992 की 1993 वर्षामध्ये तुम्ही एक मोर्चा काढला होता त्यानंतर मात्र मोर्चा काढला नाही म्हणून एकटयाने मोर्चा काढण्याचे तुम्ही ठरविले होते. तीन चार लाख लोकांचा मोर्चा काढावयाचा असे तुमच्या नेत्यांनी सांगितले होते परंतु एवढा मोठा मोर्चा काढणे हे एकटयाच्या ताकदीवर शक्य नाही.त्या पाठी मागच्या काळात काही मोर्च काढण्यात आले होते आणि बंद पाळण्यात आले होते परंतु त्यावेळी शिवसेना तुमच्या बरोबर होती म्हणूनच बंद झाला होता .शिवसेना बरोबर होती म्हणूनच ब-यापैकी मोर्चे काढण्यात आले होते. तुम्ही तीन ते चार लाख लोकांचा मोर्चा काढावयास निघाले होते परंतु प्रत्यक्षात 30 - 35 हजाराचा मोर्चा निघाला होता.तेव्हा त्याबाबतीत आम्ही टीका टिप्पणी करावयाची काय ? साधारणपणे मोर्चा काढत असतांना जे काही मुद्दे पुढे करण्यात आले होते ते मुद्दे लोकांना तितकेसे भावले नसतील त्यामुळे या मोर्चाला कशाला जावयाचे असे लोक म्हणाले असतील. तेव्हा अशा प्रकारचा मुद्दा सुध्दा येऊ शकतो. परंतु हेच जर मी काढत बसलो किंवा या व्यतिरिक्त आम्ही एकमेकाची उणी दुणी काढत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ..

बसलो तर यातून राज्याचा विकास होणार आहे काय ? म्हणून त्यानी जे काढले ते बाजूला ठेवू या त्याच बरोबर मी जे काढले होते ते तुम्ही न ऐकता बाजूला ठेवा.

सभापती महोदय , येथून पुढच्या काळात या राज्याला पुढे नेत असतांना या अभिभाषणाच्या चर्चेच्या निमित्ताने सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्यांनी महत्वाचे मुद्दे मांडलेले आहेत. सभापती महोदय, खेळाच्या संदर्भात, युवकांच्या संदर्भात काही चांगले निर्णय घेण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केलेला आहे. चांगल्या प्रकारचे
एक्झिबिशन सेटर्स उद्योगधंद्याना पोषक ठरत असल्यामुळे औरंगाबाद येथे एक एक्झिबिशन सेंटर काढण्यात येत असून पुणे येथे पिंपरी चिंचवडाच्या परिसरामध्ये एक एक्झिबिशन सेंटर काढत आहोत. हे सेंटर काढण्यासाठी हैद्राबाद ,बंगलोर वा इतर ठिकाणी उद्योजकांना जावे लागू नये या दृष्टीनेच ही एक्झिबिशन सेंटर येथे काढण्यात येत आहेत. आपल्या राज्यातच चांगल्या प्रकारचे प्रदर्शन भरविण्यात यावे त्यातून येथील उद्योगधंद्याला चालना मिळावी ही या राज्य सरकारची भूमिका आहे म्हणून त्या दिशेने जाण्याचा आमचा सर्वाचा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ..नीलम गो-हे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांना मी सांगू इच्छितो की 33 टक्के वा 50 टक्के महिलांसाठी जागा देण्याचा निर्णय आम्हीच घेत असतो हे तुम्हाला देखील माहीत आहे. माझ्या माहिती प्रमाणे 33 टक्के जागा ज्यावेळी महिलांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय आम्ही घेतला होता त्यावेळी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांना मी सांगू इच्छितो की, त्यावेळी तुम्ही आमच्याकडे होता हे तुम्हाला देखील आठवत असेल. आता 50 टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महिलांवरील अत्याचार दूर करणे, महिलांना राजकारणामध्ये आणि समाजकारणामध्ये संधी देणे या अनुषंगाने तुम्ही आणि सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जे मौलिक विचार मांडलेले आहेत त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी तर काव्य पक्तींतून आपल्या वेदनांना वाट करुन दिली आणि महिलांवरील बंधने व अत्याचार यांना साखळदंड व दोरखंडाची उपमा दिली असे मला आपल्या कवितेतून वाचावयास मिळाले होते.

3..



VTG/ KTG/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 16.55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ....

सन्माननीय सदस्या श्रीमती शाभाताई फडणवीस यांनी अशा प्रकारची कविता केली होती की,

" भाषणातील आकडे आपल्याला भावले
मला मात्र अंतरातील शब्द हृदयाला भिडले
शब्दाच्या जंजाळात साखळदंड आले,
म्हणूनच गळयात आमच्या दोरखंड आले"

या बाबतीत माझे असे म्हणणे आहे की, आपले साखळदंड सुध्दा वितळवू शकतील तेव्हा परंपरागत बंधंने, साखळदंड , अत्याचार इत्यादी काव्यातील वर्णनातून महिलांची मुक्ती करण्यासाठी आपण काही काम केले पाहिजे.सन्माननीय सदस्या श्रीमती फडणवीस यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही लोहाराचे काम करीत असतो. हे शासन लोहाराचे काम करील आणि लोहाराचा हातोडा म्हणजेच या महिलांच्या हितासाठी असलेल्या सर्व योजनांची कठोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यामध्ये शासन निश्चितपणे भर देईल. त्याबाबतीत तुम्ही कोणत्याही प्रकारची काळजी करु नका यंदाच्या वर्षी महिला व बाल कल्याण विभागसाठी अर्थसंकल्पात जी तरतूद करण्यात येत आहे ती 23 तारखेला आपल्याला पहावयास मिळेल.

नंतर श्री.सरफरे ...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अजित पवार...

एवढेच नव्हेतर भ्रूणहत्येच्या संदर्भात त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. दर हजारी पुरुषांमागे स्त्रीयांचे प्रमाण 922 एवढे होते ते आता खाली येऊन काही ठिकाणी 890 इतके झाले आहे. त्यादृष्टीने सन 2009 च्या कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या संदर्भात घेण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या परिषदेच्यावेळी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये तेथील प्रशासनाने "लेक वाचवा" अशाप्रकारचे चांगले अभियान राबविले. तशाप्रकारचे अभियान संपूर्ण राज्यभर राबविण्याचा शासनाचा निर्धार आहे व त्याप्रमाणे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्यांना आठवत असेल की, लातूर जिल्ह्यामध्ये शासनामार्फत पानंदीच्या रस्त्यांचा कार्यक्रम राबविण्यात आला. त्या बाबत राज्य शासनाला चांगला रिझल्ट मिळाल्यानंतर ही योजना संपूर्ण राज्यामध्ये राबविण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख साहेबांनी स्वस्त धान्य दुकानांच्या संदर्भात नांदेड जिल्ह्यामध्ये एक चांगला कार्यक्रम राबविल्यानंतर त्याचे अनुकरण संपूर्ण राज्यामध्ये करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सभापती महोदय, हे प्रशासन चालवीत असतांना एखाद्या जिल्ह्यामध्ये राज्य सरकारची एखादी योजना उत्तम प्रकारे यशस्वी होत असेल व त्यामधून तेथील जनतेला फायदा होत असेल तर केवळ त्याच जिल्ह्याला त्याचा फायदा मिळाला पाहिजे अशी या शासनाची भूमिका कधीच नसते. म्हणून तशाप्रकारचे चांगले निर्णय संपूर्ण राज्यामध्ये राबविण्या संदर्भात शासनाने निर्णय घेतले आहेत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग घेत असतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली वेगवेगळी मते मांडण्याचा प्रयत्न केला. यामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगली मते मांडली आहेत. नवनिर्वाचित माननीय सदस्य श्री. जयवंत जाधव व माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांना या सभागृहामध्ये प्रवेश करुन दहा दिवस सुध्दा झालेले नाहीत तरीसुध्दा त्यांनी अतिशय प्रभावीपणे, स्पष्टपणे याठिकाणी आपले मुद्दे मांडले आहेत, काही महत्वाच्या सूचना केल्या आहेत त्याबद्दल त्यांचे मनापासून कौतुक करावेसे वाटते.

माननीय सदस्य श्री. जयवंत जाधव यांनी आपल्या पहिल्या भाषणामध्ये ऐतिहासिक गड किल्ल्यांच्या ढासळणाऱ्या बुरुजांचे संरक्षण करण्याचे शासनाचे काम आहे, परंतु जर कुणाचे राजकीय बुरुज ढासळत असतील तर त्याठिकाणी लक्ष घालण्याचे शासनाचे अजिबात काम नाही याची सर्वांना जाणीव करुन दिली. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी विरोधी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. अजित पवार ...

बाकावरील माननीय सदस्यांची बघण्याची दृष्टी चुकीची असल्याचे सांगितले. विरोधी पक्षामध्ये असतांना त्यांना अर्धा रिकामा असलेला ग्लास दिसत होता, आता आमच्याकडे आल्यानंतर त्यांना तो अर्धा भरलेला दिसत आहे ही एक चांगली बाब आहे. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये नवीन धोरण जाहीर करण्याचे सूतोवाच केले आहे. यामध्ये क्रीडा धोरण, युवक कल्याण धोरण, वस्त्रोद्योग धोरण, कामगार धोरण इत्यादी धोरणांच्या बाबतीत माननीय सदस्यांकडून विधायक सूचना करण्यात आल्या आहेत. यामध्ये पर्यटन हा सर्वात मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन देणारा विभाग असून त्याव्दारे जास्तीत जास्त लोकांना रोजगार मिळू शकतो. म्हणून त्याप्रमाणे वस्त्रोद्योग धोरण तयार करण्यात आले असून शासन त्याबाबत गांभीर्यपूर्वक विचार करीत आहे. याकरिता यावर्षीच्या बजेटमध्ये भरीव तरतूद करण्याची भूमिका शासनाने घेतली आहे. संपूर्ण देशाच्या पातळीवर महाराष्ट्रामध्ये कापसाचे भरपूर उत्पादन होते. आजसुध्दा आपल्या शेतकऱ्यांना खरेदी किंमतीमध्ये 5 हजार, 6 हजार, 7 हजार रुपयापर्यंत चांगला भाव मिळतो ही आनंदाची बाब आहे. परंतु शेतकऱ्याला आणखी दोन पैसे अधिक मिळण्यासाठी केंद्र सरकारमार्फत आपण ज्याप्रमाणे कांदा, साखर निर्यात करीत आहोत त्याप्रमाणे कापसाच्या निर्यातीसाठी देखील प्रयत्न करीत आहोत. आपल्याला कांद्याच्या बाबतीत यश प्राप्त झाले आहे त्याप्रमाणे कापसाच्या बाबतीत देखील आपल्याला लवकरच यश प्राप्त होईल.

वस्त्रोद्योगाचे धोरण ठरवीत असतांना खानदेश, मराठवाडा, विदर्भामध्ये मोठया प्रमाणात जिनिंग, प्रेसिंग, गार्मेंट, सूतगिरण्यांना अधिकची चालना देण्यासाठी केंद्र सरकारची मदत घेण्याची राज्य शासनाची भूमिका आहे. त्यासंबंधी माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये उल्लेख केला आहे. त्या संदर्भात इतर अनेक माननीय सदस्यांनी अनेक वेगवेगळे मुद्दे मांडले आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ ST/ D/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:05

श्री.अजित पवार . . . .

मग त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप, विनायक मेटे असतील, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांनी देखील बरेच मुद्दे मांडले असून त्यातील काही मुद्दे मी घेतलेले आहेत.परंतु काही मुद्दे घ्यावयाचे राहीले असतील. या चर्चेच्या निमित्ताने ज्या सन्माननीय सदस्यांनी राज्य सरकारला काही विधायक सूचना केलेल्या आहेत. परंतु माझ्या उत्तराच्या भाषणाच्या निमित्ताने त्याबाबत ओझरता देखील उल्लेख झालेला नसेल तर कृपा करुन संबंधित सन्माननीय सदस्यांनी मनामध्ये अशी भावना आणू नये की, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी आमच्या मुद्यांची नोंद घेतलेली नाही काय ? सभापती महोदय, याही बाबतीत निश्चितपणे या राज्याचा उप मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री या नात्याने ज्या गोष्टी राज्याच्या हिताच्या आणि एकंदरीत वाटचालीच्या दृष्टीकोनातून सर्वसामान्य माणसाला दिलासा देणाऱ्या, महत्वाच्या अशा प्रकारच्या ज्या गोष्टी आहेत, त्या राबविण्यासाठी आम्ही निश्चितपणे प्रयत्नशील राहू.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांनी सीमा प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत, त्याचबरोबर क्षेत्रीय अधिकाऱ्यांना मुंबईला किती वेळा बोलविण्यात येणार ? असे मुद्दे उपस्थित केले. आम्ही त्याबाबत गांभीर्याने विचार करीत आहोत. परवाच्या कॉन्फरन्स्मध्ये देखील याबाबत चर्चा झाली. आम्ही एक किंवा जास्तीतजास्त दोन दिवस, परंतु शक्यतो एक दिवसासाठीच माननीय मुख्यमंत्री आणि मी आणि सगळे मंत्री यांच्याबरोबर चर्चा करण्यासाठी त्या कलेक्टरांना, अधिकाऱ्यांना बोलविले जाईल आणि त्यादिवशी सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्यांनी चर्चेसाठी थांबावे. त्यानंतर मात्र आपापल्या जिल्ह्याच्या ठिकाणी उपस्थित असले पाहिजे. कारण सर्वसामान्य माणसांना त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी ज्यावेळी तो अधिकाऱ्यांकडे जातो, त्या वेळी तो अधिकारी सांगतो की, मला मुंबईला बोलविलेले आहे आणि इकडे आल्यानंतर असे सांगावयाचे की, मला तिकडे काम आहे अशा प्रकारची कदाचित दुटप्पी भूमिका काही लोक घेतात. या गोष्टी देखील आपल्या अशा प्रकारे थांबविता येतील. कानडी शाळांच्या बाबतीत मुद्दा मांडलेला आहे. मराठी शाळांच्या बाबतीत देखील सांगितले आणि काल सुध्दा मी स्पीकर वर एका विषयावरील चर्चा ऐकत होतो. त्यावेळी सन्माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डासाहेब यांनी राज्य शासनाची भूमिका सांगितली आहे.

सभापती महोदय, जात पडताळणी हा विषय खूप गंभीर आहे आणि त्यामध्ये राज्य शासनाने ज्या काही जागा रिक्त होत आहे, त्या भरण्याच्या बाबतीत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. परंतु अजून

21-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3J-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार . . . .

100 टक्के मार्ग निघालेला नाही. पण तो मार्ग चांगल्या प्रकारे निघणे आवश्ययक असून त्यासंबंधीचा मुद्दा निश्चितपणे राज्य सरकार आणि सर्वच लोकप्रतिनिधींना भेडसावत आहे. त्याच बरोबर एम.एम.आर.डी.ए.चा फंड ग्रामीण भागातील ग्राम पंचायतींना किंवा नगरपालिकांना मिळत नाही. विदर्भातील खार जमिनीचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करावी यासंदर्भात देखील आम्ही निश्चितपणे लक्ष घालू.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब यांनी बोलत असताना अनुशेषाच्या बाबतीत एक मुद्दा उपस्थित केला होता. याबाबतीत मी सदनाला एवढेच सांगू इच्छितो की, या अनुशेषाच्या संदर्भात सांगावयाचे तर त्या भागामध्ये अनुशेष वाढलेला आहे, त्याठिकाणी जास्त मदत कशी देता येईल यासाठी आपण सतत प्रयत्न करीत आहोत. तसेच अनुशेषाच्या मुद्याबाबत पुन्हा नवीन समितीच्या नियुक्तीची आवश्यकता काय आहे ? असाही माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्न उपस्थित केला. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनीही उपस्थित केला, अन्य काही सन्माननीय सदस्यांनी देखील हा प्रश्न उपस्थित केला आहे. त्याबाबतीत शासनाच्या वतीने मी एवढेच सांगू इच्छितो की, मागील वर्षभरामध्ये सभागृहामध्ये जे कामकाज झ ाालेले आहे, त्यामध्ये वारंवार आर्थिक आणि भौतिक अनुशेषाबाबत विचारमंथन झाले. त्याबाबत काही वाद देखील झाले. विकासाचे निर्देशांक पुन्हा विशिष्ट करुन अनुशेषाची परिगणना होण्याच्या दृष्टीने एका तज्ज्ञ समितीची नेमणूक करण्याच्या बाबतीत माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशा नुसारच ही समिति नियुक्त करण्यात आलेली आहे. आम्ही आताच त्याबाबत आदेश काढलेले आहेत. या तज्ज्ञ समितीच्या निष्कर्षानुसार अनुशेष आहे की नाही याबाबतचे वाद संपणार आहेत आणि खरोखरच अजून काही ठिकाणी अनुशेष असेल तर ते मुद्दे आपल्याला निकाल्ी काढण्यासाठी मदत होणार आहे.

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या प्रश्नाच्या बाबतीत, बाल कामगारांच्या प्रश्नाच्या बाबतीत सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.हेमंतजी टकले अश अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापले मुद्दे मांडले आहेत.

सभापती महोदय, मराठी भाषेच्या विकासाबाबत मी आताच सांगितले की, नवीन विभाग सुरु केलेला आहे आणि याबाबतीत आम्हा लोकांकडून अतिशय गांभीर्यपूर्वक प्रयत्न केले जातील ही

गोष्ट देखील मी अभिभाषणाच्या उत्तराच्या निमित्ताने निश्चितपणे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी हेलिकॉप्टर आणि बाकी बाबींबाबत सांगितले. मी त्याची गंभीरपणे नोंद घेतलेली आहे आणि जेथे योग्य सूचना द्यावयाच्या तेथे त्या दिल्या जातील. सन्माननीय सदस्यांना परत या सूचना करण्याची वेळ येणार नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 17:10

श्री. अजित पवार ...

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील स्पीड बोटीतून फिरतात, त्यांचा सारखा समुद्रातून स्पीड बोटीने प्रवास चालू असतो. आपण सुध्दा स्पीड बोटीतून फिरणे कमी करावे किंवा आम्हाला पण आपल्या बरोबर घेऊन जावे.

सभापती महोदय, मला एक गोष्ट सांगावयाची आहे की, अंमलबजावणी करीत असताना काही बाबतीत विलंब होतो,त्या विलंबाच्या बाबतीत शासन समाधानी असते अशातला भाग नाही. त्यामध्ये शासन देखील समाधानी नाही. परंतु एकंदरीतच अशा वेगवेगळया प्रकारच्या परिस्थितीतीवर मात करण्याची पुरेपुर हिंमत सरकार बाळगून आहे. अंमलबजावणी बाबत त्यवेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या मनोभूमिकेशी एक मिळती-जुळती मनोभूमिका आहे. अशाच पध्दतीची मनोभूमिका मागच्या काळात श्री. मनोहर जोशी यांच्या भाषणात मी ऐकली होती. त्या भाषणात त्यांनी काही गोष्टी सांगितल्या होत्या,त्याचा उल्लेख करुन मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. परंतु सभागृहात एकंदरीतच सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुडकर यांनी माझ्या कर्तृत्वावर विश्वास दाखविला आणि मला अतिशय उत्साह देणारे विधान केले. म्हणून अंमलबजावणीच्या बाबतीत सर्व सन्माननीय सदस्यांनी निश्चिंत रहावे. खूप चांगली अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न शासनाचा राहील. कुठल्याही परिस्थितीत चुकीचे वागणाऱ्यांना राज्य सरकार कदापि पाठीशी घालणार नाही. मला या ठिकाणी एकच गोष्ट सांगावयाची आहे की, आता नवीन मराठी वर्ष लवकरच येऊ घातलेले आहे, गुढीपाडव्याच्या रुपाने आपण सर्व जण ते साजरे करणार आहोत. या निमित्ताने विकासाचे नवीन संकल्प करुन त्यांच्या पूर्ततेच्या दृष्टीने, आपण सगळेच प्रयत्न करणार आहोत. हे प्रयत्न आपण एकजूट ठेवून करु या. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई यांनी या ठिकाणी जशी एक कविता ऐकवली त्याच धर्तीवर मला बहिणाबाई चौधरी यांच्या काव्याच्या काही ओळी मला या ठिकाणी आठवतात,

"गुढी पाडव्याचा सण आला उभारा रे गुढी,
नव्या वरसाच देणं सोडा मनातली अढी "

अशा पध्दतीने समोरच्या बाकावर बसणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी मनातील अढी काढावी आणि विधायक सूचना हक्काने कराव्यात. आपण सगळे मिळून या राज्याला अतिशय चांगल्या पध्दतीने प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न करु या. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब, विरोधाला

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ...

विरोध करण्याची भूमिका राज्य सरकारची अजिबात रहणार नाही. तुम्ही त्या बाबतीत कुठली गोष्ट लक्षात आणून दिली तर निश्चितपणे माननीय मुख्यमंत्री, मी आणि मंत्रिमंडळातील सर्व सहकारी मिळून समन्वयाची भूमिका घेतील. राज्याच्या विकासासाठी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात व्यक्त झालेल्या संकल्पनांच्या बाबतीत मनातील अढी म्हणजेच शंका, कुशंका आपण सर्वजण बाजूला ठेवून प्रयत्नाला लागू या, असे या निमित्ताने मला सभागृहाला मन:पूर्वक सांगावेसे वाटते. विरोधी पक्ष म्हणून सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याबाबतीत शासन निश्चितपणे गांभीर्याने विचार करील तसेच सत्तधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचेही मी मनापासून स्वागत करतो. त्या सूचनांचाही शासन गांभीर्याने विचार करील, अशा प्रकारची ग्वाही मी दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांना देतो आणि माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव सभागृहाने एक मताने मंजूर करावा, अशा प्रकारची विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

**उप सभापती** : प्रस्ताव एक मताने संमत झाला.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

**पृ.शी./मु.शी.**: सन 2010-2011 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना हे माहीतच असेल की, पूरक मागण्यांवरील चर्चेसाठी दोन दिवस म्हणजे सोमवार, दिनांक 21 आणि मंगळवार, दिनांक 22 मार्च, 2011 दिलेले आहेत. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्यांने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणांस विदित आहे.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाची आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व उद्याकरिता असलेल्या बाकीच्या सर्व मागण्या यावरील चर्चा उद्या पूर्ण करावी लागेल.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या

**उप सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील :-

(1) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एम-2, एम-3, एम-4

(2) वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक- एस-1

(3) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - आय-3

(4) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - टी-1, टी-2, टी-4, टी-5, टी-6

(5) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - डब्ल्यू-1, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-6, डब्ल्यू-8

(6) शालेय शिक्षण मत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - ई-1, ई-2

(7) वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक -

(8) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण आणि राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - आर-1

(9) कामगार आणि विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - के-4

(10) रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक -

(11) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - डी-34

(12) महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - एक्स-1

(13) पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - यू-1, यू-3, झेडडी-2ब

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**उप सभापती** .....

आजच्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत त्यांच्या व्यतिरिक्त आणखी ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे पक्ष प्रतोदांमार्फत पाठवावीत. यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत चर्चेला सुरुवात करतील. सन्माननीय सदस्यांचे नाव पुकारल्यानंतर जर ते अनुपस्थित असतील तर त्यांना परत संधी द्यावयाची काय ?

श्री. जयंत प्र. पाटील : नाही. सभापती महोदय, आज आजच्याच मागण्यांवर चर्चा होणार आहे काय ?

**उप सभापती** : होय.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, वित्त विभागातर्फे सन 2010-2011 च्या ज्या पूरक मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. प्रथम मी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 92 वरील बाब क्रमांक 79 बाबत बोलणार आहे. मंजूर अनुदानापेक्षा अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त अनुदान यासंदर्भात ही बाब आहे.. ही अधिकची रक्कम आपण जमा करणार त्याचबरोबर अन्न साठवण प्रक्रिया यासंबंधीची एक बाब या विभागाअंतर्गत दिलेली आहे. अशा दोन बाबी अन्न व नागरी पुरवठा विभागातर्फे सभागृहासमोर ठेवण्यात आलेल्या आहेत. या बाबींच्या अनुषंगाने मला असे म्हणावयाचे आहे की, राज्यामध्ये आता अन्न सुरक्षा कायदा म्हणजे फूड अँड सेफ्टी ॲक्ट आपण आणू इच्छिता. राज्य शासनाने हा कायदा आणण्यासाठी 2006 पासून 2011 पर्यंत दिरंगाई का केली ? आपण हा कायदा आणणार असला तरी या कायद्याच्या निमित्ताने या सर्वांचे नियंत्रण होणार आहे काय ? केंद्र शासनाने जे पॅरामीटर्स किंवा जी मानके ठरवून दिलेली आहेत ती मानके आपण कोणत्याही परिस्थितीमध्ये पूर्ण करु शकत नाही. या विभागामध्ये जो स्टाफ आहे तो अतिशय तुटपुंजा आहे. त्यांनी जे काही पॅरामीटर्स किंवा जी काही मानके दिलेली आहेत ती पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचबरोबर आपण 2006 चा अन्न सुरक्षा कायदा 2011 मध्ये आणून नेमके काय करणार आहात, याबाबत या चर्चेच्या निमित्ताने मंत्री महोदयांनी सांगावे. महागाई मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. राज्य सरकार या महागाईवर कोणत्या प्रकारे नियंत्रण करणार आहे ? अन्न साठवण प्रक्रियेसंबंधीची जी बाब आहे त्यामध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत शासन कसे नियंत्रण करणार, हे देखील मंत्री महोदयांनी सांगावे.

सभापती महोदय, यानंतर मला वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 118 वरील बाब क्रमांक 97 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये प्रलंबित देयकांचे प्रदान करण्यासंबंधीची बाब आहे. आपल्या वैद्यकीय खात्याचे संचालक डॉ. वासुदेव तायडे यांच्यावर इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये फार मोठी टीकेची झोड उठविण्यात आलेली आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

मग व्हेंटिलेटरचे प्रकरण असू दे किंवा त्यांच्या जन्म तारखेचे प्रकरण असू दे. माझ्या माहितीप्रमाणे डॉ.वासुदेव तायडे यांना शासनाने सक्तीच्या रजेवर पाठविले आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संचालकांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले आहे. त्यांची एसीबीमार्फत चौकशी सुरु आहे. व्हेंटिलेटरचे प्रकरण मी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या सभागृहात उपस्थित केले होते त्यावेळी मंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, यामध्ये काहीही गैरव्यवहार झालेला नाही. परंतु सिमेन्स कंपनीने एसीबीकडे हे प्रकरण दाखल केल्यानंतर डॉ.तायडे यांच्यावर दावा दाखल झाला आहे. त्याचबरोबर वैद्यकीय शिक्षण विभागातील प्रमुख अधिकाऱ्यांविरुध्द एफआयआर दाखल झाला आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण खात्याचे माननीय राज्यमंत्री सभागृहात आता उपस्थित झाले आहेत. मी आतापर्यंत जे भाषण केले आहे त्यातील मुद्दे कोणत्या मंत्री महोदयांनी लिहून घेतले आहेत ते मला सांगावे. सभापती महोदय, मला वाटते की, माझे मुद्दे कोणीही लिहून धेतलेले नाहीत. सभापती महोदय, राज्याचे वैद्यकीय संचालक एसीबीच्या जाळ्यात सापडतात ही राज्याला लाजिरवाणी गोष्ट आहे.

सभापती महोदय, काही दिवसानंतर वैद्यकीय महाविद्यालयांचे प्रवेश सुरु होणार आहेत. कॉमन सीइटीमुळे विद्यार्थी संभ्रमावस्थेत आहेत. यावर्षी कॉमन सीईटीनुसार प्रवेश घ्यावे लागणार नाहीत, परंतु पुढील वर्षी काय होणार, यंदा अकरावीत असलेले विद्यार्थी संभ्रमावस्थेत आहेत. याबाबत डीम्ड् युनिव्हर्सिटीची भूमिका काय राहणार आहे, खाजगी महाविद्यालयांची, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची भूमिका काय राहणार आहे हे महत्वाचे आहे. या प्रवेश प्रक्रियेमध्ये 85 टक्के राज्यातील व 15 टक्के विद्यार्थी बाहेरचे असणार आहेत. 15 टक्के बाहेरचे विद्यार्थी या राज्याच्या मातीशी मिसळतील काय ? कारण हा सामाजिक बांधिलकीचा विषय आहे. याबाबत कोर्टाने निर्णय दिला आहे. परंतु या प्रश्नाबाबत शासनाकडून पुनर्विचार होऊ शकतो. राज्य सरकार तसा प्रयत्न करणार आहे काय ? वैद्यकीय शिक्षणाची संपूर्ण घडी विस्कटून जाणार आहे, त्यामुळे यावर विचार होणे आवश्यक आहे. मला वाटते की, सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या विषयावर चर्चा करणे आवश्यक आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभाग या दोन्ही विभागांमध्ये रेंट कॉट्रॅक्टवरुन वाद सुरु आहे. यासंबंधी वर्तमानपत्रातून बातम्या येत आहेत, सभागृहात बोलले जात आहे. रेंट कॉट्रॅक्ट कोणी करावे हा यामध्ये विषय आहे. आरोग्य खात्याचे म्हणणे आहे की, आमच्या विभागाचा विषय असल्यामुळे आम्ही करणार आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाचे म्हणणे आहे की, आम्ही करणार आहे. वैद्यकीय शिक्षण खात्यातर्फे काही कंपन्यांना झुकते माप दिले जाते ही बाब मी अनेक वेळा सभागृहात उपस्थित केलेली आहे. एकाच कंपनीला वारंवार झुकते माप देणे हे चुकीचे आहे. या विभागामार्फत अनेक गोष्टींची खरेदी होत असते. मोठमोठी यंत्रसामुग्री खरेदी केली जाते. ही यंत्रसामुग्री खरेदी केली जाते त्यावेळी ऑर्डर दिल्यानंतर ती यंत्रसामुग्री इन्स्टॉल होईपर्यंत त्याची वॉरंटी संपून जाते.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:25

डॉ. दीपक सावंत....

मध्ये तीन-सहा महिन्याचा काळ गेल्यामुळे ते यंत्र अप्रचलित होते, जुने होते. कारण रोज नवनवीन तंत्रज्ञानाची भर पडत असते आणि रोज नवनवीन यंत्रे बाजारात येत असतात. त्यामुळे अशा प्रकारे ही घेतलेली यंत्रे बाद झालेली आहेत. व्हेंटिलेटरच्या बाबतीतही तेच झालेले आहे. यंत्रसामग्री खरेदी करीत असताना स्पेसिफिकेशन्स देखील पुरवठादाराला साजेशी अशी केली जातात. आपण आदर्श घोटाळा पाहिला, अनेक भूखंडाचे घोटाळे पाहिले, तेल भेसळ माफिया राज पाहिले, अशाच प्रकारचा प्रचंड मोठा घोटाळा सार्वजनिक आरोग्य खात्यामध्ये आहे. या घोटाळ्यास अधिकारी जबाबदार आहेत हे मंत्री महोदयांच्या लक्षात आलेले आहे. त्या अधिका-यांवर कारवाई होत नाही.

सभापती महोदय, जे.जे. हॉस्पिटलमध्ये संगणकीकरणाचा प्रोजेक्ट घेतलेला होता. त्या प्रोजेक्टसाठी काही कोटी रुपये खर्च झाले. एक अधिकारी देखील त्यावर नेमला गेला होता. आता तो अधिकारी रजेवर गेलेला आहे. हा अधिकारी रजेवर का गेला ? संपूर्ण महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण देणारी हॉस्पिटल्स या संगणकीकरणाच्या माध्यमातून जोडली जाणार आहेत. हा प्रोजेक्ट अर्धवट राहिलेला आहे. एका अधिका-याने अट्टाहास केला म्हणून हा प्रोजेक्ट आणला गेला आणि आता तो पूर्ण होऊ शकत नाही. या प्रोजेक्टवर काही कोटी रुपये खर्च झालेले आहेत. ते पैसे पाण्यात बुडाले की नाही ते माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

सभापती महोदय, आजच्या वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी आलेली आहे की, शासकीय सेवेमध्ये असलेल्या डॉक्टरांना ते ज्या प्रिमायसेसमध्ये राहातात तेथे सायंकाळी खाजगी प्रॅक्टीस करण्याची मुभा देण्यात येणार आहे. ही परवानगी देत असताना त्यांच्यावर फी आकारण्यात येणार असून त्या फीचा काही भाग महाविद्यालयाला मिळणार आहे. अशी परवानगी देणे किती संयुक्तिक होईल, अशा प्रकारचे शासनाचे धोरण वैद्यकीय शिक्षणाला मारक ठरणार नाही काय ?

सभापती महोदय, जे.जे.हॉस्पीटलच्या हॉस्टेल बाबत या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली. परंतु अद्याप त्याबाबतीत कोणतीही सुधारणा झालेली नाही. पोलीस जिमखान्याच्या बाजूला या जे.जे.हॉस्पिटलचा जिमखाना आहे. हा जिमखाना पंचतारांकित लग्नासाठी भाड्याने दिला जातो. हे भाड्याच्या रुपाने येणारे पैसे कोठे जातात ? मी जे.जे.हॉस्पिटलमध्ये जाऊन याबाबत चौकशी केली. हे पैसे जिमखान्याकडे येत नाहीत. याबाबत माननीय मंत्री महोदयांनी चौकशी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

करावी. या जिमखान्याचे एका दिवसाचे भाडे पावणे दोन लाख रुपये आहे. डेकोरेशन वगैरे सर्व मिळू साधारणपणे 7 ते 8 लाख रुपयापर्यन्त भाडे जाते. लग्नसराईतून या ठिकाणी दरदिवशी लग्न समारंभ होत असतात. कधी कधी दिवसातून दोन-दोन लग्ने होत असतात.

सभापती महोदय, कॉमन सीईटीसाठी फी घेण्यात आली.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत........

ही फी नेमकी कुठे जाते? या रक्कमेचा विनियोग कसा केला जातो हे देखील सभागृहापुढे आले पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 125, पृष्ठ क्रमांक 147 वर उच्च व तंत्रशिक्षण विभागाची मागणी सादर केलेली आहे. मुंबई विद्यापीठाच्या कारभाराबद्दल काल झालेल्या सिनेटच्या बैठकीत खूप गोंधळ झाला. मुंबई विद्यापीठाला नॅकचा दर्जा प्राप्त झालेला आहे की नाही यासंबंधी आम्ही अनेक प्रश्न उपस्थित केले होते. माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांनी श्री.राजन वेळूकर रजिस्ट्रार झाले त्यावेळी त्यांना बोलावून त्यांच्यासमवेत आमची बैठक घेतली होती. या बैठकीला माझ याबरोबर माननीय सदस्य श्री.विनोद तावडे आणि इतरही आमदार होते. या बैठकीमध्ये आम्हाला असे सांगण्यात आले की, मुंबई विद्यापीठाबद्दल तुमचे जे काही प्रश्न आहेत ते आम्हाला सांगावेत, आम्ही त्या प्रश्नांची उत्तरे सहा महिन्यात देऊ. जुलैच्या पावसाळी अधिवेशन काळात ही बैठक झाली होती. अद्याप त्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आलेली नाहीत. आम्ही असा आरोप केला होता की, मुंबई विद्यापीठाचा मागील तीन वर्षाचा ताळेबंद सादर झालेला नाही, याला जबाबदार कोण आहे? रजिस्ट्रार श्री.विलास शिंदे यांच्याबद्दल अनेक प्रश्न उपस्थित केले होते, त्या प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत. श्री.राजन वेळूकर यांनी श्री.विलास शिंदे यांना क्लिन चीट दिली आहे का, मुंबई विद्यापीठाला नॅकचा दर्जा प्राप्त होण्यासाठी आतापर्यंत शासनाने काय प्रयत्न केले, मुंबईतील बहुतांश कॉलेजांना देखील नॅकचा दर्जा मिळणे आवश्यक आहे. त्या प्रक्रियेचे काय झाले?

सभापती महोदय, सध्या मुंबईतील चिनॉय कॉलेजचा प्रश्न गाजतो आहे. या प्रश्नाबाबत आम्ही सर्वांनी माननीय मंत्री महोदयांची भेट घेतली होती. माझ्या समवेत श्री.आदित्य ठाकरे, माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभेतील काही माननीय सदस्य देखील त्यावेळी उपस्थित होते. त्यांनी आम्हाला असे सांगितले की, 17 मार्चपासून त्या कॉलेजवर प्रशासक नेमला जाईल. या बैठकीनंतर विधानभवनातून बाहेर पडायच्या आत चिनॉय कॉलेजच्या विश्वस्तांना शासनाचा हा निर्णय कळला आणि त्यांनी न्यायालयात जाऊन प्रशासक नेमण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात स्थगिती मिळविली. चिनॉय कॉलेजच्या संदर्भात अनेकदा आंदोलने झाली. मंत्री महोदयांना देखील ही बाब मान्य आहे. चिनॉय कॉलेज



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत........

लक्ष्मी ट्रस्टमार्फत बंद करण्याचा घाट घातला जात आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू दिले जात नाही. खास परीक्षा घेऊ असे सांगितले होते. परंतु विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत अद्याप काही केलेले नाही. चिनॉय कॉलेजसंबंधीचा प्रश्न विधानसभेत उपस्थित झाला होता. चर्चेच्या वेळी हस्तक्षेप करुन माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, कोणत्याही परिस्थितीत शासन चिनॉय कॉलेज बंद करु देणार नाही. परंतु चिनॉय कॉलेज बंद होण्याची सर्व प्रक्रिया सुरु आहे. एका बाजूला शासन सांगत आहे की, आम्ही त्या कॉलेजवर प्रशासक नेमणार आहोत. मंत्री महोदयांनी आम्हाला सांगितले की, तुम्ही नाव द्या, तुमचा प्रशासक नेमतो आणि चिनॉय कॉलेजला मात्र प्रशासक नेमण्याबाबत स्थगिती घ्यायला सांगितले जाते. याला जबाबदार कोण आहे? अशा प्रकारच्या घटनेमुळे राज्यातील शाळा आणि कॉलेज बंद करुन तेथे पंचतारांकित हॉटेल्स उभी करायची आहेत का? तसे असेल तर निर्णय घेऊन टाका. ज्या मोकळ्या जागा आहेत तेथे मॉल्स उभारले जातील.

नंतर 3पी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले...... 17:35

डॉ. दीपक सावंत ........

महोदय, बाब क्र. 100-आदिवासी विभागातील मुलांच्या आश्रमशाळा व वसतिगृहांच्या संदर्भात ही मागणी करण्यात आली आहे. संपूर्ण राज्यात जवळपास 551 आदिवासी आश्रमशाळा असून त्यासाठी लागणाऱ्या आहाराच्या खरेदीवर करोडो रुपये शासन खर्च करते. पण तरी देखील या विद्यार्थ्यांना क्वॉलिटीचे अन्न व मांसाहार मिळत नाही याची आपणा सर्वांनाच जाणीव आहे. यासंदर्भात अनेक वेळा सभागृहात चर्चा झाल्या, अनेक वेळा सभात्यागही झाले पण परिस्थितीत मात्र कोणताही फरक पडलेला नाही. आश्रमशाळेतील आदिवासी मुलांना हिवाळ्यात स्वेटर्स दिले जातात पण ते मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अधिवेशन सुरु होण्यापूर्वी हे स्वेटर्स पुरविण्यात आले आहेत. थंडी खरे तर दिवाळीनंतर सुरु होते व हिवाळ्याच्या सुरुवातीलाच असे स्वेटर्स दरवर्षी द्यायचे असतात, अशी तरतूद आहे. वर्तमान पत्रातून यासंबंधात "बबनराव काका आम्हाला स्वेटर्स कधी मिळणार, थंडीत मिळणार की उन्हाळ्यात मिळणार" असा एक छान मथळा छापून आलेला होता. अगोदरच या आदिवासी मुलांना डोक्यावर छप्पर नसते, खिडक्यांना तावदाने नसतात तसेच डोंगराळ भागात शाळा असल्याने थंडीचे प्रमाण सुध्दा जास्त असते. तरी देखील मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात असे स्वेटर्स पुरविण्यात आले ही खेदाची गोष्ट आहे.

आदिवासी मुलांना द्यावयाच्या गणवेशांच्या बाबतीत सुध्दा सभागृहात अनेक वेळा चर्चा होत असते. या गणवेशाची किंमत फक्त 130 रुपये एवढीच असते पण ते देखील 15 आगस्टला दिला जात नाही. दुसरा गणवेश दुसऱ्या कॅलेंडर वर्षात म्हणजे जानेवारी, फेब्रुवारीत दिला जातो. तसेच त्यांना सॉक्स, बूट, पुस्तके व वह्या सुध्दा वेळेवर मिळत नाहीत. त्या मुलांना पुरविल्या जाणाऱ्या ट्रंकेची क्वॉलिटी तर इतकी खराब असते की, थोडा जरी हात ठेवला तरी तिचा वरील पत्रा खाली जातो. तसेच या मुलांना वेळेवर औषधे मिळत नाहीत. पावसाळ्यात मोकळ्या जागेत साप व विंचू फिरतात, मुलांना चावतात व अनेक वेळा मुले मरतात. तसेच आश्रमशाळांमध्ये शौचालयांची सुविधा नसते, मुलींना स्वतंत्र बाथरुमची सोय नसते, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. पुस्तकाच्या पेढीच्या संदर्भात मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये आकडेवारी द्यावी, अशी मी विनंती करणार आहे. साधारण्पणे 29778 एवढ्या विद्यार्थ्यांनीच प्रत्यक्ष पुस्तक पेढीचा लाभ घेतला आहे. हे सर्व पाहून व ऐकून मन विषण्ण होते की करोडो रुपयांचा निधी आपण आदिवासींवर खर्च करतो पण त्याचा फायदा मात्र या आदिवासी व गरीब मुलांना मिळत नाही.

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ..........

सभापती महोदय, बाब क्र. 96, पृ.क्र. 113, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भात मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, हिवताप नियंत्रण कार्यक्रमासाठी या पुरवणी मागणीच्या माध्यमातून सभागृहाची मंजुरी मागितलेली आहे. आपल्याकडे फायलेरिया, हिवताप व कीटकांपासून होणाऱ्या आजारांवर उपचार करण्यासाठी लाखो रुपये केंद्र शासनाकडून आपल्या राज्याला मिळतात. पण ही सर्व रक्कम कुठे खर्च होते, त्यातून काय खरेदी केली जाते हे मात्र कोणालाच कळत नाही. वास्तविक हिवतापासाठी आलेल्या पैशातून औषधे घेण्याऐवजी ब्लँकेट,चादरीं व मच्छरदाण्यांची खरेदी केली जाते. त्या मच्छरदाणीचे नाव कीटकनाशक मच्छरदाणी असे आहे. पण खरे पाहता कोणता आदिवासी व ग्रामीण भागातील माणूस मच्छरदाणीमध्ये झोपतो ? तरी देखील या गोष्टी खरेदी केल्या जातात. या विभागात सध्या सीबीआयची चौकशी चालू आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

कीट "ए" आणि कीट "बी" दादरा नगर हवेलीमध्ये ज्या रेटने घेतलेले आहेत, त्यापेक्षा दीड पट अधिक किंमत देऊन आपण हे कीट घेतलेले आहे. या संदर्भात आता सीबीआयची चौकशी सुरु आहे. या खरेदीमध्ये केंद्रापासून ते राज्यापर्यंत हात ओले झालेले असतात. श्रीमती चंद्रा अय्यंगार या सचिव होत्या तेव्हा पासून केंद्राच्या पीएसयु कडून औषधे खरेदी करावीत, यासंदर्भात जीआर काढण्यात आला होता. यामध्ये एकूण 103 औषधांचा समावेश करण्यात आलेला आहे व यामध्ये आणखी एक म्हणजेच हिंदुस्थान लॅटीक्स कंपनी घुसवण्यात आलेली आहे व त्यांच्यामार्फत सर्व उपकेंद्राना कीट "ए" व कीट "बी" पुरवले गेले आहेत.

सभापती महोदय, या संदर्भात अनेकदा तक्रार करुन करुन मला आता कंटाळा आलेला आहे. कीटच्या संदर्भात जी सीबीआय चौकशी सुरु करण्यात आली होती, त्याचा रिपोर्ट काय आलेला आहे,याची माहिती आम्हाला माननीय मंत्री महोदयांकडून हवी आहे. ज्यावेळेस आपण आमच्याकडे एक बोट करता त्यावेळेस तुमच्याकडे तीन बोटे असतात, हे आपण विसरु नये. दादरा नगर हवेलीपेक्षा जादा दराने आपण कीटची खरेदी का केली, याचीही माहिती देण्याची आवश्यकता आहे. सन 2009-10 मध्ये उपकेंद्रामध्ये किती कीट आलेले आहेत याचीही माहिती माननीय मंत्री महोदयांनी घेण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी एकही कीट खरेदी करण्यात आले नसून ही सर्व खरेदी कागदावरच झालेली आहे. या ठिकाणी मी जे काही सांगत आहे ते जबाबदारीने सांगत आहे. मी ज्यावेळेस उपकेंद्रांना भेटी दिल्या तेव्हा मला कोणत्याही उपकेंद्रात कीट आढळून आले नाही. आपली जी उपकेंद्रे आहेत ती घरामध्येच चालवली जात असतात.

सभापती महोदय, मागील अधिवेशनात दाई कीटच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. नाळ कापण्यासाठी सर्जीकल ब्लेडची आवश्यकता असतांना त्या ठिकाणी टोपॅझ ब्लेडचा तसेच छोटयाशा साबणाच्या वडीचा कीटमध्ये समावेश करण्यात आला होता. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी यांनी सीआयडी चौकशी लावण्याचे आदेश दिले होते. डीजी लेव्हलचा अधिकारी नेमून चौकशी केली जाईल. या घोषणेला दोन वर्षे झाली परंतु आजपर्यंत या चौकशीचा अहवाल आलेला नाही. आम्हाला जर सभागृहात न्याय मिळत नसेल तर आम्ही कोणाकडे जावयाचे ? यामध्ये अधिका-यांना क्लिन चीट मिळालेली आहे. खरेदीमध्ये

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

कोणताही गैरव्यवहार झालेला नाही असे सांगण्यात आले होते परंतु आम्ही खरेदीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला नव्हता तर कीटमध्ये कोणत्या वस्तू ॲड करण्यात आल्या त्यासंदर्भात आम्ही प्रश्न उपस्थित केला होता. ज्या गोष्टी प्रमाणित केल्या होत्या त्या वस्तू कीटमध्ये नाहीत एवढेच आम्ही सांगत होतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 131 पृष्ठ क्रमांक 153 वरील सामाजिक सुरक्षा व कल्याण विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. बाल न्याय अधिनियमाखालील शासन प्रमाणित गृहे व सुधारगृहे यांच्या परिरक्षणासाठी अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. बाल सुधारगृहांची परिस्थिती काय आहे याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. कोंडवाडा सुध्दा बालगृहापेक्षा चांगले असतात अशी परिस्थिती आहे. खरोखरच बाल सुधारगृहात मुले सुधारतात का, त्या ठिकाणचे वॉर्डन, रेक्टर असतात ते मुलांना चांगली वागणूक देतात का ?

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 17.45

डॉ.दीपक सावत ..

सभापती महोदय, बाल सुधारगृहाच्या संदर्भात शासनाने पुन्हा एकदा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे तेव्हा माननीय मंत्र्यांनी पुन्हा एकदा बाल सुधार गृहाचा आढावा घ्यावा व त्यात असलेल्या त्रुटी दूर कराव्यात अशी मी आग्रहाची विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.जयहिंद जय महाराष्ट्र.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 62 ,पान नंबर 70, जलसंपदा विभागाच्या संदर्भात मला प्रथम बोलावयाचे आहे. जलसंपदा विभागाचे काम सुरु करण्यापूर्वी किंवा जेव्हा धरण बांधण्यात येते तेव्हा या धरणाच्या जमिनीसाठी भूसंपादन होण्यापूर्वी, त्या ठिकाणी असलेल्या वन जमिनीचा ताबा देण्यापूर्वी ज्या कामाच्या निविदा काढल्या जातात.त्या निविदा चुकीच्या पध्दतीच्या आहेत. त्या जमिनीचा ताबा मिळालेला नाही तरी निविदा काढल्या जातात आणि वर्क ऑर्डर दिली जाते. त्याचबरोबर संबंधित ठेकेदाराला 10 टक्के मोबलायझेशन ॲडव्हान्स सुध्दा दिला जातो.एखाद्या धरणाची किंमत 500 कोटी रुपयांची असेल तर 50 कोटी रुपयांचा ॲडव्हान्स दिला जातो. या धरणाच्या कामासाठी जमिनीचा ताबा मिळाला नसल्यामुळे मी काम करु शकत नाही, माझी लाखो रुपयांची मशिनरी पडून राहिली आहे त्याची नुकसानभरपाई देण्यात यावी. अशा प्रकारे सहा महिन्यानंतर किंवा वर्षभरानंतर तो कंत्राटदार शासनाला नोटीस देतो. अशा प्रकारे ही मशिनरी पडून राहिल्यामुळे त्याची नुकसानभरपाई त्या कंत्राटदाराला दिली जाते. महाराष्ट्रामध्ये अनेक जिल्हयात जात असतांना अनेक धरणाची पहाणी करण्याचा योग मला आला होता.बुलढाणा जिल्हयातील जलंब येथे त्याचबरोबर हिंगोली जिल्हयातसुध्दा मी गेलो होतो. हिंगोली मध्ये जमीन मिळाली नाही असे मला दिसून आले. तेथे 5 हजार एकर वनीकरणाची जमीन आहे. हिंगोली मधील एका धरणासाठी 100 कोटी रुपयांचा ॲडव्हान्स दिला होता परंतु कंत्राटदाराने पुन्हा आणखी नुकसान भरपाई मिळाली पाहिजे अशी मागणी केली असून त्याची प्रक्रिया सध्या सुरु आहे. हे प्रकार थांबविण्यात येणार आहेत की नाहीत ? जनतेच्या पैशाची लूट किती वर्षे करण्यात येणार आहे ? जलसंपदा विभागामध्ये अशाच प्रकारची कामे होणार असतील तर त्यामुळे जल जाऊन अधिका-यांची आणि इतरांची संपदा मात्र वाढत चालली आहे. हे थांबविण्याचे काम झाले पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.या ठिकाणी मी चुकीचे काहीही बोलणार नाही. माननीय मंत्र्याना मी सांगू इच्छितो की, आपण चागले काम केलेले आहे याचा अभ्यास मी देखील केलेला आहे. मी आपल्याबरोबर अनेकदा चर्चा सुध्दा केलेली आहे.

3..



VTG/ D/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 17.45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, या पूरक मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने शासनाला माझी अशी विनंती आहे की,किमान जोपर्यत जमिनीचा ताबा मिळत नाही, जोपर्यत सर्व प्रक्रिया पूर्ण् होत नाही तोपर्यत टेंडर काढता येणार नाही अशा प्रकारचा नियम तयार केला पाहिजे.जल संपदा खाते हे सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे होते त्यावेळी ते असे म्हणाले की, पाण्याचे योग्य वाटप केले पाहिजे. या संबंधीचे विधेयक ज्यावेळी चर्चेला येईल त्यावेळी मी सविस्तर बोलणार आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

परंतु रायगड जिल्हयातील कर्जतमधील पाली येथे भूतवली नावाचे धरण आहे, त्या धरणासाठी मी गेली दहा वर्षे सातत्याने मागणी करीत आहे. आज त्याठिकाणी असलेले पाणी पिण्यासाठी वापरले जात नाही तर बिल्डरला बांधकाम करण्यासाठी राजरोसपणे वापरु दिले जात आहे, शेतकऱ्यांच्या शेतीला सुध्दा हे पाणी दिले जात नाही. तेव्हा मला आपल्याला विचारावयाचे आहे की, आपण हे धरण कुणासाठी बांधले आहे, या धरणामधील पाण्यावर कुणाचा अधिकार आहे, बिल्डरचा आहे की शेतकऱ्यांचा आहे? मी कालच कर्जतला कॉंग्रेसचे कार्यकर्ते श्री. पुंडलिक पाटील यांच्या वडिलांचे निधन झाले म्हणून भेटायला गेलो होतो. माझी मागणी आहे की, हे पाणी निश्चितपणे शेतकऱ्यांकडेच राहिले पाहिजे. बिल्डर्सना जर बांधकामासाठी पाणी पाहिजे असेल तर त्यासाठी आपण वेगळे धरण बांधावे. म्हणून मी या माध्यमातून जलसंपदा विभागाच्या विधेयकाला विरोध करणार आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे अन्न व नागरी पुरवठा विभागावर बोलले. आज राज्यामध्ये शेतीमधून अन्न धान्याचे उत्पादन होत आहे ते साठवून ठेवण्यासाठी आपल्याजवळ गोडाऊन नाही. शेतामधून पिकलेले धान्य साठवून ठेवणारी कोणतीही यंत्रणा आपल्याजवळ नाही. केंद्र सरकारची नाबार्ड नावाची संस्था आहे, त्यांच्यामार्फत गोडाऊन बांधण्यासाठी 50 टक्के सबसिडी दिली जाते. परंतु त्याची मर्यादा 40 लाखापर्यंत आहे, त्यापेक्षा अधिक सबसिडी दिली जात नाही. याबाबत माझी अशी मागणी आहे की, राज्य सरकारने 25 टक्के स्वत:ची सबसिडी दिली पाहिजे. आज राज्यामध्ये भाताचे पीक उत्पादित केले जाते. त्याला विदर्भामध्ये धान म्हटले जाते. परंतु हे उत्पादित झालेले हजारो क्विंटल भात, धान साठवून ठेवण्यासाठी गोडावून नसल्यामुळे पावसामध्ये भिजून गेले. त्यामुळे भाताचे उत्पादित झालेले प्रचंड पीक साठवून ठेवण्यासाठी गोडावून नसल्यामुळे आपल्याला ते खरेदी करता येत नाही. गेल्या दोन वर्षापूर्वी गोडावूनमध्ये ठेवलेले धान्य उचलले गेले नाही. गोडावून बांधण्यासाठी स्क्वेअर फूटाचा भाव 150 रुपये आहे, आज नाबार्डने तो भाव 500 रुपये केला आहे. कोकणामध्ये सर्वत्र खार जमीन असल्यामुळे बांधकामापूर्वी पायलींग करावे लागत असते, त्यामुळे तेथील बांधकामाचा दर 750 रुपये स्क्वेअर फूटापर्यंत जातो. नाबार्डची 40 लाखाची सबसिडी त्या पायलींगमध्ये खर्च पडते. याकरिता 10 हजार स्क्वेअर फूटाचे गोडावून बांधावयाचे असेल तर राज्य सरकारने आपल्या अर्थसंकल्पामध्ये त्यासाठी तरतूद करावी अशी मी मागणी करतो. तसेच, सर्व जिल्ह्यांच्या पातळीवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. जयंत प्र. पाटील...

शेतीचे उत्पादन साठविण्यासाठी शासनाने आपल्या पायावर प्रभावी यंत्रणा उभी करण्याची गरज आहे. तामिळनाडू, आंध्रसारख्या राज्यांचा आदर्श समोर ठेवून आपण हे काम केले पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 147 व पृष्ठ क्रमांक 124 वर मी बोलणार आहे. या ठिकाणी माननीय राज्यमंत्री नवीन आहेत. मी एक महिन्यापूर्वी बुलढाण्याला जात असतांना परभणी येथील एका कॉलेजला भेट दिली. सदरहू कॉलेजचे संस्था चालक हे पूर्वी जनता दलामध्ये होते त्यांनी माझा सत्कार केला, मी त्यांचे नाव जाहीर करु इच्छित नाही. त्यांनी मला त्यांचे कॉलेज दाखविले त्यावेळी ....

(अपूर्ण - यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

मी माझ्या पध्दतीने त्यांना विचारले की, कॉलेजमध्ये किती विद्यार्थी आहेत ? तर असे सांगण्यात आले की, एकंदर 120 विद्यार्थी आहेत. तेथे शिपायापासून प्राचार्यापर्यंतचा स्टाफ किती आहे ? तर असे सांगण्यात आले की, ही संख्या 90 आहे अशी स्थिती आहे. त्यामुळे आपण याची कुठेतरी गंभीरपणे चर्चा करण्याची वेळ आलेली आहे.

श्री.माणिकराव ठाकरे (खाली बसून) : एखाद्या ठिकाणी . . .

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, असे एकच कॉलेज नाही, तर अनेक कॉलेजेस आहेत. मी याबाबतीत त्यांच्याशी बोलेन. मी काही रेकॉर्डवर आणत नाही कारण त्यांनी मला हार घातला, नारळ दिला. मला तेवढी तरी माणुसकी ठेऊ द्या. मी त्यांना खाजगी स्वरुपामध्ये माहिती सांगेन. माझी अशी मागणी आहे की, याबाबतीत पॅटर्न बदलला पाहिजे. विद्यार्थी किती, स्टाफ किती? आपण कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम केलेले आहे. आपल्याला माहिती आहे. पण हे सगळे कशा प्रकारे चालले आहे आणि त्याचे कोणाला काही वाटत नाही. त्यामुळे राज्य शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. तेथे स्टाफ किती, विद्यार्थी किती? तर त्या ठिकाणी दोनच विद्यार्थी होते आणि त्यांचा पगार किती तर कोणाला 80 हजार, कोणाला 1 लाख 20 हजार रुपये इतका आहे. याठिकाणी माझे शिक्षक आमदार उपस्थित नाहीत पण हे थांबले पाहिजे. त्यांना अजून सवलती द्या.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर संपवावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी माननीय सभापतींना भेटणार आहे. कारण आम्हाला प्रत्येक विषयाच्या बाबतीत बोलावयास देणार नाही काय ? विधेयकावरील चर्चेच्या वेळी बोलावयास देणार नाही, पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी बोलण्यासाठी वेळ देणार नाही, लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी दोनच प्रश्न विचारावेत असे सांगणार. मग आम्ही काय करावयाचे? सभापती महोदय, आपल्याला याबाबत विचार करावा लागेल. हे अधिवेशन दीड महिना आहे. विधान परिषदेमधील आम्ही 15-20 सन्माननीय सदस्यच जास्त जोरामध्ये बोलत असतो. बाकी तुम्ही कोणाला पाहिलेले आहे काय? याबाबत काही ठरविले पाहिजे नाहीतर मग आम्ही आमचे विचार मांडणार कधी ? असा प्रश्न आहे.

श्री.रमेश शेंडगे (खाली बसून) : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे आता पहिल्या बाकावर बसत आहेत, त्यामुळे ते सिनिअर सदस्य झालेले आहेत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

श्री.जयंत प्र.पाटील : असे नाही. मला वाईट वाटते. हा अतिशय गंभीर मुद्दा आहे. एकीकडे आज राज्यामध्ये 4 हजार शाळा विना अनुदान तत्वावर चालवित आहोत. तेथील शिक्षकांना पगार देत नाहीत. गरीबांची मुले शिकू शकत नाहीत. दुसरीकडे मात्र पैशाची लयलूट सुरु आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी स्वत: ग्रामीण भागामध्ये, आदिवासी भागामध्ये 40 विना अनुदान तत्वावरील शाळा चालवितो. जर मी नवी मुंबई, पनवेल येथे शाळा काढली तर मला फी मिळू शकते हे आपल्याला माहिती आहे, उत्पन्न मिळू शकते. पण विशिष्ट तत्वाने आणि ध्येयाने काम करणारा मी कार्यकर्ता आहे आणि म्हणून मी कळकळीने बोलत आहे. मला वाईट वाटते की, आम्ही आमच्या कमाईचे 25 टक्के रक्कम शिक्षणसाठी खर्च करतो. मी एवढे पोटतिडकीने का बोलतो ? तर मी माझ्या कमाईतील 25 टक्के रक्कम ग्रामीण आणि आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करणारा एक कार्यकर्ता आहे. मी चेकने रक्कम देतो, माननीय मंत्री महोदय हसू नका. 40 कोटी रुपयांचा चेक मी माझ्या संस्थेला माझ्या कंपनीतून दिलेला आहे. आम्हाला या विषयाचे गांभीर्य वाटते, दु:ख होते. आम्ही याठिकाणी आमदार म्हणून कायम रहाणार नाही. परंतु आम्हाला जनतेने जी संधी दिली आहे, त्याचा उपयोग सर्वसामान्य आणि गरीब माणसांसाठी खऱ्या अर्थाने झाला पाहिजे आणि पण याठिकाणी लयलूट चालू आहे.आम्ही जलसंपदा विभागाबाबत बोललो. पण काय चालले आहे ? केवळ पगार वाढवावयाचे, मी मंत्रालयामध्ये जात नाही. मी सन्माननीय मंत्री श्री.रामराजे निंबाळकर साहेबांना सांगू इच्छितो की, मंत्रालयामध्ये गेल्यानंतर वजन ठेवल्याशिवाय पेपर हलत नाही अशी परिस्थिती आहे. जर तेथे आमदार गेले तर समोरच्या टेबलावरील बाई उठून उभी रहात नाही. मी तेथे गेल्यानंतर क्लार्क उठून उभा रहात नाही. त्यामुळे मला आमदार म्हणून घ्यावयास लाज वाटते. मी अनेक वेळा या सदनामध्ये बोललो आहे. त्यामुळे मी मंत्रालयामध्ये कमी वेळा जातो. आपण मला तेथे आल्याचे कधी पाहिले आहे काय ? मी तुमच्या चेंबरमध्ये कधीच आलो नाही. त्यामुळे आम्ही आल्यावर कोणी उठेल की नाही, आम्हाला पी.ए.ओळखेल की नाही हे माहिती नाही. परंतु हे कुठेतरी थांबले पाहिजे अशी मी यानिमित्ताने निश्चितपणे मागणी करु इच्छितो.

यानंतर कु.थोरात . . ..

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

सभापती महोदय, बाब क्रमांक 138, पान क्रमांक 167 - वेतन आणि भत्ते, यावर मी बोलू इच्छितो.

सभापती महोदय, सभागृहात विद्यमान सदस्यांचे वेतन वाढले. मी कधी माझे वेतन घेतले नाही. मी फक्त माझ्या वेतनावर सही करतो आणि ग्रामीण भागातील जी मुले वैद्यकीय, इंजिनियरिंग, वकिली इत्यादीचे शिक्षण घेऊ शकत नाहीत अशा मुलांना मी माझे वेतन देतो. सभापती महोदय हे शासन माजी आमदारांना सवलती देऊ शकलेले नाही. सभापती महोदय, आपण सुध्दा या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. माजी आमदारांना टोलच्या संदर्भात एक पास देण्यात यावा अशी आम्ही सूचना केली होती. पण अद्याप माजी सन्माननीय सदस्यांना टोलच्या संदर्भात पास देण्यात आलेला नाही. माननीय मंत्री कायमचे आमदार नाहीत. ते पण माजी सन्माननीय सदस्य होणार आहेत. मला माहीत आहे माननीय मंत्र्यांवर कृपादृष्टी असल्यामुळे ते आणखी 25 वर्षे या सभागृहात मंत्री म्हणून रहातील. पण सन्माननीय माजी आमदारांना सवलती दिल्या जात नाहीत. सन्माननीय माजी आमदारंचा जो प्रोटोकॉल आहे तो त्यांना मिळत नाही. या सभागृहात या विषयावर अनेक वेळा चर्चा झालेली आहे. त्याबाबतीत शासनाने अश्वासन देऊनही, त्याची अंमलबजावणी होत नाही. याबाबतीत अमुक अमुक करा असा फक्त एक जी.आर. शासनाला काढावयाचा आहे. त्यासाठी राज्य शासनाला काही द्यावयाचे नाही. त्यामुळे राज्य शासनावर कुठल्याही पैशाचा बोजा पडणार नाही, पण ते काम देखील केले जात नाही. म्हणून या पुरवणी मागण्याच्या मध्यमातून मी शासनाला विनंती करतो की, सन्माननीय माजी आमदारांना रेल्वेची कुपन्स देऊन त्यांचा सन्मान केला पाहिजे. काही सन्माननीय माजी आमदार खरोखरच गरीब आहेत. सन्माननीय मंत्री श्री. ढोबळे यांना या माजी आमदारांची परिस्थिती माहीत आहे. त्यांच्या जिल्हयामध्ये देखील काही माजी आमदारांची परिस्थिती अत्यंत गरिबीची आहे.

प्रा. लक्ष्मण ढोबळे (बसून): हे खरे आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, याचे दु:ख आम्हाला आहे. राज्य शासनाने याबाबतचे निर्देश द्यावयास पाहिजेत. राज्य शासनाने याबाबतचा निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे. ( अडथळा)...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : याबाबतीत माननीय मंत्र्यांची कितीही राजकीय इच्छा असली तरी अधिकारी हे करु देणार नाहीत.

प्रा. लक्ष्मण ढोबळे : माजी आमदार होणे ज्यांच्या नशिबी आले नाही त्यांना माजी आमदार झाल्याशिवाय माजी आमदारांचे दु:ख कळणार नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : आपण माजी आमदार होता म्हणून आपल्याला माजी आमदारांचे दु:ख चांगले माहीत आहे.

प्रा. लक्षमण ढोबळे : होय.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने शेवटच्या मागणीवर बोलून मी माझे विचार संपवणार आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 62, पान क्रमांक 70 वर मी बोलू इच्छितो. कोकणात खार जमिनीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. किनाऱ्यावरचे बाहेर काटे बांधण्यासाठी आणि त्याचे मजबुतीकरण करण्यासाठी राज्य शासनाने तरतूद केलेली नाही. आमचे परम मित्र सन्माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांच्याकडे ज्यावेळी अर्थखाते होते त्यावेळी त्यांनी सहयाद्रीवर एक बैठक घेतली होती. त्यावेळी 300 कोटी रुपये बाहेर काटयासाठी देण्यात येतील असे त्यांनी सांगितले तेव्हा मी अतिशय प्रभावित झालो आणि मी त्यांना असे म्हटले की, "आपण एवढे काम केले तरी खूप झाले, आपल्याला अर्थखाते मिळाल्याचे समाधान झाले. पण दुर्दैवाने माननीय मंत्री श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांनी त्यांचे अर्थ खाते काढूनच घेतले.

श्री. रामराजे नाईक - निंबाळकर ( बसून) : मी काढून घेतले नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : पश्चिम महाराष्ट्राची सगळी दादागिरी असल्यामुळे कोकणाच्या वाटयाला आलेले अर्थखाते तुम्ही काढून घेतले. सभापती महोदय, माजी अर्थ मंत्र्यांनी जी तरतूद करण्याचे आश्वासन दिले होते, ती देण्यात यावी अशा प्रकारची अपेक्षा या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मी व्यक्त करतो आणि सभापती महोदय, आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

-----

यानंतर श्री. बरवड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असताना प्रथम मी जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 71 वरील बाब क्रमांक 64 बाबत बोलणार आहे. यामध्ये दिंडोरा बंधाऱ्याचे काम हाती घेण्यासाठी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळासाठी निधीची तरतूद करणे याकरिता 10 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ हे विदर्भातील सिंचन व्यवस्था वाढावी आणि विदर्भाचा सिंचनाचा जो अनुशेष आहे तो पूर्ण व्हावा या दृष्टीकोनातून सातत्याने काम करते. राज्यातील सिंचनाची एकंदर अवस्था पाहिली तर जेवढे पाणी जमिनीमध्ये आहे किंवा सर्व पाणी अडवून त्या माध्यमातून महाराष्ट्रातील जमिनीचे सिंचन करतो म्हटले तरी एकूण सिंचन क्षमता 35 ते 40 टक्केपेक्षा जास्त सिंचन होईल अशी परिस्थिती नाही. माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, संपूर्ण पाणी वापरले तरी फक्त 35 टक्केपर्यंतच सिंचन होऊ शकते. 38 टक्के सिंचन होऊ शकेल असे धरले तरी नवीन धोरणाप्रमाणे इतर बाबींसाठी आणि उद्योगांसाठी काही पाणी राखून ठेवतो म्हटले तर राहिलेल्या पाण्यामध्ये किती जमीन भिजेल याचे भविष्य आपण वर्तवू शकत नाही. विदर्भ हा सिंचनाच्या दृष्टीकोनातून अत्यंत मागे आहे. आज त्या ठिकाणी आम्ही फक्त 6 ते 7 टक्के ओलिताची क्षमता पूर्ण करु शकलो. आणखी बराच टप्पा गाठावयाचा आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून सिंचनाचा अनुशेष पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्या दृष्टीकोनातून आपण नव्याने काही विचार करणे गरजेचे आहे. या दृष्टीकोनातून राज्य शासनाने मागच्या काळामध्ये काही निर्णय घेतले होते.

महाराष्ट्रामध्ये सिंचनाची व्यवस्था करण्याच्या दृष्टीकोनातून ठिबक सिंचन किंवा सूक्ष्म सिंचनाचा उपयोग महाराष्ट्रामध्ये केला गेला तरच कमी पाण्यामध्ये जास्त जमीन भिजवू शकू आणि आपण महाराष्ट्रामध्ये जी 38 टक्केपर्यंत सिंचनाची व्यवस्था करु शकतो त्यापेक्षाही जास्त प्रमाणात आपल्याला सिंचनाची व्यवस्था करता येऊ शकेल. या दृष्टीकोनातून कॅबिनेटमध्ये निर्णय घेतले. त्यावर बरीच चर्चा झाली होती. आपल्याकडे जी जलाशये आहेत त्यातून ठिबक सिंचनाची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर करण्याच्या संदर्भात निर्णय घेतले पाहिजेत या दृष्टीकोनातून विदर्भामध्ये बेंबळा प्रकल्पाच्या ठिकाणी जे मोठ्या प्रमाणावर पाणी साठते त्याच्या वरच्या भागामध्ये 6 टक्के पाणी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .....

वापरण्याच्या बाबतीत प्रस्ताव तयार केला आणि त्या योजनेला डेहणी उपसा सिंचन योजना असे नाव दिले. ठिबक सिंचनावर आधारित ती योजना होती. बेंबळा प्रकल्पावर वरच्या भागाकरिता ही योजना घेतली. त्या भागामध्ये अत्यंत कमी पाऊस पडत होता आणि पाहिजे तसे उत्पादन मिळत नव्हते. तेथील 20 हजार एकर कोरडवाहू शेतीला ठिबक सिंचनाव्दारे पाणी मिळू शकेल अशी योजना त्या ठिकाणी प्रस्तावित केली. शासनाने त्या योजनेला मान्यता दिली. पाटबंधारे विभागाकडे त्याचे टेक्निक नसताना इतर विभागाकडून ते टेक्निक घेऊन अत्यंत चांगल्या पध्दतीने ती योजना केली. बेंबळा नदीतील बॅकवॉटरचे 6 टक्के पाणी आणावयाचे आणि त्यावर 20 हजार एकर जमीन ओलिताखाली आणावयाची अशी योजना होती. त्यामध्ये 10 ते 12 मोठी कोरडवाहू गावे येतात. इतर ज्या लिफ्ट इरिगेशन योजना आहेत त्यामध्ये पाणी उचलून उंच भागामध्ये घेऊन जावयाचे आणि त्या ठिकाणाहून इरिगेशनचे कॅनॉल काढून शेतीपर्यंत पाणी घेऊन जावयाचे, अशी योजना असते पण ही वेगळी योजना आहे. ही योजना करीत असताना 20 हजार एकर शेतीला ठिबक सिंचनाव्दारे पाणी द्यावयाचे होते. ज्यावेळी असा विचार करतो त्यावेळी त्या शेतीमध्ये कोणते पीक घेऊ शकू या संदर्भात त्या 20 हजार एकर जमिनीचा अभ्यास केला. त्यानंतर त्या शेतीचा उतार कसा आहे आणि कोणत्या पध्दतीने ठिबक सिंचनाची पाईपलाईन जोडली पाहिजे याचा विचार झाला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

या सगळया पध्दतीने ज्यांच्या शेतीसाठी ठिबक सिंचनाची आवश्यकता असेल त्यांच्यासाठी ही योजना आणली आहे. तसेच एखाद्या शेतकऱ्यांनी ठिबकचे पाणी माझ्या शेतीला नको असे ठरविले तर संगणकाद्वारे पाणी बंद करण्याची व्यवस्था या व्यवस्थेमध्ये केली आहे. 24 तास वीज राहील अशीही व्यवस्था केलेली आहे. शेतात जाण्यासाठी, व्यवस्था पाहण्यासाठी रस्त्यांची व्यवस्था केली आहे. उत्पादन होणारा नॅशनल हायवेचा रस्ता तीनपदरी, चौपदरी करण्याची व्यवस्था केली आहे. एकूणच नवीन पध्दतीची संकल्पना घेऊन त्या भागातील सिंचन व्यवस्था ठिबकद्वारे झाली पाहिजे. बेंबळ्यामधून सिंचन व्यवस्था खालच्या भागामध्ये होणार आहे जवळजवळ 2 हजार कोटीची व्यवस्था झाली आहे. 25 टक्के ओलितासाठी 6 टक्के पाण्यामधून होईल आणि 300-400 कोटी रुपयांमध्ये अशी व्यवस्था या योजनेद्वारे होणार आहे. ठिबक सिंचनासाठी 75 टक्के अनुदान देण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. या योजनेसाठी 90 टक्के अनुदान शेतकऱ्यांना देण्याचा प्रस्ताव आम्ही पाठविलेला आहे. या योजनेचे जवळजवळ 70 ते 80 टक्के काम झालेले आहे. सर्व मशिनरी आलेली आहे. मोटर्स आलेल्या आहेत, पाईप लाईन टाकून झालेली आहे. छोट्या पाईप लाईन्स टाकल्या आहेत, रस्ते तयार झालेले आहेत. गोदाम झाले आहेत. शेतकऱ्यांना ठिबक शेती करावयाची असेल तर कोणत्या प्रकारची करता येईल, कशाप्रकारे देखभाल दुरुस्ती केली पाहिजे यासंबंधी प्रशिक्षण देण्यासाठी हॉल बांधला आहे. त्यासाठी 2 कोटी ते 2 कोटी 50 लाख इतका खर्च झाला आहे. त्याठिकाणी शेतकऱ्यांचे प्रशिक्षण सुरु आहे. ही सर्व यंत्रणा उभी केल्यावर महाराष्ट्रामध्ये अशी कोठेही यंत्रणा नाही. देशात कोठेही 20 एकर शेतीसाठी सरळ ठिबक सिंचनाद्वारे पाणी जाईल आणि त्या शेतकऱ्यांनी नाही म्हटले त्या शेतकऱ्यांचे पाणी थांबविले जाईल आणि तेवढीच आकारणी केली जाईल. अशाप्रकारची व्यवस्था या योजनेद्वारे केली आहे. जर ही योजना यशस्वी होऊ शकली तर संपूर्ण राज्यामध्ये जे जलाशय आहेत त्यांच्याद्वारे सिंचन व्यवस्था करता येईल. भविष्यामध्ये ज्या योजना हाती घेणार आहोत तेथे अशा प्रकारच्या योजना घेता येतील व सिंचन क्षमता अधिक बळकट करण्यासाठी पाऊल टाकले जाईल.

आज जवळजवळ 300 ते 325 कोटी रुपये खर्च झाले असावेत. मोटर्स, संगणक आलेले

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.माणिकराव ठाकरे....

आहेत. संपूर्ण यंत्रणा उभी राहिली आहे.  यावर्षी त्या योजनेसाठी पुरेसा पैसा दिला नाही तर ही योजना अयशस्वी झाली असे म्हटले जाईल. म्हणजे नेहमी सारखी ओरड होईल. मी सन्माननीय राज्यमंत्र्यांबरोबर बैठक घेतली आहे. त्यावेळी त्यांनी 20 कोटी रुपये देण्याचे मान्य केले आहे. परंतु या योजनेची माहिती रेकॉर्डवर यावी हाही उद्देश आहे.  शासनाच्या माध्यमातून या योजनेला आवश्यक तेवढा पैसा देण्याचे मंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले तर अधिकाऱ्यांना माहिती होईल. अधिकारी तेथे जात नाहीत. तसेच नवीन नवीन संकल्पना राबविण्याची कोणाची तयारी नसते. जे काही रुटीन काम असते, कामाचे टेंडर काढावयाचे ते मंजूर करावयाचे म्हणजे मर्यादित इंटरेस्ट अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झाला आहे. त्यामुळे ही योजना कोठेही रखडू नये, शासनाचे लक्ष केंद्रीत करावे. एक चांगली योजना, राज्यात कोठेही नसलेली, 20 एकर शेतीला ठिबक सिंचनाद्वारे पाणी पुरवठा करणारी योजना यशस्वी करण्यासाठी शासनाने सर्वतोपरी सहकार्य करावे.  इतर विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्यामुळे मी या एकाच मागणीवर माझे विचार व्यक्त केले आहेत. या मागणीकडे शासनाने अधिक लक्ष द्यावे अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:15

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलले) : सभापती महोदय, सन 2010-2011च्या पुरवणीमागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 70 वरील बाब क्रमांक 66 संबंधी बोलत असताना मी सांगू इच्छिते की, आताच आमचे नेते सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी ठिबक सिंचनाच्या मुद्याला हात घातला. ठिबक सिंचनाच्या बाबतीत मला शासनाला विनंती करावयाची आहे की ठिबक सिंचनासाठी 100 टक्के अनुदान कसे देता येईल आणि स्प्रिंकल सेटसाठी देखील 100 टक्के अनुदान कसे देता येईल हे पहावे. ठिबक सिंचनामुळे आणि स्प्रिंकलमुळे जमिनी भुसभुशीत होतील,जमिनीमध्ये पाणी मुरण्याची प्रक्रिया वाढेल आणि त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढेल. म्हणून याबाबतीत शासनाने पाऊल उचलणे गरजेचे आहे. जर आपण जल पुनर्भरणाची प्रक्रिया, ठिबक सिंचनाची प्रक्रिया, स्प्रिंकलची प्रक्रिया कार्यान्वित करुन त्यासाठी भरीव अनुदान दिले तर निश्चितच दरडोई उत्पन्न वाढेल, मानव विकास निर्देशांक वाढेल आणि विकासाच्या दृष्टीने आपले एक पाऊल पुढे पडलेले असेल.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, नामदार श्री. अजितदादा पवार हे जलसंपदा मंत्री असताना त्यांनी विदर्भ, मराठवाडा आणि इतरही मागासलेल्या भागाचा अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न केला. तरीही भौतिक बॅकलॉग दूर झालेला नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असा उल्लेख आहे की, भरीव अशा प्रकारची तरतूद करुन 1.25 लाख हेक्टर नवीन सिंचन क्षमता आपण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यामध्ये विदर्भ-मराठवाड्यातील सिंचनाचे क्षेत्र जास्तीत जास्त असावे अशा प्रकारची अपेक्षा मी या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने जलसंपदा खात्यालाकडे करीत आहे. बीड जिल्ह्यामध्ये ब-याच वर्षापासून मांजरा खो-याचे पाणी आम्हाला मिळत नाही. मी आतापर्यन्त जवळपास 5 ते 6 वेळा पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या माध्यमातून, विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या माध्यमातून शासनाला विनंती केलेली आहे. आम्हाला अनेक वर्षापासून मांजरा खो-याचे पाणी मिळणे बंद झालेले आहे. मांजरा खो-यामध्ये अनेक साठवण तलाव आहेत आणि बीड जिल्हा हा मागासलेला जिल्हा असल्यामुळे हे मांजरा खो-याचे पाणी आम्हाला देण्याच्या दृष्टीने शासनाने ताबडतोबीने निर्णय घ्यावा अशी मी विनंती करते. बीड जिल्ह्यामध्ये ज्याची वर्षानुवर्षे मागणी होत आहे असे कासारी, मैंदवाडी, बुटेनाथ, दौंडवाडी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

क्रमांक 3, मांडवा, दहिफळ वडमाऊली, हनुमान गड, गहिनीनाथ गड व अन्य काही साठवण तलाव आहेत. या साठवण तलावांची अत्यंत निकड आहे. त्या भागामध्ये कोरडवाहू शेतकरी आहेत. त्यांचे जीवनमान पाण्याअभावी कठीण झालेले आहे. परिणामी ऊस तोड कामगार म्हणून त्यांच्यावर स्थलांतर करण्याची पाळी येते. तेव्हा हे सर्व तलाव करण्याच्या दृष्टीने जलसंपदा खात्याने विशेष प्रयत्न करावेत. माननीय राज्यमंत्री श्री. प्रकाशदादा सोळंके यांच्या प्रयत्नातून गोदावरीचे पाणी माजलगाव धरणात आणि माजलगावचे पाणी मांजरा खो-यात आणि वान खो-यात टाकण्याची एक महत्वाकांक्षी योजना कार्यान्वित होत आहे. या योजनेला प्राधान्य क्रम देऊन गती देणे गरजेचे आहे ज्यायोगे धारुर तालुका, परळी तालुका, केज तालुक्याचा काही भाग सिंचनाखाली येऊ शकेल. वान खो-याचा उल्लेख केल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे समाधानाने हसले. कारण त्यांच्याही क्षेत्राला त्याचा फायदा होणार आहे.

सभापती महोदय औरंगाबाद जिल्हयामध्ये असलेल्या गोदावरी नदीवरील पैठण जवळच्या कालव्यामुळे बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील 70 ते 80 गावातील शेतीला पाणी मिळत असते. तथापि, सन 1993मध्ये निर्माण झालेल्या कालव्याची व वितरिकांची दुरुस्ती अनेक वर्षापासून करण्यात आलेली नाही. परिणामी कालवा व वितरिका जवळ मोठ्या प्रमाणावर बाभळाची झाडे उगवलेली आहेत. याचे दोन दुष्परिणाम होतात. एक तर वितरिकेतून पाण्याची गळती होते आणि जमिनी नापिक होतात. जमिनी कोरडवाहू व्हायला लागल्यामुळे उत्पादनावर त्याचा मोठ्या प्रमाणावर परिणाम होत आहे. आपण करोडो रुपये खर्च करुन एवढा मोठा नाथसागर प्रकल्प बांधलेला आहे त्याचे पाणी बीड जिल्ह्याला मिळण्याच्या दृष्टीने या कालव्याची ताबडतोबीने दुरस्ती होणे आवश्यक आहे. उडवणी तालुक्यामध्ये उर्ध्व कुंडिलिका प्रकल्पाचे काम चालू आहे. काही शेतक-यांचे भूसंपादनाचे ॲवार्ड झालेले आहेत. काही शेतक-यांचे ॲवार्ड प्रक्रियेमध्ये आहेत. जैतापूर प्रकल्पाच्या बाबतीत लोकांनी मोठ्या प्रमाणावर उठाव केल्यानंतर त्यांच्याशी संवाद करुन एकरी किमान 15 लाख रुपये देण्याची शासनाची मानसिकता तयार झालेली आहे. मला विनंती करावयाची आहे की, बीड जिल्ह्यामध्ये जेथे हा उर्ध्व कुंडलिका प्रकल्प होत आहे तेथील शेतक-यांना एकरी 25 ते 30 हजार रुपये या पध्दतीने ॲवार्ड होत आहे. मी स्वत: माहिती घेतली

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

त्यावेळी असे समजले की, एका शेतक-याने त्याच्या शेतामध्ये कापसाचे उत्पादन घेतले होते. 10 एकरामध्ये 30 लाख कापसाचे उत्पादन झाले होते.

...नंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 18:20

ॲड.उषा दराडे........

ते जर या पध्दतीने कापसाचे उत्पादन काढत असतील तर 10 एकराला फक्त 3 लाख रुपये देऊन कसे भागणार? या शेतकऱ्यांनी जगायचे कसे? त्यांचे कुटुंब उघड्यावर पडणार आहे. सभापती महोदय, उर्ध्व कुंडलिका प्रकल्पाबाबत शासनाने शेतकऱ्यांशी संवाद साधावा. ॲग्रीमेंट घडवून आणण्याचा प्रयत्न करावा आणि शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात भरपाई कशी मिळेल यादृष्टीने भूमिका स्वीकारावी.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 131, बाब क्रमांक 153. बीड जिल्हयात बीड शहरामध्ये गेल्या एक वर्षात 1365 मुले आणि 800 मुलींचा जन्म झाला. महाराष्ट्रात सर्वात वाईट असे हे प्रमाण आहे. या संदर्भात शासनाने योजना राबवावी. शासनाने या संदर्भात एक समिती नेमली आहे. त्या समितीची मी सदस्या आहे. बीड जिल्हयामध्ये योजनेच्या माध्यमातून आजचे व्यस्त असलेले प्रमाण कमी करुन मुलांच्या व मुलींच्या जन्मदरामध्ये समानता कशी येईल यासाठी प्रयत्न करावेत. सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभागाने बालकाश्रम योजना सुरु केलेली आहे. ही योजना योग्य पध्दतीने चालू आहे. दोन्ही बालकाश्रमांना एकाच मापात तोलले जात आहे. बालकाश्रम मंजूर झाल्यापासून चांगल्या पध्दतीने चालू आहे त्यांच्यासाठी मागणी न केल्यामुळे एकही पैसा दिला गेला नाही. जे सुरु नाहीत त्यांना पैसा देण्याचा प्रश्न नाही. ही जी त्रुटी आहे ती दूर केली पाहिजे.

सभापती महोदय, अनेक वर्षापासून आम्ही सांगत आहोत की, महिला आयोगाचे गठन का केले जात नाही? ही वैधानिक बॉडी आहे. महिलांच्या दृष्टीने कायदे सुचवू शकते. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आणि मी देखील अनेकदा सभागृहात मागणी केली. इतर महामंडळाची पुनर्रचना करु नका. परंतु किमान महिला आयोगाचे गठन ताबडतोब केले पाहिजे अशा प्रकारची शासनाला विनंती करते. मूल म्हटले की, आईचा संबंध आला. आई आणि मुलाचा संबंध असतो. वडिलांचा संबंध तितका महत्वाचा नाही. महिला व बालकल्याण हे खाते एकत्रित न ठेवता महिला कल्याण खाते स्वतंत्र असावे व बालकल्याण खाते स्वतंत्र असावे. जेंडर सेन्सिटिव्ह बजेट आणण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा अशा प्रकारची विनंती करते.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 113, बाब क्रमांक 96. 15 जुलै, 2010 पासून शासनाने 'डॉक्टर तुमच्या दारी' ही योजना सुरु केली आहे. बीड जिल्हयात एकही डॉक्टर कोणत्याही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे........

गावात गेलेला दिसून आला नाही. जिल्हा परिषदेच्या आरोग्य खात्यात कंत्राटी पध्दतीने परिचारिका, अधिसेविका, आशा कामगार कार्यरत आहेत. 24 मार्च रोजी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण मंडळाच्या वतीने मोर्चा काढण्यात येणार आहे. अनेक वर्षापासून त्यांच्या काही मागण्या प्रलंबित आहेत. बंधपत्राची अट लागू करावी. अर्ध सेविकांना 3000 रुपये मानधन देण्यात यावे. आरएचएम व आरसीएच अंतर्गत परिचारिकांना पीटीए लागू करण्यात यावा. आशा कामगारांना रोख स्वरुपात मानधन देण्यात यावे. या मागण्यांकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 33, पृष्ठ क्रमांक 31. शालेय शिक्षण विभागांतर्गत कानडी माळी, ता.केज, जि.बीड येथे वस्तीशाळेचे प्राथमिक शाळेत रुपांतर झाले. शाळेतील निमशिक्षक डी.एड करण्यासाठी रजेवर गेले. मुख्याध्यापक नातेवाईकाच्या आजारपणामुळे 25 दिवसापासून रजेवर आहेत. 25 दिवसांपासून शाळेत कोणी नाही. शाळेला कुलूप ठोकले आहे. खोल्या पडायला आलेल्या आहेत. तीन वर्षापूर्वी बांधकाम करण्यात आले होते. तेथील मुले जीव मुठीत घेऊन शाळेत बसत आहेत. तेथील शौचालय देखील वापरण्यायोग्य नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 96, पृष्ठ क्रमांक 113. वडवणी, ता.केज, जि.बीड येथील आरोग्य केंद्राला मरणकळा आलेली आहे. चार वैद्यकीय अधिकाऱ्यांची गरज असताना फक्त एकच अधिकारी असून ते देखील प्रभारी आहेत. शहरात राहून ग्रामीण भागाचा कारभार करीत आहेत. याकडे शासनाने विशेष लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 78, पृष्ठ क्रमांक 92. केज तालुक्यात वितरणासाठी 5 लाख लीटर केरोसिनची आवश्यकता आहे. यापैकी 3.60 लाख लीटर केरोसिनचा पुरवठा केला जातो. 30 टक्के कमी पुरवठा होत असल्यामुळे त्याचा परिणाम वितरणावर होत आहे. याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, एक अत्यंत गंभीर प्रश्न आहे. महिला व बालकल्याण विभाग, गृह विभागाशी संबंधित प्रश्न आहे.

नंतर 3झेड.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले....... 18:25

ॲड. उषा दराडे.......

बाब क्र. 96, पृ.क्र. 113, सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित हा विषय असून समाजाच्या दृष्टीने अतिशय शरमेची बाब आहे. केज येथील बस स्थानकामागील कुंटणखान्यावर 15 दिवसापूर्वी पडलेल्या छाप्यात अल्पवयीन मुलींसह 16 महिलांना संरक्षण गृहात दाखल केले. त्यातील आठ महिलांना एचआयव्ही, सिकीलीसची लागण झाल्याचे आढळून आले, त्या सर्व महिलांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे आणि जेथे जेथे अशा वस्त्या असतील त्या शोधून पुन्हा पोटाची खळगी भरण्यासाठी शरीर विक्रय करण्याची वेळ येणार नाही याकडे शासनाने लक्ष द्यावे व त्यांचे पुनर्वसन करावे. तसेच गेवराई तालुक्यात प्रकल्प 1 व 2 मधील 15 बालविकास केंद्रामध्ये 150 बालके कुपोषित आढळून आली. त्यांना मध्य तीव्र (मॅम) व गंभीर तीव्र (सॅम) ग्राम बाल विकास केंद्रात दाखल केले. त्यापैकी 8 बालकांची प्रकृती सुधारत आहे पण कुपोषित बालके होणे ही अत्यंत वाईट गोष्ट आहे व त्याचा शासनाने विचार करावा.

महोदय, बाब क्र. 30, पृ.क्र. 27 पशुवैद्यकीय विभागाच्या संदर्भात मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, बीड जिल्ह्यात एकूण 162 पशुवैद्यकीय दवाखाने असून कर्मचारी वर्ग अपुरा आहे. तसेच यातील बऱ्याच दवाखान्यांमध्ये बाहेरुन औषधे आणायला सांगितले जाते. त्याचबरोबर आश्चर्याची गोष्ट म्हणजे परळी येथील पशुवैद्यकीय दवाखाना पुलाखाली चालतो. हा प्रश्न अनेक वेळा सभागृहात देखील उपस्थित केला आहे. एकदा मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, या दवाखान्यासाठी 20 लाख रुपये देण्यात येतील पण लोकांची अशी मागणी आहे की, हा दवाखाना दुसऱ्या ठिकाणीच घेण्यात यावा, पण गेल्या तीन चार वर्षात यामध्ये काहीच निर्णय घेतला गेला नाही. या निमित्ताने मी अशी मागणी करणार आहे की, हा पुलाखाली चालणारा परळी येथील पशुवैद्यकीय दवाखाना दुसरीकडे शिफ्ट करावा तसेच त्याला वॉल कम्पाऊंडची व्यवस्था करावी. तसेच जिल्ह्यातील 162 पशुवैद्यकीय दवाखान्यांचा आढावा घेऊन सन्माननीय सदस्यांना बोलवावे व सचिवांबरोबर चर्चा घडवून आणावी व हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा, एवढे बोलून मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले पुन्हा आभार मानते व माझे भाषण पूर्ण करते.

------

.....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन 2010-11 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, प्रामुख्याने मला बाब क्र. 83, पृ.क्र.27 च्या अनुषंगाने पशुवैद्यकीय विभागाच्या संदर्भात माझे विचार मांडताना शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, लाल्या व खुरकुत्या रोग हद्दपार करण्यासंबंधी शासनाने व्यवस्थित पावले उचलली व त्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे पण प्रत्यक्ष या रोगाची लस उपलब्ध असणे आवश्यक आहे. गेल्या पाच महिन्यात मात्र ही लस उपलब्ध झालेली नाही. या मागणीच्या निमित्ताने मी अशी सूचना करणार आहे की, शासनाने या लसीच्या खरेदीसाठी दिलेला निधी अत्यल्प आहे त्यात वाढ करावी.

यानंतर बाब क्र. 35, पृ.क्र. 31 च्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भात मला असे सूचित करावयाचे आहे की, न्यायालयाच्या आदेशानुसार अर्धवेळ ग्रंथपाल म्हणून नियुक्ती केलेल्या ग्रंथपालाला शासनाने पूर्णवेळसाठी मान्यता दिलेली आहे. पण संपूर्ण राज्यात असे बरेच ग्रंथपाल कार्यरत आहेत, ते बऱ्याच वर्षांपासून काम करीत असताना त्यांना कोणालाच अशी मान्यता दिलेली नाही, हे योग्य वाटत नाही. म्हणून या निमित्ताने मी अशी मागणी करणार आहे की, आज राज्यातील शाळांमध्ये हजारो ग्रंथपाल अर्धवेळ तत्वावर काम करीत आहेत, ते मान्यतेसाठी चकरा मारत आहेत त्यांना मान्यता देण्यात यावी.

महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्र. 78, पृ.क्र.92 च्या संदर्भात मला शासनाच्या निदर्शनास आणावयाचे आहे की, राज्यातील अन्नधान्य वितरण योजना पूर्णपणे कोलमडलेली आहे. सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे यांनी आताच एक मुद्दा उपस्थित केला की, बीड जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये व्यवस्थितपणे पुरवठा केला जातो तर काही तालुक्यात तो योग्य प्रकारे केला जात नाही........

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंढे...

बीड जिल्हयातील काही तालुक्यांमध्ये रेशन धान्य पुरवठा चांगल्या प्रकारे केला जातो परंतु काही ठिकाणी रेशन धान्य पुरवठा चांगल्या प्रकारे केला जात नाही. नियमाप्रमाणे 15 तारखेच्या आत रेशन धान्याचा पुरवठा दुकांनामध्ये केला गेला पाहिजे व 20 तारखेपर्यंत लाभार्थ्याला धान्य मिळाले पाहिजे. परंतु गेल्या अनेक वर्षापासून 20-20 तारखेपर्यंत रेशन दुकानात धान्याचा पुरवठा केला जात नाही व 20 तारखेच्या नंतर लाभार्थी रेशन दुकानात जातो तेव्हा माल संपलेला आहे असे रेशन दुकानदार लाभार्थ्याला सांगतो व लाभार्थ्याला पुन्हा पुढील 20 तारखेची वाट पहावी लागते. मधील काळात हा रेशन माल बाहेर विकला जातो अशी अनेक उदाहरणे आपल्याला आढळून आलेली आहेत. रेशन वितरण व्यवस्थेमध्ये चांगल्या प्रकारचे काम व्हावे यासाठी वेगळा निधी द्यावा लागला तरी शासनाने तो द्यावा परंतु ही वितरण व्यवस्था शासनाने व्यवस्थित करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, मी आता वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या पृष्ठ क्रमांक 119, बाब क्रमांक विभाग 98 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्यातील विविध रुग्णालयांना अनुदान देण्याबाबतचा मुद्दा आहे. ग्रामीण भागातील वैद्यकीय महाविद्यालय म्हणून आशिया खंडात एकेकाळी लौकिक असलेले अंबेजोगाईचे स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची अवस्था आज फार भयानक झाली आहे. या ठिकाणी 191 पदे रिक्त आहेत. या महाविद्यालयात प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता अशा एकूण 191 पदे रिक्त आहेत. सद्याच्या परिस्थितीत कोणत्याही दवाखान्यात यंत्रसामुग्री शिवाय आज कोणताही इलाज होऊ शकत नाही. या ठिकाणच्या रुग्णालयात सिटी स्कॅन,मेमो ग्राफी, डायलेसीस, सोनोग्राफी, कलर डॉपलर अशी यंत्र आहेत परंतु ही सर्व यंत्र बंद पडलेली आहेत. मी जबाबदारीने सांगू इच्छितो की, ज्या दिवशी ही सर्व यंत्रसामुग्री दवाखान्यात नवीन आली त्या दिवसापासून आज पर्यंत या मशिनरीज चालवल्या गेल्या नसल्यामुळे ती बंद पडलेली आहेत. ही सर्व यंत्रणा चालविण्यासाठी प्रशिक्षित टेक्नीशियन्स न दिल्यामुळे ही यंत्रे बंद पडलेली आहेत. या मशिन्स चालू न होताच बंद पडलेल्या आहेत. हे शासकीय रुग्णालय इतर दवाखांन्यांमध्ये पेशंटला रेफर करीत आहे. या ठिकाणी सर्व यंत्रसामुग्री आहे परंतु ती चालविण्यासाठी कर्मचारी वर्ग नसल्यामुळे ही सर्व यंत्रे बंद पडलेली

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंढे...

आहेत. त्यामुळे एकेकाळी आशिया खंडात नावलौकिक असलेल्या स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या बाबतीत विचार करणे आवश्यक आहे. यापूर्वी अशा रुग्णालयांना शासनाने मदत देऊन ती चांगल्या प्रकारे सुरु केल्याची अनेक उदाहरणे आहेत. या पुरवणी मागणीच्या माध्यमातून मला अशी विनंती करावयाची आहे की, एकेकाळी आशिया खंडात नाव लौकिक असलेल्या मराठवाडयातील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी लागणा-या सर्व सुविधा पुरविण्यात याव्यात तसेच जी 191 पदे या ठिकाणी रिक्त आहेत ती पदे सुध्दा लवकरात लवकर भरण्यात यावीत.

सभापती महोदय, रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या बाब क्रमांक 128,129 व 130 व पृष्ठ क्रमांक 148 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. किमान कौशल्यावर आधारित उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचे शिक्षण देणा-या विना अनुदानित संस्थामधील कर्मचारी वेतनासाठी मागील 12 वर्षापासून सातत्याने संघर्ष करीत आहेत. स्वत:च्या पायावर उभे करणारे शिक्षक आज शासनाच्या सोयी-सवलतीपासून वंचित आहेत. मोर्चे, उपोषणे, निवेदन देऊनही शासनाने या व्यवस्थेकडे दुर्लक्ष केलेले आहे. दर वर्षी 80 हजार विद्यार्थ्यांना शिक्षण देणा-या शिक्षकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झालेली आहे. त्यामुळे व्यवसाय अभ्यासक्रमाचे निदेशक व शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतन अनुदान देण्याची गरज आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

सर्व विनाअनुदानित संस्थांना बांधकाम व साहित्य याकरिता अनुदान देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर संस्थांना व विद्यार्थ्यांना वेतनेतर अनुदान देण्यात आले पाहिजे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना ई.बी.सी. व इतर सवलती चालू करण्यात याव्यात, अशी मी पुरवणी मागणीच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 171 बाब क्रमांक 141, ही बाब सांस्कृतिक कार्य विभागाशी सबंधित असून या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, भरत नाटय संशोधन मंदिर या नाटय मंदिराच्या नूतनीकरणासाठी तरतूद करण्यात आली आहे. या सभागृहात मागच्या वेळी पुरवणी मागणीच्या निमित्ताने बोलत असतांना एक मागणी केली होती. मराठवाडयातील एकनाथ नाटय मदिरानंतरचे सर्वात जुने नाटयगृह हे परळी येथील नटराज रंग मंदिर आहे. जवळजवळ 25 वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या नटराज रंग मंदिराची अवस्था अत्यंत वाईट आहे. मी मागच्यावेळी या संदर्भात मागणी केली होती आणि आज पुन्हा या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो की, परळी येथील नटराज रंग मंदिराच्या नूतनीकरणासाठी शासनाने पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा. सभापती महोदय, पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या निमित्ताने आपण मला बोलण्याची संधी दिली म्हणून आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.जयहिंद जय महाराष्ट्र.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभागाची बाब क्रमांक 140 व 141 पान क्रमांक 172 संबंधी मला प्रथम बोलावयाचे आहे. या मागणीवर बोलत असतांना सन्माननीय सदस्य श्री धनंजय मुंडे यांनी जो उल्लेख केला होता त्या संदर्भात मी सर्व प्रथम शासनाचे आभार मानतो. भरत नाटय संशोधन मंदिर या संस्थेला 119 वर्षे पूर्ण झाली असून महाराष्ट्रातील आणि देशातील नाटय संशोधन करणारे हे अतिशय जुने नाटय केन्द्र असून त्या संदर्भात दोन वर्षापूर्वी शासनाने निर्णय घेतला होता. त्याबाबतीत जीआर काढण्यात आला. परंतु दुर्देवाने अर्थसंकल्पात तरतूद केली गेली नाही. . या वर्षीच्या पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करुन भरत नाटय मंदिराच्या नूतनीकरणासाठी निधी उपलब्ध करुन दिल्या बद्दल मी सांस्कृतिक कार्य विभागाचे मंत्री श्री.संजय देवतळे यांचे आणि शासनाचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी जो मुद्दा मांडला होता तो अतिशय महत्वाचा आहे. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी एक घोषणा केली होती ती घोषणा मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. त्यावेळी त्यांनी अशी घोषणा केली होती की, अशा प्रकारच्या ज्या ज्या संस्था महाराष्ट्रात काम करीत आहेत आणि ज्या संस्थांना 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत अर्थात केवळ हाच निकष नव्हे तर ज्या संस्थांना 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत आणि ज्या संस्था अजूनही उत्तम काम करीत आहेत, अशा संस्थांची,संशोधन केन्द्राची, नाटयगृहाची किंवा सांस्कृतिक सभागृहाची किंवा ग्रंथालयाची अवस्था वाईट असेल तर अशा संस्था निवडून त्या संस्थांमध्ये सुधारणा करण्याकरिता जेवढा जास्तीत जास्त निधी देता येईल तेवढा निधी त्यांना देण्यात यावा. अशी मी पुरवणी मागण्याच्या निमित्ताने शासनाला आणि सांस्कृतिक कार्य विभागाच्या मंत्र्यांना विनंती करीत आहे.

सभापती महोदय यानंतर मला दुसरा एक मुद्दा याठिकाणी मांडावयाचा आहे सांस्कृतिक कार्य विभागामध्ये काही बदल झाला आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. परंतु आज जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज यांची बीज आहे. म्हणजेच सदैव वैकुंठगमनाचा आजचा दिवस असून आज

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार...

लक्षावधी वारकरी देहूला जमले आहेत. ज्या तुकोबा महाराजांनी असे सांगितले की, आपुले मरण पाहिले मी डोळा, काय तो सोहळा वर्णावा " तुकोबा मृत्युंजय असून त्यांची चतु: जन्म शताब्दी गेल्या वर्षभर साजरी होत आहे. त्याचा अजून थोडा कालावधी राहिलेला आहे. हे वर्ष साजरे करण्यासाठी शासनाने एक समिती नेमली होती. देवस्थान आणि संस्थांनी त्या संबंधीचा कार्यक्रम तयार केला होता. त्याचबरोबर महामहिम राष्ट्रपती त्या दिवशी या कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. देहू संस्थानच्या वतीने तो कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सन 1992 साली ज्ञानेश्वरांची सप्त शताब्दी शासनाच्या वतीने पैठण येथे साजरी करण्यात आली होती. त्याचबरोबर त्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. दुर्देवाने काही घटनांमुळे किंवा अन्य काही कारणामुळे जगद्‌गुरु संत तुकाराम महाराजांच्या चतु:शताब्दीचा एकही कार्यक्रम शासनाच्या वतीने होऊ शकला नाही. हा कार्यक्रम म्हणजेच केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नव्हे तर या वेळी भागवत संप्रदायाच्या संतांनी मानवतेचे, जाती निर्मूलनाचे, व्यसन मुक्तीचे तसेच पर्यावरणाचे प्रबोधन केले होते. आज आपल्यासमोर पर्यावरणाचा महत्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

पर्यावरणाबद्दल सुध्दा संतांनी सांगितले आहे. त्यांचे समाज प्रबोधन करणे, त्यांच्यामध्ये सामाजिक जागृती आणणे म्हणजे चतु:जन्मशताब्दी साजरी करणे. यानिमित्त शासनाने कार्यक्रम हाती घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे. चतु:जन्मशताब्दी वर्षाचा काही काळ निघून गेला असून आता काही महिने शिल्लक राहिले आहेत. याकरिता शासनाच्या वतीने आपल्याला काही करता येईल? आपणास माहीत आहे की, 1992 साली पैठण येथे ज्ञानेश्वरीचा मोठा कार्यक्रम केला होता. या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मी शासनाला विनंती करतो की, शासनाने याबाबत अजूनही विचार करुन शासनाने कार्यक्रम करावेत. सभापती महोदय, 1973 साली करण्यात आलेल्या प्रयत्नांमुळे पंढरपूर मंदिर समितीचा ॲक्ट शासनाने पारित केला होता. त्या ॲक्टनुसार पंढरपूर येथे जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्थापन करावे याकरिता तरतूद करण्यात येऊन त्याचा आराखडा तयार करण्यात आला. त्यानंतर पंढरपूर मंदिर समितीने ती इमारत बांधून तयार ठेवली आहे. सर्व योजना तयार असताना दुर्दैवाने आजही जैसे थे परिस्थिती आहे. म्हणून माझी आपणास विंनती आहे की, पैठण येथील मूळ विद्यापीठाचा आराखडा वैकुंठवासी बाळासाहेब भारदे, साखरे महाराज, यु. म. पठाण, प्राचार्य राम शेवाळकर या सर्वांनी मिळून तयार केला आहे तो तसाच पडून आहे. पैठणचे संतपीठ केंद्र सरकारच्या पर्यावरण कायद्यातील जाचक अटींमुळे अडकून पडले आहे, दुर्दैवाने ते आजही कार्यरत नाही. सदरचे संतपीठ आता कुठल्यातरी विद्यापीठाच्या अखत्यारीत समाविष्ट करण्याचा विचार सुरु असल्याची बातमी वर्तमानपत्रात छापून आली होती. वर्तमानपत्रातील ती बातमी सत्य आहे की नाही हे मला माहीत नाही. जर ती सत्य असेल तर ते चुकीचे होईल. वैकुंठवासी बाळासाहेब भारदे यांनी सदर संतपीठाला वारकरी विद्यापीठ असे नाव देऊ नका असे मुद्दाम सांगितले होते. याचे कारण विद्यापीठ म्हटले की, त्याठिकाणी विद्येचे पीठ होते. म्हणून त्याठिकाणी त्यांनी पीठ या शब्दाचा अर्थ व्यापक असल्याचे सांगितले होते. असे हे पैठणचे संतपीठ अर्धवट पडले आहे, ते कार्यरत नसल्यामुळे कोणत्याही विद्यापीठामध्ये समाविष्ट करु नका.

शासनाने 1973 साली कायदा केल्यानंतर मंदिर समितीने त्याचा संपूर्ण आराखडा तयार करुन दिला होता. आज सुध्दा ती इमारत मंदिराच्या उजव्या बाजूला बांधून तयार आहे. त्याठिकाणी जगदगुरु संत तुकाराम महाराजांच्या चतु:जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने महाराजांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार....

नावाने भागवत संप्रदायाचे एक व्यापक, वैश्विक, अद्वैत तत्वज्ञानाचे हे संतपीठ तुम्हा-आम्हाला करावयाचे आहे, त्या आधारे सर्व समाज सर्व धर्म एकत्र करावयाचा आहे. त्याठिकाणी सर्व संतांचे वाङ्मय एकत्र असावे अशी एक कल्पना असून आपण ती प्रत्यक्षात आणली पाहिजे. माननीय सदस्य श्री. माणिकरावजी ठाकरे साहेब आपण विदर्भातील आहात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जन्मशताब्दी देखील आता सुरु आहे. त्याकरिता निर्माण करण्यात आलेल्या समितीची बैठक दुर्दैवाने अद्यापि होऊ शकली नाही. मी आपणास विनंती करतो की, ज्यांनी स्वातंत्र्य आंदोलन केले, जन जागृती केली, व्यसनमुक्ती केली त्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या "आदर्श गाव" या ग्राम गीतेचे 14 भाषांमध्ये भाषांतर करावे असे विधान भारताचे पहिले अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांनी लोकसभेत अर्थसंकल्प मांडीत असतांना पंडीत जवाहरलाल नेहरुंच्या समोर केले होते हे मी आपणास सांगतो. त्या ग्राम गीतेचे भाषांतर अनेक भाषांमध्ये झाले आहे. महाराष्ट्राच्या विकासाकरिता या ग्राम गीतेच्या निमित्ताने मला स्वर्गीय नरेंद्रजी तिडके यांची आठवण होते. त्यामुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जन्म शताब्दी वर्षाच्या निमित्ताने माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख साहेबांनी शासनामार्फत प्रयत्न करुन ग्राम गीतेची प्रत प्रत्येक गावामध्ये स्वस्तात पोहोचविली तर महाराजांची आदर्श गावाची असलेली कल्पना प्रत्यक्षात साकारण्याच्या दृष्टीने महाराजांना ती एक आदरांजली ठरेल, किंवा त्यांना अभिवादन केल्यासारखे होईल. म्हणून या जन्म शताब्दीच्या निमित्ताने शासनाने ग्राम गीतेच्या प्रती छापून महाराष्ट्रातील प्रत्येक गावामध्ये त्या पोहोचवाव्यात अशी सूचना करतो. महाराजांनी आदर्श गावाची कल्पना मांडताना गाव कसे असावे, पर्यावरण कसे राखले जावे, पाणी पुरवठा कसा असावा, पाण्याची काटकसर कशी करावी हे सर्व त्या ग्राम गीतेमध्ये सांगितले आहे. म्हणून मी याठिकाणी सांगितलेल्या दोन गोष्टी शासनाने करण्याची आवश्यकता आहे.

व्यसनमुक्तीच्या विषयावर मी जास्त बोलत नाही. शासनाजवळ सांस्कृतिक धोरण असणे अत्यंत महत्वाचे आहे. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी विकास म्हणजे काय हे सांगितले होते. विकासाच्या रथाचे जे दोन डोळे आहेत त्यामध्ये पाटबंधारे, पाणी, रस्ते, धरणे इत्यादींचा भौतिक विकास हा एक डोळा आहे आणि सांस्कृतिक विकास हा दुसरा डोळा आहे. हा दुसरा डोळा जर उघडा नसेल तर या सर्व विकासाला अर्थ उरणार नाही. असे त्यांनी सांगितले होते. माननीय मंत्री श्री. देवतळे साहेब आपणाकडे सांस्कृतिक खाते आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

म्हणून मी या सर्व गोष्टींचा याठिकाणी उल्लेख आणि ऊहापोह करीत आहे. आपण या सर्व बाबी लक्षात घेऊन सांस्कृतिक धोरणासाठी शासनाने एक व्यापक समिती नियुक्त केली होती त्यामध्ये डॉ. आ.ह. साळुंखे, प्राचार्य दत्ता भगत, अरुण टिकेकर, नाटककार शबाहत खान, कवी अशोक नायगावकर अशी सर्व मंडळी होती. त्यांनी शासनाला एक उत्तम सांस्कृतिक धोरण तयार करुन दिले. त्या धोरणाच्या निमित्ताने मराठी भाषेसाठी वेगळा विभाग निर्माण करुन माननीय मुख्यमंत्र्यांनी ते खाते स्वत:कडे ठेवले आहे आणि स्वतंत्र मराठी भाषा भवन बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . ..

पण हे सर्व करीत असताना सांस्कृतिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी समिती नेमली आहे. मात्र दुर्दैवाने त्याची एकही बैठक झालेली नाही. माझे असे म्हणणे आहे की, याबाबतीत लवकरात लवकर बैठक घ्यावी आणि या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत गतीमानता कशी आणता येईल यादृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संबंधात पान क्र.118 आणि बाब क्र.97 बाबत सांगावयाचे आहे. ससून हॉस्पिटलबाबत मुद्दा आहे. याठिकाणी मुंबई आणि पुणे, औरंगाबाद आणि नागपूर बाबत उल्लेख केलेला आहे. तसेच आंबेजोगाईच्या रुग्णालयाचे वर्णन केलेले आहे. ससून रुग्णालयाच्या इमारतीला आता 150 वर्षे पूर्ण होतील. या सगळया जुन्या रुग्णालयाच्या इमारती आहेत मग ते जे.जे.असेल, सेंट जॉर्जेस असेल किंवा ससून हॉस्पिटल असेल किंवा अंबेजागाई येथील हॉस्पिटल असेल, त्याठिकाणी मेंन्टेनन्स ग्रँट देऊन तेथील इमारती जतन करण्याचे काम करावयास पाहिजे.तसेच तेथील यंत्रणा म्हणजे जे.जे.हॉस्पिटलमधील एम.आर.आय.ची यंत्रणा आहे, ज्याचा यापूर्वी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि मी देखील उल्लेख केला होता. ती यंत्रणा अद्ययावत असून तेथील डॉक्टर देखील अतिशय उत्तम आहेत. आपल्या शासकीय सेवेमध्ये आंतरराष्ट्रीय कीर्तीचे डॉक्टर आहेत याचा तुम्हाला-मला अभिमान वाटला पाहिजे. ससून हॉस्पिटलमधील हार्ट ऑपरेशनचे केंद्र पाहिले तर ते पंचताराकित हॉटेल पेक्षाही उत्तम प्रकारे केले आहे आणि तेथील डॉक्टर देखील उत्तम आहेत. त्याठिकाणी स्वस्तामध्ये इलाज होतो. परंतु परिपूर्णता नाही. पुणे येथील एका हॉस्पिटलबाबत मी बोलत नाही. पण तेथे 50 लाखापर्यंत लोकसंख्या वाढलेली आहे आणि पिंचरी-चिंचवड मिळून एकच हॉस्पिटल आहे. पण प्रत्यक्षात तेथे दोन हॉस्पिटलची आवश्यकता आहे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, याठिकाणी सभापतीस्थानी श्री.मोहन जोशी उपस्थित आहेत आणि त्यांना माहिती आहे की, बिबवेवाडी येथील औंध येथे अशिया खंडातील सर्वात प्रसिध्द असे चेस्ट हॉस्पिटल होते. आपण तेथील काही बाबी हलविल्या. आता त्या हॉस्पिटलचे नेमके काय केले आहे हे समजत नाही. तेथील कामगार विमा योजनेचा जो आरोग्य विभाग होता. त्यासंदर्भात पुणे-सातारा रोडवरील बिबवेवाडीला अद्ययावत इमारत बांधून किती वर्षे झाली आहेत? आपल्याला सर्वांना आश्चर्य वाटेल की,या इमारतीला पाच वर्षे झाली, नवी कोरी इमारत आहे.पण हॉस्पिटल नाही. शेवटी मागच्या वर्षी आम्ही खूप भांडल्यानंतर कसा तरी ओ.पी.डी.चा एक विभाग सुरु झाला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . ..

पण सध्या तो देखील सुरु आहे की नाही याबाबत शंकाच आहे. इमारत बांधून पाच वर्षे झाली आहेत तरी देखील तेथे हॉस्पिटल नाही, माणसे नाहीत. वेगवेगळया संस्था ते हॉस्पिटल चालविण्यास तयार आहेत. आज पुणे येथील लोकसंख्या प्रचंड वाढलेली आहे आणि तेथील आरोग्य सेवा कमी पडत आहेत हे स्वाभाविक आहे. म्हणून आपण या सर्व बाबींचा विचार करावा एवढी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

. . . .4 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या संदर्भात अनेक वेळा वेगवेगळया पध्दतीच्या आर्थिक स्वरुपाची बेशिस्त दिसून येते आणि नेहमीच विविध विभागांच्या चर्चेच्यावेळी त्याकडे कधीच लक्ष वेधले जात नाही. "समर्थन" संस्थेने आम्हाला जे टिपण पाठविले आहे ते शासनाकडेही पाठविले आहे. आता अनेक नवीन मंत्री झालेले आहेत आणि त्यांना माझी खास करुन विनंती राहील. त्यांचे असे म्हणणे असते की, प्रत्येक वेळेला आकस्मिक मागण्यांचा खर्च वाढतो आणि मूळ मागण्यांच्या तुलनेमध्ये तो खर्च कितीतरी पटीने असतो. हे असे का घडते ? म्हणजे आपल्याकडे येणारी माहिती वेळेवर येत नाही काय ? प्रत्येक वेळेला पुरवणी मागण्यांच्या संदर्भात जी आर्थिक शिस्त आहे, ती पाळली जाते की नाही हे सुध्दा पहाणे अत्यावश्यक आहे याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, परिवहन विभागाच्या मागण्या आज आहेत की उद्या आहेत ? कारण मी दोन्ही दिवसांचे विभाग पाहिले तर त्यामध्ये परिवहन विभागाचा उल्लेख नाही.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : माननीय मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या मागण्यांच्या यादीमध्ये परिवहन विभाग आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नियोजन विभागाच्या बाबतीत काय ?

**तालिका सभापती** : नियोजन विभाग देखील माननीय मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या मागण्यांच्या यादीमध्ये आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ठीक आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या 78 क्रमांकाची जी बाब आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे 88 आस्थापनांना जी अन्नधान्याची तूट होती, ती भरुन काढण्यासाठी तरतूद केलेली आहे. ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे आणि ती करणे गरजेचे होते. परंतु मला लक्ष वेधले पाहिजे की, पुण्यामध्ये 88 अशी आस्थापने आहेत की, ज्याच्यामध्ये मेंटल हॉस्पिटल, ससून, जेल बेगर्स् होम या ठिकाणी गेली काही महिने धान्याचा पुरवठा कमी प्रमाणात झाला. त्याच्यासोबत ठिकठिकाणी रहाणारे जे रुग्ण आहेत, त्यांचे सुध्दा प्रचंड हाल झाले. म्हणून जेव्हा अन्नधान्याच्या बाबतीत तूट निर्माण होते, तेव्हा जे इन्मेंटस् आहेत, जे मुळातच कुपोषित असतात, त्यांची प्रकृती बरी नसते त्यांच्या बाबतीत अन्नधान्याची कशा प्रकारे परिपूर्ती करता येईल याचा सुध्दा विचार करणे गरजेचे आहे. तसेच अन्न व नागरी पुरवठ्यामध्ये होणाऱ्या भेसळीबाबत बरीच चर्चा केली. पुण्याचा उल्लेख केल्यावर सगळेजण सांगतात की, पुणे फार सुधारलेले आहे. पण तसे अजिबात नाही.

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

श्री. प्रदीप पाटील, अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांनी असे सांगितलेले आहे की, 85 वितरकांपैकी फक्त 6 वितरकांवर कारवाई करण्यात आलेली आहे. आपण नुकतेच वर्तमान पत्रात असे वाचले आहे की,"साखरेचा भाव कमी झाल्यामुळे स्वस्त धान्य दुकानातून साखर दिली जाणार नाही." अशा प्रकारचा अन्नधान्य वितरण विभागाने निर्णय घेतलेला आहे. मेंटल हॉस्पिटल, ससून जेल ही जी 88 आस्थापने आहेत, यांना वेळेवर धान्य पुरवठा लागतो पण आरोग्य विभाग आणि अन्न व नागरी पुरवठा या दोन खात्यामध्ये योग्य समन्वय नसल्यामुळे येथील रुग्णांचे हाल होत आहेत, याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 69, पान क्रमांक 81. कामगार व सेवायोजन या विषयावर वर मी बोलू इच्छिते.

सभापती महोदय, यामध्ये औद्योगिक लवाद न्यायालये, कामगार न्यायालये, कामगार आयुक्तालये यांच्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये घर कामगारांचा प्रश्न मी या सभागृहात उपस्थित करते. घर कामगारांसाठी कायदा करण्यात आला. सन्माननीय मंत्री श्री. गावित यांनी मध्यंतरी घर कामगारांच्या कार्यक्रमामध्ये येऊन आश्वासन दिले. परंतु या घर कामगारांच्या संदर्भात गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात काहीच उल्लेख करण्यात आलेला नव्हता तसेच आता सुध्दा या पुरवणी मागण्यांमध्ये उल्लेख करण्यात आलेला नाही. या घर कामगारांच्या साध्या मागण्या आहेत. त्यांची नोंदणी झाली पाहिजे, त्यांना वैद्यकीय विम्याचा फायदा मिळाला पाहिजे. या संदर्भामध्ये तरतुद का करण्यात येत नाही, असा प्रश्न मला या ठिकाणी उपस्थित करावयाचा आहे. कामगार आयुक्तालयामध्येच घर कामगारांची नोंदणी करण्यात यावी, असे मला या ठिकाणी सूचवावयाचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 33,34 आणि 35, पृष्ठ क्रमांक 31, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागावर मी या ठिकाणी बोलू इच्छिते. शालेय शिक्षण विभाग आणि परिवहन विभाग या दोन विभागांनी मिळून स्कुल बसेसमधून मुलांची ने आण केली जाते, यांच्या संदर्भात एक आचारसंहिता जाहीर करण्यात आली होती, याकडे मला सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधावेसे वाटते. या शाळांच्या बसेसची अतिशय वाईट परिस्थिती आहे. दिनांक 16 मार्च, 2011 रोजी शिवेन नावाचा मुलगा या बसमधून पडून बसच्या चाकाखाली चिरडून जागीच ठार झालेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

डॉ. नीलम गोऱ्हे...

आहे. काल पुण्याजवळ चिखली या ठिकाणी एक बस उलटली गेली. स्क्रॅपमध्ये काढावयाची बस लहान मुलांची ने आण करण्यासाठी वापरण्यात आल्यामुळे ही बस उलटली, त्यामध्ये 27 मुले जखमी झालेली आहेत, याकडे मी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते. स्कुल बसेससाठी आचारसंहिता ठरविण्यात आली होती, त्याची अंमलबजावणी होत नाही. पनवेललाही छोटी मुले जळून मृत झाली आहेत. अनेक ठिकाणी स्कूल बसेसना मागच्या बाजूचा दरवाजा नसतो. आग लागली तर काय करायचे हे मुलांना माहीत नसते. चालका बरोबर वाहक देखील असावयास पाहिजे आणि त्यांनी मुलांना मार्गदर्शन केले पाहिजे. अनुदानित शाळांची त्यांच्या शाळेमध्ये येणाऱ्या मुलांच्या बसेसची भूमिका बघितली तर त्यांची याबाबतीत संवेदनहीनता दिसून येते. सर्व मोठया शहरांमध्ये शाळांच्या क्रीडांगणामध्ये बसेसमधून मुलांना सोडण्यात यावे असे परिवहन खाते सांगून थकले आहे परंतु  कुठलीही शाळा ते ऐकण्यास तयार नाही. या स्कुल बसेस रस्त्यावर थांबतात, त्यामुळे ट्राफिक जाम होतो. मुले किती तरी अंतर चालत जातात. त्यामुळे रस्ते क्रॉस करताना अपघात होतात. पुण्या सारख्या शहरामध्ये दर महिन्यात किमान दहा मुले चिरडली जातात अशी कित्येक दिवसापासून परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत शालेय शिक्षण विभागाने स्वत: पुढाकार घेऊन स्कूल बस सेवा आणि रिक्षा सेवा कशी व्यवस्थित करता येईल याबाबतीत अनुदानित शाळांवर जबाबदारी टाकली पाहिजे. रिक्षामधून मुलांना घेऊन जात असताना नऊ ते दहा मुले एका रिक्षात झोपवलेली असताता तर काही मुले रिक्षाच्या पाठीमागे, सीटच्या वरच्या बाजूला झोपवलेली असतात. मला स्वत:ला हे माहीत नव्हते पण माझी मुले छोटी होती त्यावेळी मी एकदा रिक्षामधून जात असताना माझी मुलगी आणि भाचा असे म्हणाले की, आम्ही सीटवर बसत नाही, आम्ही मागच्या बाजूला सीटवर जाऊन झोपतो. त्यावेळी त्यांना यासंदर्भात मी विचारले तेव्हा त्यांनी असे सांगितले की, आम्ही रिक्षामधून शाळेत जात असताना आम्हाला रिक्षावाले काका तिकडेच बसवतात म्हणून आम्हाला तिकडेच बसावयाची सवय लागलेली आहे. आठ ते बारा मुले रिक्षातून नेली जातात, याला सुध्दा काही तरी मर्यादा घालण्याची गरज आहे. याबाबतीत शाळांवर आचारसंहितेचे बंधन असणे, मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गरजेचे आहे.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, शालेय शिक्षण, क्रीडा विभाग आणि कामगार विभागा सोबतच मला सांस्कृतिक कार्य आणि पर्यटन विभागाकडे माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. धनजंय मुडे आणि श्री. उल्हास पवार या दोघांनी नाटय मंदिरांचा उल्लेख केला आहे. शासनाने उशिरा का होईना भरत नाटय मंदिरसाठी तरतूद केली त्याबद्दल आम्ही शासनाचे आभारी आहोत. नाटय संमेलनासाठी शासनामार्फत निधी देण्यात येतो.

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ॲड. उषा दराडे )**

यानंतर श्री. बरवड....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

नाट्य सम्मेलनाला शासन जो निधी देते त्याबाबत मी सांगू इच्छिते. मंत्री महोदय नवीन आहेत. ते वाहिन्यांवरुन काही बातम्या पाहात असतील. नाट्य सम्मेलनाच्या निधीवरुन नाट्यकर्मींमध्ये प्रचंड मोठे वादविवाद होतात. तो वाद इतका पराकोटीला पोहोचतो की, चार चार दिवस जाहीररीत्या वाद होतो. विशेषत: श्री. मोहन जोशी आणि श्री. भट यांच्यातील वादविवाद हा अगदी वर्ल्ड कप प्रमाणे चार ते पाच दिवस चालला होता. माझी अशी विनंती आहे की, नाट्यामध्ये आपण राजकीय हस्तक्षेप करु नये. परंतु जेव्हा परदेशात नाट्य सम्मेलन होते त्या वेळेला सरकार कोणत्या पध्दतीने मदत करु शकते का तसेच आर्थिक मदतीबरोबरच नाटकाची जाण असणारे जे नाट्य रसिक आहेत त्यांच्या मदतीने एखादी मार्गदर्शन करणारी, मदत करणारी यंत्रणा उभी केली तर काही गोष्टींच्या बाबतीत आचारसंहिता तयार होईल. आपण त्यांना निधी देतो. मध्यंतरी मी रत्नागिरीच्या नाट्य सम्मेलनातील काही चित्रे पाहिली. त्या ठिकाणी रसिकच नव्हते. व्यासपीठावर जेवढी गर्दी होती त्या मानाने नाट्य रसिकांची उपस्थिती कमी होती. म्हणजे सरकारच्या अनुदानाचा उपयोग करुन घेतला जात नाही. काही ना काही कारणांनी लोकांचा सहभाग नसेल तर आपण कशा पध्दतीने आणि कशासाठी अनुदान देतो याचा सुध्दा विचार करणे गरजेचे आहे.

सभापती महोदया, सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाबतीत आणखी एक मुद्दा मांडावयाचा आहे. जे सिंगल स्क्रीन थिएटर्स आहेत त्यामध्ये करमणूक कर रद्द करण्याची मागणी सिंगल स्क्रीन थिएटर्सनी केलेली आहे. आठवडाभर सिंगल स्क्रीन थिएटर्स बंद ठेवण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, मल्टीप्लेक्सला जे कर आहेत त्याच्या प्रमाणामध्ये सिंगल स्क्रीनवर जो 45 टक्के करमणूक कर आहे तो त्यांना परवडत नाही. म्हणून त्यांनी 7 दिवस सिंगल स्क्रीन बंद ठेवलेले आहेत. ग्रामीण भागामध्ये सगळे सिंगल स्क्रीन थिएटर्स आहेत. त्या ठिकाणी एकच पडदा असतो. परंतु ज्या ठिकाणी अनेक चित्रपट चालतात त्या मल्टीप्लेक्स कडून मात्र पाच वर्षे करमणूक कर घेतला जात नाही. मग आपले सांस्कृतिक धोरण हेच आहे का ? सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी उल्लेख केला. आपण सांस्कृतिक धोरण तयार केले. सांस्कृतिक धोरण काय आहे हे मला माहीत आहे तसेच आमदारांना सुध्दा कळविण्यात आले असल्यामुळे त्यांनाही माहीत आहे. परवा डॉ. अनिल काकोडकर यांचे प्रेझेंटेशन ठेवले होते त्या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. नीलम गोऱ्हे ...

पध्दतीने सरकारचे काय सांस्कृतिक धोरण आहे याची माहिती समोर ठेवली पाहिजे. मी पुण्याच्या मराठी साहित्य सम्मेलनात सुध्दा सुचविले होते की, सरकारच्या वतीने फतवा म्हणून नाही पण निदान सांस्कृतिक धोरण म्हणजे नेमके आम्ही काय करणार याचे एक व्यवस्थित प्रेझेंटेशन किंवा माहिती लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे.

सभापती महोदया, यानंतर मी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 97 बाबत बोलणार आहे. यामध्ये प्रलंबित देयकांसाठी तरतूद केलेली आहे. ससून हॉस्पिटल आणि अन्य ठिकाणी मोठ्या एक्सरे मशिन्स नाहीत. दुर्दैवाने पुण्यात ज्यावेळी जर्मन बेकरीत बॉम्बस्फोट झाला त्यावेळी असे लक्षात आले की, मृतदेहांच्या सर्व अवयवांचा एकदम एक्सरे काढता येईल अशी एक्सरे मशिन्स नसल्यामुळे वेगवेगळ्या भागाचे छोटे छोटे एक्सरे काढून ते जोडण्याचे काम करावे लागत होते. म्हणून ससून हॉस्पिटलमध्ये मोठी एक्सरे मशिन्स आवश्यक आहेत. त्याचबरोबर समुपदेशकांच्या जागा रिक्त आहेत. समुपदेशकांच्या जागा रिक्त असल्यामुळे ज्या पीडित महिला त्या ठिकाणी जातात त्यांना समुपदेशनाचा फायदा मिळू शकत नाही.

सभापती महोदया, यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भात बाब क्रमांक 96 बाबत मला बोलावयाचे आहे. आपण प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बाबतीत काही व्यवस्था केलेली आहे. मला मनोरुग्णालयांकडे लक्ष वेधावयाचे आहे. पुण्याच्या मनोरुग्णालयात या वर्षी जानेवारी महिन्यात काही रुग्णांचा मृत्यू थंडीने काकडून झाला. कारण त्यांना ब्लँकेट्स मिळाली नाहीत. शेवटी पुणेकरांनी वर्गणी काढली आणि येरवडा मनोरुग्णालयातील रुग्णांना ब्लँकेट्स पुरवली. मला वाटते की, ही स्थिती शोभादायक नाही. रस्त्यावरच्या भिकाऱ्यांना सुध्दा ब्लँकेट्स वाटणारे लोक आज समाजामध्ये दिसतात. अशा वेळी आपल्याकडे रुग्णसेवा घेण्यासाठी जे लोक येतात त्यांना आपण ते का देऊ शकत नाही? शेवटी पुण्यातील काही दैनिकांनी मोहीम काढून पैसे जमविले आणि आम्ही त्या ठिकाणी ब्लँकेट्स पोहोचविले. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमध्ये धान्यासोबतच या मनोरुग्णांसाठी उबदार कपड्यांची व्यवस्था देखील झाली पाहिजे. शासनानेच या मनोरुग्णांलयांच्या प्रश्नावर एक समिती नेमली. सभापती महोदय, आपल्याला त्या समितीची कल्पना आहे. प्रत्यक्षामध्ये माननीय राज्यमंत्री त्या समितीवर आहेत पण त्याची अंमलबजावणी कॅबिनेट मंत्री करत नाहीत.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

यानंतर महिला व बालकल्याण विभाग, पान क्रमांक 153, बाब क्र.131 वर माझे विचार माडत आहे. महिला धोरणाबाबत परत परत चर्चा होत आहे. या विभागाच्या अंतर्गत बाल न्यायगृहांची व्यवस्था केल्याचे नमूद केले आहे. परंतु या बाल न्यायगृहांचे व्यवस्थापन कसे चालणार, त्याची देखरेख कशी करणार, न्यायालयाने याबाबत काही समित्या नेमलेल्या आहेत. त्या समित्यांच्या सूचनांची अंमलबजावणी कशी करणार, या सर्व बाबींसाठी कोणतीही यंत्रणा नसल्यामुळे मध्यंतरी पनवेलमध्ये मतिमंद मुलींच्या आश्रमामध्ये भयानक प्रकार झाल्याचे दिसले. तसेच प्रकार अनेक ठिकाणच्या आश्रमामध्ये घडल्याचे दिसत आहेत. म्हणून मला शासनाचे लक्ष वेधून सांगावयाचे आहे की, शासन सुधारगृह निर्माण करणार आहे, त्यांची देखभाल करणाऱ्या यंत्रणेची स्थापना करणे गरजेचे आहे.

यानंतर मी पर्यावरण विभागाच्या बाब क्र.109 वर मी बोलते. प्रदूषण नियंत्रण मंडळाने पी.एफ.ची व्यवस्था केलेली आहे. परंतु दुर्दैवाने या मंडळाचे जे कामकाज सुरु आहे त्याकडे शासनाचे लक्ष वेधते. पंचगंगा नदीच्या सर्वेक्षणाचे काम निधीअभावी हवेतच राहिले आहे. पुण्यातील रामनदीच्या प्रदूषणाकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कर्मचाऱ्यांना वेगवेगळे फायदे देत असताना मला आपल्याला सांगितले पाहिजे की, प्रदूषणाला नियंत्रित करण्यासाठी त्यांनी कोणती कार्यवाही केली आहे त्याची सुध्दा माहिती होणे आवश्यक आहे. अन्यथा, या विभागाच्या बाबीवर विचार करीत असताना मला कवी नामदेव ढसाळ यांची कविता आठवते. 'तूही यत्ता कंची' तसे आपण कोणत्या इयत्तेमध्ये आहोत हेच शोधण्याची शासनावर वेळ येईल. एवढे बोलून मी येथेच थांबते. धन्यवाद.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2010-11 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

जलसंधारण विभाग, पान क्र.87, बाब क्र.74 वर मी माझे विचार मांडणार आहे. मागील वर्षी केंद्र सरकारकडून शासनाने 8039 कोटी रुपयांचा निधी मिळविला. त्यासाठी शासनाचे मी अभिनंदन करतो. हे अभिनंदन करीत असताना देशाची सिंचन क्षमता 40 टक्के झालेली आहे, काही राज्यांमध्ये 80 ते 95 टक्क्यांपर्यंत गेलेली आहे. परंतु महाराष्ट्राचा विचार केला तर 18 ते 20 टक्के सिंचन झाल्याचे दिसते. काही ठिकाणी थोडीशी वाढ झाली असेल. महाराष्ट्र राज्यातील काही भागाचा सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी वारंवार मागणी केली जाते. तत्कालीन जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार यांनी त्यांच्या काळात मराठवाडा, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न केला होता. हे खरे असले तरी महाराष्ट्रामध्ये कायम दुष्काळी तालुके आहेत. त्या तालुक्यांचा अजूनही अनुशेष संपलेला नाही. दुष्काळी तालुके तसेच राहिले आहेत. त्यामुळे पुढील काळासाठी सिंचनाचा कार्यक्रम आखत असताना राज्यातील कायम दुष्काळी तालुक्यांचा विचार व्हावा. सिंचनाच्या योजना राबवित असताना आपल्या राज्यामध्ये तालुका घटक मानून निधीचे वाटप करावे व योजनांची आखणी करावी अशी विनंती करतो. सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुका, मिरज पूर्व, जत, आटपाडी, माण, खटाव, सोलापूरमधील सांगोला, मंगळवेढा हे कायम दुष्काळी तालुके आहेत. हे तालुके तसेच राहिले. या तालुक्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कवठेमहांकाळ तालुक्यामध्ये पाझर तलाव झालेले आहेत, त्यासाठी निधीची आवश्यकता आहे. 11 पाझर तलावासाठी केवळ 1 कोटींची आवश्यकता आहे. परंतु निधी नसल्यामुळे पाझर तलावातील पाणी वाहून जात आहे.

यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पान क्र.96, बाब क्र.113 वर मी माझे विचार मांडतो. सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यात उप जिल्हा रुग्णालय आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 19:05

श्री. रमेश शेंडगे....

त्या उप जिल्हा रुग्णालयामध्ये आवश्यक असणारी मशिनरी नाही, आवश्यक डॉक्टर नाहीत, औषधे नाहीत. सद्य:परिस्थितीमध्ये तेथे एक बीएमएस डॉक्टर आणि सहा-सात दिवसापूर्वी आलेले एक एमबीबीएस डॉक्टर असे दोन डॉक्टर आहेत. या रुग्णालयाचा पाहिजे तसा उपयोग तेथील जनतेला होत नाही. औषधांचा तुडवडा तर तेथे कायम असतो. त्यामुळे त्या रुग्णालयाला औषधांचा पुरवठा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कवठेमहांकाळ तालुक्यातील ढालगाव येथे 50 खाटांचे एक ग्रामीण रुग्णालय मंजूर झालेले आहे. या रुग्णालयाचा अनेक महिन्यांपासून शासन स्तरावर प्रस्ताव असून ब-याचशा गोष्टींना मान्यता मिळालेली आहे. परंतु फाईल सचिव महोदयांकडे पडून आहे. त्याबाबतीत देखील त्वरित निर्णय घेणे आवश्यक आहे हे मला माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 27 वरील बाब क्रमांक 32 संबंधी बोलत असताना मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सन 2008च्या दुस-या अधिवेशनामध्ये तत्कालीन मंत्री महोदय श्री. हसन मुश्रीफ, कृषी मंत्री श्री. बाळासाहेब थोरात, तत्कालीन पशुसंवर्धन मंत्री श्री. अनिस अहमद यांनी या सभागृहामध्ये आश्वासन दिले होते की, या राज्यातील शेळीमेंढी व्यवसायाला शेतीपूरक उद्योगाचा दर्जा देण्यात येईल. परंतु मला येथे नमूद करावेसे वाटते की, याबाबतीत आतापर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. महाराष्ट्र शासनाचे देखील शेळीमेंढी व्यवसायाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे धोरण जाहीर झालेले नसल्यामुळे या व्यवसायाकडे दुर्लक्ष व्हायला लागलेले आहे. आपणा सर्वांना हे माहीत आहे की, मटणाचे दर सारखे वाढत आहेत. सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील माडयाळ येथे होळीच्या निमित्ताने शेळयामेंढ्यांचा मोठा बाजार भरतो. शेळीमेंढी महामंडळाच्या माध्यमातून असेल किंवा पशुसंवर्धन खात्याच्या माध्यमातून असेल या व्यवसायाच्या बाबतीत चांगल्या प्रकारचे नियोजन आपल्या राज्यामध्ये आहे. पण शेजारच्या तामिळनाडू, आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या राज्यामध्ये मटणाचे दर 350 रुपयापासून 450 रुपयापर्यन्त गेलेले आहेत. तेथील सर्व व्यापारी आपल्या राज्यामध्ये जेथे जेथे मोठे बाजार भरतात तेथे शेळयामेंढयांची खरेदी मोठ्या रकमा देऊन करायला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री. रमेश शेंडगे....

लागलेले आहेत. परिणामी आपल्या राज्यामध्ये शेळयामेंढ्याचा तुटवडा व्हायला लागलेला आहे. याची आपण योग्य वेळी दखल घेतली नाही तर आपल्या राज्यात देखील कोणत्याही क्षणी मटणाचे दर साडेतीनशे ते साडेचारशे रुपयापर्यन्त जाऊ शकतील.

सभापती महोदय, मी आपल्या मार्फत माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो आणि सभागृहाला देखील हे माहीत आहे की, अनेक वर्षापासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळीमेंढी विकास महामंडळ या राज्यामध्ये असून त्या महामंडळाचा मी अध्यक्ष आहे. वारंवार मागणी करुन सुध्दा, वारंवार आश्वासने देऊन सुध्दा, लक्षवेधी सूचनेला आश्वासन देऊन सुध्दा, अनेक वेळा तत्कालीन वित्त मंत्रालयाच्या कार्यालयामध्ये, माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयामध्ये बैठका होऊन सुध्दा, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी मागणी करुन सुध्दा आमच्या महामंडळाला एक रुपयाचाही निधी मिळालेला नाही. सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य मला याबाबतीत पाठिंबा देतात. पण महाराष्ट्र शासनाकडून निधी मिळालेला नाही.

**तालिका सभापती (ॲड. उषा दराडे )** : पूरक मागण्यावरील सन्माननीय सदस्यांची भाषणे आणि मंत्री महोदयांची उत्तरे संपेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मी आपणास मुद्दाम सांगू इच्छितो की, सन 2008च्या दुस-या हिवाळी अधिवेशनामध्ये महामंडळाला 25 कोटी रुपये निधी देण्याचे प्रस्तावित करण्यात आले. सन 2010 मधील पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये तत्कालीन मंत्री महोदय श्री. नितीन राऊत यांनी 10 कोटी रु.ची मागणी त्वरित मान्य केली आणि 25 कोटीचा निधी देण्याबाबत प्रस्तावित केले. विधानसभा 2010च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये माननीय पशुसंवर्धन राज्यमंत्री श्री. गुलाबराव देवकर यांनी सांगितले की, या संदर्भात योग्य तो विचार केला जाईल 25 कोटीचा निधी देण्याबाबत चर्चा झाली. अशा प्रकारे 10 ते 15 वेळा या सभागृहामध्ये आश्वासने मिळालेली आहेत, निधी मिळण्याची खात्री दिलेली आहे. पण आजपर्यन्त निधी मिळालेला नाही. मी पुन्हा एकदा शासनाला विनंती करतो की, या महाराष्ट्रामध्ये शेळीमेंढी व्यवसाय करणारा, भटकंती

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 19:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे....

करणारा फार मोठा धनगर समाज आहे. या धनगर समाजासाठी फक्त या शेळीमेंढी महामंडळा मार्फतच कर्ज पुरवठा होतो. म्हणजे शेळयामेंढयांचा पुरवठा होतो. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत आजपर्यन्त धनगर समाजाला किती कर्ज पुरवठा केलेला आहे हे पाहिले तर मागील तीन-चार वर्षामध्ये एक रुपयाचा देखील कर्ज पुरवठा धनगर समाजाला झालेला नसल्याचे निदर्शनास येईल. म्हणून मी पोटतिडिकेने महाराष्ट्र शासनाला पुन्हा एकदा विनंती करतो की, या शेळीमेंढी महामंडळाला निधी द्यावा. महाराष्ट्रामध्ये दुस-या क्रमांकावर हा धनगर समाज आहे. धनगर समाजाची लोकसंख्या 1 कोटी 20 लाखापेक्षाही जास्त आहे. हा गरीब, मनमिळावू आणि भोळाभाबडा समाज कोणत्याही प्रकारची आंदोलने करीत नाही.

...नंतर श्री. खंदारे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे........

रक्तपात करीत नाहीत, फक्त सामूहिकदृष्ट्या आपल्या मागण्या शासन दरबारी मांडत असतात. म्हणून या महामंडळाला निधी देण्याची विनंती करतो.

सभापती महोदय, आजच्या वर्तमानपत्रामध्ये महाराष्ट्र राज्य शेळी मेंढी विकास महामंडळाबाबत एक बातमी प्रसिध्द झाली आहे. अनेक लोकांनी माझ्याकडे याबाबत विचारणा केली. मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, 2002 साली घडलेली ही घटना आहे. महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून झालेला हा प्रकार आहे. मी त्यावेळी या महामंडळाचा अध्यक्ष नव्हतो, हे मी मुद्दाम सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, राज्यात अवकाळी पावसामुळे हजारो शेळ्या मेंढ्या मेल्या. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात मी मागणी केली होती. विदर्भात जवळजवळ 18 ते 20 हजार शेळ्या मेंढ्या मेल्या. संपूर्ण राज्यात 40 ते 45 हजार शेळ्या मेंढ्या मेल्या. गोरगरीब मेंढपाळ बांधव वारंवार तालुका किंवा जिल्हयाच्या ठिकाणी नुकसान भरपाई मिळण्याची मागणी करण्यासाठी जाऊ शकत नाही. त्यांना आजपर्यंत कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मिळाली नाही. शासनाने स्वत: या घटनेची दखल घेऊन नुकसान झालेल्या मेंढपाळांना भरपाई देण्याबाबत विचार करावा.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा बाब क्रमांक 80, पृष्ठ क्रमांक 93 बाबत सांगू इच्छितो की, बीपीएल कार्ड धारकांना सवलतीच्या दरात उत्कृष्ट अन्नधान्य पुरवठा करीत असताना एपीएल कार्ड धारकांची सुध्दा मागणी आहे की, त्यांना वर्षातून फक्त एकदा किंवा दोनदा सवलतीच्या दरात धान्य मिळावे. गॅस पुरवठा थांबतो त्यावेळी त्यांच्याकडे केरोसिन नसते. महिन्यातून निदान दोन ते तीन लीटर केरोसिनचा त्यांना पुरवठा व्हावा. जेणेकरुन गॅस सिलिंडर संपल्यानंतर दुसरा सिलिंडर येईपर्यंतची गॅप आहे त्या काळात या केरोसिनच्या माध्यमातून दैनंदिन जीवनाला आवश्यक असणारा स्वयंपाक करता येऊ शकतो. याचा शासनाने जरुर विचार करावा.

सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभाग बाब क्रमांक 131, पृष्ठ क्रमांक 153 वर मागणी सादर केली आहे. अंगणवाड्या आणि बालवाड्यांना सकस आहार पुरवठा होतो. या सकस आहाराची तपासणी व्हावी अशी परिस्थिती आहे. पूर्वी अंगणवाड्यांना आणि बालवाड्यांना अंड्यांचा पुरवठा केला जात होता. मध्यंतरी बर्ड फ्लूची साथ आल्यानंतर अंड्यांचा पुरवठा बंद करण्यात आला. दूध आणि अंडी निदान आठवड्यातून काही दिवस पुरविण्याबाबत शासनाने

..2...

श्री.रमेश शेंडगे........

विचार करावा अशी मी विनंती करतो. त्याचप्रमाणे महिला व बालकल्याण विभागाच्या अनेक योजना आहेत. बाल संगोपन योजना आहे. त्याच धर्तीवर एचआयव्ही एड्सबाबत महिलांच्या दृष्टीने प्रशिक्षण योजना ग्रामीण भागात सुरु करणे आवश्यक आहे. सांगली जिल्हयाच्या ग्रामीण भागात कोणतीही नवीन योजना सुरु असल्याचे दिसून येत नाही, याची शासनाने नोंद घ्यावी.

सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभाग बाब क्रमांक 140, पृष्ठ क्रमांक 171. शासनामार्फत अतिशय चांगल्याप्रकारे या देशातील राष्ट्रपुरुष आणि राष्ट्र महिलांबाबत चित्रफित तयार केल्या जातात. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केलेल्या कार्याचा ठसा काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत उमटलेला आहे. त्याची पाहिजे तेवढी दखल घेतली जात नाही. सांस्कृतिक कार्य विभागामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर चित्रफीत तयार केली जावी. त्यांच्या चौंडी या जन्मगावी विकासाच्या दृष्टीने निधी कमी पडत असल्यामुळे 2 कोटी रुपये उपलब्ध करुन द्यावेत आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा शासनाने गौरव करावा अशी मी विनंती करतो. एवढे बोलून मला बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल आभार मानून माझे भाषण संपवितो.

--------

....3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदया, बीड जिल्हयामध्ये उद्या तलाठी पदासाठी परीक्षा घेण्यात येणार आहे.  मी या विषयासंबंधी सकाळी मुद्दा उपस्थित केला होता, त्यावेळी माननीय उप सभापती यांनी शासनाला आज सायंकाळपर्यंत या मुद्यासंबंधी निवेदन करावयास सांगितले होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, माननीय सभापतींनी निर्णय दिला होता. सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी या विषयावर शासनातर्फे निवेदन केले जावे.  उद्या तलाठी पदासाठी परीक्षा घेतली जाणार आहे.

**तालिका सभापती** (ॲड.उषा दराडे) : शासनाचे प्रतिनिधी याठिकाणी उपस्थित आहेत. सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी तलाठी पदाच्या परीक्षेसंबंधी निवेदन करावयाचे आहे.  उपस्थितांपैकी कोण जबाबदारी घेत आहे?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदया, निवेदन करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सकाळी माननीय उप सभापतींनी निर्णय दिला होता की, सभागृहाच्या कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी निवेदन करावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : माननीय महसूल राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत.  11 हजार मुलांच्या भवितव्याचा प्रश्न आहे.  अन्यथा या परीक्षेला स्थगिती देण्यात यावी.

नंतर 4जे.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, हा प्रश्न आजच सकाळी उपस्थित केलेला असल्याने यासंबंधीची माहिती घेऊन उद्या सभागृहात निवेदन करण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

**तालिका सभापती (ॲड. उषा दराडे)** : उद्या बीड येथे तलाठी संवर्गाच्या परीक्षा आहेत. आज सकाळी हा प्रश्न उपस्थित झाला होता त्यावेळी माननीय उप सभापतींनी आजचे सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी याबाबतचे निवेदन करावे, असे निदेश दिलेले आहेत. अजून सभागृहाचे कामकाज संपायला पुष्कळ अवधी आहे, त्यामुळे शासनाने आजच निवेदन करावे.

श्री. प्रकाश सोळंके : ठीक आहे, आजच निवेदन करण्यात येईल.

श्री. हुसेन दलवाई : महोदया, खरे तर ही बाब मंत्री महोदयांच्याच अखत्यारीतील असल्याने यामध्ये सभागृहात निवेदन करण्याचा प्रश्नच येत नाही. तलाठी परीक्षेला बसण्यासाठी स्थानिक लोकांनाच अधिवासाचा दाखला सक्तीचा करण्यात आला आहे. वास्तविक महाराष्ट्रातील मुलांना अशी मागणी सक्तीची करण्याची गरज नाही. अशा प्रकारे प्रत्येक ठिकाणी त्रास देण्याचे काम प्रशासन करीत आहे, याला आळा घातला पाहिजे.

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांनी आजच सभागृहात निवेदन करण्याचे मान्य केले आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, आज सभागृहाचे कामकाज रात्री 11 वाजेपर्यंत चालण्याची शक्यता आहे. एवढ्या उशिरा सभागृहात निवेदन झाले तर विद्यार्थी व संबंधित अधिकाऱ्यांना त्याची माहिती होणार नाही. तसेच बीड येथे उद्या तलाठी पदासाठी परीक्षा होणार आहे. अशा परिस्थितीत स्थानिक लोकांनाच अधिवासाचा दाखला मागण्याचा हट्ट न धरता परीक्षेला बसण्याची अनुमती दिली जावी व त्यानंतर काय निर्णय घ्यायचा असेल तो शासनाने घ्यावा.

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, ठीक आहे, अर्ध्या तासात यासंबंधीचे निवेदन सभागृहात करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पाइंट ऑफ आर्डर है. मैं कहना चाहता हूं कि सुबह के समय माननीय सदस्य श्री मुंडे जी ने यहां पर एक प्रश्न उपस्थित किया था और उनकी बात सुनने के बाद माननीय उप सभापति महोदय ने निदेश दिया था कि उस संबंध में सरकार की ओर से आज शाम तक निवेदन किया जाना चाहिए. जिस समय आदेश दिए गए, उस समय यहां पर बहुत सारे मंत्री महोदय उपस्थित थे. ऑफिसर गॅलरी में अधिकारी भी बैठे थे. लेकिन अभी तक वह निवेदन यहां पर नहीं हुआ है. मुझे पूछना है कि संबंधित मंत्री महोदय को निवेदन करने संबंधी आदेश की जानकारी देना किसकी जवाबदारी है, इस बारे में जवाबदारी फिक्स होनी चाहिए और जिस निवेदन के बारे में माननीय उप सभापति महोदय ने निदेश दिया था वह निवेदन यहां पर सरकार की ओर से जल्द से जल्द किया जाना चाहिए.

-0-

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : सन 2010-11 च्या पूरक विवरण पत्रावर चर्चा

( चर्चा पुढे सुरु.......

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता ) : महोदया, सन 2010-11 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, बाब क्र. 33, पृ.क्र. 31-शालेय शिक्षण विभागाच्या अनुषंगाने मला असे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, खाजगी प्राथमिक शाळेतील कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीवरील व्याजाचे प्रदान करण्यासाठी 9.25 कोटीची मागणी सभागृहासमोर आणलेली आहे. राज्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगानुसार मिळणाऱ्या रकमेचा पहिला हप्ता दिवाळीपूर्वी द्यावा असे आदेश असताना अद्यापही त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणीचा लाभ आतापर्यंत मिळालेला नाही. बुलढाणा जिल्ह्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणी लागू करण्याबाबत अजून कोणताच मार्ग काढलेला नाही. माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की, बुलढाणा जिल्ह्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांच्या या प्रश्नात लक्ष घालून तो ताबडतोब निकाली काढावा.

यानंतर बाब क्र. 63, पृ.क्र.71, विदर्भ पाटबंधारे महामंडळाला भागभांडवली अंशदान मिळावे म्हणून ही मागणी करण्यात आली आहे. विदर्भाच्या हक्काचा निधी राज्यात दुसरीकडे वळविताना शासनाने विदर्भातील जनतेची इंग्रजांनाही लाजवेल अशी लूट केली आहे. मुळात तुटपुंजा निधी मिळतो आणि त्यावरही हे दरोडा टाकतात. तो जोड प्रस्तावाच्या नावाखाली तर कधी निकृष्ट काम दाखवून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार सुरु आहे. माझ्या जिल्ह्यातील जिगांव प्रकल्पातील एखादे काम अगोदर कमी रकमेत द्यायचे .........

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

एखादे काम अगोदर कमी रक्कमेत द्यायचे, 4-6 महिने जाऊ द्यायचे त्यानंतर कामाच्या डिझाईनमध्ये बदल करायचा आणि मूळ निविदा दुप्पट -तिप्पटीने वाढवावयाची, असा नवीन प्रकार पाटबंधारे महामंडळाच्या अधिका-यांनी शोधून काढला आहे. बुलढाणा जिल्हयातील नांदूरा तालुक्यात जीगाव प्रकल्प 1990 मध्ये मंजूर करण्यात आला, त्यावेळी तो 396 कोटी रुपयांचा होता, सन 2006 मध्ये त्याची सुधारित किंमत 1221 कोटी रु. झाली, त्यानंतर 2010 मध्ये म्हणजे अवघ्या 4 वर्षात त्याची किंमत 4044 कोटी रुपये झाली. केवळ 4 वर्षात या प्रकल्पाचे आधीच सुधारित केलेली किंमत तिप्पटीपेक्षा जास्त झाली. या प्रकल्पांतर्गत घेण्यात आलेल्या 12 उपसा सिंचन योजनांमध्ये स्टील पाईपचे दर तिप्पट लावण्यात आले. साधारणत: हे पाईप 55000 रु. मेट्रीक टन या दराने घेतले जातात, परंतु जीगांवमध्ये या पाईपचा दर 1,65,000 रु. मेट्रीक टन असा लावण्यात आला व एवढे असूनही निकृष्ट दर्जाचे स्टील वापरण्यात आले. या कामाला लागणा-या स्टीलचे दर 70 ते 80 हजार रुपये मेट्रीक टन लावले तरी ते ग्राहय धरता आले असते. या ठिकाणी सरळ दुप्पट दर लावण्यात आल्याने या घोटाळयाची रक्कम वाढली.

सभापती महोदय, उपसा सिंचन योजना ग्रुप -1 मध्ये ( 1,10,11 व 12 ) याच्यासाठी पंपगृहाचे बांधकाम, ऊर्ध्वगामी नलिका, पंपिंग मशिनरी, स्वीच यार्डसह बांधकाम, वितरण कुंड व संतुलन जलाशयाची कामे करावयाची होती. यासाठी 263 कोटी 68 लाखांची निविदा हैदराबादच्या एक कंपनीला देण्यात आली. या मूळ निविदेत 18.4 टक्के अधिक फी वाढ करण्यात आली. त्यामुळे ही निविदा 311 कोटी 22 लाखांवर गेली.

उपसा सिंचन योजना क्रमांक -2(2,8) ची निविदा 68 कोटी 4 लाख रुपयांची होती. अधिक मूल्यामुळे ती 80 कोटी 70 लाख रुपयांची झाली. उपसा सिंचन योजना ग्रुप 3 साठी पंपगृहाचे बांधकाम, ऊर्ध्वगामी नलिकेचे काम, मशिनरी, स्वीय यार्डसह बांधकाम, वितरण कुंड व संतुलन जलाशय ही कामे करावयाची होती, यासाठी मूळ निविदा 31 कोटी 17 लाखांची होती. वाटाघाटीनंतर त्यामध्ये 23.43 टक्के अधिक देयकानुसार हे बांधकाम 38 कोटी 48 लाख रुपयांचे करण्यात आले. अशा प्रकारे उपसा सिंचन क्रमांक 4 ची निविदा 72 कोटी 30 लाखांची होती, ती 81 कोटी 91 लाखांची झाली. उपसा सिंचन योजना ग्रुप क्रमांक 6 (8 व 9 चे) ची निविदा 498 कोटी 13 लाख रुपयांची होती. ही निविदा 11.35 टक्के अधिक देयकांवर देण्यात आली. त्यामध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

सुधारित किंमत 4.98 टक्के अधिक करण्यात आली. अशा प्रकारे आता या निविदेची किंमत 554 कोटी 66 लाख रुपयांच्या घरात गेली आहे. सहा ठेकेदारांची कामे जादा दराने मंजूर करण्यात आली. उपरोक्त निविदा सिंचन खात्याच्या सचिवांच्या अखत्यारीत असलेल्या कार्यासन समितीकडे न पाठविता कार्यकारी संचालकांनी आपल्या अखत्यारीत मंजूर करुन कारवाईसाठी तत्कालीन जलसंपदा मंत्र्याकडे पाठवली.

सभापती महोदय, सुमारे 350 कोटी मूळ किंमत असलेला हा प्रकल्प आता 7,700 कोटीच्या घरात गेला आहे. या प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातील भिंत चक्क चालू लागण्याची बाब नुकतीच उघडकीस आली आहे. या कालव्यातील 300 मीटर लांबीच्या 10 भिंती 1 ते 9 मीटर सरकल्या, अतिशय निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले. कित्येक निविदा दरसूची पेक्षा जास्त दराने भरण्यात आल्या तर सहा निविदा चक्क दुप्पट दराने काढल्या गेल्या. या संदर्भातील भ्रष्टाचार मी नुकताच सभागृहात उघडकीस आणला आहे. शासनाने या भ्रष्टाचाराची चौकशी करणा-या समित्यांचा अहवाल लक्षात घेऊन त्वरीत दोषी अधिका-यांवर कारवाई करणे गरजेचे आहे. शेतक-यांचे पुनर्वसन चांगल्या प्रकारे झाले नाही, शेतकऱ्याची शेती प्रकल्पात गेल्याने आज तो भूमिहीन झाला आहे. शेतक-यांच्या व्यथा न जाणता अधिकारी, ठेकेदारांशी संगनमत करीत आहेत. ठेकेदारांशी संगनमत करुन अर्धमेला झालेल्या शेतक-यांच्या व्यथा न जाणता त्याच्या टाळूवरील लोणी खाणा-या अधिका-यांना यापुढेही राज्य शासनाने संरक्षण दिल्यास आम्ही शांत बसणार नाही.

सभापती महोदय, एका बाजूला प्रकल्पाच्या किमती तीनपट, चारपट वाढवावयाच्या व तुमचा बॅकलॉग संपला असे सांगावयाचे. तर दुस-या बाजूला भौतिक विकास तसाच ठेवायचा. असे काम शासनामार्फत केले जात आहे. मराठवाडयाची जशी परिस्थिती झालेली आहे, तशीच परिस्थिती विदर्भाची देखील झालेली आहे. त्यामुळे यासंदर्भात माझी मागणी आहे की, जीगाव प्रकल्पाच्या खरेदीमध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. उपसा जलसिंचन योजनेच्या संदर्भात शासन चौकशी करणार आहे काय ? स्वत:च्या अखत्यारीत, खरेदी समितीला न सांगता सर्व खरेदी करण्यात आलेली आहे. कार्यकारी संचालकांच्या अधिपत्याखाली ही सर्व खरेदी करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मी यानिमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, त्या ठिकाणी श्री शिंदे नावाचे एक अधिकारी आहेत. त्यांच्या बदलीच्या संदर्भात मी या विभागाला एकूण तीन पत्रे दिली होती. श्री.शिंदे नावाचा जो अधिकारी त्या ठिकाणी आहे, त्याची कधीच बदली होत नाही. श्री.शिंदे यांनी विदर्भ पाटबंधारे मंडळ संपूर्णपणे खाऊन टाकण्याचा जणू काही चंगच बांधलेला आहे अशा भ्रष्ट अधिका-याला त्या ठिकाणी कशासाठी ठेवण्यात येत आहे ? श्री.शिंदे नावाच्या अधिका-याची सुध्दा चौकशी करावी,अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 74, पान नंबर 87, ग्राम विकास व जलसंधारण विभागासंबंधी मला बोलावयाचे आहे. काटेपूर्णा प्रकल्पाच्या दुरुस्तीचे काम आता शासनाने हाती घेतलेले असून या कामाचा ठेका एका ठेकेदारास देण्यात आला आहे. सुमारे 10 कोटी 30 लाख रुपयांचे हे काम असून या मंजूर कामापैकी त्या ठेकेदाराने फक्त 50 टक्के काम पूर्ण केले असून उरलेले 50 टक्के काम न करता काम केल्याचे दाखविले आहे. 50 टक्के काम केले असतांना बिल मात्र 100 टक्के कामाचे काढले आहे. मी त्या जिल्ह्याचा असून मला त्याची संपूर्ण माहिती असल्याने मी अत्यंत जबाबदारीने या ठिकाणी ही बाब सांगत आहे. या काटेपूर्णा प्रकल्पाच्या कामाच्या दुरुस्तीच्या कामाची माननीय मंत्र्यांनी चौकशी करावी,अशी मी या पुरवणी मागण्या वरील चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 80, पान नंबर 93, अन्न व नागरी पुरव्ठा आणि ग्राहक संरक्षण विभागासंबंधी मला बोलावयाचे आहे. सर्व सामान्य जनतेला अत्यावश्यक वस्तू स्वस्तात मिळाव्यात या उदात्त हेतूने शासन अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत गहू तांदूळ केरोसिन, साखर इत्यादी आवश्यक वस्तुंचे वितरण करते. हे वितरण करतांना कोटयवधीचे अनुदान दिले जाते. हे अनुदान देतांना दारिद्रय रेषेखालील जनतेला किमान खायला दोन वेळ तरी अन्न मिळावे, हा हेतू असतो. परंतु सरकारी अधिकारी, ठेकेदार यांनी या अतिशय चांगल्या योजनेचा पुरता बोजवारा उडवला आहे. गहू, तांदूळ, केरोसिन, साखर इत्यादी वस्तू जनतेला न मिळता ठेकेदार पुरवठा विभागातील अधिका-यांशी संगनमत करुन या वस्तू काळया बाजारात





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

विकतात. आवश्यक त्या घटकांपर्यत हा कोटा पोहोचतो किंवा नाही, ते पाहण्याची जबाबदारी पुरवठा खात्याच्या दक्षता विभागाकडे आहे. मार्च 2010 ते फेब्रुवारी 2011 या कालावधीत 157 कोटी 5 लाख 30 हजार लिटर्स केरोसिनचे वितरण अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत करण्यात आले होते. यापैकी प्रत्यक्षात किती केरोसिन सर्व सामान्य जनतेला मिळाले याचे उत्तर शासनाला विचारले तर 100 टक्के केरोसिन मिळाले, असे कोणालाही न पटणारे उत्तर शासन देईल. परंतु महाराट्रातील कोणत्याही गावात जाऊन चौकशी केली तर सरकारचे बिंब लगेच उघडे पडेल. कोणत्याही खेडयात जाऊन पाहिले तर केरोसिन मिळाले नाही, हीच तक्रार समोर येते. या केरोसिनचे वितरण जनतेला व्यवस्थित व्हावे, याकरिता पुरवठा विभागाने दक्षता विभाग स्थापन केला असून मार्च 2010ते फेब्रुवारी 2011 या कालावधीत दक्षता विभागाने केलेली कामगिरी मोठी मजेशीर आहे. या बाबतीत मी आपल्याला ठाणे जिल्हयाचे उदाहरण देऊ इच्छितो. ठाणे जिल्हा हा भौगालिकदृष्टया मोठा जिल्हा आहे. या ठाणे जिल्हयात मार्च 2010 ते फेब्रुवारी 2011 या वर्षभरात एक दोन नव्हे तर चक्क 182 धाडी टाकण्यात आल्या. या 182 धाडीमध्ये फक्त 20 लिटर केरोसिन जप्त केले होते. या केरोसिनची किंमत फक्त 260 रुपये आहे. तेव्हा या संदर्भात माननीय मंत्र्यांनी सभागृहाला माहिती द्यावी. या रिपोर्टवरुन हसावे की रडावे, हे आम्हाला कळत नाही. 182 धाडी टाकून फक्त 20लिटर केरोसिन पकडण्यात आले असून त्याची किंमत फक्त 260 रुपये आहे. ठाणे जिल्हयात सर्वात जास्त केरोसिन भेसळीसाठी वापरले जात असल्याच्या तक्रारी केल्या जात असतांना या जिल्हयातून फक्त 20 लिटर केरोसिन जप्त होणे, ही चक्क जनतेच्या डोळयात धूळ फेक आहे. ही गंभीर बाब असल्यामुळे, या प्रकरणाची चौकशी शासनाने करावी आणि यामध्ये जे कोणी दोषी असतील त्या व्यक्तीला शासन करावे, अशी मी या पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

नंतर श्री.सरफरे

अस्मुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, मागणी क्रमांक 99 व पृष्ठ क्रमांक 125 मध्ये दिनांक 25 जून, 2010 रोजी शेगाव, जिल्हा बुलढाणा येथील श्री. गजानन महाराज अनुदानित आश्रमशाळेची मान्यता शासनाने रद्द केली व या आश्रमशाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता त्यांना जवळच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेत तसेच काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना इतर अनुदानित आश्रमशाळेतील रिक्त पदांवर सामावून घ्यावे असे आदेश अप्पर आयुक्त, अमरावती व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांना दिले. सभापती महोदय, संपूर्ण अमरावती विभागात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे या कर्मचाऱ्यांनी त्यापैकी कुठेही समायोजन झाल्यास त्याठिकाणी काम करण्यास तयार असल्याबाबतचे निवेदन अप्पर आयुक्तांकडे देऊनही त्यांना गेल्या 3 वर्षापासून वेतनाअभावी रहावे लागले आहे. या संदर्भात मी अप्पर आयुक्तांशी दोन वेळा बोललो आहे. त्या कर्मचाऱ्यांना कुठेतरी सामावून घेतले पाहिजे अशी या पुरवणी मागणीच्या निमित्ताने मी ही बाब उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 100, पृष्ठ क्रमांक 125 वर बिरोटी, तालुका धारणी, जिल्हा अमरावती या शासकीय आश्रम शाळेत अनेक गैरव्यवहार व भ्रष्टाचार सुरु आहेत. त्याबाबत अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्या,परंतु अजूनपर्यंत त्याबाबत चौकशी देखील करण्यात आली नाही. आदिवासींच्या असलेल्या या आश्रम शाळेमधील मुलांना अन्न व साहित्य तसेच जेवण सुध्दा दिले जात नाही तर तो सर्व माल खुल्या बाजारामध्ये विकला जात आहे. त्याबाबत चौकशीची मागणी मी याठिकाणी करीत आहे. सभापती महोदय, या आश्रम शाळेमध्ये काम करणाऱ्या श्री.गणेश जंगलूजी चव्हाण यांनी हा गैरव्यवहार उघडकीस आणल्यानंतर या आश्रमशाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. पटवनकर व अधीक्षक श्री.देसाई यांनी त्याला कामावर येण्यास मज्जाव केला आहे. अशाप्रकारे या आश्रमशाळेची चौकशी करुन संबंधितांवर तात्काळ कारवाई केली पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 126 व पृष्ठ क्रमांक 148 मध्ये खामगाव, जिल्हा बुलढाणा येथील शासकीय तंत्रनिकेतनात विद्यार्थ्यांना गेल्या 3 वर्षापूर्वी सर्वोच्च असे शिक्षण व प्रशिक्षण मिळत होते. परंतु गेल्या काही वर्षापासून या शासकीय तंत्रनिकेतनात अनेक समस्या निर्माण झाल्या असल्यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक, आर्थिक व शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यांना खाजगी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. पांडुरंग फुंडकर ...

शिकवण्या लावून शिकावे लागते. या शासकीय तंत्रनिकेतनात विद्यार्थी संख्येप्रमाणे प्राध्यापक नाहीत, जे प्राध्यापक आहेत ते सदैव तणावात असतात. वेळोवेळी प्रशासकीय स्तरावर मागणी करुनही प्राध्यापक उपलब्ध होत नाहीत. मुलांच्या वसतिगृहात अनेक समस्या आहेत.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

यासंबंधी मी मंत्रालयामध्ये अनेक वेळा पत्र व्यवहार केला आहे. विदर्भामध्ये अतिशय उत्कृष्ट असलेल्या या तंत्र निकेतनामध्ये आज प्राध्यापक नाहीत, हेड ऑफ डिपार्टमेंट नाहीत तरमग विद्यार्थ्यांनी काय करावे. यामुळे तेथील सर्व विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. याची शासनाने त्वरित दखल घ्यावी. त्याठिकाणी रिक्त असलेल्या प्राध्यापकांची पदे तात्काळ भरण्याचा शासनाने प्रयत्न करावा अशी मी मागणी करतो. सभापती महोदय, यानिमित्ताने मी मंत्री महोदयांना एकच सांगू इच्छितो की, हे तंत्र निकेतन कॉलेज नीटपणे चालले पाहिजे. हे कॉलेज जर उद्या बंद झाले तर शासनावर नामुष्कीची पाळी येणार आहे. विदर्भामध्ये सर्वात जुने असलेले हे उत्कृष्ट कॉलेज बंद होण्याच्या मार्गावर आहे . म्हणून त्या कॉलेजमध्ये प्राध्यापक, हेड ऑफ डिपार्टमेंट आणि तज्ज्ञ मंडळींची रिक्त असलेल्या पदांवर ताबडतोब नियुक्ती करावी अशी मागणी करुन माझे भाषण संपवितो.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पान क्र.31, बाब क्र.34 बाबत सांगावयाचे आहे. मी प्राथमिक विभागाच्या संदर्भात लक्ष वेधू इच्छितो. पिण्याच्या पाण्याची सोय नसलेल्या अनेक प्राथमिक शाळा आहेत. तेथे पिण्याच्या पाण्याची सोय नाही आणि ती सोय होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच स्वच्छतागृहे ही अत्यंत गरजेची बाब असून, तेथे स्वच्छतागृहे असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक शाळेच्या भोवती कम्पाऊंड वॉल असणेही गरजेचे आहे. परंतु अशा अनेक शाळा आहेत की जेथे कॅम्पाऊंड वॉल नाहीत, तेथे ती बांधणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, पान क्र.31, बाब क्र.35 माध्यमिक विभागाबाबत सांगावयाचे तर याठिकाणी शिक्षकेतर कर्मचारीवर्गाच्या अतिरिक्त पदाच्या वेतनावरील खर्च भागविण्यासाठी सहायक अनुदानाची तरतूद केली आहे. याबाबतीत अशी विनंती आहे की, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनेक पदे नवीन आकृतीबंधामुळे भरली गेलेली नाहीत. त्यामुळे सदरहू नवीन आकृतीबंध रद्द झाला पाहिजे. एस.एस.कोड किंवा चिपळूणकर समितीनुसार तेथे जागा भरणे आवश्यक आहेत. अनेक शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे नसल्यामुळे काम करताना अनेक अडचणी येत असतात. त्याचप्रमाणे अर्धवेळ ग्रंथपाल पूर्णवेळ करणे अत्यंत गरजेचे आहे आणि ते देखील व्हावे अशी मी या चर्चेच्या निमित्ताने अपेक्षा करतो. वेतनेतर अनुदान 2004 पासून बंद असल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे आणि व्यवस्थापनासमोर अनेक समस्या निर्माण होतात. म्हणून वेतनेतर अनुदान देखील मिळाले पाहिजे. शिक्षण विभागामध्ये अनेक रिक्त पदे आहेत. तालुक्यापासून जिल्हा लेव्हलवर आणि पूर्ण शिक्षण विभागामध्ये अधिकारी व कर्मचारी यांची अनेक पदे रिकामे असल्यामुळे कामाचा बोजा वाढतो. त्यामुळे तेथे देखील पदे भरणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्र.37 याठिकाणी बिगर आदिवासी विनाअनुदानित 54 माध्यमिक शाळांना मान्यता देण्यात आली आहे. त्याबाबतीत अनुदान देण्याची तरतूद झालेली नाही. त्यामुळे तेथे शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. माझी अशी विनंती आहे की, त्याठिकाणी अनुदानाची तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच शिक्षण सेवकांच्या मानधनाच्या प्रश्नाबाबत बरीच चर्चा झाल्यानंतर देखील त्यांना तुटपुंजे मानधन देण्यात येत आहे. त्यासाठी देखील अनुदानाच्या माध्यमातून तरतूद व्हावयास पाहिजे अशी अपेक्षा करतो.

सभापती महोदय,अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्र.78, सांगावयाचे तर रेशनिंगच्या माध्यमातून गहू, तांदूळ, साखर, केरोसीन इ.बाबींचा पुरवठा केला जातो. पण प्रत्यक्षात जे गरजू ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे . . ..

आहेत, त्यांना ते मिळत नाही. त्यामुळे अन्न व नागरी पुरवठा विभागाने याच्या संबंधातील यंत्रणेमध्ये बदल करणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून यानिमित्ताने मी याठिकाणी विनंती करतो की, अन्न व नागरी पुरवठा विभागाने पुरवठा विभागाच्या यंत्रणेमध्ये बदल करावा.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाब क्र.98 बाबत सांगावयाचे तर जिल्हा रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय याठिकाणी अनेक विभागांमध्ये डॉक्टर उपलब्ध नाहीत. त्यामुळे पेशंटच्या बाबतीत ज्याप्रकारे व्यवस्था व्हावयास पाहिजे, ती होत नाही. अशा वेळी डॉक्टरांची नियुक्ती होणे अत्यंत गरजेचे आहे. जिल्हा रुग्णालयामध्ये, उप जिल्हा रुग्णालयामध्ये औषधांचा देखील तुटवडा असतो. प्रत्येक उप जिल्हा उप रुग्णालयामध्ये अद्ययावत मशिनरीची देखील आवश्यकता आहे. मी यानिमित्ताने विनंती करतो की, चोपडा उप जिल्हा रुग्णालय, जळगाव जिल्हा येथे डॉक्टरांची नियुक्ती होणे आवश्यक आहे, ती करण्यात यावी.

सभापती महोदय, आदिवासी विभागाच्या बाब क्र.100 संदर्भात सांगावयाचे आहे. याठिकाणी आहार खर्चामध्ये वाढ आणि सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या संदर्भात मागणी केलेली आहे. याठिकाणी विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचा आहार आणि वस्तू, साहित्य मिळण्याची गरज आहे. त्यासाठी अधिकची तरतूद असावी अशी अपेक्षा करतो. तसेच मुलींसाठी स्वच्छता गृहासाठी तरतूद करण्यात यावी. आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या निवासी आश्रमशाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पगार 1 तारखेला होण्याच्या दृष्टीने तरतूद व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्र.96 नुसार ग्रामीण भागामध्ये डॉक्टरांची भरती होणे अत्यंत गरजेचे आहे. काही प्रमाणात भरती झालेली आहे. परंतु संपूर्ण ग्रामीण भागामध्ये ज्याठिकाणी खरोखर वैद्यकीय सेवा आवश्यक आहे अशा पी.एच.सी.सेंटरला डॉक्टरांची भरती होणे गरजेचे आहे. तसेच तेथे औषधांचा पुरवठा होणे आवश्यक आहे. मेडिकल किटस् बाबत सांगावयाचे तर तेथे चांगल्या प्रकारचे साहित्य मिळावे अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या बाब क्र.131 मध्ये बालसुधार गृहाबाबत मुद्दा आहे. त्यामध्ये सुधारणा होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी लागणारे जे वेतनेतर अनुदान आहे मग दूरध्वनी असेल, वीज असेल किंवा इतर सामुग्री असेल, आहार खर्च असेल, प्रवास खर्च असेल या संदर्भात देखील तरतूद व्हावी अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे....

सभापती महोदय, शिक्षण विभागामध्ये दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी आणि नंतर लागलेल्या शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचा हिस्सा पुरवणी मागणीमध्ये दिसत नाही. त्यासंदर्भात तरतूद करण्यात यावी, अशी मी शिक्षण विभागाला विनंती करतो व मला याठिकाणी बोलण्याची संधी दिली याबद्दल माननीय सभापतींचे आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो. जयहिंद.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, बाब क्रमांक 29, पृष्ठ क्रमांक 26, कृषी विभागाच्या संदर्भात मी या ठिकाणी बोलणार आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये खऱ्या अर्थाने बदलते हवामान आणि वाढलेल्या तापमानामुळे आंबा आणि काजू हे प्रमुख पीक असताना या पिकांनी मोहर धरल्यानंतर त्याचे रुपांतर फलधारणेमध्ये न झाल्यामुळे आज कोकणातील आंबा व काजू बागायतीचे पूर्णपणे नुकसान झालेले आहे. या पिकांवर करपा रोग पडल्यामुळे अतिशय कमी प्रमाणात ही फळे आलेली आहेत, त्यामुळे याबाबतीत नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टिकोनातून तरतूद करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 25, बाब क्रमांक 28 केंद्र पुरस्कृत तेलताड प्रकल्पाच्या बाबतीत मी याठिकाणी बोलू इच्छितो. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये कोकण विकास महामंडळाने एक लाख हेक्टर जमिनीवर तेलताड झाडांची लागवड केली. त्या झाडांना फल धारणा होत असताना त्या ठिकाणी या कोकण विकास महामंडळामार्फत एक कारखाना काढण्यात आला तो कारखाना चार तासात बंद पडला त्यामुळे आज त्याठिकाणी उत्पादन होणाऱ्या फळांचे क्रशिंग होत नसल्यामुळे ती फळे पूर्णपणे वाया गेलेली आहेत. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये लावलेल्या या झाडांना वाढविण्याकरिता अनुदान देण्याची गरज आहे. अशा प्रकारचे अनुदान देऊन त्यांना पुरस्कृत करण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 26, बाब क्रमांक 29 वर बोलत असताना मला या ठिकाणी असे सूचवावयाचे आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये या आंबा नुकसान भरपाईसाठी आणि काजू नुकसान भरपाईसाठी केंद्र शासनाकडून 27 कोटी रुपये देण्यात आले. पण या मदतीतील केवळ 13 कोटी रुपये वाटण्यात आले व 14 कोटी रुपये तसेच अखर्चित राहिले. प्रस्ताव पाठवताना संपूर्ण जागेचा प्रस्ताव पाठविण्यात आला. पण अनुदान देत असताना फक्त दोन हेक्टर शेतीला मदत देण्यात आलेली आहे. तेव्हा हे दोन हेक्टर पर्यंत मदत देण्याची अट शिथिल करुन बागायतदारांची जेवढी मोठी बाग असेल आणि त्यांच्या जेवढया कलमांचे नुकसान झाले असेल तेवढी नुकसानभरपाई दिल्यास ही शिल्लक राहिलेली रक्कम खर्ची पडेल किंवा राहिलेली शिल्लक रकम रोखीने अनुदान देण्याची योजना करण्यात यावी, तरच ही रकम खर्ची पडेल. शासनाने अशा प्रकारचा निर्णय करावा, अशा प्रकारची मी विनंती करतो.

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, पष्ठ क्रमांक 27, बाब क्रमांक 30 वर मी बोलू इच्छितो. फयान वादळावर या सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. फयान वादळात नुकसान झालेल्या काही मच्छीमारांना आपले पुरावे सादर करता न आल्यामुळे त्यांना जाळयांची आणि होडीची नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे जिल्हा बँकेने पुढाकार घेऊन त्यांना रुपये 15 हजार ते 50 हजार इतके कर्ज दिले. पण बदलत्या हवामानामुळे आणि अवकाळी पावसामुळे मच्छिमारी न झाल्यामुळे हे कर्ज ते मच्छीमार फेडू शकले नाहीत त्यामुळे या बँकेने या मच्छीमारांवर नोटिसा काढल्या आहेत. अशा प्रकारे मच्छीमारांना नोटिसा काढून दुष्काळाच्या परिस्थित त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रयत्न चाललेला आहे म्हणून शासनाने या कर्जाचे व्याज माफ करावे आणि कर्जाची मुदत वाढवून द्यावी अशा प्रकारची मी शासनाला सूचना करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 31, बाब क्रमांक 35 वर मी बोलू इच्छितो. इयत्ता दहावी आणि इयत्ता बारावीसाठी कोकण बोर्ड निर्माण झाले. त्यासंबंधीचा शासन निर्णय,दिनांक 14 मार्च, 2011 ला काढण्यात आलेला आहे. परंतु खऱ्या अर्थाने हे बोर्ड चालू होण्याची गरज आहे. दि. 24 जून, 2010 रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये त्याची घोषणा झाली आणि दिनांक 14 मार्च, 2011 मध्ये त्याच्या अंमलबजावणीचा जी. आर. निघाला. पण प्रत्यक्षात या बोर्डाची सुरुवात कधी होईल याबाबतची घोषणा मंत्री महोदयांनी करावी. कोकणात इयत्ता दहावी आणि इयत्ता बारावीला दर वर्षी एक लाख विद्याथी बसतात. तेव्हा ऑक्टोबर, 2011 पासून या कोकण बोर्डाच्या परीक्षेला विद्यार्थ्यांना बसता येईल काय, याबाबतचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 70, बाब क्रमांक 61. जलसंपदा या विभागावर मी बोलू इच्छितो. कोकणामध्ये खऱ्या अर्थाने खार भूमी आहे. या खार भूमीमुळे शेतीजमीन नापीक होते

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

या खारभूमीबाबत कोकणात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये 116 कोटी रुपयांची तरतूद केली. पण आज या पुरवणी मागणीमध्ये 7 ते 8 प्रकल्पांसाठी फक्त 1-1 हजार रुपये टोकन तरतूद करुन कोकणाची दिशाभूल करण्याचा किंवा कोकणाला वाटाण्याच्या अक्षता लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. गेल्या वर्षी 30 कोटी रुपये आणि या वर्षी 39 कोटी रुपये खारभूमीसाठी देण्याची गरज होती पण आज या पुरवणी मागण्यांमध्ये 7 ते 8 प्रकल्पांसाठी फक्त 1-1 हजार रुपये टोकन तरतूद करुन खऱ्या अर्थाने कोकणाची पिळवणूक किंवा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या ठिकाणी खारभूमी विभागाने आतापर्यंत 24 अंदाजपत्रकांना मान्यता घेतलेली आहे आणि 15 अंदाजपत्रके सादर केलेली आहेत. अशी एकूण 46 अंदाजपत्रके तयार केलेली आहेत. ज्या ठिकाणी खारजमीन नापीक होते त्या खारजमिनी पिकाखाली आणण्याकरिता विभागाने शासनाकडे प्रस्ताव पाठवून आणि मंत्रिमंडळामध्ये तशा प्रकारची घोषणा करुनही कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, वेंगुर्ला तालुक्यात रेगेमानस आणि दत्तमानस हे रोजगार हमी योजनेतून झालेले बंधारे आहेत. त्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी पैसे न मिळाल्यामुळे त्यांची दुरुस्ती होऊ शकली नाही. हे बंधारे रोजगार हमी योजनेतून झालेले असले तरी खारजमीन नापीक होण्यापासून वाचविण्याकरिता बांधलेले हे बंधारे आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक होऊ नये यासाठी रोजगार हमी योजनेतून जे बंधारे झालेले आहेत त्या सर्व बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 71 वरील बाब क्रमांक 63 बाबत बोलावयाचे आहे. कोकण पॅकेजमध्ये कोकणातील सिंचन प्रकल्पांना जवळजवळ 1500 कोटी रुपये तीन टप्प्यात देण्याची घोषणा झाली. पण अनेक प्रकल्पांना आजही पुनर्वसनाचे पैसे देऊ शकलेले नाहीत. आज कर्नाळ्यामधील प्रकल्पाचे काम 80 टक्के पूर्ण झालेले आहे. त्या प्रकल्पाचे पुनर्वसनाचे 4 निवाडे मंजूर झालेले आहेत त्या 4 निवाड्यातील 12 कोटी रुपये देय असताना शासनाने पुनर्वसन विभागाकडे फक्त 2 कोटी रुपये भरलेले आहेत. त्यामुळे त्या शेतकऱ्यांचा मोबदला पुनर्वसन विभाग वाटू शकत नाही. ते 12 कोटी रुपये तातडीने देऊन खऱ्या अर्थाने

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. परशुराम उपरकर ....

पुनर्वसनाचा प्रश्न सोडविण्याची गरज आहे. तशाच प्रकारे टाळंबा हा एक मोठा प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्ये असलेला वनसझेचा प्रश्न तसेच आकारपडीचा प्रश्न न सुटल्यामुळे आज प्रकल्प सुरु होऊन 7 वर्षे होऊनही पुनर्वसनाचा प्रश्न सुटलेला नाही. आधी पुनर्वसन आणि नंतर धरण अशा प्रकारची शासनाची जी भूमिका आहे त्याची अंमलबजावणी करण्याकरिता त्या भागातील 7 गावातील सर्व शेतकरी कुटुंबे रस्त्यावर उतरलेली आहेत. अशा प्रकारची आंदोलने सातत्याने त्या ठिकाणी झ ाालेली आहेत. त्या ठिकाणच्या पुनर्वसनासाठी यावेळी शासनाकडे 34 कोटी रुपयांचा प्रस्ताव आलेला आहे. त्या प्रस्तावाचे पैसे सुध्दा शासनाने द्यावेत आणि त्या 7 गावांचा पुनर्वसनाचा प्रश्न तसेच त्या भागातील वनसझेचा प्रश्न तातडीने सोडवावा.

सभापती महोदय, यानंतर मला पान क्रमांक 133 वरील बाब क्रमांक 96 बाबत बोलावयाचे आहे. लेप्टोची साथ गेली 12 वर्षे कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत आहे. गेल्या वर्षी 25 रुग्ण दगावले.. त्या ठिकाणी असलेले प्लेटलेट सेपरेशनचे युनिट 1 डिसेंबरला चालू करणार अशा प्रकारची घोषणा त्यावेळच्या मंत्री महोदयांनी केली पण अद्याप त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची व्यवस्था झालेली नाही. त्या ठिकाणी टेक्निशियन दिले गेले नाहीत. त्या ठिकाणी ज्या सुविधा लागतात त्या पुरविलेल्या नाहीत. गेल्या डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये त्या भागातील शल्य चिकित्सकाच्या बदलीबाबत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. पुरवणी मागणीच्या निमित्ताने 14.12.2010 रोजी, तारांकित प्रश्न क्रमांक 9534 च्या निमित्ताने 15.12.2010 रोजी तसेच नियम 93 अन्वये 15.12.2010 रोजी हा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. 20 वर्षे जिल्ह्यात असलेल्या या शल्य चिकित्सकाची बदली तातडीने करणार काय यासंदर्भात त्यावेळी मंत्र्यांनी सभागृहात उत्तर दिले की, त्यांची तातडीने बदली करु पण अद्याप त्या शल्य चिकित्साची बदली झालेली नाही. म्हणजे सभागृहात दिलेले आश्वासन सुध्दा मंत्री पाळत नाहीत. अशा प्रकारची दिशाभूल करण्याचा प्रयत्न मंत्री महोदयांकडून चाललेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

मंत्री महोदयांनी दुसऱ्या प्रश्नाला असे उत्तर दिले होते की, लेप्टोसंबंधी मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे मी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एस.पी. यांना पत्र लिहून वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी जिल्ह्यातील एकाही पोलीस स्टेशनमध्ये मनुष्यवधाचा गुन्हा नोंदलेला नाही असे मला उत्तर पाठविले आहे. म्हणजे मंत्री महोदयांनी माझी आणि सभागृहाचीही दिशाभूल केलेली आहे. त्यामुळे आज पुन्हा मंत्री महोदयांना याची जाणीव करुन देतो. त्यांनी पुन्हा या मुद्याचे उत्तर देऊन आम्हाला न्याय देणार की नाही ते सांगावे.

यानंतर मी पर्यावरण विभागाच्या पान क्र.133, बाब क्र.109 वर माझे विचार मांडतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संपूर्ण पश्चिम घाटासाठी माधवराव गाडगीळ समिती नेमली होती. या समितीने कोकणात आलेले प्रकल्प लोकांचा विरोध असतानाही करण्यात आले असे जाहीर केले होते. त्यांनी तसे अहवालात नमूद केलेले आहे. केंद्रीय पर्यावरण समितीने 39 खाण प्रकल्पांचे फेर सर्वेक्षण करावे असे आदेश दिले होते त्याचे काय झाले ते मंत्री महोदयांनी सांगावे.

यानंतर मी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, पान क्र.148 वरील बाब क्र.127 वर माझे विचार मांडतो. माननीय उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री हे मूळचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आहेत. मी यापूर्वी आयटीआय संबंधी अनेकवेळा प्रश्न उपस्थित केला होता. माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील हे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री असताना सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये आयटीआयमध्ये पर्यटन उद्योग डोळ्यासमोर ठेवून फळांवर प्रक्रिया करणारे नवीन ट्रेड सुरु केले जातील असे सांगितले होते. परंतु हे ट्रेड अद्याप सुरु झालेले नाहीत. त्याचप्रमाणे हे ट्रेड सुरु न झाल्यामुळे यासाठी लागणाऱ्या शिक्षकांची सुध्दा भरती केलेली नाही. तेथील आयटीआयमध्ये असलेली यंत्रसामुग्री जीर्ण झालेली आहे. त्याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी विनंती करतो.

त्याचप्रमाणे या विद्यार्थ्यांना आजही 40 रुपये विद्यावेतन दिले जाते. याबाबतचा जी.आर.1981 सालातील आहे. आज महागाई पराकोटीला पोहोचली आहे. त्यामुळे विद्यावेतनात भरीव वाढ करण्यात यावी. तसेच तासिकेवर शिकविणाऱ्या शिक्षकांच्या तासिका वाढविल्या आहेत. परंतु त्यांचे मानधन वाढविलेले नाही. सध्याची महागाई विचारात घेता त्यांचे दरही वाढवावेत व

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

तेथे कायम स्वरुपी शिक्षक नेमण्याची गरज आहे. फोंडा आयटीआयमध्ये नळ कारागीर हा इंटेरियर डिझाईनचा कोर्स शिकवितो. त्या शिक्षकाची बदली करण्यासाठी तातडीने निर्णय घ्यावा अशी विनंती करतो आणि येथेच थांबतो.

----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



NTK/ ST/ D/

<u>पोलिसांनी दिलेल्या वाईट वागणुकीबाबत</u>

**उप सभापती** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौरांशी मी स्वत: बोललो आहे. त्यांनी मला सांगितले की, त्यादिवशी पोलिसांनी ढकलताना माझ्या करंगळीला मार लागला. त्यांची मूळ तक्रार पोलिसांबद्दल नसून त्या ठिकाणच्या एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांविरुध्द आहे. त्यांनी असे सांगितले की, श्री.पण्णीकर हे अत्यंत उद्धटपणे व उर्मटपणे माझ्याशी वागले. एरवी देखील त्यांची वागण्याची तशीच स्टाईल आहे. त्यामुळे मी संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांना विनंती करतो की, या खात्याच्या अधिकाऱ्यांना बोलवून यासंदर्भात त्यांची चौकशी करावी आणि ते जर खरोखर दोषी असतील तर आपल्याला योग्य वाटेल ती कारवाई त्यांच्याविरुध्द कारवाई करावी. कारण महापौर यांच्यासारख्या प्रतिष्ठित व्यक्तींना शासकीय अधिकारी अशी उद्धटपणे वागणूक देत असतील तर ते भूषणावह नाही. दुसरी गोष्ट अशी की, त्यांना 10 एमएलडी पाणी वाढवून पाहिजे. ही बाब एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी मान्य केलेली आहे. त्याची अंमलबजावणी त्वरित करावी.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्ही आपले आभारी आहोत. परंतु आपल्या निदेशाची कोण नोंद घेत आहे ते समजले नाही. कारण कोणाला हा विषय समजलेला नाही असे दिसत आहे. सगळे मंत्री महोदय एकमेकाकडे बघत आहेत. निदान आपल्या म्हणण्याची दखल घेण्यात आली आहे एवढे तरी आम्हाला कळू द्या.

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, आपण दिलेले निदेश संबंधित मंत्री महोदयांना कळविण्यात येतील.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण बीड जिल्ह्यातील तलाठी पदाच्या परीक्षेबाबत शासनाने आज निवेदन करावे असे मंत्री महोदयांना सांगितले होते.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मंत्री महोदयांचे निवेदन तयार झाल्यावर ते सभागृहात केले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4....

NTK/ ST/ D/

**पृ.शी./मु.शी.**: सन 2010-11 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

( चर्चा पुढे सुरु....)

श्री.हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-11च्या पुरवणी मागण्यांवर मी बोलण्यासाठी उभा आहे. या राज्यामध्ये अल्पसंख्याक विभाग आहे. या विभागाची या पुरवणी मागण्यांमध्ये कोणतीही मागणी नाही. या विभागाचा कारभार नीट चालला आहे असे दाखविले जाते.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई...

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

वक्फ बोर्डाच्या बाबतीत बरेच काही करता येण्यासारखे आहे. परंतु काही केले जात नाही.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 31 वरील बाब क्रमांक 34 मध्ये अल्पसंख्याक संस्था/शाळा यांसाठी पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता तरतूद करण्यात आली आहे. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी केन्द्राने 18 कोटी रुपये पाठविलेले आहेत.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, बीड जिल्हयातील तलाठ्याच्या परीक्षेच्या संदर्भात शासनाने निवेदन करण्यासंबंधी आपण निदेश दिले होते. त्यानुसार मंत्री महोदय निवेदन करु इच्छित आहेत. तेव्हा त्यांना निवेदन करण्याची परवानगी द्यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे. माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे. राज्यमंत्री महोदयांच्या निवेदनानंतर सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई हे आपले भाषण पुढे सुरु करतील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बीड जिल्हाधिकारी कार्यालयाने तलाठी पदासाठी उमेदवारांना अपात्र ठरविल्याबाबत

**मु.शी.**: बीड जिल्हाधिकारी कार्यालयाने तलाठी पदासाठी उमेदवारांना अपात्र ठरविल्याबाबत सर्वश्री धनंजय मुंडे, संजय केळकर व पाशा पटेल, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय,सर्वश्री. धनंजय मुंडे, संजय केळकर व पाशा पटेल, वि.प.स. यांनी "बीड जिल्हाधिकारी कार्यालयाने तलाठी पदासाठी उमेदवारांना अपात्र ठरविल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मी पुढील निवेदन करीत आहे :-

सभापती महोदय, ऑक्टोबर 2011 पर्यन्त बीड जिल्ह्यामध्ये तलाठ्याची 76 पदे रिक्त झाली होती. ही पदे भरण्याची प्रक्रिया जिल्हाधिकारी, बीड यांनी सुरु केलेली आहे. जाहिरात प्रकाशित झाल्यानंतर एकूण 29776 अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी छाननी केल्यानंतर 17874 अर्ज पात्र आढळून आले. उर्वरित 11902 उमेदवारांचे अर्ज अपात्र आढळून आले. जे 11902 अर्ज अपात्र ठरले त्याची कारणे, उमेदवार वयोमर्यादेत न बसणे, डिमांड ड्राफ्ट न जोडणे, शैक्षणिक अर्हतेमध्ये न बसणे, छायाचित्र न जोडणे आणि रहिवास प्रमाणपत्र न जोडणे ही आहेत. 11902 अपात्र उमेदवारांपैकी 1128 उमेदवार रहिवास प्रमाणपत्र नसल्यामुळे अपात्र करण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले आणि माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आणि सभागृहातील अनेक सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे उद्या दिनांक 22.3.2011 रोजी तलाठी संवर्गासाठीची परीक्षा घेण्यात येणार होती आणि त्यामध्ये जवळ जवळ 8122 विद्यार्थ्यांना संधी नाकारण्यात आलेली आहे ही बाब लक्षात घेऊन शासनाने ही परीक्षा 15 दिवसानंतर घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. 8 ते 10 दिवसाच्या कालावधीत उमेदवारांनी हे रहिवास प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करावे. ज्यांना रहिवास प्रमाणपत्रा अभावी अपात्र केलेले आहे तेवढ्याच उमेदवारांचा आपण विचार केलेला आहे. अशा उमेदवारांनी 10 दिवसामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये रहिवास प्रमाणपत्र द्यावे.ग्रामपंचायत

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तलाठी, ग्रामसेवक किंवा तहसीलदार यांनी दिलेले रहिवास प्रमाणपत्र मान्य करुन त्या उमेदवारांना संधी देण्यात येईल.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: सन 2010-2011 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु....)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 31 वरील बाब क्रमांक 34 मध्ये अल्पसंख्याक संस्था/शाळा यांसाठी पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता तरतूद करण्यात आली आहे. मघाशी मी सांगत होतो की, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी 18 कोटी रुपये केन्द्र सरकारने राज्याकडे पाठविलेले आहेत. परंतु ते पैसे प्रत्यक्षात खर्च झाले नाहीत.या संबंधी बाहेर विशेषत: उर्दू प्रेसमध्ये अशी चर्चा आहे की, अल्पसंख्यांक विभागाचे मंत्री आणि विभाग यांच्यामध्ये टेंडर कुणाला द्यावे यावरुन रस्सीखेच चालू आहे. म्हणून हा निधी खर्च होऊ शकलेला नाही. ही बाब शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारित असेल तर गणवेशासाठी आलेला निधी ताबडतोबीने खर्च करण्यासंबंधी मंत्री महोदयांनी संबंधिताना ताबडतोबीने निदेश द्यावे अशी मी विनंती करतो.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KGS/ ST/ KTG/ 20:00

श्री.हुसेन दलवाई.......

अल्पसंख्याक विभागाचे माननीय राज्यमंत्री याठिकाणी बसले आहेत. हे प्रकरण थांबले आहे, या संदर्भात चौकशी सुरु आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 25 व 26 अन्वये कृषी विभागाची मागणी सादर केली आहे. कोकणामध्ये मुख्यत: आंबा व काजूचे उत्पादन घेतले जाते. यावर्षी फक्त 20 टक्के पीक येणार आहे. त्यामुळे शासनाने आंबा व काजू बागायतदारांना मदत करण्याच्या संदर्भात निर्णय घ्यावा. तागापेक्षा अधिक चांगले पीक रॅनसीडचे येते. त्याचा प्रयोग मंडणगड येथे सुरु आहे. त्या संदर्भात कृषीमंत्र्यांनी माहिती घ्यावी आणि अधिक काय करता येईल याचा विचार करावा.

सभापती महोदय, जलसंधारण विभागाची बाब क्रमांक 73, पृष्ठ क्रमांक 87. गेली 10-12 वर्षे मी सातत्याने मागणी करीत आहे. वसिष्ठी नदीचे पाणी समुद्रात सोडले जाते, ते पाणी लिफ्ट करण्याची योजना शासनाने तयार करावी. योजना मंजूर झाली तर त्या भागातील डोंगर भिजतील. मी एक योजना दिली आहे ती पायलट योजना म्हणून स्वीकारली तर इतर योजना सहकाराच्या माध्यमातून करण्याबाबत विचार करता येईल. मी दिल्ली येथे जाऊन केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांची भेट घेऊन लिफ्ट योजना राबविण्यासंबंधी विनंती केली होती. त्यांनी सहकाराच्या माध्यमातून योजना राबवावी असे सुचविले. कोकणामध्ये सहकार चळवळ तितकी फोफावलेली नाही. पश्चिम महाराष्ट्रात सरकारच्या पैशातून लिफ्ट योजना तयार झालेल्या आहेत. त्यामुळे हे काम सरकारच्या माध्यमातून व्हावे. मी यासंदर्भात योजना दिलेली आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 89, पृष्ठ क्रमांक 104. कोकणात परशुरामाचे पवित्र स्थान आहे. ते पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्याचे शासनाने निश्चित केले आहे. त्यासाठी 3 कोटी रुपये देण्याचे ठरले होते. प्रत्यक्षात यावर्षी 10 लाखाची मागणी सादर केली आहे. त्यामुळे हे काम रखडत रखडत होणार आहे. असे न करता तेथे भरीव तरतूद करुन पर्यटन क्षेत्र उभे करण्याचा शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 96, पृष्ठ क्रमांक 113. सार्वजनिक आरोग्य विभागाची मागणी सादर केली आहे. राज्यात आयुर्वेद पदवी मिळविलेल्या डॉक्टरांना शासन सेवेत सामावून घेतले जाते. बीयुएमएस, युनानी डॉक्टरांची देखील मागणी आहे. या मागणीकडे का लक्ष दिले जात नाही. कोर्स, अभ्यास आणि ज्ञान एकाच प्रकारचे आहे. किंबहुना युनानी डॉक्टरांचे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई.......

ज्ञान अधिक चांगले असावे. तरी देखील त्यांच्यावर सातत्याने अन्याय केला जात आहे. हा अन्याय शासनाने दूर करावा व त्यांना शासन सेवेत सामावून घ्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 74, पृष्ठ क्रमांक 71 वर सांस्कृतिक कार्य विभागाची मागणी सादर केली आहे. नाट्य क्षेत्राला मोठया प्रमाणात शासनाकडून मदत केली जाते. साहित्य संमेलनासाठी आर्थिक मदत दिली जाते. ही उच्चवर्णीयांची प्रकरणे आहेत. प्रत्यक्षात ज्या लोककला आहेत त्यांच्याकडे शासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. कठपुतलीचा नाच आहे. कोकणातील ठाकर समाजाची लोककला आहे ती वर्षानुवर्षे जपली गेली आहे. त्यांच्या कलेसाठी सरकार मदत करीत नाही. आदिवासींसारखेच त्यांचे नृत्य असते. दशावतार, बाल्या नृत्य यांना उत्तेजन दिले पाहिजे. नागपूरच्या एका गावात मुस्लीम जादूगार आहे. त्यांची कला अत्यंत चांगली आहे. त्यांना शासनाकडून कोणतीही मदत मिळत नाही.

नंतर 4टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई ..........

महोदय, संत वाड़मयाच्या बाबतीत विद्यापीठ निघेल की नाही हे मला माहीत नाही पण किमान पीठ तरी निर्माण करावे आणि त्यात अशा सर्वच संत वाड़मयांचा अभ्यास केला जावा. शेख महम्मद यांनी म्हटले की, "मी जरी अविंद, मनी माझ्या गोविंद" याप्रमाणे सबंध मराठ्यांनी महाराष्ट्राचा इतिहास घडविला त्यादृष्टीने याबाबत सुध्दा प्रयत्न होणे आवश्यक आहे, आणि शासन त्याकडे लक्ष देईल, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-------

.....2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-11 च्या खर्चाच्या पूरक मागण्यांवर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, बाब क्र. 109, पृ.क्र. 139 च्या अनुषंगाने पर्यावरणाच्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, सध्याच्या परिस्थितीत पर्यावरणाच्या बाबतीत अत्यंत जागरुकपणे काम करण्याची गरज भासू लागली आहे. ज्या पध्दतीने ग्लोबल वॉर्मिंगमुळे संपूर्ण जगात वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे त्याचा विचार करता येणाऱ्या दिवसांमध्ये पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून प्रकर्षाने करणे आवश्यक आहे. आवाजाचे प्रदूषण, वायू प्रदूषण किंवा इतर अनेक प्रकारचे प्रदूषण अशा वेगवेगळ्या प्रकारे प्रदूषण होत असते. त्याला कुठेतरी पायबंद घालण्याचा प्रयत्न शासनाच्या नियोजनाच्या माध्यमातून किंवा वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे. मला आठवते की, काही वर्षापूर्वी शासनाने बायो-गॅस योजनेचे महत्व लोकांना पटवून दिले व त्या माध्यमातून वेगवेगळ्या योजना लोकांसमोर आणल्या व पर्यावरणासाठी आवश्यक असल्याचे पटवून दिले व त्या योजना राबविण्याचा त्या काळात प्रयत्नही केला गेला. आज राज्यातील अनेक गावे मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत, काही गावांचे तर शहरात रुपांतर होत आहे. असे होत असताना त्या गावात सांडपाण्याचा निचरा योग्य प्रकारे होत नाही. आपण याच सभागृहात कायदा पास केला की ग्रामपंचायती अथवा जिल्हा परिषदांच्या निवडणुका लढवावयाच्या असतील तर आपल्या घरात शौचालय असणे आवश्यक आहे. पण ही बाब आर्थिक बाबीशी संबंधित आहे. केवळ पर्यावरणाचा समतोल किंवा स्वच्छता राखणे यासाठीच हा कायदा केला आहे पण त्याचे पालन करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल अशा वेगवेगळ्या योजना शासनाने घेणे आवश्यक आहे. ईको-व्हॅलीची योजना आपण वेगवेगळ्या पध्दतीने ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून सुरु केली आहे. अशा अनेक योजनांचा प्रचार व प्रसार चांगल्या प्रकारे होण्याच्या दृष्टीने तरतूद होणे आवश्यक आहे. आज राज्यात विजेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्पाच्या बाबतीत आपण वेगवेगळ्या चर्चा ऐकतो. पण काही तरी नवे आणि नवीकरण करावयाचे असेल तर त्याचा प्रचार होणे आवश्यक असते. मग त्यात सोलर एनर्जी असेल अथवा ॲटोमिक एनर्जी असेल त्यांचा वापर करण्याच्या दृष्टीने तसेच गावा-गावात रस्त्यावरील दिवे सोलरच्या माध्यमातून सुरु करुन पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे आवश्यक आहे.

....3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे .........

महोदय, बाब क्र. 96, पृ.क्र. 113, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अनुषंगाने अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात बोलत असतात की, शासकीय रुग्णालयांमध्ये वेगवेगळ्या उपकरणांचा अभाव असतो. शासनाच्या माध्यमातून अशी उपकरणे विकत घेण्यासाठी निधी दिला जातो व वेगवेगळे कार्यक्रम हाती घेतले जातात. पण अनेक वेळा दिसून येते की, या उपकरणांचा वापर करणाऱ्या तंत्रज्ञांच्या नेमणुकाच केलेल्या नसतात व त्यामुळे अशी उपकरणे वर्षानुवर्षे पडून निकामी होतात. अशा प्रकारे महागडी उपकरणे घेऊन त्याचा वापर करणारा स्टाफ मिळणार नसेल तर ज्या कंपन्यांकडून ती विकत घेतली जातात त्या कंपनीशी कॉन्ट्रॅक्ट करावा की तंत्रज्ञांच्या नेमणुका होईपर्यंतची उपकरणांची जबाबदारी कंपन्यांची असेल, तरच ती उपकरणे लोकांसाठी उपयोगात येतील, असे मला वाटते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

सभापती महोदय, बाब क्रमांक 97,पृष्ठ क्रमांक 118 वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्यावर माझे विचार मी व्यक्त करणार आहे. वैद्यकीय महाविद्यालयांसाठी मोठया प्रमाणात तरतूद केली जात असते. सन्माननीय सदस्य नेहमी सांगत असतात की, वैद्यकीय अधिका-यांची व स्टाफची कमतरता आहे. त्यामुळे त्या त्या भागाची निकड लक्षात घेऊन, जास्तीत जास्त डॉक्टर्स कशा प्रकारे दिले जातील हे पाहण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 79,पृष्ठ क्रमांक 92 अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. आपण ग्राहक संरक्षणाच्या संदर्भात बोलतो. परंतु आज सर्रास साखरेचे किंवा तांदळाचे एक किलोचे पॅकींग अनेकदा 800 ग्रॅमचे असते. मात्र ग्राहकांकडून एक किलोचेच पैसे घेतले जातात. अशा प्रकारे ग्राहकांची सर्रासपणे लूट केली जाते. त्यामुळे वजन मापाचे स्टँडर्डायझेशन झाले पाहिजे. पॅकींग ज्या मापाचे असेल त्याच प्रमाणे त्यामध्ये माल असला पाहिजे. त्यामुळे यासंदर्भात बंधने घालण्याची आवश्यकता आहे,अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे विचार येथेच थांबवतो. धन्यवाद.

-----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, बाब क्रमांक 33, पृष्ठ क्रमांक 31, शालेय शिक्षण व क्रीडा विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. वाढीव खर्चासाठी 9 कोटीची तरतूद भविष्य निधीसाठी करण्यात आलेली आहे. मात्र याच खात्याशी संलग्न असलेले क्रीडा खाते व क्रीडा खात्याशी संलग्न असलेले 8 शारीरिक महाविद्यालये महाराष्ट्रात आहेत. या 8 शारिरीक महाविद्यालयांतील कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याच्या संदर्भात तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे यासंदर्भात तरतूद केली जावी, अशी माझी मागणी आहे. वाढीव मागणी करीत असताना 20 जुलै, 2009 च्या शासन निर्णयानुसार, ज्या शाळांचा"कायम"शब्द काढला आहे, त्या शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी प्राथमिक खर्चाची तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

बाब क्रमांक 84, पृष्ठ क्रमांक 99, अपंगाच्या शाळेच्या वाढीव तरतूदीसाठी 1.88 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. सन 2002 च्या पूर्वी मान्यता दिलेल्या 138 अपंगशाळा महाराष्ट्रात आहेत. 138 अपंगशाळांच्या कर्मचा-यांचे आझाद मैदानावर गेल्या 8-10 दिवसापासून आंदोलन सुरु आहे. या अपंग शाळांसाठी आर्थिक तरतूद करण्याची गरज आहे.

बाब क्रमांक 85,86 पृष्ठ क्रमांक 100, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागावर्ग यावर माझे विचार व्यक्त करणार आहे. आपल्या महाराष्ट्रात नवबौध्दांचे व मागासवर्गीयांचे शासकीय वसतिगृहे आहेत. या वसतिगृहाच्या अंतर्गत सजावटीसाठी 2.60 कोटी व 37.590 कोटी रुपयांची वाढीव तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु राज्यातील खाजगी अनुदानित वसतिगृहामधील विद्यार्थ्यांना महागाई नुसार, भत्ता वाढवून द्यावयास पाहिजे. मात्र त्यांना महागाई भत्ता वाढवून दिला जात नाही. तसेच त्या ठिकाणच्या अधीक्षकांना वाढीव वेतन दिले पाहिजे. परंतु यासाठी तरतूद केलेली नाही, त्यामुळे यासंदर्भात तरतूद करण्याची यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 99, पृष्ठ क्रमांक 125, आदिवासी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या व्याजापोटी 60.34 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. या ठिकाणच्या आदिवासी शाळेवर रोजंदारीने काम करणारे जे शिक्षक आहेत त्यांना दिवसाकाठी 90 रुपये दिले जातात व जो नॉन टिचींग स्टाफ आहे, त्यांना केवळ 67 रुपये

..3..

मिळतात. त्यामुळे ते आझाद मैदानावर उपोषणासाठी बसलेले आहेत. यांच्यासाठी सुध्दा तरतूद करण्याची आवश्यकता आहे. या लोकांना गेल्या 10 वर्षापासून नियमित करण्यात आलेले नाही. त्यामुळे या स्टाफला 3 वर्षानंतर नियमित केले जावे, अशी माझी मागणी आहे. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्यात अनेक औद्योगिक प्रशिक्षण संस्था काढल्या आहेत. या ठिकाणी काम करणारे निदेशक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नियमित करणे, त्यांचे मानधन वाढवणे, याबाबत काहीही करण्यात आलेले नाही.

सभापती महोदय, वसतिगृहासाठी मेन्टेनन्स ग्रँट वाढवण्याची आवश्यकता आहे. त्याच बरोबर 82 शाळा या खाजगी शिक्षण संस्था चालकांच्या आहेत. या शाळांमध्ये भ्रष्टाचार झाल्यामुळे या शाळांच्या मान्यता शासनाने काढून घेतलेल्या आहेत. लाभार्थ्यांसाठी ज्या शाळा आहेत त्यांना शासनामार्फत काहीही दिले जात नाही. शासनाचा निर्णय चांगला आहे परंतु या ठिकाणच्या शिक्षकांना शासनाने वा-यावर सोडलेले आहे. या ठिकाणचे शिक्षक नाशिकच्या आयुक्तांच्या कार्यालयासमोर गेल्या 8-10 दिवसापासून उपोषणाला बसले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे ....

त्यातील 20 शिक्षकांची प्रकृती अत्यवस्थ असून त्यांना हॉस्पिटलमध्ये सलाईन लावण्यात आले आहे. त्यांना त्वरित वेतन दिले गेले पाहिजे. त्याचबरोबर त्यांचे समायोजन व्हावयास पाहिजे. तसेच या शाळा आदिवासी विकास महामडळाने स्वत:शी संलग्न करुन घेतल्या पाहिजेत. अन्यथा त्या शाळांना पुन्हा सुधारण्याची संधी दिली पाहिजे, असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 125, पान नंबर 125, अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना वाढीव वेतन देण्यासाठी 333 कोटी रुपयांची तरतूद अपेक्षित आहे. यामध्ये एका गोष्टीचा समावेश होण्याची आवश्यकता आहे. राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये तासिका तत्वावर सुमारे 50 टक्के प्राध्यापक काम करीत आहेत. त्यांना व्हिजीटींग प्राध्यापकाप्रमाणे 300 रुपये तासिका या प्रमाणे मानधन देण्याचा निर्णय झ ाालेला आहे. परंतु अनेक विद्यापीठामध्ये जॉईट डायरेक्टर, त्याप्रमाणे तरतूद करीत नाही व त्यांना वाढीव मानधन देत नाहीत. ही तरतूद न करण्याचे कारण ते असे सांगतात की, राज्य शासनाकडून आम्हाला वाढीव तरतूद दिली जात नाही. तेव्हा त्यांना वाढीव मानधन देण्यात यावे,अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, त्याचबरोबर युजीसी ने नेट सेटची परीक्षा देणे क्षमापित केलेले आहे, अशा प्राध्यापकांची संख्या भरपूर आहे. नागपूर विद्यापीठामध्ये असे प्राध्यापक जवळजवळ 825 आहेत. त्याचबरोबर इतरही विद्यापीठामध्ये असे अनेक प्राध्यापक आहेत. या प्राध्यापकांना प्लेसमेन्ट देण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची गरज आहे. त्यांना कालबध्द पदोन्नती देण्याची गरज आहे. ज्या तारखेपासून त्यांना कालबध्द पदोन्नती मिळावयास पाहिजे, त्या तारखेपासून कालबध्द पदोन्नती देण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची गरज आहे. ती तरतूद अजून पर्यंत करण्यात आली नाही. तेव्हा ही तरतूद करण्यात यावी, अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 130, पान नंबर 139 संबधी मला बोलावयाचे आहे. शासनाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी अनेक गोष्टी केल्या आहेत. या सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी लागणा-या सर्व यंत्रसामुग्रीची व्यवस्था शासनाने केली आहे. परंतु राज्यातील बहुतेक औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये 1/3 निदेशकाची पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची व ही पदे लवकरात लवकर भरण्याची नितांत आवश्यकता आहे, असे मला सांगावयाचे आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्याकरिता मी उभा आहे. सर्व प्रथम बाब क्रमांक 30, पान नंबर 26, पशुसंवर्धन विभागासंबंधी मला बोलावयाचे आहे. पशुसंवर्धन विभागात जेवढे कर्मचारी काम करतात त्याच्या पगाराएवढेसुध्दा पशुधनाच्या माध्यमातून दूध मिळत नाही. म्हणून माझी शासनाला अशी विनंती आहे की, कणकवली येथे जिल्हयाची डेअरी आहे. त्या ठिकाणी 2200 लिटर्स दूध जमा होत असते. त्या ठिकाणी जवळजवळ 40 कर्मचारी काम करतात. पशुसंवर्धन, दुग्धविकास वा अन्य जी काही खाती आहेत, त्या खात्यांमध्ये किती कर्मचारी काम करतात, त्यांच्या पगारावर किती खर्च केला जातो आणि त्यातून किती आऊटपूट निघते, यासंबंधीचा सर्व्हे करण्यात यावा. जर तेवढा खर्च निघत नसेल तर ते विभाग बंद करण्यात यावा,अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे. या कर्मचा-यांच्या पगारावर वर्षाला जेवढा खर्च केला जातो, तेवढे देखील आऊटपूट निघत नसेल तर त्यांना कामावर ठेवण्यात काहीही अर्थ राहत नाही. या संदर्भात आपण निष्कारण बोलत राहतो व त्यामध्ये वेळ खर्च होतो. तसेच या कर्मचा-यावर शासनाचे पैसे देखील खर्च होत असतात त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी शासनाने ज्या पध्दतीने लक्ष द्यावयास पाहिजे दुर्देवाने त्या पध्दतीने शासन त्याकडे लक्ष देत नाही. या संदर्भात शासनाने मी सांगितल्याप्रमाणे प्रयोग करावा तसेच त्याचबरोबर पशुधन वाढविण्यासाठी आणि डेअरीचा व्यवसाय वाढविण्यासाठी काय करता येईल, या दृष्टीकोनातून प्रयत्न करावा अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 33, पान नंबर 31, शालेय शिक्षण विभागासंबंधी मला बोलावयाचे आहे. गेल्या वर्षी अर्थसंकल्पामध्ये कोकणासाठी रत्नागिरी येथे एसएससी आणि एचएससीचे वेगळे बोर्ड स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. गेल्या अनेक वर्षापासूनची आमची ही मागणी होती व शासनाने ती मागणी मान्य केली होती. परंतु प्रत्यक्षात हे बोर्ड तेथे केव्हा सुरु करण्यात येणार आहे, याबाबतीत माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा. हे बोर्ड सुरु करण्याच्या दृष्टीने कोणत्याही हालचाली सुरु झालेल्या नाहीत. तेव्हा त्याबाबातीत मंत्र्यांनी ठोस आश्वासन द्यावे, अशी मी त्यांना विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...

सभापती महोदय, यानंतर मला आणखी एक मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. शासनाने वेतनेतर अनुदान आता बंद केलेले आहे. ग्रामीण भागातील शाळा चालवितांना खूप अडचण येते. कोकणातील शाळा या कोणत्याही पक्षाच्या असल्या तरी त्या डोनेशन घेऊन चालत नाहीत. या शाळा प्रामाणिकपणे शिक्षण देण्याचे काम करीत असतात. म्हणून वेतनेतर अनुदान देण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत, अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, माध्यमिक शिक्षण विभागात मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु असून त्यासंबंधी मी आपल्याला एक उदहारण देऊ इच्छितो. दोडामार्ग तालुक्यात घोडगे परमे येथे धारेश्वर माध्यमिक विद्यालय नावाची एक संस्था असून गेल्या दोन वर्षापासून त्या संस्थेमधील कर्मचा-यांचे पगार झालेले नाहीत. संबंधित शिक्षणधिका-यांना पैसे दिले नाही म्हणून ते मुद्दाम त्यांना वेठीला धरतात व अडचणीत आणतात. तेव्हा या प्रकरणाची माननीय मंत्र्यांनी चौकशी करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, त्याचबरोबर बांदा नवभारत संस्थेमध्ये 48 लाख रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे. या संस्थेने खोटी उपस्थिती दाखवून हे पैसे शासनाकडून उचलले आहेत. एक वर्षापासून त्या ठिकाणी प्रशासक नेमला आहे. परंतु तेथे मोठया प्रमाणावर पैशाची देवाण घेवाण होत असल्यामुळे, प्रशासक नेमले असले तरी ते काम करीत नाहीत.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

आणि म्हणून या सर्व अधिकाऱ्यांवर कुणी अंकुश ठेवणार आहे की नाही? जिल्हा परिषदेचे पदाधिकारी सिंधुदुर्गात बसतात परंतु डेप्युटी डायरेक्टर कोल्हापूरला बसतात. त्यामुळे अधिकारी मन मानेल त्या पध्दतीने वागतात. या सर्व अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी केली पाहिजे. या एका संस्थेतील शिक्षकांचा गेली 24 महिने पगार झालेला नाही याकरिता या अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार की नाही?

सभापती महोदय, शासनाने शिक्षण सेवकांच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयाबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. त्याप्रमाणे यापुढे 50 टक्के स्थानिक लोकांना शिक्षण सेवक या पदावर घेण्याचा निर्णय झाला आहे. त्या संदर्भात जिल्हा बोर्ड निर्माण करण्यात येणार आहे. या धोरणाची अंमलबजावणी आपण केव्हा करणार आहात या संदर्भात योग्य ते मार्गदर्शन करावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 61 आणि पृष्ठ क्रमांक 70 मध्ये पाटबंधारे विभागाच्या संदर्भात जवळ जवळ रोजच याठिकाणी भाषण करावे लागते, तरीसुध्दा यामध्ये काही फरक पडेल असे मला वाटत नाही. कोकणामध्ये 94 प्रकल्प आहेत त्यापैकी 92 सिंचन प्रकल्प आज सुरु आहेत. या करिता सन 2009-10 मध्ये 729.49 कोटी रुपयांचा निधी देण्याचे शासनाने कबूल केले होते, प्रत्यक्षात 419.28 कोटी रुपये देण्यात आले. जुनी थकित देणी देण्यासाठी साडे तीनशे कोटी रुपये देण्यात येतील असे सांगण्यात आले होते. परंतु ते अद्यापि दिलेले नाहीत. यादृष्टीने शासनाचे कोकणाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष होत आहे की काय असा मला प्रश्न पडला आहे. खऱ्या अर्थाने आपण विचार केला तर विदर्भामध्ये 57 लाख हेक्टर जमीन आहे त्यापैकी 10 लाख हेक्टरमध्ये सिंचन होते. म्हणजे सिंचनाचे प्रमाण 16 ते 17 टक्के आहे. मराठवाडयामध्ये तीच परिस्थिती आहे. मराठवाडयामध्ये 56 लाख हेक्टर जमिनीपैकी 9 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आहे. कोकणामध्ये 15 लाख 68 हजार हेक्टर जमिनीमध्ये पीक घेता येईल अशी परिस्थिती असतांना फक्त 1 लाख 4 हजार हेक्टरमध्ये सिंचन होते. म्हणजे सर्वसाधारणपणे 5 टक्के सिंचन होते. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की. कोकणामध्ये कोरले-सातार्डे या प्रकल्पाचे 90 टक्के काम पूर्ण झ ाले आहे, त्याचप्रमाण् करंदळे प्रकल्पाचे काम 90 टक्के पूर्ण झाले आहे. प्रकल्पाच्या घळभरणीचे काम होत आले तरी सुध्दा शेतकऱ्यांच्या भू संपादन केलेल्या जमिनीचे पैसे त्यांना दिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. राजन तेली....

जात नाहीत यांचा आपण विचार करणार आहात की नाही? आज जिल्ह्यामध्ये अनेक प्रकल्प आहेत त्यांच्या संदर्भात आपण कोकणाला दिलासा देण्यासाठी योग्य तो न्याय द्यावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय,बाब क्रमांक 99, पृष्ठ क्रमांक 125 मध्ये आदिवासी विभागाच्या मागण्यांच्या निमित्ताने एवढेच सांगतो की, ठाकर समाजाच्या संदर्भात या सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेवर चर्चा झ ाली आहे. आमच्या कोकणामध्ये काही भागात ठाकर समाज मोठया प्रमाणात आहे. त्यांना 35 वर्षापूर्वी जातीचे दाखले देण्यात आले होते. आज त्या लोकांना आमच्या भागातील काही लोक विरोध करीत आहेत. याकरिता आपल्या खात्याच्या माध्यमातून त्यांना म्हणावा तसा न्याय मिळत नाही. तेव्हा या ठाकर समाजाला योग्य तो न्याय मिळाला पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 109,पृष्ठ क्रमांक 133 मध्ये पर्यावरण विभागाच्या संदर्भात माझे विचार मांडतो. आज कोकणामध्ये पर्यटनाचा विकास करण्याकरिता एक सदस्यीय गाडगीळ समिती नेमण्यात आली होती. त्या समितीकडे लोकांनी आपल्या मनाला वाटेल त्या पध्दतीने चुकीची निवेदने दिली होती. त्या आधारावर इको सेंसेटीव्ह झोन झाला पाहिजे अशी मागणी करण्यात आली. आज माथेरान सारख्या थंड हवेच्या ठिकाणी इको सेंसेटिव्ह झोन झाल्यानंतर त्याठिकाणी कोणती परिस्थिती निर्माण झाली आहे हे आपल्याला माहीत आहे? पर्यटन विभागाच्या माध्यमातून कोकणामध्ये विकासाचे प्रकल्प आणावयाचे असतील तर गाडगीळ समितीच्या अहवालावर आपल्याला पुन्हा एकदा फेरविचार केला पाहिजे. त्या भागात कोणतेही व्यवसाय येऊ नयेत म्हणून ही पर्यावरणवादी मंडळी नाटक करीत आहेत त्या संदर्भात योग्य तो अभ्यास करुन त्या ठिकाणी चांगल्या प्रकारचे काम करावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 144, पृष्ठ क्रमांक 147 या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या मागणीच्या संदर्भात सांगू इच्छितो की, आमच्या कोकणामध्ये जे आयटीआय पॉलीटेक्निक कॉलेज आहेत त्याठिकाणी किती तरी वर्षे पुरेसा कर्मचारी वर्ग दिलेला नाही. मंत्री महोदय आम्हाला दरवर्षी सांगतात की, कर्मचारी भरती सुरु आहे, त्यासाठी एमपीएससीकडे आम्ही यादी पाठविली आहे. हे आम्ही गेली 5 वर्षे ऐकत आहोत. तेव्हा आमच्या आयटीआय, पॉलीटेक्निकला चांगले शिक्षक दिले पाहिजेत नाहीतर या संस्था एका खाजगी संस्थेला तरी चालवायला दिल्या पाहिजेत. तेव्हा तेथील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये याकरिता शासनाने कार्यवाही करावी अशी मी विनंती करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 20:25

श्री.राजन तेली . . . .

सभापती महोदय, बाब क्र.96, पान क्र.123 सार्वजनिक आरोग्य विभागाबाबत सांगावयाचे तर माननीय मुख्यमंत्र्यांनी आरोग्य विभागाच्या डॉक्टरांबाबत सांगितले आहे. माझी अशी विनंती आहे की,जवळजवळ 50 टक्क्यापेक्षा जास्त पदे केवळ कोकणामध्येच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातच अनेक ठिकाणी कमी आहेत. त्यामुळे ही पदे भरण्याच्या बाबतीत प्रयत्न करावेत. तसेच लॅप्टोचा आजार सातत्याने गेल्या 7 ते 12 वर्षापासून कोकणातील विशेष करुन कणकवली तालुक्यामध्ये सुरु झालेला आहे. त्यामध्ये 26 जण मृत्यूमुखी पडले आहेत. त्यामुळे तेथे ब्लड बँक आणि प्लेटलेट युनिट सुरु करण्याचे कबूल केले होते. त्याबाबतीत सुध्दा शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशा प्रकारची आपल्याला विनंती करतो आणि इरिगेशन विभाग आणि इतर विभागांच्या मागण्यांसंबंधात मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मनापासून धन्यवाद देतो.

----

. . . .4 एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4X-2

श्री.हेमंत टकले (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आता प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या भाषणाचा वेळ कमी होत चालला आहे. पूरक मागण्यांवर बोलताना एक मूलभूत प्रश्न मला नेहमी पडतो की, एकूण अर्थसंकल्पाची जी रचना केलेली असते आणि त्यामध्ये नियोजित खर्च धरलेला असतो, त्याच्या किती टक्के पुरवणी मागण्यांच्या स्वरुपात सदनामध्ये येत असतात. मला एक गोष्ट नक्की मान्य आहे. या बाबतीत यासाठी चर्चा होते की, जर याबाबतीत शासनाकडून काही पूर्तता झालेली नसेल आणि काही विषय राहून गेले असेल तर त्याची पूर्तता करण्यासाठी या चर्चेचा निश्चित उपयोग होऊ शकतो. परंतु ते पहाताना सुरुवातीला बाब क्र.69, पान क्र.81 हे उदाहरणादाखल आपल्या नजरेसमोर आणत आहे. सुरुवातीला 4 कोटी 23 लाख 92 हजार एवढा अधिक खर्च होणार आहे म्हणजे पहिल्यांदा जे नियोजन केले होते त्याच्या दुप्पट खर्चाची ही बाब आहे. तेव्हा पहिले नियोजन आणि त्यामध्ये दुप्पट वाढ झाली आहे. यातील बहुतांशी बाबींमध्ये असे लक्षात येते की, वेतनामध्ये जी वाढ झालेली आहे, त्यामुळे अधिकची मागणी आलेली आहे. वेतनामध्ये होणारी वाढ अपेक्षित असते आणि त्याचे नियोजन वर्षाच्या सुरुवातीला करावयास पाहिजे. पण ते करण्याच्या बाबतीत कुठेतरी अपूर्णता आहे किंवा काय अशा प्रकारची शंका या निमित्ताने दरवेळेस निर्माण होते.

सभापती महोदय, बाब क्र.75, पान क्र.87 मध्ये अपारंपारिक ऊर्जा यासाठी जी अर्थसहाय्य योजना आहे, त्यासाठी 2 कोटी 26 लाख 22 हजार रुपयांची मागणी केलेली आहे. परंतु मला असे वाटते की, गोबर गॅसचा जर पर्यायी ऊर्जा साधन म्हणून वापर करणार असू तर शक्य असल्यास अर्थसहाय्यामध्ये वाढ करण्याची शक्यता आहे की नाही ही बाब देखील तपासून घेतली जावी असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, अन्न साठवण व वखार साठवण, बाब क्र.80, पान क्र.93 विषयी सांगावयाचे तर गेल्या काही वर्षांचे अनुभव लक्षात घेता आपण तरतूद करीत आहोत, पण या सगळया आकडेमोडीतून जी गोष्ट बाहेर येते आणि अधिकचा जो खर्च आहे, त्याबाबत याठिकाणी मी जे आकडे वाचत आहे त्यावरुन जे मला दिसत आहे तो 715 कोटी 37 लाख 48 हजार आहे. ही एकूण अर्थसंकल्पातील तरतुदींमधील मोठया तरतुदी आहेत आणि याबाबतीत अधिक कार्यक्षमपणे मांडणी होण्याची आवश्यकता आहे. कारण जे धान्य उत्पादन केले जाते त्याची साठवण व्यवस्थित झ ाली नाही तर त्याच्या वितरणामध्येही अडचणी निर्माण होतात. त्यामुळे याकडे अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे असे मला सांगावेसे वाटते.



APR/ KTG/ KGS/ 20:25

श्री.हेमंत टकले . . . .

सभापती महोदय, बाब क्र.96, पान क्र.113 यामध्ये कुटुंब कल्याण विभागातील अधिकचा खर्च भागविण्यासाठी जो खर्च आहे, त्यामध्ये राज्यातील एकूणच सार्वजनिक आरोग्याची व्यवस्था आहे. त्यातील अनेक त्रुटी बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणातून मांडलेल्या आहे. केवळ तरतूद करुन हा प्रश्न सुटेल अशातला भाग नाही. तेथे काम करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची मानसिकता सुधारण्यासाठी आपल्याला काहीतरी निश्चित प्रयत्न करावे लागतील. त्या मुळे याही बाबतीत आपण पुन्हा विचार करावा.

यानंतर कु.थोरात . . .. .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ KGS/ प्रथम सौ. रणदिवे... 20:30

श्री. हेमंत टकले.....

सभापती महोदय, बाब क्रमांक 98, पान क्रमांक 119 वर मी बोलू इच्छितो. या मागणीमध्ये मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये ज्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे, अशी जी शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व सार्वजनिक मोठी रुग्णालये आहेत त्यामधील बाबीमध्ये यानिमित्ताने सुधारणा करता येईल काय याबाबत विचार करावयास पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 99, पान क्रमांक 125 यावर मी बोलू इच्छितो. यामध्ये आदिवासींसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ती तरतूद पुरे पडेल असे मला वाटत नाही, त्यामुळे यामध्ये सुधारणा करण्यात यावी, असे मला या ठिकाणी सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 110, पान क्रमांक 133 वर मी बोलू इच्छितो. यामध्ये अपेक्षित खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मी सुरुवातीला मोठया रकमा बद्दल बोललो आहे. या मागणीमध्ये 2 लाख 58 हजार वगैरे रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. हया रकमा या आधीच्या मागणीमधील आकडयांच्या तुलनेत मामुली स्वरुपाच्या वाटतात, म्हणून याबाबतीत ज्या पध्दतीने विचार करावयास पाहिजे त्या पध्दतीने विचार होत नाही अशा प्रकारचे चित्र आपल्या समोर दिसते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 130, पान क्रमांक 149 वर मी बोलू इच्छितो. यामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठी यंत्रसामुग्री आणि साधनसामुग्री बाबतीत फेर मांडणी करण्यात आलेली आहे. यामध्ये दोन कोटी रुपयापेक्षा अधिकचा खर्च करण्यात येणार आहे आणि याची पूर्तता या अगोदरच करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, मी या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने इतर ठिकाणी काय चालले आहे याची माहिती घेत होतो. श्री. राघव बहल यांचे 'सुपर पॉवर' हे चीन आणि भारत यांची तुलना करणारे पुस्तक मी आज सकाळपासून पुरवणी मागण्यांच्या संदर्भात वाचत होतो. चीनने या सगळया योजनांवर होणाऱ्या खर्चाच्या बाबतीत तेथे जी लाईन ऑफ ॲक्शन आहे म्हणजे तेथे कामावर असलेला जो शेवटचा माणूस आहे त्याच्यावर जबाबदारी निश्चित केली आणि त्याच्याकडे जो निधी जातो त्याचा वापर योग्य तऱ्हेने होतो की नाही याच्या प्रमाणात त्याच्या पगारात वाढ होते, अशा पध्दतीच्या काही तरी धाडशी योजना या पुरवणी मागण्याच्या निमित्ताने शासनाला करता

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

आल्या तर त्या निमित्ताने शासनाने विचार करावा. जी मागणी करण्यात येते आणि ज्या खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात येते त्याचा परिणामकारक वापर करण्यासाठी या पूरक मागण्यांच्या संदर्भात शासनाने आणि सर्व यंत्रणेने अतिशय गांभीर्याने विचार करावा, अशी सूचना मी शासनाला करतो.

**तालिका सभापती** : वेळ बराच झालेला असल्यामुळे माझी उर्वरित सन्माननीय सदस्याना विनंती आहे की त्यांनी पाच-पाच मिनिटात आपली भाषणे पूर्ण केली तर आपल्याला लवकर कामकाज संपविता येईल. आणखी चार-पाच सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते बोलतील.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, पुरवणी मगाण्यांच्या संदर्भात अगदी कमी वेळात जास्तीत जास्त मुद्दे मांडण्याचा मी प्रयत्न करतो.

सभापती महोदय, पान क्रमांक 31, बाब क्रमांक 35 वर मी बोलू इच्छितो. माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची तीन पदे आहेत. न्यायालयीन निर्देशानुसार त्यांना पगार देण्यासाठी 12 लाख 94 हजार रुपयांची तरतूद या ठिकाणी करण्यात आलेली आहे. मला हे समजले नाही की, या तीन पदांसाठी संबंधित कर्मचाऱ्यांना न्यायालयात का जावे लागले. त्यांच्यावर अन्याय झाला असेल, शासनाच्या अधिकाऱ्यांनी काही चुकीचा निर्णय घेतला असेल म्हणून त्यांना न्यायालयात जावे लागले असेल. न्यायालयाने या संदर्भातील निर्णय दिलेला आहे. न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होऊ नये म्हणून तातडीने त्याची अंमलबजावणी केली आणि त्या संबंधित कर्मचाऱ्यांना वेतन दिले म्हणून मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो, धन्यवाद देतो. अन्य विभागामध्ये पैसे दिल्याशिवाय शिक्षकाची मान्यता दिली जात नाही.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

मी आमच्या डीवायडीई मुंबईचे उदाहरण सांगतो. एका महाविद्यालयातील पाच सहा शिक्षकांच्या, दुसऱ्या महाविद्यालयातील सात शिक्षकांच्या तसेच दुसऱ्या एका ठिकाणी वैयक्तिक एका शिक्षकाच्या मान्यतेचा प्रश्न न्यायालयात गेला. न्यायालयाने सांगितले की, त्यांच्या नेमणुका नियमानुसार झ ाालेल्या आहेत त्यामुळे त्यांना मान्यता द्यावी, परंतु मान्यता दिली गेली नाही. 2-2 लाख रुपयांची मागणी केली. त्यांना पैसे मिळाले नाहीत म्हणून त्यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये त्या न्यायालयीन आदेशाच्या विरोधात रिव्ह्यू पिटीशन दाखल केले. ते रिव्ह्यू पिटीशन मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळले आणि सांगितले की, आम्ही दिलेला निर्णय बरोबर आहे, नियुक्त्या नियमानुसार झालेल्या आहेत. त्यांनी रिव्ह्यू पिटीशन डिसमिस केले. त्यानंतर सुध्दा दोन वर्षे होत आहेत पण या अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या ठिकाणी न्यायालयाचा निर्णय होता म्हणून तातडीने शासनाने तरतूद केली आणि त्यांना पगार दिल्याबद्दल मी धन्यवाद दिले. पैसे दिल्याशिवाय मान्यता देत नाहीत. न्यायालयाचा आदेश झाला तरी सुध्दा पैसे दिल्याशिवाय मान्यता देत नाहीत. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, आमच्या चर्नी रोडच्या कार्यालयाची जरा चौकशी करावी. जी भ्रष्ट माणसे आहेत, ज्यांना ॲन्टी करप्शन ब्युरोने पकडले, ज्यांनी मान्यता देण्यासाठी 70 हजार रुपये, 80 हजार रुपये घेतले त्या अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याऐवजी त्या अधिकाऱ्यांचे प्रमोशन होऊन आज त्या ठिकाणी आलेले आहेत. त्यांना पैसे घेण्याची चटक लागलेली आहे. या पध्दतीने ते शिक्षकांची आणि आमच्या संस्थांची अडवणूक करीत आहेत, याची गांभीर्याने चौकशी होण्याची आवश्यकता आहे. तसेच ज्यांच्यासाठी आपण ही पुरवणी मागणी मंजूर करीत आहात या तीन प्रकरणांमध्ये हे शिक्षक कर्मचारी कोण होते, त्यांच्यावर काय अन्याय झाला होता, तो अन्याय कोणी केला, त्याला जबाबदार कोण आणि त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार, यांची सुध्दा माहिती मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर मी उच्च माध्यमिक शाळेतील पायाभूत पदांच्या संदर्भात पृष्ठ क्रमांक 32 वरील बाब क्रमांक 36 बाबत बोलणार आहे. शासनाने 772 पदांसाठी 1 कोटी 4 लाख 41 हजार रुपयांची तरतूद केली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. 2007-2008

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

2007-2008 मध्ये 758 पदांना उच्चस्तरीय समितीने 21 फेब्रुवारीला मान्यता दिली. त्यानंतर एक दीड महिन्याचा कालावधी होता. त्यामुळे पुरवणी मागण्यांमध्ये ही बाब येऊ शकली असती. हे शिक्षक 2007-2008 मध्ये नेमले. आपण 2007-2008 ला मान्यता दिली नाही. 2008-2009 ला मान्यता दिली नाही, 2009-2010 ला मान्यता दिली नाही. 2010-2011 ला मान्यता दिली नाही. आता ही पदे चार वर्षानंतर मंजूर केली. त्या संदर्भात सुध्दा पुरवणी मागण्यांमध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. चार वर्षापासून काम करणाऱ्या या शिक्षकांना कधी पगार मिळणार ? ते विनावेतन काम करीत आहेत. यामध्ये विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित असा काही प्रश्न नाही. 100 टक्के अनुदानावर असणाऱ्या वर्गांवर काम करणारे हे शिक्षक आहेत. शासनाने आमच्या डोक्यावर बसविलेले पायाभूतचे हे भूत आहे. आपण 4-4 वर्षे आमच्या पदांना मान्यता देत नाही आणि मान्यता दिली तरी पगार मात्र आता देणार आहेत. आपण 2008-2009 चा पगार देत नाही. 2009-2010 चा पगार देत नाही. या शिक्षकांना 4-4 वर्षे उशिरा मान्यता द्यावयाची आणि पगार द्यावयाचा नाही, हे बरोबर नाही. आपल्याला या नवीन प्रोसीजरप्रमाणे त्या पदांना शासनाची मान्यता द्यावयाची असेल तर जरुर आपण ती प्रोसीजर ॲडॉप्ट करावी पण किमान चार महिन्यात, सहा महिन्यात किंवा त्या त्या वर्षात तरी प्रकरण निकाली काढावे तरच कर्मचाऱ्यांना न्याय मिळू शकेल. 4-4 वर्षे ही प्रकरणे प्रलंबित ठेवणे अजिबात बरोबर नाही.

सभापती महोदय, परत तशाच प्रकारचा एक विषय आहे. प्राथमिक शाळांमध्ये 500 पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या वाढली तर प्राथमिक शाळेमध्ये एक लिपिक आणि एक कर्मचारी मिळतो. 500 च्या पुढे विद्यार्थी संख्या गेली की, एक लिपिक आणि एक शिपाई द्यावयाचा अशी कायद्यामध्येच तरतूद आहे. पण ते प्रस्ताव शासनाकडे येतात. कायदा मोठा की, शासनाचा हा जी.आर. मोठा असा प्रश्न आमच्यापुढे येतो. शासनाकडे प्रस्ताव आला तरी शासनाने 4-5 वर्षे मान्यता दिलेली नाही. आता सचिव समितीने मान्यता दिली. त्यांचा शासन निर्णय आजही निघालेला नाही. सचिव समितीने मान्यता दिली नाही म्हणून प्रकरण प्रलंबित आहे. आता मान्यता मिळाली तर आदेश



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG

श्री. रामनाथ मोते ....

निघत नाहीत. दोन तीन महिने होत आले आहेत. 193 पदांचा जी.आर. निघाला तर या लोकांना न्याय मिळू शकेल. तो जी.आर. निघणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या संदर्भात मी आजच सकाळी अर्धा-तास चर्चा उपस्थित केली होती. सर्व शिक्षकांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना लागू आहे. पण नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या शाळांमध्ये ज्यांना शासनाकडून 100 टक्के अनुदान मिळते त्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना अद्यापही शासनाने लागू केलेली नाही. त्याचा जी.आर. शालेय शिक्षण विभागाने काढावयाचा की, नगरविकास विभागाने काढावयाचा या वादामध्ये अद्यापही हे कर्मचारी या फायद्यापासून वंचित आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

सभापती महोदय, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग मिळाला आहे. त्यासाठी 12 जून रोजी जी.आर.निघाल्यानंतर सर्व अनुदानित संस्थांना सहावा वेतन लागू झाला आहे. नगरपालिका व महानगरपालिकांच्या प्राथमिक शाळांना सहावा वेतन आयोग लागू झाला. नगरपालिका व महानगरपालिकांच्या माध्यमिक शाळा आहेत त्यांना सहावा वेतन आयोगानुसार वेतन मिळण्याबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही. याबाबत मी माननीय नगरविकास मंत्र्यांना भेटलो होतो. परंतु शालेय शिक्षण विभाग व नगरविकास विभाग यांच्यामध्ये वाद सुरु आहे. त्यामुळेच हा जी.आर.निघालेला नाही. मागील वेळी ज्या विभागाने पाचवा वेतन आयोग लागू करण्याचा जी.आर.काढला होता त्यांनीच सहावा वेतन आयोगाचा जी.आर.काढावा. वाद नसेल तर आतापर्यंत जी.आर.काढावयास पाहिजे होता. हा जी.आर.कोणत्या विभागाकडूनही काढण्यात यावा. महानगरपालिका व नगरपालिकांच्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची भूमिका घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कायम विना अनुदानित यामधील कायम हा शब्द शासनाने काढला आहे. त्यामुळे या शाळांबाबत सन 2012-13 मध्ये अनुदान देण्याचा विचार केला जाणार आहे. परंतु त्यासाठी मूल्यांकनाची प्रक्रिया सुरु झालेली नाही, त्यासाठी आदेश तरी काढण्यात यावेत. शासनाने निकष बदलले असतील ते शाळांपर्यंत जाऊ द्या, त्यानंतर त्यांचे मूल्यांकन सुरु करावे. यासाठी कोणतीही तरतूद करण्याची आवश्यकता नाही किंवा शासनावर आर्थिक बोजा पडणार नाही. त्या शिक्षकांना व शाळांना असे वाटेल की आता आपले मूल्यांकन होणार आहे आणि त्यानुसार आपल्याला सन 2012-13 मध्ये अनुदान मिळेल.

सभापती महोदय, शिक्षण सेवकांचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत आम्ही हा विषय सभागृहात मांडणार आहोत. या विषयाबाबत जेव्हा संधी मिळेल तेव्हा आम्ही हा विषय उपस्थित करणारच. शासनाने हे मान्य केले आहे की, हा प्रश्न 2 महिन्यामध्ये सोडविण्यात येईल. शिक्षण सेवकांचे मानधन वाढविणे आवश्यक आहे. वेतनेतर अनुदान देण्याचे मान्य केलेले आहे. त्याचाही विचार तातडीने व्हावा.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

यानंतर पान क्र.147, बाब क्र.125 वर मी बोलणार आहे. महाविद्यालयांना अनुदान देण्याचा हा विषय आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपले भाषण आटोपते घ्यावे. आता रात्रीचे 9 वाजत आले आहेत. आपण शेवटचा मुद्दा पूर्ण करावा व भाषण संपवावे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मला काही महत्वाचे मुद्दे मांडावयाचे असल्याने आपण ते मांडू द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करतो. महाविद्यालयांना अनुदान देण्यासाठी तरतूद केलेली आहे. सन 2004-05 या वर्षात जी महाविद्यालये अनुदानावर आली आहेत त्यांना 100 टक्के अनुदान देण्याचे आदेश आहेत. कोकण विभागातील 10 महाविद्यालये आहेत. सन 2004-05 व 2005-06 मध्ये त्यांना 100 टक्के अनुदान मिळाले आहे. त्यानंतरच्या काळात एकाही पैशाचे अनुदान मिळालेले नाही. त्याबाबत मी विभागाकडे पत्रव्यवहार केला आहे त्याचे उत्तर देत नाहीत. या महाविद्यालयांना 100 टक्के अनुदान मंजूर केलेले असताना ते न देण्याची कारणे काय आहेत ?

बाब क्र.99, पान क्र.125, आदिवासी आश्रमशाळांसाठी तरतूद करण्यात आली आहे. या आदिवासी आश्रमशाळांचे खूप प्रश्न आहेत. सध्या शासनाने आश्रमशाळा बंद करण्याचे ठरविलेले आहे. अनुदानित व खाजगी शाळांचे निकष शासकीय आश्रमशाळांना लावले तर 90 टक्के आश्रमशाळा बंद पडतील. परंतु आकसाने आदिवासी क्षेत्रातील अनुदानित संस्थांच्या आश्रमशाळा बंद करण्याची सुरुवात केलेली आहे त्याचा फेरविचार करावा. शाळेच्या वेळेसंबंधी मी हा विषय यापूर्वीही मांडलेला आहे. माननीय मंत्री श्री.गावित यांच्याबरोबर चर्चा केलेली आहे. त्यांनी आम्हाला न्याय द्यावा. त्यांच्या शाळेच्या वेळेत बदल होण्याची आवश्यकता आहे. शालेय शिक्षण व आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांमधील वेतनश्रेण्यांमध्ये तफावत आहे. हे शासकीय कर्मचारी आहेत. शालेय शिक्षण विभागामध्ये असलेल्या शिक्षकांना शासकीय सेवेत पदोन्नतीचा लाभ मिळतो. त्या पध्दतीने या शिक्षकांचाही विचार झाला पाहिजे. स्वयंसेवी संस्थांच्या आश्रमशाळा व शासकीय

3...



NTK/ KGS/ KTG/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

आश्रमशाळा आहेत. जी पदे शासकीय आश्रमशाळांसाठी मान्य केली जातात तीच पदे अनुदानित आश्रमशाळांमध्ये मान्य करण्याची आवश्यकता आहे. तेथे सफाई कामगार नाही, स्वयंपाकी नाहीत. शासकीय आश्रमशाळांमध्ये ही पदे आहेत. शासकीय अनुदानित आश्रमशाळेमध्ये पहारेकऱ्यांची व स्वयंपाकी यांची आवश्यकता नाही का ?

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री खंदारे 20:45

श्री. रामनाथ मोते...

त्यामुळे शासकीय आश्रमशाळेप्रमाणे अनुदानित आश्रमशाळेमध्ये पदे मंजूर करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, वसतिगृहामध्ये दिल्या जाणा-या जेवणाचा दर्जा चांगला असणे गरजेचे आहे. आपण एका बाजूला स्त्री-पुरुष समानता मानतो मग दुस-या बाजूला वसतिगृहातील मुलामुलींना दिल्या जाणा-या आहारामध्ये, आहार भत्त्यामध्ये तफावत का ? मुलांना अधिक जेवण आणि मुलींना कमी जेवण का दिले जाते ? अशा पध्दतीने जेवण देण्याची जी जुनी पध्दत आहे ती बंद करुन स्त्री-पुरुष समानता मानून समान हक्क आणि समान आहार देण्याची आवश्यकता आहे. एवढे बोलून आणि सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2010-2011च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. मी 22 पुरवणी मागण्यांचा अभ्यास करुन आलो आहे. असे असले तरी मी फक्त पाचच पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, पंचपरमेश्वर, पाचामुखी परमेश्वर यावर माझा विश्वास आहे. मी प्रथमत: आमचे महसूल राज्यमंत्री श्री. प्रकाश सोळंके यांना मनापासून धन्यवाद देतो. त्यांनी बीड जिल्हयातील हजारो विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळले आहे. तलाठ्याच्या परीक्षेला स्थगिती दिल्याबद्दल त्याना मी पुनश्च मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या पृष्ठ क्रमांक 140 वरील बाब क्रमांक 118 संबंधी बोलत असताना मी सांगेन की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये वस्त्रोद्योग विभागाला चालना किंवा प्राधान्य देण्याचा संकल्प सोडलेला आहे. मराठवाड्यामध्ये 10 वर्षापूर्वी कापसाचे एक बोंडही पिकविले जात नव्हते. विदर्भामध्ये मात्र कापसाचे प्रचंड प्रमाणात उत्पादन घेतले जात होते. परंतु आजची स्थिती अशी आहे की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कापूस उत्पादनाच्या बाबतीत बीड जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे. सभापती महोदय, आपणास आश्चर्य वाटेल की, एकट्या बीड जिल्ह्यामध्ये कापसाची 10 हजार कोटी पेक्षा जास्त उलाढाल झाली. ज्या बीड जिल्ह्यामध्ये पूर्वी वातीलाही कापूस मिळत नव्हता त्या बीड जिल्हयामध्ये कापसाची 10 हजार कोटी पेक्षा जास्त उलाढाल झालेली आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, या कापसावर आधारित असलेल्या उद्योगधंद्यांना बीड जिल्ह्यामध्ये चालना देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करावा . सहकाराच्या माध्यमातून जे जे कोणी सूत गिरण्या उभ्या करण्याचा प्रयत्न करणार असतील त्यांना किमान पहिली 10 वर्षे मूल्यवर्धित करामध्ये सवलत द्यावी. मराठवाड्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये सूत गिरण्या उभ्या राहिल्या तर मराठवाड्याचा अनुशेष दूर होऊ शकेल. आज मराठवाड्यामध्ये कापसाच्या व्यापारात दलालांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झालेला आहे.

कापसाच्या गावातून जाग आली नागव्याना
उजेडाचे दान आता सूर्य मागे काजव्यांना

अशी आज परिस्थिती आहे. सभापती महोदय, हा अत्यंत जिव्हाळ्याचा आणि मराठवाड्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे.

..3..



MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री खंदारे 20:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 27वरील बाब क्रमांक 31 संबंधी बोलत असताना मी सांगू इच्छितो की, वाळू माफियांची संख्या राज्यात खूप आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले..........

अनेक खाद्य पदार्थांमध्ये भेसळ करणा-यांची संख्या महाराष्ट्रात खूप मोठी आहे. अन्य खाद्यपदार्थ आणि जनावरांची पेंड यामध्ये मोठया प्रमाणात भेसळ केली जाते. प्रामुख्याने पेंडीमध्ये नटबोल्ट, तारेचे तुकडे, वाळू, माती आदींची भेसळ केली जाते. कृषीतज्ज्ञ डॉ.वि.सु.बावीस्कर यांनी एक पुस्तिका प्रकाशित केली आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, अशा प्रकारची भेसळयुक्त पेंड खाल्ल्यामुळे गॉसीपॉल नावाचा अपायकारक घटक त्यांच्या शरीरामध्ये निर्माण होतो आणि त्यामुळे पशुधन धोक्यात येण्याची शक्यता असते. जनावरांना घेरी येऊन ती मृत्युमुखी पडू शकतात. यादृष्टीने उपाययोजना केली तर महाराष्ट्रातील पशुधन वाचविण्यासाठी मदत होईल. अगोदरच पशुधन कमी होत आहे. पशुधन कमी झाल्यामुळे शेणखत कमी, शेणखत कमी झाल्यामुळे सुपीक माती कमी झाली आहे. ही शृंखला वाचविण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा एवढी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 69, पृष्ठ क्रमांक 81, उद्योग व ऊर्जा विभाग. 169 विशाल प्रकल्प शासन उभे करणार आहे. माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा हे माजी उद्योगमंत्री आहेत. मराठवाड्यामध्ये 70 विशाल प्रकल्प उभे केले जाणार आहेत. राज्य शासनाने मराठवाडा म्हणजे औरंगाबाद आणि विदर्भ म्हणजे नागपूर अशी मनामध्ये समजूत करुन घेतली असेल तर ती दूर करावी. मराठवाड्यामध्ये भौतिकदृष्टया व आर्थिकदृष्ट्या मागासलेले अनेक जिल्हे आहेत. बीड, जालना, परभणी, हिंगोली व उस्मानाबाद हे जिल्हे मागासलेले आहेत. विचाराने आम्ही श्रेष्ठ आहोत. परंतु आर्थिकदृष्ट्या मागास आहोत. माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांना याचा अनुभव आहे. हे 70 विशाल प्रकल्प इतर जिल्हयांमध्ये उभे करण्यासाठी शासनाने संकल्प सोडावा. जेणेकरुन मराठवाड्याचा जो अनुशेष आहे तो दूर होण्यास निश्चितपणे मदत होऊ शकेल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 131, पृष्ठ क्रमांक 53. बालकाश्रमाच्या संदर्भात माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी अत्यंत मुद्देसूद मांडणी केली आहे. ज्या संस्था उत्तमरित्या बालकाश्रम चालवितात त्यांना तरी अनुदान द्यावे. जे बनवाबनवी करतात, कागदोपत्री घोडे नाचवितात, घोड्यावर बसून प्रत्यक्ष बालकाश्रम चालवित नाहीत त्यांचा वेगळा विचार करावा. परंतु चांगल्याप्रकारे बालकाश्रम चालवितात त्यांना अनुदान दिले जावे. तरच त्या संस्था चांगल्याप्रकारे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले..........

चालतील.  संस्थांमध्ये जे कर्मचारी काम करीत आहेत त्यांना दीड ते दोन हजार रुपये मानधन दिले जाते.  तेथील बालकांची काय मनस्थिती असते, त्यांचे मानसशास्त्र काय आहे याचा शासन विचार करणार आहे की नाही? या बालकाश्रमामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांच्या नियम व शर्तीनुसार राज्य शासनाच्या सेवेत सामावून घ्यावे अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 128, पृष्ठ क्रमांक 148.  राज्यात जी विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालये आहेत त्या महाविद्यालयांमध्ये काम करणारे प्राध्यापक पी.एचडी, एम.फिल आणि तत्सम डिग्री संपादन करणारे आहेत.  आपल्या आयुष्याची 30 ते 35 वर्षे या क्षेत्रात खर्ची घातली त्यांच्या विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये काम करताना काय व्यथा असतील याचा शासनाने विचार करावा.  त्यांना संस्था चालक 2 ते 3 हजार रुपयांपेक्षा जास्त पगार देत नाहीत.  अशा स्थितीत त्यांनी काम करण्यापेक्षा माझी राज्य शासनाला विनंती आहे की, नवीन वरिष्ठ महाविद्यालये मंजूर करु नये. कायमस्वरुपी वरिष्ठ महाविद्यालय देऊन त्यांचे जीवन उपेक्षित ठेवणे हा एकप्रकारे शाप आहे.  हा शाप शासनाने आपल्या माथी घेऊ नये एवढी आग्रहाची विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-------

नंतर 5डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KTG/ KGS/ 20:55

श्री. एस. क्यु.. जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, पूरक मागणी का समर्थन करते हुए कुछ मुद्दों के बारे में मैं अपने विचार प्रकट करने के लिए खड़ा हुआ हूँ. कई विषयों पर माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई ने सभागृह में अपने विचार पेश किए हैं. मैं श्रम विभाग के बारे में बोलना चाहता हूँ. पूरक मागणी की पुस्तक में बाब क्रमांक 69, पेज क्रमांक 71 पर श्रम विभाग की 4 करोड़ 23 लाख रुपए की पूरक मागणी का समावेश है. हमारे माननीय श्रम राज्य मंत्री इस बात को नोट करें कि विदर्भ में श्रम विभाग में मॅन पावर बहुत कम है. श्रम विभाग में लेबर इन्सपेक्टर नहीं है, असिस्टेंट कमिश्नर नहीं है, लेबर वेलफयर ऑफिसर नहीं है और जो संख्या आज से 30 साल पहले मंजूर हुई थी, उससे भी कम संख्या इस समय विदर्भ में श्रम विभाग में है. नागपुर में सन् 2004 में एडीशनल लेबर कमिश्नर का पद मंजूर हुआ था. आज तक हमें फुल टाइम एडीशनल लेबर कमिश्नर नहीं मिला है. आज सन् 2011 में भी नागपुर में एडीशनल लेबर कमिश्नर नहीं है. बाहर के अधिकारी एडीशनल चार्ज पर काम करते हैं. हमारे यहां पर लेबर कोर्ट और इन्डस्ट्रियल कोर्ट में प्रिसाइडिंग ऑफिसर्स की संख्या बहुत कम है. केन्द्र शासन न्यायिक प्रक्रिया को तेज करने के लिए प्रावधान कर रहा है. लेकिन हजारों की संख्या में पिछले 20 साल से मजदूरों से संबंधित केस पेंडिंग है, उनकी सुनवाई के लिए नम्बर नहीं आता है. इसके बारे में शासन को ध्यान देना चाहिए. फास्ट ट्रॅक कोर्ट का विचार कई मामलों में हमारे सामने आ रहा है. मेरी शासन से मांग है कि श्रम विभाग में भी फास्ट ट्रॅक कोर्ट होने चाहिए, जिससे मजदूरों के मामलों का 1-2 साल में एक निश्चित समय सीमा के अन्दर निर्णय हो सके. ऐसी व्यवस्था महाराष्ट्र सरकार के श्रम विभाग को करना चाहिए.

सभापति महोदय, महाराष्ट्र में हमने श्रम विभाग में कई अच्छे कानून बनाए. हमने माथाडी बोर्ड बनाया, निजी सुरक्षा गार्ड का विचार सामने आया, मोलकरिन के लिए हमने कानून बनाया. केन्द्र शासन ने बिल्डिंग एंड कन्सट्रक्शन वर्कर्स के लिए सन् 1996 में कानून बनाया है और करीब 100 करोड़ रुपए से ज्यादा आपने बिल्डिंग एंड कन्सट्रक्शन का सेस जमा किया है. लेकिन बिल्डिंग एंड कन्सट्रक्शन वर्कर्स को राहत देने के लिए बोर्ड नहीं बनाया है. इस ओर शासन को ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, आजकल हालात ऐसे हैं कि किसी भी विभाग में परमानेंट नौकरी नहीं मिलती है. ठेकेदारी पर काम अधिक होने लगे हैं, इसलिए ठेकेदारी पर काम करने वाले लोगों

. . . 5D 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा

की संख्या बढ़ गई है. एजेन्सी के लेबर काम कर रहे हैं. हमारे साथियों ने शिक्षकों के बारे में कहा. हम डॉक्टर्स भी कॉन्ट्रेक्ट बेसिस पर ले रहे हैं. ये ठेकेदारी मजदूर 15-20 साल तक एक निश्चित वेतन पर काम करते हैं. इनको भविष्य के बारे में सामाजिक सुरक्षा मिलनी चाहिए. केन्द्र शासन का अथवा महाराष्ट्र शासन का मिनिमम वेज एक्ट जो हमारे राज्य में लागू है, उसका पालन होना चाहिए.

सभापति महोदय, हमारे माननीय साथी श्री. हुसेन दलवाई ने कहा कि अल्पसंख्यक विभाग की मंत्री महोदया यहां पर बैठी हैं.

. . . भाषण जारी, नंतर देवदत्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा.....

इन पूरक मांगों में अल्पसंख्यकों की समस्याओं का कहीं पर कोई जिक्र नहीं किया गया है. इसलिए मैं यहां पर कहना चाहता हूं कि अभी दो दिन बाद सन् 2011-2012 वर्ष का जो बजट आने वाला है, उस बजट में अल्पसंख्यकों के विकास के लिए हेडवाइज बजट एलोकेशन किया जाना चाहिए.

मेरी मांग है कि अल्पसंख्यकों के लिए 15 प्रतिशत बजट एलोकेशन किया जाना चाहिए. माननीय प्रधानमंत्री महोदय के 15 पाइंट प्रोग्राम के अनुसार महाराष्ट्र सरकार ने सभी डिपार्टमेंट को हेडवाइज बजट एलोकेशन करने के लिए कहा है, लेकिन उस पर अमल नहीं हो रहा है. किसी भी डिपार्टमेंट द्वारा इस बात पर ध्यान नहीं दिया जाता है और न ही उस पर सरकार की ओर से कोई मॉनिटरिंग होती है. मेरा निवेदन है कि इस साल के बजट में इस बारे में हेडवाइज प्रोवीजन होनी चाहिए. यह बात सही है कि हम करीब 220 करोड़ रुपए अल्पसंख्यकों के विकास के लिए दे देते हैं. लेकिन उसका कोई खास फायदा अल्पसंख्यकों को नहीं होता है.

एक बात मैं यहां पर यह कहना चाहूंगा कि एक बहुत ही अच्छा काम सरकार ने यह किया है कि वक्फ बोर्ड की जिन जमीनों पर दूसरे लोगों ने कब्जा कर लिया है, सरकार ने उसका सर्वे किया है. मैं यहां पर भूतपर्व मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख जी का जिक्र करना चाहूंगा. एक बार एक प्रश्न के उत्तर में उन्होंने कहा था कि कर्नाटक में वक्फ बोर्ड की जमीन पर कोई व्यक्ति यदि अवैध कब्जा कर लेता है तो उस जमीन को रिकवर करने के लिए वहां पर विशेष कानून बनाया गया है, उसी प्रकार का विशेष कानून बनाने का विचार महाराष्ट्र सरकार द्वारा भी किया जाएगा. लेकिन वह कानून अभी तक नहीं बन पाया है. इसलिए मैं माननीय मंत्री महोदय से निवेदन करुगा कि वक्फ बोर्ड की जमीन को रिकवर करने के लिए कर्नाटक की तरह ही महाराष्ट्र में भी एक विशेष कानून बनाया जाये.

सभापति महोदय, मॉयनारिटीज को रिजर्वेशन देने का प्रश्न केंद्र सरकार के अधीन है. जस्टिस रंगनाथ मिश्र की रिपोर्ट के आधार पर तो मैं कोई बात नहीं कहूंगा, परन्तु माननीय मंत्री जी से मेरा अनुरोध है कि चाहे मुस्लिम समाज के लोग हों या कोष्टी समाज के लोग हों, यहां पर बहुत बड़ी संख्या में हँडलूम और पावरलूम से संबंधित बुनकर समाज के लोग रहते है.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा....

महाराष्ट्र हँडलूम कॉरपोरेशन बंद होने की वजह से इन बुनकरों की हालत आज बहुत खराब हो गयी है.

इसलिए मेरा कहना है कि आप कोई एक हाई पावर कमेटी बनायें. उस कमेटी के माध्यम से आप यदि स्टडी करेंगे तो आप देखेंगे कि बुनकरों की हालत आज बीपीएल के लोगों से भी बदतर हो गयी है. पहले कई परिवारों में 3-4 लोग हँडलूम में काम करते थे. लेकिन महाराष्ट्र हँडलूम कॉरपोरेशन बंद हो जाने की वजह से वे लोग आज रोटी खाने को मोहताज हो गए हैं. मेरी विनती है कि हँडलूम और पावरलूम के बारे में सरकार को एक अच्छी नीति बनानी चाहिए ताकि बुनकर समाज के लोगों की हालत सुधर सके और वे रोटी खाने के लिए किसी के मोहताज न रहें.

सभापति महोदय, नागपुर, मराठवाडा, मुंबई तथा महाराष्ट्र के अन्य क्षेत्रों में बड़ी संख्या में मुस्लिम समाज के लोग रहते हैं. मैं यहां पर अमरावती विभाग का जिक्र करना चाहूंगा. पहले यह क्षेत्र मध्यप्रदेश में आता था. उसे सेंट्रल प्रोविंस एंड बरार बोलते थे. यह विभाग अब महाराष्ट्र में है. यहां पर बड़ी संख्या में मॉयनारिटी समाज के उर्दू भाषी लोग रहते हैं. काफी दिनों से यह विचार हो रहा है कि नागपुर में अन्तर्राष्ट्रीय स्तर का एक इस्लामिक केंद्र बनाया जाए ताकि वहां पर उर्दू, अरबी और फरसी भाषा की पढ़ायी एवम् शोध xvकरायी जा सके. नागपुर विश्वविद्यालय में अभी भी अरबी और फारसी भाषा की पढ़ायी करायी जाती है. मेरा निवेदन है कि अन्तर्राष्ट्रीय स्तर की एक इस्लामिक संस्था नागपुर में खोली जानी चाहिए और उसकी व्यवस्था आने वाले बजट में की जानी चाहिए, ऐसा मेरा अनुरोध है.

सभापति महोदय, आपने मुझे बोलने का समय दिया, इसके लिए आपको बहुत-बहुत धन्यवाद.

-0-

( इसके बाद श्री जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 5E 3

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल,सर्व प्रथम मी आपले आभार मानतो. बाब क्रमांक 27 व पृष्ठ क्रमांक 31, मत्स्य व्यवसाय विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. मत्स्य व्यवसाय विभागाने मध्यंतरी मुंबई येथे डिसेंबर, 2010 रोजी मत्स्य महोत्सव भरवला होता. मात्र हा महोत्सव मुंबईत न भरवता कोकणात भरवला गेला तर अधिक चांगले होईल. परवा आम्ही जैतापूर येथील साखरे या गावी गेलो होतो. त्या ठिकाणी वर्षाला 100 कोटी रुपयांच्या माशांची निर्यात होत असते.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ प्रथम श्री.जुन्नरे 21.05

श्री.सुभाष चव्हाण ...

संपूर्ण कोकणाला जवळजवळ 1500 कोटी रुपये मत्स्य निर्यातीमधून मिळत असतात. तेव्हा यासंबंधी विचार करुन या व्यवसायाला उत्तेजन देण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय,यानंतर बाब क्रमांक 32, पान नंबर 27 कृषी, पशुसंवर्धन विभागासंबंधी मला बोलावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे दर वर्षी शेळी मेंढी विकास महामंडळाला द्यावयाच्या रकमेसंबधी बोलत असतात. या महामंडळाला मदत देण्याकरिता त्यांच्याकडून सतत निधीची मागणी केली जाते. त्यांनी सतत मागणी केल्यानंतरसुध्दा त्यांना एकही पैसा अद्याप मिळालेला नाही. या वर्षीच्या पूरक मागण्यामध्ये या महामंडळातील कर्मचा-यांना पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्यासाठी 4 कोटी 9 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे या महामंडळाचे अध्यक्ष असून या महामंडळाकरिता अधिक आर्थिक तरतूद करावी,यासाठी ते सतत पोटतिडीकीने बोलतात. परंतु त्यांना अधिक रक्कम दिली जात नाही.

सभापती महोदय, आजच्या लोकसत्तेमध्ये एक बातमी प्रसिध्द झाली असून " शेळी मेंढी महामंडळाच्या जागेवर बिल्डरांचे टॉवर" असे शीर्षक देण्यात आले आहे. त्या बातमीत असे म्हटलेले आहे की, पुण्याच्या सेनापती बापट मार्गावरील सर्व्हे नंबर 98 व 99 ही रामोशी वतन जमीन शासनाने ताब्यात घेतल्यानंतर सर्व्हे क्रमांक 99 वरील गोखले नगर ही वसाहत उभी झाली तर सर्व्हे क्रमांक 98 वरील काही जागेत शासकीय वसाहत बांधण्यात आली. उर्वरित जागा 1995 मध्ये शासनाने शेळी मेंढी विकास महामंडळाला मुख्यालय बांधण्यासाठी तसेच विकासासाठी दिली. त्याचा ताबा घेऊन येथे महामंडळाची इमारत उभी राहिली व सुमारे दीडशे झाडेही लावण्यात आली. विशेष म्हणजे सरकारनेच जमीन मोजणी करुन या 80 हजार चौरस फूट जागेचा ताबा महामंडळाला दिला होता. परंतु आता या जागेवर बिल्डरांचे टॉवर उभे राहत असून या महामंडळाला वा-यावर सोडून देण्यात आले आहे. तेव्हा याबाबत शासनाने विचार करावा, अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण ...

सभापती महोदय,पान नंबर 69,बाब नंबर 59 जलसंपदा विभागातील लघु पाटबंधा-यासंबंधी मला बोलावयाचे आहे. धामापूर हे माझे गाव असून तेथे एक चांगला तलाव आहे.त्यासाठी साडेतीन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला. या संदर्भात मी मागे एक लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर त्यावेळचे जलसंपदा मंत्री श्री अजित पवार यांनी असे आश्वासन दिले होते की, मार्च 2011 पर्यत या गावातील तलावाचे संपूर्ण काम पूर्ण होईल. त्यांनी पुढे असेही सांगितले होते की, हे तुमचे गाव असून या गावासाठी निधी मिळावा, म्हणून तुम्ही पाठपुरावा करीत आहात, 25-25 वेळा अधिका-यांकडे जात आहात. त्यामुळे आपल्याला निधी देण्यात येईल. याच संदर्भात माननीय जलसंपदा मंत्र्यांबरोबर यापूर्वी दोन ते तीन बैठका देखील घेण्यात आल्या होत्या. इतकेच नव्हे तर एक महिन्या पूर्वी सुध्दा श्री.अजित पवार यांच्या बरोबर एक बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी जलसंपदा मंत्र्यांना आणि विभागाच्या प्रधान सचिवांना सुध्दा बोलावले. तसेच संबंधित अधिका-यांना सुध्दा बोलावले होते. मात्र अजून पर्यत कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. फक्त गेल्या वर्षी श्री. सुनील तटकरे हे जलसंपदा मंत्री असतांना या कामासाठी पाच लाख रुपयांचा निधी दिला होता. त्यातून एक टेंडर काढण्यात आले होते. या अर्थसंकल्पामध्ये या कामासाठी पूर्ण निधी दिला जाईल, अशा प्रकारे माननीय मंत्र्यानी अभिवचन दिले होते. त्याप्रमाणे माझ्या मागणीचा पूर्ण विचार करावा, अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 140, पान नंबर 171 सांस्कृतिक कार्य विभागासंबंधी मला बोलावयाचे आहे. 91 व्या अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनासाठी 25 लाख रुपये देण्यात येतात. श्री. दया पवार, श्री. बाबुराव बागुल, श्री. केशवराव मेश्राम, श्री.नामदेव ढसाळ इत्यादी दलित साहित्यिकांनी दलित साहित्याची निर्मिती केली होती. या राज्यात दलित साहित्य भवन व्हावे, यासाठी असंख्य पत्रे देण्यात आली होती. कै.अण्णाभाऊ साठे, कै. वामनराव निंबाळकर या सर्व साहित्यिकांचे यथोचित स्मारक उभारण्यात यावे त्याचबरोबर सांस्कृतिक भवनाच्या माध्यमातून उपेक्षित साहित्य असो, विद्रोही साहित्य असो वा दलित साहित्य असो या सर्व दलित साहित्य संमेलनाला दरवर्षी 25 लाख रुपयांचा निधी देण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी, अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

..3..



VTG/ प्रथम श्री.जुन्नरे 21.05

श्री.सुभाष चव्हाण ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 141, पान नंबर 171 सांस्कृतिक कार्य विभागा संबंधी मला बोलावयाचे आहे. भरतनाटय संशोधन मंदिर, पुणे या संस्थेसाठी पूरक मागणी करण्यात आली आहे. कोकणामध्ये रामनवमी व हनुमान जयंतीच्या वेळी दशावतारी नाटक सादर केले जाते. त्यामुळे दशावतारी नाटकासाठी एक नाटय अकादमी स्थापन करावी, अशी मी या निमित्ताने मागणी करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आपले पुन्हा एकदा शतशः आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

---

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री) : सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, श्री. जयंत प्र. पाटील, ॲड. उषाताई दराडे, माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, पांडुरंग फुंडकर, हेमंत टकले, डॉ. नीलम गोऱ्हे व इतर अनेक माननीय सदस्यांनी वेगवेगळया सूचना केल्या आहेत. त्यांनी केलेल्या सूचना निश्चितपणे अंमलात आणण्याचा आपण प्रयत्न करु. त्यांनी उपस्थित केलेल्या काही मुद्दयांबाबत मी याठिकाणी थोडक्यात खुलासा करण्याचा प्रयत्न करणार आहे. माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आणि माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी गोडावूनबाबत मुद्दा उपस्थित केला. राज्यामध्ये गोडावूनची कमतरता असल्यामुळे नाबार्डच्या माध्यमातून गोडावूनच्या बांधकामासाठी निधी वाढवून दिला पाहिजे अशी त्यांनी मागणी केली. त्या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आपल्या राज्यामध्ये गोडावूनची कमतरता आहे ही गोष्ट खरी आहे. त्यामुळे या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये 36 कोटी रुपये नवीन गोडावून बांधण्यासाठी प्रस्तावित केले आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे त्यांच्या केज तालुक्यामध्ये केरोसीनचा कोटा कमी मिळत असल्याबाबत मुद्दा उपस्थित केला आहे.सदरहू तालुक्याची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही, सदरची माहिती त्यांना नंतर देण्यात येईल. परंतु बीड जिल्हयामध्ये एकूण 3 हजार 936 किलो लीटर केरोसीनची मागणी असताना प्रत्यक्षात जवळपास 100 किलो लीटर केरोसीन पुरविण्यात येते. माननीय विरोधी पक्षनेते सभागृहात उपस्थित नाहीत तरी देखील त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबतचा खुलासा सभागृहाच्या रेकॉर्डवर असणे आवश्यक असल्यामुळे मी याठिकाणी करीत आहे. त्यांनी भाषण करतांना ठाणे जिल्हयामध्ये मार्च 2010 ते फेब्रुवारी 2011 पर्यंत 182 धाडी टाकण्यात आल्या व त्यामध्ये फक्त 20 लीटर केरोसीन जप्त करण्यात आल्याचे सांगितले. मी त्यांना सांगू इच्छितो की, जानेवारी 2010 ते डिसेंबर 2010 पर्यंत जवळपास 161 धाडी टाकण्यात आल्या त्यामध्ये 40 हजार 985 लीटर केरोसीन जप्त करण्यात आले आहे. भाषण करीत असतांना अनेक माननीय सदस्यांनी शासनाची पीडीएस सिस्टीम अधिक मजबूत करण्याची मागणी केली आहे. त्या अनुषंगाने सातारा जिल्हयामध्ये आम्ही पायलट प्रोजेक्ट सुरु केला आहे. त्या प्रोजेक्टमध्ये लाभधारकांना युआयडी नंबर देण्यात येणार आहे. सदर युआयडी नंबर बायोमेट्रीक सिस्टीमशी लिंकअप करुन एक नवीन सॉफ्टवेअर डेव्हलप केले आहे.त्याव्दारे संगणकीकरणाच्या माध्यमातून कोणत्याही लाभार्थ्याला कोणत्या दुकानामधून किती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. रणजित कांबळे....

धान्य दिले व किती धान्य द्यावयाचे आहे याची नोंद फक्त कंट्रोलरकडे न होता ती वेबसाईटव्दारे मंत्रालयीन स्तरावर देखील होईल. अशाप्रकारचा पायलट प्रकल्प आम्ही माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या मदतीने सातारा जिल्हयामध्ये करीत आहोत. तो यशस्वी झाल्यानंतर आम्ही संपूर्ण राज्यामध्ये राबविणार आहोत.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी अर्थसंकल्पामध्ये 716 कोटी रुपयांची तरतूद कशी करण्यात आली असा प्रश्न उपस्थित केला? त्यांच्या माहितीसाठी सांगतो की, यावर्षी तूरदाळ आणि साखर ईपीएलसाठी प्रस्तावित केली होती त्यामुळे त्याठिकाणी तफावत दिसून आली. त्या अनुषंगाने पूरक मागणीमध्ये ही तरतूद करण्यात आली आहे. इतकेच नव्हेतर आमच्या विभागासाठी जेवढी मागणी असते तेवढी आगाऊ तरतूद केली जाते. त्याचप्रमाणे अेपीएलसाठी सुध्दा 2 ते 3 लीटर केरोसीन दिले पाहिजे अशी मागणी करण्यात आली. जे अेपीएल कार्डधारक आहेत त्यांच्याकडे 1 गॅस सिलेंडर आहे त्यांना आजही नियमितपणे आपण 3 लीटर केरोसीन देतो.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, मंत्री महोदय त्यांच्याजवळ असलेल्या कागदांवरील माहिती सभागृहाला देत आहेत.परंतु प्रत्यक्षात रेशन दुकानावर लोकांना केरोसीन मिळत नाही,धान्य मिळत नाही अशी अवस्था आहे. या संदर्भात आपण नेहमी याठिकाणी चर्चा करीत असतो. तेव्हा शासनाने जरा कडक धोरण स्वीकारले पाहिजे व संबंधितांना आदेश दिले पाहिजेत.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय,केरोसीनच्या दुकानात केरोसीन मिळते व धान्याच्या दुकानामध्ये धान्य मिळते. आपण जर धान्याच्या दुकानामध्ये जाऊन केरोसीन मागितले तर ते मिळणार नाही. ही संपूर्ण यंत्रणा कॉप्युटराईज झाल्यानंतर योग्य पध्दतीने सर्व ग्राहकांना नियतन होणार आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी शासनाला सूचना केल्या. त्या सुचनांचे मी स्वागत करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सर्वश्री धनंजय मुंडे, उल्हासदादा पवार, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.प्रकाश बिनसाळे, हेमंत टकले इ.सन्माननीय सदस्यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संदर्भात आपल्या सूचना मांडलेल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत सध्या सदनामध्ये उपस्थित नाहीत. पण त्यांनी काही गोष्टींचा ऊहापोह केला. राज्यात 2011 मध्ये एम.एच.सी.ई.टी होणार आहे काय यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला. मी आपल्याला सांगू इच्छितो की, पुढील वर्षी राष्ट्रीय पातळीवर सी.ई.टी. होणार की नाही या बाबत केंद्रीय पातळीवर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. केंद्र शासनाने निर्णय घेतल्यावर त्याप्रमाणे महाराष्ट्र शासन कारवाई करील. दुसरा विषय मांडला की, कॉमन सी.ई.टी.साठी जी फी घेतली जाते, त्याचा विनियोग कशा प्रकारे केला जातो. तर सी.ई.टी. साठी प्रश्नपत्रिका काढणे, इन्व्हिजिलेटर, सुपरवायझर, स्टेशनरी इ.अनेक गोष्टींसाठी केला जातो. त्यांनी रेट कॉन्ट्रॅक्टबाबत सांगितले की, पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट आणि मेडिकल एज्युकेशन येथे सध्या तरी एकच रेट कॉन्ट्रॅक्ट आहे आणि अंतिम निर्णय प्रलंबित आहे.हॉस्पिटल मॅनेजमेंट (एच.एम.आय.एस.) आणि इन्फर्मेशन सिस्टीम संदर्भात त्यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. सध्या हा एच.आय.एम.एस.प्रकल्प चार हॉस्पिटलमध्ये लागू आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे डॉ.संजय बिजवे हे ग्रँट मेडिकल महाविद्यालयातून प्रति नियुक्तीवर गेले होते. ऑन द ऑफीसर ऑन स्पेशल ड्युटी म्हणून कार्यरत होते. त्यांची प्रतिनियुक्ती रद्द केल्यामुळे त्यांना परत पाठविण्यात आले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धनंजयजी मुंडे उपस्थित नाहीत. त्यांनीही अंबेजोगाई मेडिकल कॉलेज संदर्भात प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी ससून हॉस्पिटलमधील एक्स-रे मशीन संदर्भात सांगितले. त्यांच्याही मागण्यांबाबत नक्की विचार केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सुविधांच्या सुधारणेबाबत कार्यवाही करण्यासंबंधात सांगितले. तसेच बांधकामासाठी तरतूद केली परंतु रिक्त जागा भरण्याबाबत सुध्दा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत . . . .

त्यांनी महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. आम्ही या सर्व सूचना नक्की विचारात घेऊ. मी सभागृहाला विनंती करतो की, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाब क्र.57,97,98 बाबत प्रस्तावित केल्या प्रमाणे कृपया मान्यता द्यावी. धन्यवाद.

----

. . . .4 एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या पूरक मागण्यांसंबंधी मी उत्तर देण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सर्वसाधारणपणे 8 आमदारांनी आमच्या विभागाला मार्गदर्शन केले. यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत प्र.पाटील, माणिकराव ठाकरे साहेब सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे, सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे साहेब,माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब, सन्माननीय सदस्य सर्वश्री.परशुराम उपरकर, हुसेन दलवाई, राजन तेली आणि सुभाष चव्हाण यांनी मार्गदर्शन केले आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 21:20

श्री. रामराजे नाईक - निंबाळकर....

सभापती महोदय, कोकणातील ज्या प्रमुख मागण्या आहेत त्यापैकी खारभूमी संबंधी मला थोडेसे बोलावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांनी असा प्रश्न उपस्थित केलेला आहे की, यासाठी केवळ टोकन ग्रँट दिलेली आहे. त्यामुळे कोकणची कुचेष्ठा झालेली आहे. कोकणातील जवळ जवळ 181 खारभूमी विषयीचे प्रस्ताव शासनाकडे आलेले आहेत. यामध्ये पुनर्स्थापित होणारे क्षेत्र 20919 आहे. 20562 लाख एवढी अंदाजित तरतूद नाबार्डच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. टोकन ग्रँट ठेवली तर कामाची सुरुवात होते. ही एक कायदेशीर फॉर्म्यालिटी आहे. आठही प्रस्ताव सुरु करण्यासाठी नाबार्डमधून पैसे मिळणार आहेत, तेव्हा काम थांबणार नाही, एवढे मी या ठिकाणी निश्चितपणे सांगेन.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचे मनापासून अभिनंदन करावेसे वाटते कारण त्यांनी बिंबळा प्रकल्पा संबंधी मुद्दा मांडला आणि तो मंजूर करुन घेतला आहे. या प्रकल्पावर लिफ्ट तयार केलेली आहे. ही संपूर्णपणे ॲटोमायझेशन झालेली लिफ्ट आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आणि मलाही त्याची खात्री आहे की, एखाद्या शेतकऱ्यांनी या लिफ्टचे पाणी वापरावयाचे नाही असे ठरविले तर त्याचे पाणी किंवा त्याचे बिल कसे कमी करता येईल येथपर्यंत शंभर टक्के ॲटोमायझेशन दिलेले आहे. मी सन्माननीय सदस्यांना या ठिकाणी एकच आश्वासन देऊ इच्छितो की, ही लिफ्ट महाराष्ट्र शासनाच्या नियोजनाप्रमाणे 2012 पर्यंत पूर्ण करावयाची आहे. म्हणून बेंबळा प्रकल्पासाठी आणि या लिफ्टसाठी कुठलीही तरतूद कमी पडणार नाही, एवढेच मी या ठिकाणी निश्चितपणे सांगेन.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी काही आरोप केले, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काही आरोप केले. विरोधी पक्ष नेत्यांच्या आरोपाची दखल घेणे हे माझे कर्तव्य आहे असे मी मानतो. विदर्भातील इरिगेशनच्या संदर्भात दोन समित्या नेमण्यात आलेल्या आहेत. या दोन समित्यांचा स्टेटस काय आहे हे मला आज नेमकेपणाने सांगता येणार नाही परंतु सन्माननीय सदस्यांनी तीन प्रकल्पांच्या चौकशीची मागणी केलेली आहे. या चौकशीत हे प्रकल्प आढळून आले नाही तर त्याबाबत काय करावयाचे याचा विचार निश्चितपणे केला जाईल.

..2..

श्री. रामराजे नाईक - निंबाळकर....

सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांचे मला मनापासून अभिनंदन करावेसे वाटते. सिंप्रिकल सिस्टिम करणे आणि त्याला 100 टक्के अनुदान देणे हे गरजेचे आहे, असे मला वाटते. मला वाटते सिंप्रिकल सिस्टिम, ठीबक सिंचन या सगळयाच गोष्टी काळाची गरज झालेल्या आहेत. पाणी मर्यादित आहे. पाण्याचा वापर मर्यादित करणे आणि कमीत कमी पाण्यात शेतीचे जास्त उत्पन्न कसे घेता येईल यासंबंधात विचार करण्याची आवश्यकता आहे आणि शासन या बाबतीत निश्चितच जागरुक आहे. अनुशेषाच्या संदर्भात बीड-मांजरा खोऱ्याचा पाण्याचा विचार करावा, अशी त्यांनी मागणी केली आहे. काही साठवण तलावांची त्यांनी नावे या ठिकाणी सांगितली पंरतु ती नावे मला लिहून घेता आली नाहीत, त्यांनी ती नावे पुन्हा द्यावीत अशी विनंती मी करतो. सभापती महोदय, गोदावरी नदीचे पाणी नामदार प्रकाश सोळंके साहेबांच्या प्रयत्नाने येत आहे, त्याला गती देण्याचा शासन निश्चित प्रयत्न करील. नाथसागर प्रकल्प हा दुर्दैवाने जागतिक बँकेच्या एमडब्लूव्ही या योजनेत नसल्यामुळे त्याची दुरुसती कशी करावी, यासंबंधात शासन निश्चित वेगळया माध्यमातून विचार करील. उर्ध्व कुंडलिका प्रकल्पाची भूसंपदनाची तक्रार होती. त्यासंबंधीची बैठक बोलावण्यात येईल.

सन्माननीय आमदार श्री. रमेश शेंडगे या ठिकाणी अनुशेषाबद्दल बोलले आहेत. त्यांना मी एवढेच सांगू इच्छितो की, एकंदरीतच अनुशेषाचा विचार करण्यासाठी महाराष्ट्राच्या महामहिम राज्यपांलांनी नवीन समितीची स्थापना करण्यास सांगितलेले आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या सभागृहात दोन तासापूर्वी ही समिती स्थापन करण्यात आलेली आहे असे सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्यांच्या थोडयाफार तक्रारी असतील, निधी कमी असेल तर आता पश्चिम महाराष्ट्राला विचार करावा लागणार आहे की, शेवटी मागासलेल्या विभागाचा अनुशेष कमी करुनच पश्चिम महाराष्ट्रातील इरिगेशन प्रकल्पांसाठी पैसे घ्यावे लागणार आहेत. सभापती महोदस, मला या ठिकाणी सविस्तर उत्तर देता येणे शक्य नाही. परंतु ज्या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला त्यांचे जलसंपदा विभागामार्फत मी आभार व्यक्त करतो आणि सभागृहाने जलसंपदा विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करतो. धन्यवाद..

----

यानंतर श्री. बरवड....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ( सार्वजनिक आरोग्य, महिला व बालकल्याण, अल्पसंख्याक विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग तसेच अल्पसंख्याक विकास विभाग या विभागांच्या पुरवणी मागण्यांवर ज्या सन्माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये भाग घेऊन त्यांचे प्रश्न उपस्थित केले तसेच काही सूचना केल्या त्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या सूचनांचे मी स्वागत करते. त्यामध्ये सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, ॲड. उषाताई दराडे, श्री. उल्हास पवार, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री दिलीपराव सोनवणे, हुसेन दलवाई, परशुराम उपरकर यांनी चर्चेमध्ये भाग घेतला. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, ॲड. उषाताई दराडे तसेच डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महिला व बालकल्याण विभागाच्या संदर्भात ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचे स्वागत करते तसेच त्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्यातील दोन चार महत्वाच्या प्रश्नांचे उत्तर मी या ठिकाणी देऊ इच्छिते. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी काही तक्रारी केलेल्या आहेत. मलेलिया, फायलेरिया विभागाच्या इक्विपमेंट खरेदीबद्दल त्यांनी तक्रार केलेली आहे. मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, स्प्रे पंप, मायक्रोस्कोप, फॉगींग मशीन ही सर्व यातील खरेदी असते. मच्छरदाणीबाबत त्यांनी सांगितले. यातील एक उपाययोजना म्हणूनच मच्छरदाणीची खरेदी होत असते. ट्रायबल एरियाकरिता 5 कोटी रुपये आणि नॉन ट्रायबल एरियाकरिता 3 कोटी रुपये असे याचे बजेट असते. त्यांनी किट 'ए' आणि किट 'बी' बद्दल या ठिकाणी तक्रार केली. केंद्र सरकारच्या नार्म्सपेक्षा जास्त दराने खरेदी करण्यात आलेली आहे त्या बाबत सीबीआय चौकशी प्रोसेसमध्ये आहे. सीबीआयने ज्या रेकॉर्डसची मागणी राज्य शासनाकडे केली ती सर्व माहिती आपण त्यांना देत आहोत. याबद्दल मी या ठिकाणी जास्त खुलासा करत नाही कारण ती चौकशी प्रोसेसमध्ये आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मनोरुग्णालयाबद्दल या ठिकाणी उल्लेख केला. मनोरुग्णालयासंबंधीच्या समितीने जो अहवाल सादर केला त्यावर ॲक्शन प्लॅन तयार करण्याची कार्यवाही चालू आहे. त्याशिवाय वित्त मंत्र्यांसोबत या बाबतीत चर्चा झालेली आहे. आपल्याला पर बेड नॉर्म्समध्ये बदल करावयाचा आहे त्यामुळे पुढच्या आऊटलेमध्ये ते होणार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ....

आहे. एका मृत्यूबद्दल सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. त्या मृत्यूचे कारण ॲपिलेप्टीक विथ स्किट्सोफ्रेनिया या पध्दतीचे होते. दुसरा जो मृत्यू आहे त्याचे पोस्टमार्टेम झाले पण त्याचा अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे. पण सर्दीमुळे हे मृत्यू झालेले नाहीत असा खुलासा मला या ठिकाणी करावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी पुणे जिल्हा रुग्णालय इएसआयएस हॉस्पिटलच्या इमारतीमध्ये शिफ्ट होत आहे या बाबतचा उल्लेख केला. ओपीडी आणि वॉर्ड शिफ्ट झालेले आहेत. ऑपरेशन थिएटर दुरुस्तीचे काम झाल्यानंतर शिफ्ट होणार आहे. जी नवीन इक्विपमेंट्स लागणार आहेत त्याचा पुरवठा संचालनालयाकडून होणार आहे. बाकीचे पुष्काळ प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आले.

श्री. परशुराम उपरकर : शल्य चिकित्सकाच्या बदलीबाबतचा मुद्दा मी उपस्थित केला होता.

प्रा. फौजिया खान : बदलीच्या संदर्भात मागे आश्वासन दिलेले आहे आणि सभागृह संपल्यानंतर त्या बदलीच्या बाबतीत काय झालेले आहे, याची माहिती घेणार आहे. ती बदली लवकरात लवकर व्हावी अशी सगळ्या सभागृहाची भावना होती. मी त्याची माहिती घेते. जर आश्वासन दिले असेल तर ते पाळणार आहेच, असे मी सांगू इच्छिते. युनानी डॉक्टरांच्या बद्दल मुद्दा उपस्थित करण्यात आला. ते जिल्हा रुग्णालयामध्ये आणि ग्रामीण रुग्णालयामध्ये आहेत. 116 युनानी डॉक्टर्स आज राज्यात उपलब्ध आहेत. पण सन्माननीय सदस्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रासंबंधी प्रश्न उपस्थित केला त्याचा निर्णय सुध्दा आपल्याला लवकरात लवकर घ्यावयाचा आहे.

श्री. रमेश शेंडगे : मी कवठेमहांकाळ तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाचा प्रश्न उपस्थित केला होता.

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी वैयक्तिक भागातील जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्याचे उत्तर आम्ही जरुर देऊ. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची माझ्याकडे नोंद आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे साहेबांचे नाव घेतलेले नाही त्याबद्दल क्षमा मागते.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. किमान ज्या सन्माननीय सदस्यांनी त्या खात्याच्या संदर्भात आपल्या भावना व्यक्त केलेल्या असतील त्या सन्माननीय सदस्यांच्या नावांचा उल्लेख तरी माननीय मंत्री महोदयांनी करावा, एवढी आग्रहाची विनंती मी आपल्यामार्फत त्यांना करीत आहे.

**तालिका सभापती ( श्री. मोहन जोशी )** : माननीच मंत्री महोदयांनी चर्चेमध्ये भाग घेतलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या नावांचा उल्लेख करावा.

प्रा. फौजिया खान : मी सन्माननीय सदस्यांचे नाव घेतलेले आहे.

प्रा. सुरेश नवले : मी उत्तर ऐकत आहे. आपण माझे नाव घेतलेले नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले आहेत त्यांच्या मुद्यांची मी नोंद घेतली आहे. यामध्ये अल्पसंख्याक विभागाची एक महत्वाची बाब आहे. 15 कलमी कार्यक्रमाचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा यांनी उपस्थित केला होता. यासंदर्भात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी एक परिपत्रक काढले आहे. 15 कलमी कार्यक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात 15 टक्के निधी खर्च झाला पाहिजे, त्याची चर्चा डीपीडीसीमध्ये व्हावी असे कळविले आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण तसेच अल्पसंख्याक विकास विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्या अशी मी विनंती करते आणि माझे उत्तर संपविते.

-----

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, सन 2010-11 च्या आदिवासी विकास विभागाच्या मागण्यांवरील चर्चेत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते, श्री.हेमंत टकले यांनी भाग घेतला. या सर्वांचा मी आभारी आहे. या सन्माननीय सदस्यांनी अतिशय मौलिक सूचना केल्या आहेत. आपल्या सूचनांचा मी पूर्ण आदर करीत आहे.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी महिला व बालकल्याण विभागाच्या खात्याबाबत माझे नाव घेऊन एक मुद्दा मांडला होता. या विभागामार्फत मच्छरदाण्या खरेदी केल्याचा तो मुद्दा होता. त्याबाबत मंत्री महोदयांकडून उत्तर देण्यात आले आहे. तसेच गजाजन महाराज आश्रमशाळा बंद पडली आहे असे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आले आहे. हीच आश्रमशाळा त्याच संस्थेला शासन देण्यास तयार आहे असे त्यांना पत्र पाठविलेले आहे. गजानन संस्थेकडे पैसे आहेत. पण ही संस्था चालविण्यास ते तयार नाहीत. या संस्थेने हीच आश्रमशाळा चालविण्याची तयारी दाखविली तर त्यासाठी शासन उद्या सुध्दा पत्र देण्यास तयार आहे. त्यांनी अमरावती जिल्ह्यातील आश्रमशाळांबाबत खबरदारी घेण्यास सांगितले आहे. ही खबरदारी जरुर घेण्यात येईल.

राज्यात अनुदानित 551 आश्रमशाळा आहेत. शासकीय आश्रमशाळा 556 आहेत, अशा 1100 पेक्षा जास्त आश्रमशाळा असून त्यामध्ये 4 लाख 38 हजार मुले व मुली शिक्षण घेत आहेत. या आश्रमशाळांसाठी इमारतींची आवश्यकता आहे. अनुदानित आश्रमशाळा 551 आहेत. त्यांच्यासाठी 4 वर्षांचा कार्यक्रम केलेला आहे. पुढील 4 वर्षात या आश्रमशाळा नवीन चांगल्या इमारतींमध्ये शिफ्ट होतील. सध्या या आश्रमशाळा जुन्या इमारतीत आहेत. त्याचप्रमाणे मुलांचे व मुलींचे वसतिगृह वेगळे केले जाईल, स्वयंपाकगृह व काही शिक्षक गावात रहात नाहीत. अशा शिक्षकांची फ्लॅट सिस्टिमसारखी राहण्याची सोय केली जाणार आहे. या संपूर्ण शाळांच्या इमारतींसाठी यावर्षी 600 कोटींची तरतूद केलेली आहे.

सन्माननीय सदस्यांनी 82 आश्रमशाळांना लायसन्स स्थगित ठेवलेले आहे असे सांगितले आहे. आश्रमशाळा सुरु करण्यासाठी, आदिवासींची सेवा करण्यासाठी खूप लोक पुढे आले होते.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते....

त्यांनी आदिवासींची सेवा करतो असे सांगितले होते. आदिवासींची सेवा करुन आनंद घेण्यासाठी पुढे आले होते. पण या लोकांनी 15-15 वर्षे आश्रमशाळा चालविल्यानंतरही इमारती बांधल्या नाहीत. 15 वर्षानंतरही मुलांना व मुलींना स्वच्छतागृहासाठी जागा नाही, आंघोळीसाठी जागा नाही, पिण्याचे पाणी नाही, पाण्याची टाकी नाही. 2-3 शाळा तर अशा आहेत की तेथे शिक्षक 28 आहेत आणि मुलांची संख्या 22 इतकी आहे. अशा शाळा चालू ठेवावयाच्या काय ? सन्माननीय सदस्यांची मागणी आहे की, या शाळा चालू ठेवाव्या. ठीक आहे, या शाळा चालू ठेवण्यात येतील. पण मुलांची संख्या कमी असेल अशा शाळा बंद कराव्या लागतील. त्यामुळे थोडीशी अडचण होईल. काही गोष्टींबाबत शासनाला निर्णय घ्यावे लागतील. आदिवासी आयुक्तांनी शाळा स्थगित केली असेल तर त्यांनी अपील करावे. अपील केल्यानंतर त्या शाळा जून महिन्यापर्यंत अडचणी सोडवित असतील तर सगळयांना मुदतवाढ देऊ. शाळा बंद करणे हा काही पर्याय होऊ शकत नाही. पण त्या शाळांमध्ये सुधारणा झाली पाहिजे. तसेच शाळांची गुणवत्ता वाढली पाहिजे. 3 वर्षापूर्वी सांगितले होते की, गुणवत्तेमध्ये वाढ झाली पाहिजे. पण तरीही शाळांचे निकाल कमी लागले आहेत. कागदावर निकाल 100 टक्केच लागले आहेत. अशा शाळा बंद करु नका असे म्हणणे कितपत योग्य आहे ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 21:35

श्री. बबनराव पाचपुते ..

आदिवासी मुलांनी शिकावे, त्यांनी मुख्य प्रवाहात यावे असे अपेक्षित असेल तर काही कठोर निर्णय घ्यावे लागतील. शिक्षक हजर होतात त्यावेळी शाळा सुरु होतात आणि शिक्षक जातात त्यावेळी शाळा बंद होतात. शिक्षकांवर शाळेत येण्याबाबतचे बंधन नाही. म्हणून बायोमेट्रिक पध्दत अवलंबिण्याचा निर्णय घेतलेला आहे. शाळेमध्ये दोन वेळा आणि आश्रमशाळेत सकाळी आणि संध्याकाळी असे दोन वेळा बायोमेट्रिक पध्दतीने शिक्षकांची हजेरी घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच शिक्षकांना यशदा मार्फत प्रशिक्षणही देण्यात येण्ार आहे. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी ठाकर समाजाला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची सूचना केली. यासंदर्भात हायकोर्टाने सूचना दिलेल्या आहेत. त्या लोकांना जातपडताळणी समितीकडे कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल. या ठाकर लोकांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केली तर त्यांच्या बाबतीत निर्णय घ्यावा अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी आश्रमशाळेतील मुलामुलींना समान आहार मिळाला पाहिजे, अनुदानित आश्रमशाळांमध्ये आवश्यक त्या सुविधा नसतात असे सांगितले. आश्रमशाळामध्ये आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्यासंबंधीचा निर्णय घेतलेला आहे. गेल्या वर्षी अन्नधान्याच्या बाबतीत तक्रारी आल्या होत्या. परंतु या वर्षी त्या आलेल्या नाहीत. कारण अन्नधान्य खरेदी केल्यानंतर त्यांचे नमुने पाठवून मुख्याध्यापकांना सूर्योदयापूर्वी अन्नधान्य नमुन्याप्रमाणे असले तरच गाडी खाली करुन घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. चुकीच्या नमुन्याच्या अन्नधान्याची गाडी खाली करुन घेतली गेली तर मुख्याध्यापकांना जबाबदार धरण्यात येईल असेही सांगितलेले आहे. तसेच तीन-तीन महिन्याचे धान्य दिले जात असल्यामुळे धान्याबाबतच्या आता तक्रारी आलेल्या नाहीत. थोडेसे नियोजन केले तर हे होऊ शकते आणि तशा प्रकारचे नियोजन विभागाने केलेले आहे.

सभापती महोदय, मुलामुलींना सारखाच आहार दिलेला आहे. परंतु अनुदानित आश्रमशाळांच्या बाबतीत तक्रारी आलेल्या आहेत. त्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता असून तो आम्ही घेणार आहोत. आदिवासी विभागासाठी यावर्षी 9 टक्के तरतूद केलेली आहे. अन्य सर्व खात्यांच्या तरतुदी कमी केल्यामुळे आदिवासी विभागाची तरतूद देखील कमी करण्यात आलेली आहे. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी ठरवून दिल्याप्रमाणे आदिवासी विभागाला पैसे मिळतात

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

ही वस्तुस्थिती आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आदिवासींच्या विकासाच्या संदर्भात, शिक्षणाच्या संदर्भात, त्यांच्या उन्नतीच्या संदर्भात सूचना केलेल्या आहेत. त्या सूचनांचा जरुर विचार केला जाईल. तेव्हा बाब क्रमांक 99 ते 108 वरील मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, सर्वश्री. जयंत प्र.पाटील, धनंजय मुंडे, भगवानराव साळुंखे, राजन तेली, रामनाथ मोते, प्रा. सुरेश नवले तसेच माननीय विरोधी पक्षनेता श्री. पांडुरंग फुंडकर यांनी अतिशय महत्वाच्या सूचना व मार्गदर्शन केले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या बहुतांश मागण्या ह्या शासनाच्या धोरणाशी निगडित आहेत. त्यामुळे त्यामध्ये जास्तीत जास्त लक्ष घालून न्याय देण्याचा प्रयत्न शासना तर्फे केला जाईल. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मुंबई विद्यापीठाच्या आणि चिनॉय कॉलेजच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्न उपस्थित केले. मुंबई विद्यापीठाला नॅकचा दर्जा देण्याबाबत कारवाई सुरु आहे. मुंबई विद्यापीठाचा सन 2008-2009चा वार्षिक अहवाल लवकरच सभागृहाला सादर होईल. चिनॉय कॉलेजच्या बाबतीत उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांकडे सुनावणी झाली. हे कॉलेज सुरु ठेवून विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही यादृष्टीने कारवाई करणे चालू आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत.........

माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी बुलढाण्यातील कॉलेजबद्दलचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबद्दल जरुर लक्ष घालून शासन योग्य ती कारवाई करेल. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी खामगाव येथील शासकीय तंत्रनिकेतनामध्ये प्राध्यापक आणि संगणक तज्ज्ञ पदाबाबत सूचना केली आहे. माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सिंधुदुर्ग जिल्हयातील मल प्रक्रिया ट्रेडमध्ये लक्ष घालण्याबाबत सूचना केली आहे. तासिका तत्वावर नेमणूक न करता कायमस्वरुपी प्राध्यापक नेमण्यात यावेत, आयटीआयमधील यंत्रसामुग्री जीर्ण झाली आहे, स्टायपेंडची रक्कम वाढवावी अशी सूचना केली आहे. माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी 50 टक्के प्राध्यापक तासिका तत्वावर काम करीत आहेत, त्यांना कालबध्द पदोन्नतीची तरतूद करण्याबाबत विनंती केली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी माननीय सदस्यांच्या मुद्यांची पुनरावृत्ती करण्यापेक्षा शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे हे सांगितले पाहिजे.

श्री.डी.पी.सावंत : बहुतांश माननीय सदस्यांनी हेच सांगितले की, आयटीआयमध्ये पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्रात अधिव्याख्यात्यांची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. जसजशी नावांची शिफारस येत आहे तसतशी पदे भरण्याची प्रक्रिया केली जात आहे. माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सांगितले की, 2004-05 पासून 100 टक्के अनुदानावर आलेल्या महाविद्यालयांना अद्याप अनुदान मिळालेले नाही. असे होणे योग्य नाही. नक्की हे अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी ही बाब तपासून घेण्यात येईल. अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या महाविद्यालयांना अनुदान उपलब्ध करुन दिले जाईल. माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी कायम विनाअनुदान तत्वावरील महाविद्यालयातील प्राध्यापकांना पुरेसे वेतन न मिळण्याबाबत ऊहापोह केला आहे. शासनाचे निकष असल्यामुळे या संदर्भात शासनाच्या धोरणामध्ये 'कायम' शब्द काढण्यासाठी प्रयत्नशील आहोत. ते होईल त्यावेळी नक्की याबाबत चर्चा करता येईल. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 124 ते 130 प्रस्तावित केल्याप्रमाणे सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या मार्च, 2011 च्या पुरवणी मागण्यांवर माननीय सदस्या ॲड.उषा दराडे, डॉ.नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, परशुराम उपरकर, दिलीपराव सोनवणे, हुसेन दलवाई, भगवानराव साळुंखे, राजन तेली, रामनाथ मोते, प्रा.सुरेश नवले यांनी आपले विचार मांडले, मार्गदर्शन केले त्याबद्दल मी सर्वप्रथम त्यांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, सूर्य थोडा वर आला की हे सभागृह सुरु होते आणि सूर्य पश्चिमेला अस्त झाला तरी याठिकाणी तळमळीने प्रश्न मांडले जातात. लोक आपापल्या राहुटीत गेले तरी या ठिकाणी जनतेचे प्रश्न तडफेने मांडण्यासाठी हे सभागृह आणि माननीय सदस्य आहेत त्याबद्दल मी मनापासून आनंद व्यक्त करु इच्छितो. मी मागच्या वेळी माझ्या मतदारसंघात असताना कोणीतरी प्रश्न विचारला की, शिक्षक आमदार आपल्याला भेटतात की नाही? मी म्हटले, भेटतात? शिक्षक आमदार सभागृहात सकाळी लवकर येतात आणि त्यानंतर ते स्वत:ही झोपत नाहीत आणि आम्हालाही झोपू देत नाहीत. इतक्या चांगल्याप्रकारे या सभागृहात आज पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली, त्याबद्दल मनापासून आभार मानतो. आज याठिकाणी वृत्तपत्राचे प्रतिनिधी कमी प्रमाणात उपस्थित असले तरी हरकत नाही. परंतु जे उपस्थित आहेत त्यांचा मी आभारी आहे. शेवटी याठिकाणी जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी आपण बसत असतो. जे कर्मचारी उपस्थित आहेत ते सुध्दा कधी घरी पोहोचणार आणि उद्या सकाळी सभागृहाची विशेष बैठक आहे की नाही या विवंचनेत असतील.

नंतर 5एन.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा ........

येथे उपस्थित केलेल्या मुद्यांच्या बाबतीत मी अत्यंत थोडक्यात माझे म्हणणे मांडणार आहे. गेल्या वर्षभरात शालेय शिक्षण विभागात प्राथमिक शिक्षणासाठी शासनाने मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याच्या कायद्याची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे केली. प्राथमिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण व्हावी, आनंददायी शिक्षण मिळावे म्हणून सर्वंकष मूल्यमापन पध्दती देखील आपल्या राज्यात सुरु झाली आहे. राज्यातील शाळांची गरज लक्षात घेऊन शासनाने बृहत आराखडा व स्कूल मॅपिंग योजना देखील राज्यात सुरु केली व त्या माध्यमातून मूलभूत सुविधा निर्माण करण्याचे काम या राज्यात करण्यात आले. माध्यमिक स्तरावर एकात्मिक योजनेतून युनिटची स्थापना झाली आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा जवळपास 500 शाळांमध्ये आपण संगणकाची व्यवस्था केली. त्याऐवजी 2800 नवीन शाळांमध्ये आपण संगणक प्रयोगशाळा उभारण्याचे काम यावर्षी सुरु करीत आहोत. सन 2011 या वर्षात एमएमआरडीए क्षेत्रात अकरावीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली असून राज्यातील कायम विना अनुदानित शाळांबाबत सांगायचे झाल्यास "कायम" हा शब्द काढल्यानंतर सन 2012-13 मध्ये अनुदानासाठी येणाऱ्या शाळांबद्दलचा उल्लेख येथे झाला. त्या अनुषंगाने मी असे सांगणार आहे की, अशा शाळांचे मूल्यांकन निकष सुध्दा शासनाने ठरविलेले आहेत. आता ही पध्दती शेवटच्या टप्प्यात असून वित्त विभागाकडे या विषयाची नस्ती गेली आहे. येत्या आठ-पंधरा दिवसांमध्ये हे निकष सुध्दा ठरतील, अशी मी खात्री देतो.

महोदय, सभागृहात सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी बीड जिल्ह्यातील एका शाळेला एक महिन्यापासून शिक्षक रजेवर गेल्यामुळे कुलूप असल्याचा मुद्दा उपस्थित केला, हा मुद्दा मी तपासून पाहतो. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्कूल बससारख्या महत्वाचा मुद्दा उपस्थित केला असून त्यांनी यासंबंधी आचारसंहिता असावी अशीही अपेक्षा व्यक्त केली आहे. त्या अनुषंगाने मागील काळात एक निर्णय झाला होता व त्या निर्णयाची तपासणी मी जरुर करणार आहे. पण विद्यार्थ्यांची सुरक्षा ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे आणि त्याच पध्दतीने आपण म्हणालात की रिक्षात 10-12 मुलांना कोंबून बसविले जाते, त्याबद्दल निश्चितच आचारसंहिता अतिशय कडक करावी लागेल, याचाही विचार करावा लागेल. यासंदर्भात मी माजी शिक्षण मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याशी चर्चा केलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी बुलढाणा जिल्ह्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाचा दुसरा हप्ता

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा.....

मिळण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला असून त्या अनुषंगाने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, शासनाने याबाबतचे आदेश दिले असून निधी सुध्दा उपलब्ध करुन दिलेला आहे. जिल्हा स्तरावर दुसरा हप्ता देण्याबाबत काही अडचणी असल्यास त्याची तपासणी केली जाईल. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव सोनवणे यांनी शाळांमध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, वॉल कम्पाऊंडसारख्या सुविधा नसल्याचे सांगितले. यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की, सर्व शिक्षा अभियान योजनेच्या माध्यमातून हे काम मोठ्या प्रमाणावर चालू असून दोन दिवसातच यासंबंधीचा प्रश्न सभागृहात उपस्थित होणार आहे. त्या प्रश्नाला उत्तर देताना याबाबतची सविस्तर माहिती देता येईल. तसेच या ठिकाणी शिक्षकांच्या नवीन आकृतिबंधाबाबत बोलताना असा आकृतिबंध रद्द करावा, अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ मान्यता द्यावी, 54 शाळांना अनुदान द्यावे, शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करावी अशा प्रकारे अनेक प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले आहेत. त्याबाबत मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, वेतनेतर अनुदानाच्या बाबतीत शासन सहानुभूतीने विचार करणारच आहे. तसेच शिक्षण सेवकांच्या अनुदानात वाढ जोपर्यंत करणार नाही तोपर्यंत हा प्रश्न सभागृहात मांडला जाईल असेही सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्यांना मी सांगू इच्छितो की, शिक्षण सेवकांचा प्रश्न सुटेपर्यंत आपण मांडतच राहणार पण आपण चिंता करु नका तो प्रश्न सुटेपर्यंत या प्रश्नाला मी नेहमीच उत्तर देत राहणार, याची आपण खात्री बाळगावी.

सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांनी 20 जुलै 2009 च्या जी.आर. नुसार कायम शब्द शासनाने काढला असला तरी शाळांच्या मूल्यांकनाबाबतचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. मूल्यांकनाची बाब आता शेवटच्या टप्प्यात असल्याचे मी मघाशीच सांगितले. तसेच 2002 पूर्वीच्या अपंग शाळांना अनुदान देण्याची मागणी केली त्याबद्दल मी सांगू इच्छितो की, केंद्र शासनाच्या अपंगांकरिता एकत्रिकृत योजनेच्या माध्यमातून प्राथमिक योजना बंद करण्यात आली आहे, मात्र या शाळांतील शिक्षकांना इतरत्र सामावून घेण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी एसएससी बोर्डाचा प्रश्न उपस्थित केला असून त्या अनुषंगाने मला सांगावयाचे आहे की, मागील वर्षी यासंबंधी 3 कोटीची तरतूद करण्यात आली असून ही गोष्ट खरी आहे की, मागील वर्षी या योजनेला गती येणे आवश्यक होते. पण पुढील काळात निश्चितपणे या योजनेला गती मिळेल. तसेच धारेश्वर विद्या मंदिराचाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे...

यानंतर श्री. जुन्नरे .......

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ 21:50

श्री. राजेंद्र दर्डा...

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी चर्नी रोड येथील कार्यालयात पैसे दिल्याशिवाय मान्यता दिली जात नाही, असा उल्लेख केलेला आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, 2010-11 या वर्षापासून माध्यमिक शाळेतील वैयक्तिक मान्यता संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे. या विषयाच्या संदर्भात ज्या गोष्टी व्हावयाच्या, त्याची मला देखील कल्पना आहे. आतापर्यंत सर्व काम मॅन्युअली होत असे. परंतु आता वैयक्तिक मान्यता देतांना संगणकाच्या माध्यमातून देण्याचे शासनाने ठरवले आहे. त्यामुळे यावर्षी माध्यमिक, प्राथमिक व उच्च माध्यमिकच्या वैयक्तिक मान्यतेच्या संदर्भात काळजी घेतली जाणार आहे. शेवटी एवढेच सांगतो की, आज जरी आपण पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असलो तरी सभागृहात आपण दररोज शिक्षण विभागावर चर्चा करीत असतो. जे काही प्रश्न राहिले असतील त्या प्रश्नांवर आपण येत्या दीड महिन्याच्या काळात चर्चा करु या. मी आपल्या माध्यमातून सभागृहाला विनंती करतो की, मागणी क्रमांक इइ-1 मधील 9 कोटी 25 लक्ष भारीत खर्चाची व मागणी क्रमांक इ-2 मधील 9 कोटी 25 लक्ष 51 हजार रुपयांची पुरक मागणी मान्य करावी.धन्यवाद...

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, चर्नी रोडच्या कार्यालयातील व्यक्तींच्या नावांचा उल्लेख केलेला आहे, त्यामुळे यासंदर्भात चौकशी करण्याची आवश्यकता आहे. न्यायालयाने त्यांचे पीटिशन डिसमिस करुन सुध्दा जर मान्यता दिली जात नसेल आणि मान्यतेसाठी जर दोन दोन वर्षे लागत असतील तर या संदर्भात गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे. अन्यथा या सभागृहाचे पावित्र्य राहणार नाही.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मला सभागृहात माहिती दिलेली असल्यामुळे, सन्माननीय सदस्यांची बाब निश्चितपणे तपासून घेण्यात येईल. जर एखादी व्यक्ती यामध्ये दोषी आढळली तर त्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल, एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

-------------

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ( वस्त्रोद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, वस्त्रोद्योग विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले व सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. बीड जिल्हयामध्ये कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असते. त्यामुळे साहजिकच कापसावर प्रक्रिया करणारी कारखानदारी बीड जिल्हयात उभी रहावी, यासाठी सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली आहे. वस्त्रोद्योग विभागाचे नवीन धोरण लवकरच जाहीर होणार असून या वस्त्रोद्योग धोरणामध्ये कापूस उत्पादक प्रदेश म्हणजेच मराठवाडा, विदर्भ व खानदेशामध्ये कापसावर प्रक्रिया होणारी कारखानदारी उभी रहावी,अशी शासनाची भूमिका आहे व त्यासाठी जी काही मदत करावी लागणार आहे, ती मदत शासनाकडून वस्त्रोद्योग विभागाला निश्चितपणे केली जाणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री. ज़मा साहेबांनी हातमाग विणकरांची परिस्थिती सुधारण्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची अपेक्षा केलेली आहे. मला सभागृहाला सांगावयाचे आहे की, बाब क्रमांक 118 च्या माध्यमातून 1 कोटी 22 लक्ष 46 हजार रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे तिचा उद्देश असा आहे की, महाराष्ट्रात ज्या हातमाग विणकर संस्था आहेत त्यांचा 50 टक्के बोजा कमी करण्याचे शासनाने मान्य केलेले आहे व त्यासाठीच ही मागणी करण्यात आलेली आहे. या मागणीच्या माध्यमातून नागपूर, सांगली या दोन जिल्ह्यातील सहकारी संस्थांचा कर्जाचा 50 टक्क्यांचा भार शासनामार्फत उचलला जाणार आहे. या ठिकाणी मी सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले व सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा दोन्ही सदस्यांचे आभार मानतो व सभागृहाला विनंती करतो की, बाब क्रमांक 118 ची मागणी मान्य करावी. धन्यवाद.

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, कामगार विभागाच्या संबंधित सन 2010-11 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या दरम्यान आदरणीय सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, एस.क्यू.ज़मा यांनी चर्चेत भाग घेतला.

या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी घरेलू कामगार मंडळाच्या संदर्भातील महत्वाचा विषय उपस्थित केलेला आहे. महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ व महाराष्ट्र घरेलू कामगार सल्लागार समितीची यादी प्रसिध्द केलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित......

सगळयात महत्वाचे असे आहे की, घरेलू कामगार मंडळाच्या संदर्भात आपण सतत पाठपुरवा केलेला असल्यामुळे मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. मला आमदारापासून ते मंत्रीपदापर्यंत माननीय सोनिया गांधीनी सहकार्य केलेला असल्यामुळे मला महिलांच्या संदर्भात विशेष आदर आहे. मघाशी आपण उल्लेख केला की, घरेलू कामगारांसाठी निधी उपलब्ध करण्यात आलेला नाही. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन 2010-12 मध्ये जवळ जवळ 6.5 कोटी निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

त्याच प्रमाणे न्याय मूर्ती पद्मनाभन समितीच्या शिफारसीनुसार औद्योगिक व कामगार न्यायालयामधील न्यायाधीशांसाठी 1.1.2006 पासून रुपये 3 कोटी 75 लाख 12 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत. तसेच सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीनुसार 48.80 लाखाची मागणी सुध्दा सादर करण्यात आलेली आहे. यामधून फास्ट ट्रॅक न्यायालयाची स्थापना करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी विचार व्यक्त केले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा यांना मी सांगू इच्छितो की, कंत्राटी कामगारांच्या संदर्भात आघाडी सरकारने अतिशय चांगले निर्णय घेतलेले आहेत. कोणत्याही कारखान्यात 100 पेक्षा अधिक कामगार असतील तर त्या कामगारांना आपण टप्प्या टप्प्याने कायमस्वरुपी करणार असून जो अन्यायकारक कायदा आहे तो ॲबॉलीश करण्यात येईल एवढे मी यानिमित्ताने सांगू इच्छितो.

त्याच प्रमाणे इमारत मंडळाच्या स्थापनेच्या संदर्भातील फाईल माझ्याकडून क्लिअर झालेली असून आता ही फाईल कॅबिनेटमध्ये गेलेली आहे. त्यामुळे इमारत मंडळाची लवकरच स्थापना केली जाणार आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भातील बाब क्रमाक 39 वरील एकूण खर्च 4 कोटी 23 लक्ष 92 हजार रुपये असून या खर्चाची पूरक मागणी सभागृहापुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आलेली आहे. कृपया त्यास सभागृहाने मंजुरी द्यावी ही विनंती.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर (कृषी राज्यमंत्री ) पशुसंवर्धन व जलसंधारण विभागाच्या मागणी संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, रमेश शेंडगे, राजन तेली, भगवान साळुंखे, डॉ. नीलम गो-हे व प्रा. सुरेश नवले यांनी अतिशय चांगल्या सूचना केलेल्या असून काही मुद्याच्या संदर्भात मार्गदर्शनही केलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी लाल्या-खुरकुत लस उपलब्ध करण्याच्या संदर्भात मागणी केलेली आहे. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, ही योजना राज्यामध्ये पूर्वी 75/25 टक्के या हिस्साने चालत होती आता या लशीवर केंद्रशासन 100 टक्के अनुदान देत आहें. त्यामुळे केंद्र शासनाच्या माध्यमातून या लशी मोठया प्रमाणात उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. हा रोग 100 टक्के नष्ट करण्याच्या संदर्भात शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी परिवहन सेवेमध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. आज परिवहनचा विषय नसला तरी सुध्दा मी आपल्याला सांगू इच्छितो की, शालेय विद्यार्थ्यांना एकाच वाहनात कोंबून शाळेमध्ये किंवा शाळेतून घरी आणले जाते परतु जास्त गर्दीमुळे या वाहनांना अपघात होत असतात. परवाच यासंदर्भातील अपघात पुणे येथे घडलेला असून यासंदर्भातील सविस्तर माहिती सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे. या विषयाच्या संदर्भात विभागाने धोरण आखले असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी ठोस उपाययोजना केली जाणार आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी सूचना केली आहे की, बीड जिल्हयात दवाखान्यातील 162 पदे रिक्त आहेत. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात ज्या काही अडचणी असतील त्या संदर्भात सचिवांसोबत बैठक घेऊन तोडगा काढण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर...

त्याचप्रमाणे त्यांनी परळी वैजनाथ येथील पूलाखालील असलेला दवाखाना स्थलांतरीत करण्याबाबत सूचना केली आहे. सदरचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्याबाबत ताबडतोबीने कारवाई केली जाईल. माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी जल संधारणाच्या संदर्भात सूचना केली आहे की कवठे महाकाळ तालुक्यात अनेक वर्षापासून पाझर तलावाच्या दुरुस्तीसाठी निधीची मागणी करण्यात येत असून शासनाने निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. त्याबाबत राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या जल स्त्रोतांची दुरुस्ती, नूतनीकरण आणि पुनर्स्थापना या कार्यक्रमामध्ये केंद्राकडून 3-आर योजनेंतर्गत सन 2011-12 मध्ये 120 कोटींचा निधी प्रस्तावित केला आहे व त्या बाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. शासनाने तयार केलेल्या एकत्रित योजनेमध्ये आपल्या योजनेचा समावेश करण्यात येईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी कोकणामध्ये पशुधन कमी असल्यामुळे दुधाचे संकलन कमी होत असून ते वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचना केली. कोकणामध्ये पशुधन वाढीसाठी केंद्र सरकारची आरकेव्हीवाय ही योजना असून त्या माध्यमातून कृत्रिम रेतनाचा कार्यक्रम हाती घेण्यात येतो. सदर कार्यक्रमाच्या माध्यमातून जलद गतीने ही योजना राबवून जास्तीत जास्त कृत्रिम रेतनाव्दारे पशुधनामध्ये वाढ कशी करता येईल यासाठी धडक कार्यक्रम नुकताच हाती घेतला आहे. त्यासाठी कोकणामध्ये केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. त्याठिकाणी आयडीएफ-3 या योजनेव्दारे 100 टक्के संकरित गाई आणि म्हशींचा प्रकल्प कोकणातील दुग्ध संस्थांच्या परिक्षेत्रामध्ये स्थापन करण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्याला सुध्दा गती देण्याचे काम लवकरात लवकर केले जाईल. जेणेकरुन कोकण, विदर्भ,पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडयाच्या जिल्ह्यांमध्ये सुध्दा ही योजना राबविण्याबाबत लक्ष घालण्यात येत आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी शेळी-मेंढी महामंडळाला 25 कोटींचा निधी देण्यात यावा अशी मागणी केली आहे. त्याबाबत निश्चितपणे सांगू इच्छितो की, आमच्या विभागामार्फत 10 कोटींचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो मंजूर करुन घेण्यासाठी माननीय अर्थमंत्र्यांकडे पाठपुरावा केला जाईल. राज्यामध्ये शेळी-मेंढींचे उत्पादन वाढले पाहिजे व हे महामंडळ मजबूत झ ााले पाहिजे यासाठी आपण नेहमी चांगल्या विधायक सूचना करीत असल्यामुळे या प्रश्नाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.गुलाबराव देवकर....

बाबतीत निश्चितपणे लक्ष घातले जाईल यादृष्टीने एक चांगले ठोस धोरण तयार करण्याचा आमचा मानस आहे.

श्री. रमेश शेंडगे : शेळी-मेंढी पालन हा एक शेती पूरक व्यवसाय मानला गेला पाहिजे.

श्री. गुलाबराव देवकर : त्याबाबत निश्चितपणे सकारात्मक विचार केला जाईल. माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी गुरांचे खाद्य असलेल्या पेंडीमध्ये नट बोल्ट, माती आणि वाळू इत्यादींचे मिश्रण केले जाते त्यामुळे मोठया प्रमाणात पशुधन दगावते, पशुधनाची हानी होते अशी गंभीर बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली. ज्याठिकाणी असे प्रकार होत असतील त्या ठिकाणची माहिती तात्काळ घेतली जाईल आणि अहवाल मागविला जाईल.असे प्रकार कुठे होत असतील तर त्याबाबत कडक कारवाई करण्याचे माझ्या खात्याचे धोरण असेल असे मी आश्वासन देतो. मी सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून आभार मानतो. याठिकाणी पशुसंवर्धन विभागाच्या बाब क्रमांक 30, 31, 32 या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात. त्याचप्रमाणे जलसंधारण विभागाच्या बाब क्रमांक 73, 74 मागण्या देखील सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी. पी. सावंत (विशेष सहाय्य राज्य मंत्री) : सभापती महोदय, विशेष सहाय्य विभागाच्या बाब क्रमांक 82 मध्ये 4 कोटी 92 लाख 55 हजार इतक्या रकमेच्या योजनेतर मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली होती. विशेष सहाय्य विभागाच्या बाब क्रमांक 82 मध्ये प्रस्तावित केलेल्या 4 कोटी 92 लाख 55 हजार रुपयांच्या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे (पर्यावरण व सांस्कृतिक कार्यमंत्री) : सभापती महोदय, आज पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य विभागाच्या मागण्यांवर बोलताना खालील सन्माननीय सदस्य म्हणजे सर्वश्री. धनंजय मुंडे, उल्हासदादा पवार, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे, रमेश शेंडगे, परशुरामजी उपरकर, हुसेनजी दलवाई, प्रकाशजी बिनसाळे व सुभाष चव्हाण यांनी चर्चेमध्ये भाग घेतला. मी त्यांना पहिल्यांदाच आश्वस्त करु इच्छितो की, आपण ज्या काही बाबी नोंदविलेल्या आहेत, त्याची निश्चितपणे नोंद घेऊन, त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार यांनी शासनाचे अभिनंदन केले की, पुण्यातील भरत नाट्य संशोधन संस्था ही 115 वर्षापासूनची जुनी संस्था असून ती कार्यरत आहे. त्याला पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यांनी जी सूचना केली आहे, त्याबाबत मी सांगू इच्छितो की, ज्या 100 वर्षे पूर्ण झालेल्या संस्था आहेत आणि त्या कार्यरत असतील आणि चांगल्या प्रकारे काम करीत असतील तर निश्चितपणे त्यांना अशा पध्दतीचे अनुदान देऊन त्यांचे नूतनीकरण किंवा त्यांच्या समस्या दूर केल्या जातील. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना निश्चितच स्वागतार्ह आहे.त्या दृष्टीकोनातून शासन निश्चितच याचा विचार करील. या सोबतच प्रामुख्याने तुकाराम महाराज बीज चुतर्शताब्दीच्या संदर्भात सुध्दा सांगितले. त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली आहे, तसेच कार्यकारी समिती आहे. त्याबाबत निश्चितपणे बैठक घेऊन याला गती दिली जाईल. यामध्ये नियोजन विभागाकडून जो काही निधी द्यावयाचा आहे, तो उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश झाले आहेत. त्या बाबत मी स्वत: आढावा घेऊन, याला गती देऊन आपल्याला चतुर्शताब्दी महोत्सव साजरा करावयाचा आहे ते केले जाईल. आपल्याला माहिती आहे की, या राज्याचे पहिले मुख्यमंत्री माननीय श्री.यशवंतरावजी चव्हाण यांनी सुरुवातीला राज्य स्थापन झाले तेव्हा राज्याच्या विकासा बरोबरच साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना केली आणि विकासासोबत साहित्य संस्कृती मंडळामार्फत सांस्कृतिक घडामोडींना चालना मिळावी यासाठी तेव्हा पासूनच प्रयत्न होत आहेत. या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने राज्य शासनाने सांस्कृतिक धोरण जाहीर केलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेमध्ये वाच्यता केलेली असून याची माहिती वेबसाईटवर उपलब्ध आहे. त्यात विविध मान्यवरांनी सुध्दा सूचना दिलेल्या आहेत, त्याचा सर्वोपांग सारांश घेऊन त्या पध्दतीने पुढील सांस्कृतिक दिशा ठरविण्याच्या दृष्टीकोनातून शासनाचा प्रयत्न रहाणार आहे.या ठिकाणी ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे . . . .

सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी प्रामुख्याने सांगितले की, रत्नागिरी येथे नाट्य संमेलन झाले आणि मे 2010 मध्ये अमेरिकेतील न्यू जर्सी येथे नाट्य संमेलन झाले होते आणि त्या करता शासनाने 50 लाख रुपयांचे अनुदान उपलब्ध करुन दिलेले आहे. तसेच पंचगंगा नदीच्या प्रदूषणाच्या बाबतीत देखील सांगितले. याकरता केंद्र शासनाने नदी संवर्धन योजनेअंतर्गत 7.38 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला असून, त्याचे काम सुरु झालेले आहे. तसेच सिंगल स्क्रीन थिएटरबाबत मुद्दा मांडलेला आहे. पण करमणूक विभाग हा महसूल विभागाच्या अंतर्गत येतो. त्यामुळे संबंधित विभागाच्या माननीय मंत्री महोदयांना याबाबत निश्चितपणे विनंती केली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी म्हटले आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर शासनामार्फत चित्रपट काढण्यात यावा. त्याबद्दल शासन दरवर्षी एक चित्रपट काढण्यासाठी अनुदान देत असते, त्या दृष्टीकोनातून निश्चितपणे विचार केला जाईल. याठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री.परशुराम उपरकर आणि राजन तेली यांनीही मुद्दा उपस्थित केला. प्रामुख्याने माधवरावजी गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली वेस्टर्न घाट समिती ही केंद्र शासनाने नेमलेली आहे. त्या माध्यमातून दि.30-06-2011 पर्यंत तेथे नवीन खाण प्रकल्पासाठी बंदी आलेली आहे. यामध्ये जुन्या प्रकल्पांच्या बाबतीत कोणतीही बाधा आलेली नाही. सध्या दि.30-06-2011 पर्यंत बंदी आहे. त्यानंतर विकासाच्या दृष्टीने काही अडचणी येत असतील तर निश्चितपणे याबाबत केंद्रीय पर्यावरण मंत्री महोदयांकडे पाठपुरावा केला जाईल.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे....

सभापती महोदय, याबाबत केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांकडे पाठपुरावा केला जाईल. या ठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा निश्चितपणे विचार कला जाईल. सभापती महोदय, मी सभागृहाला विनंती करतो की, पर्यावरण विभागाच्या बाब क्रमांक 109,110 तसेच सांस्कृतिक कार्य विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने संमत कराव्यात अशी विनंती करतो.

श्री. उल्हास पवार : ग्रामगीतेच्या संदर्भात मी मुद्दा मांडला होता, त्यासंदर्भात खुलासा करण्यात यावा.

श्री. संजय देवतळे : ग्रामगीतेचा 125 कोटी रुपयांचा आराखडा मंजूर केलेला आहे. ग्रामगीता प्रत्येक गावात पोहचली पाहिजे अशा प्रकारची सूचना आहे. या सूचनेचा निश्चितपणे विचार केला जाईल. सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभागच्या बाब क्रमांक 140 आणि 104 या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती** : सन 2010 - 2011 च्या पूरक विविरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चा नंतर घेण्यात येतील.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 22 मार्च,2001 दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 10 वाजून 11 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 22 मार्च, 2011 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही